
ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०

साहित्यिक शंकरराव खरात यांना जन्मशताब्दी वर्षानिमित्त

विनम्र अभिवादन



# माडगूळकर कुटुंबीयांनी साहित्य परिषदेत केले गदिमांना अभिवादन



## महापौरांनी दिलेला शब्द पाळावा : प्रा. मिलिंद जोशी

पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते गदिमांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, त्यांच्या ग्रंथाचे पूजन करून, गदिमांची पणती पलोमा हिने गदिमांच्या कविता सादर करून, पणतू मृगांकने गीत सादर करून, नात लीनता आंबेकर, नातसून प्राजक्ता माडगूळकर, उल्हास आणि विनया बापट यांनी काव्यवाचन करून आणि कुटुंबातील सदस्यांनी आठवणी जागवत 'महाराष्ट्रवाल्मिकी ग. दि. माडगूळकर' यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्र साहित्य परिषदेत गदिमांना अभिवादन केले. गदिमांचे चिरंजीव आनंद माडगूळकर, सून स्मिता माडगूळकर, नातू सुमित्र माडगूळकर, नातसून प्राजक्ता माडगूळकर, पणती पलोमा माडगूळकर, नात लीनता आंबेकर, नातजावई अलोक आंबेकर ,पणतू मृगांक आंबेकर, प्रा. उल्हास बापट, संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे, साहित्यिक न. म. जोशी, नगरसेविका माधुरी सहस्रबुद्धे, गदिमा प्रतिष्ठानचे विश्वस्त राम कोल्हटकर, भैयासाहेब देशपांडे, राजेश कुलकर्णी, संवादचे सुनील महाजन, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनीताराजे पवार, प्रमोद आडकर, दीपक करंदीकर, उद्धव कानडे, बंडा जोशी, राजन लाखे यावेळी उपस्थित होते.

महापौर मुरलीधर मोहोळ म्हणाले, 'गदिमांचे भव्य स्मारक पुण्यात होईल. त्यासाठी साहित्यिकांच्या सूचना महत्त्वाच्या आहेत.'

मनोगत व्यक्त करताना प्रा. जोशी म्हणाले, 'गदिमा हे प्रतिभेचे उत्तुंग शिखर आहे. त्यांचे नाव घेताच मराठी माणसांच्या मनात आनंदाचे आणि अभिमानाचे कारंजे सुरू होते. अंगणात प्राजक्ताचा सडा पडावा तसा गदिमांच्या प्रतिभासृष्टीत शब्दसुमनांचा सडा पडत असे, ही शब्दफुले वेचून, त्याच्या काव्यमाला तयार करून गदिमा त्या सरस्वतीच्या चरणी अर्पण करीत. फुले सुकतात, देवाला वाहिली तरी दुसऱ्या दिवशी त्यांचे निर्माल्य होते; पण गदिमांच्या काव्यफुलांना अम्लानतेचे वरदान लाभले आहे. त्यांचे साहित्य हा मराठीचा चिरंतन ठेवा आहे. गदिमांच्या निधनाला त्रेचाळीस वर्षे झाली. गदिमांच्या जन्मशताब्दीची सांगता झाली तरी त्यांचे यथोचित स्मारक त्यांची कर्मभूमी असलेल्या पुण्यात होऊ शकले नाही. इतकी सरकारे आली आणि गेली; पण कोणीही काहीही ठोस केले नाही. गदिमांच्या स्मारकाबाबत आजवर राज्यकर्त्यांनी जी असंवेदनशीलता दाखवली ती वेदनादायक आहे. पुण्याचे महापौर दिलेला शब्द पाळतील अशी आशा आहे. कोट्यवधी मराठी जनतेने आपल्या हृदयसिंहासनावर गदिमांना जे अढळस्थान दिले आहे तेच त्यांचे चिरंतन स्मारक आहे.'

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३७२, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०

संपादक

**डॉ. पुरुषोत्तम काळे**

संपादन समिती

**डॉ. मनोहर जाधव । डॉ. नीलिमा गुंडी**
**डॉ. भास्कर ढोके । डॉ. रणधीर शिंदे**
**डॉ. वर्षा तोडमल**

प्रकाशक

**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**
टिळक रस्ता, पुणे ४११०३०.
दूरभाष । ०२०-२४४७५९६३
संकेतस्थळ । www.masapapune.org
ई-मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.०० दुपारी १२.००
दुपारी ४.३० ते रात्री ८.००

महाराष्ट्र साहित्य परिषद

मुद्रक–प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

जाहिरात व्यवस्थापक
**वि. दा. पिंगळे**
९८८१२३५०३३

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स, एल. एल. पी.**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : **१५ रुपये**

प्रकाशन क्र. ३७२
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१

या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक, संपादन समिती, सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

**मसाप पत्रिका**
**ऑक्टोबर ते डिसेंबर**
**२०२० अंक**


- नववर्षानिमित्ताने वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याचा संकल्प करू या! । **डॉ. पुरुषोत्तम काळे** । ३
- साहित्यातील दादा गेले –। **डॉ. भास्कर ढोके** । ६
- शरच्चंद्र मुक्तिबोधः सूर्ययुगाचे प्रदीप्त गीत! । **डॉ. अजय देशपांडे** । ९
- शंकरराव खरात : दलितकथा साहित्याचा महान शिल्पकार!। **अरुण खोरे** । १३
- मराठी नाटक आणि रंगभूमीच्या इतिहासाची पुनर्मांडणी । **प्रा. केदार काळवणे** । १७
- पासोडी : परखड चिकित्सेची । **राजीव जोशी** । २७
- ‘आधुनिकता’ केंद्रित प्रा. राजा दीक्षित गौरवग्रंथ । **प्रा. गणेश राऊत** । ३३
- साहित्य संशोधन स्वरूप आणि उपयोजन । **प्रा. डॉ. शिरीष लांडगे** । ३९
- मराठी विज्ञानकथा : समीक्षा नवा दृष्टिकोन । **संतोष नानाभाऊ पाटील** । ४१
- हरवलेले प्रतिष्ठान आणि पैठण । **डॉ. दादा गोरे** । ४५
- वा. सी. बेंदेकृत संभाजी चरित्र : आकलन आणि चिकित्सा । **प्रा. संतोष शेलार** । ४९
- भारतीय इतिहासाचा देदीप्यमान कालखंड... । **प्रा. डॉ. वर्षा सतीश तोडमल** । ५५
- सर्वे भवन्तु सुखिनः। **धनंजय तडवळकर** । ५९
- १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील दुष्काळाचे चित्रण। **प्रा. किसन माने** । ७०
- मधु मंगेश कर्णिकांच्या कादंबऱ्यांमधील विविध जीवन–जाणिवा । **प्रा. डॉ. बाळासाहेब अनुसे** । ७६
- अभिरुची रुंदावणाऱ्या दोन धीट कादंबऱ्या । **डॉ. अंजली जोशी** । ८१
- आभासी मांडणीतून वास्तवदर्शन घडवणारी प्रयोगशील कादंबरीः ‘९६ मेट्रोमॉल’। **डॉ. राहूल अशोक पाटील** । ८६
- पुण्यतोया : बलात्काराच्या प्रश्नाला भिडणारी कादंबरी । **प्रा. किरण गाढवे** । ९२
- आदिबंधात्मक जाणिवेची तरल कविताः ‘आरण्याहत’ । **प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे** । ९५
- कोरोना आणि साहित्य व्यवहार । **प्रा. डॉ. राजाभाऊ भैलुमे** । ९९
- मंगला गोडबोले ह्यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्रीविषयक जाणिवांचा अभ्यास । **तेजाली गवळी** । १०४
- संत तुकारामाचे उद्बोधक चरित्र : । **प्रा. विजय लोंढे** । १०७
  व्यवस्थेतील व्यत्यास आणि वर्तनातील विसंगतीचे अन्वयार्थः सगळं उलथून टाकलं पाहिजे । **चंद्रकांत चव्हाण** । ११०
- अव्यक्त स्त्रीच्या उद्गारांच्या कविता । **प्रा. डॉ. सुनीलकुमार लवटे**। ११४
- कार्यवृत्त नोंद । ११६

## संपादकीय

# नववर्षानिमित्ताने वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याचा संकल्प करू या!

करोना महामारीच्या जागतिक साथीमुळे २०२० हे वर्ष जागतिक समाजजीवनात विशेष वर्ष ठरले. मार्च महिन्यापासून सुरू झालेली टाळेबंदी टप्प्याटप्प्याने शिथिल करीत जवळजवळ सर्व सामाजिक व्यवहार पूर्वपदावर येत आहेत. कोविड विषाणूने जगावर टाकलेल्या प्रभावांच्या परिणामांतून सावरण्यास अजून काही काळ जाऊ द्यावा लागेल. या महासाथीने जीवितहानी मोठ्या प्रमाणावर झाली. युरोप–अमेरिकेच्या तुलनेत या महासाथीचा मृत्युदर आपल्याकडे कमी होता. या साथीला प्रतिबंध करण्यात, आटोक्यात ठेवण्यात राज्य आणि केंद्र सरकारला यश आलेले आहे हे मान्य करायलाच हवे. सुरुवातीच्या तातडीच्या टाळेबंदीनंतर, श्रमिकांच्या मोठ्या परवडीनंतर आणि महासाथीच्या प्रसाराबाबत एका समूहाला दोषी धरणे आणि त्यांना न्यायालयाने चौकशीनंतर दोषमुक्त करणे या पार्श्वभूमीवर सध्याची महासाथीची वस्तुस्थिती दिलासादायक म्हणायला हवी. एखाद्या भयावह दुःस्वप्नासारखे २०२० हे वर्ष संपलेले असले तरी महासाथ संपल्याचा आनंद व्यक्त करण्याची वेळ अजून आलेली नाही हे लक्षात ठेवायला हवे. नूतन वर्षाचे स्वागत करताना कोविड विषाणूचे उत्परिवर्तन झालेला वेगळा प्रकार इंग्लंडहून आपल्याकडे आलेला आहे. नवीन विषाणूची संसर्गक्षमता जास्त असून त्याचा प्रसार वेगाने झाल्यास पुन्हा एकदा मोठे संकट उभे राहू शकते.

नववर्षाच्या पहिल्या सप्ताहात केंद्र सरकारने दोन लशींना लसीकरणासाठी परवानगी दिली आहे. विक्रमी वेळेत या दोन्ही लशी आपत्कालीन वापरासाठी तयार केल्या, याबाबत सीरम इन्स्टिट्यूट पुणे आणि भारत बायोटेक हैद्राबाद या दोन्ही कंपन्यांचे संचालक प्रशंसेस पात्र आहेत. त्यातही आदर पूनावाला यांच्या सीरम इन्स्टिट्यूट या संस्थेने ऑक्सफर्ड विद्यापीठ आणि ॲस्ट्राझेनेका यांनी संशोधित केलेली लस मोठ्या प्रमाणावर विक्रमी वेळेत उत्पादित केली ही महाराष्ट्रीयांसाठी अभिमानाची बाब आहे. लवकरच जगातील मोठे लसीकरण भारतात सुरू होईल आणि ही साथ संपुष्टात यायला सुरुवात होईल.

कोविड महासाथ संपुष्टात जरी आली तरी तिने समाजजीवनाच्या सर्व अंगांवर केलेले परिणाम दीर्घकाळ राहणार आहेत. सक्तीची गृहस्थानबद्धता, टाळेबंदी आणि मुक्त अवकाशाचा झालेला संकोच यामुळे सर्वच समाजावर आणि सामाजिक संस्थांवर परिणाम झालेले आहेत. यातून सावरताना जीवनशैलीत काही बदल करण्याची आवश्यकता आहे. कोविड विषाणूच्या प्रतिबंधक उपायांपैकी मुखपट्टी आणि सार्वजनिक ठिकाणी वावरताना एकमेकांपासून सुरक्षित अंतर हे उपाय महत्त्वाचे आणि आवश्यक आहेत. मुख्य म्हणजे या साथीचा प्रतिकार विज्ञानामुळेच करता आला हे ध्यानात ठेवून समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन अधिकाधिक वाढीस लागावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे यापुढील काळात महत्त्वाचे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाणवण्याचा आणि ‘चांगला नागरिक’ बनण्याचा संकल्प नववर्षाच्या निमित्ताने करू या आणि तो प्रत्यक्षात येण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू या!

गतवर्षाच्या शेवटी माजी मंत्री, म. सा. प. नाशिक शाखेचे पालक, रसिकाग्रणी वनाधिपती मा. विनायकदादा पाटील यांचे निधन झाले. नाशिकच नव्हे तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर आघात

झाला. प्रभावी वक्ते, उत्तम लेखक, रसिक वाचक आणि साहित्याची मर्मग्राही जाण असलेले विनायकदादा हे अनेक लेखक, कवींचे प्रेरणास्थान होते. त्यांच्याशी झालेल्या संवाद-चर्चांमधून एका बहुश्रुत, व्युत्पन्न आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्वाची प्रचीती येत असे. अनेक विषयांचा अभ्यास असलेल्या मा. विनायकदादांचा सहवास समृद्ध करणारा असे. हे संपादकीय लिहीत असताना काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री विलासकाका पाटील उंडाळकर यांच्या निधनाची बातमी आली.

गेली ३५-४० वर्षे उंडाळे गावी स्वातंत्र्यसैनिकांचे संमेलन आणि साहित्यसंमेलन भरवणाऱ्या विलासकाकांच्या निधनाने एक सच्चा निष्ठावान राजकारणी, सहकार महर्षी आणि साहित्यरसिक हरपल्याची वेदना साहित्यप्रेमी व्यक्त करीत आहेत. साहित्यावर प्रेम करणाऱ्या विनायकदादा पाटील आणि विलासकाका पाटील उंडाळकर यांना भावपूर्ण आदरांजली! मराठीतील ख्यातकीर्त कवी बालम केतकर आणि ज्येष्ठ व्यवस्थापनगुरू, विचारवंत महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांचे नुकतेच निधन झाले. म. सा. परिषद आणि पत्रिकेकडून भावपूर्ण आदरांजली!

हे वर्ष शरच्चंद्र मुक्तिबोध आणि शंकरराव खरात यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. शोषितांवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, त्यांच्या दुःखनिवारणासाठी करावा लागणारा संघर्ष आणि मानवी कल्याणाची प्रेरणा मुक्तिबोधांच्या साहित्यातून व्यक्त होते. दलित, शोषित, भटक्या आणि समाजातील तळाशी असलेल्या सामान्य जनांच्या व्यथा वेदना शंकरराव खरात यांच्या साहित्यातून मुखर होतात. या दोन्ही साहित्यिकांच्या स्मृती जागवणारे लेख पत्रिकेतून प्रकाशित होतील. या अंकाचे मुखपृष्ठ मा. शंकरराव खरात यांचे छायाचित्र आहे.

करोना महासाथीच्या प्रभावामुळे आणि टाळेबंदीमुळे साहित्यविषयक कार्यक्रम बंद झाले. समाजमाध्यमांचा उपयोग करून काही कार्यक्रम म. सा. प.च्या काही शाखांनी घेतले. त्या शाखांच्या संचालकांनी प्रतिकूल परिस्थितीतही साहित्यजागर चालू ठेवला याबद्दल त्यांचे अभिनंदन. करोनाकाळातील निर्बंधामुळे म. सा. परिषदेचे अर्थकारण धोक्यात आलेले असून साहित्य-संस्कृती महामंडळामार्फत जे वार्षिक शासकीय अनुदान येते ते पूर्ण आलेले नाही. सर्व साहित्य संस्थांना देय असलेले अनुदान शासनाने त्वरित अदा करावे, असे आवाहन या निमित्ताने आम्ही करीत आहोत. म. सा. परिषदेच्या आर्थिक चणचणीविषयीची बातमी वृत्तपत्रात वाचून स्नेहल जोशी यांनी २५,०००/- रु. चा धनादेश परिषदेकडे पाठवला. त्यांच्या या देणगीबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

म. सा. पत्रिकेचा हा अंक गेल्या काही अंकांप्रमाणेच ई-अंक या स्वरूपात प्रकाशित होईल आणि सदस्यांना मेल केला जाईल. या अंकामध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना छापली आहे. या अंकामध्ये शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या साहित्यावरील डॉ. अजय देशपांडे यांचा लेख, डॉ. भास्कर ढोके यांचा विनायकदादा पाटील यांच्यावरील श्रद्धांजलीपर लेख, राजीव जोशी यांचा नितीन रिंढे यांच्या 'पासोडी' या समीक्षाग्रंथावरील लेख, प्रा. केदार काळवणे यांचा 'मराठी नाटक आणि रंगभूमीच्या इतिहासाची पुनर्मांडणी' करणारा लेख आणि प्रा. राजा दीक्षित यांच्या गौरवग्रंथावरील डॉ. गणेश राऊत यांचा लेख प्रकाशित करीत आहोत. याशिवाय इतर समीक्षालेख-ग्रंथपरीक्षणेही या अंकात आहेत. वाचक अंकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा बाळगतो.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सर्व सभासदांना आणि महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या सर्व लेखक-वाचकांना नववर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**डॉ. पुरुषोत्तम काळे**
चलभाष : ९४०४९३७७१०
purshottamdkale@gmail.com

◆◆

# महाराष्ट्र साहित्य परिषद

४९६, सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे–४११०३०.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

दि. १३/०१/२०२१

महाराष्ट्र साहित्य परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि. २८ जानेवारी २०२१ रोजी पुणे येथे एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशनच्या सभागृहात दुपारी ३.३० वाजता परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, अशी विनंती आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

## सभेत करावयाची कामे

१. श्रद्धांजली

२. मागील सभेचे इतिवृत्त वाचून संमत करणे.

३. सन २०१९–२०२० या वर्षाचे कार्यवृत्त सादर करणे.

४. सन २०१९–२०२० या वर्षाचे ताळेबंद आणि उत्पन्न–खर्चपत्रक संमत करणे.

५. सन २०२०–२०२१ चा अर्थसंकल्प संमत करणे.

६. सन २०२०–२०२१ करिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे.

७. सन २०२१–२०२६ या कालावधीसाठी कार्यकारी मंडळाची निवड करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

८. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.

आपले,

**सुनीताराजे पवार** (कोषाध्यक्ष)

**प्रकाश पायगुडे** (प्रमुख कार्यवाह)

**प्रा. मिलिंद जोशी** (कार्याध्यक्ष)

## विशेष सूचना

१. पुरेशी गणसंख्या नसल्यास सभा १५ मिनिटे स्थगित करण्यात येईल व नंतर ती रीतसर सुरू होईल. त्या वेळी गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२. सन २०१९–२०२० या वर्षाचा ताळेबंद उत्पन्न खर्च–पत्रक व सन २०२०–२०२१ या वर्षाचे अंदाजपत्रक सर्व सभासदांच्या निरिक्षणासाठी मसापच्या कार्यालयात सकाळी ९ ते १२ या वेळेत उपलब्ध आहे.

३) वरील कामकाजासंबंधी सभासदांस काही सूचना करावयाच्या असतील वा ठराव मांडायचा असेल, तर लेखी स्वरूपात तसे बुधवार दि. २० जानेवारी २०२१ पर्यंत कळवावे. नंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

# साहित्यातील दादा गेले-

**साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा संवेदनशीलतेने विचार करणारे माजी मंत्री वनाधिपती मा. विनायकदादा पाटील यांच्या वाङ्मयीन कर्तृत्त्वाचा आढावा घेणारा श्रद्धांजलीपर लेख.**

**डॉ. भास्कर ढोके**

'कुठलाही महाकवी किंवा कुठलाही कवी, निव्वळ शब्दांचा जुळारी होऊन कवी होऊ शकत नाही. नादमाधुर्य म्हणजेच काव्य असे आपल्याला म्हणता येणार नाही. आपल्या मराठी वाङ्मयामध्येही असा एक काळ होता की, ज्या वेळी शब्दलालित्य म्हणजेच साहित्य असे समजून अशा साहित्यामागे लोक धाव घेत: परंतु निव्वळ नादमाधुर्यातूनच निर्माण होणाऱ्या काव्यात जनतेचे मन काबीज करण्याचे सामर्थ्य येऊ शकत नाही. त्या जुळणाऱ्या सुंदर नादमधुर शब्दांच्या पाठीमागे एक नवा सामर्थ्यवान संदेश देणारे मन आणि विचार असल्याशिवाय कवी किंवा महाकवी निर्माण होऊ शकत नाहीत.'

यशवंतराव चव्हाण यांनी व्यक्त केलेले हे साहित्यविषयक विचार 'यशोधन' या पुस्तकात संकलित केलेले आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक विचारांचे हे संकलन केले आहे, यशवंतराव चव्हाण यांचे सहकारी विनायक दादा पाटील यांनी. राजकीय क्षेत्रात वावरत असताना साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा संवेदनशीलतेने विचार करणारे जे काही बोटावर मोजण्याइतके लोक महाराष्ट्रात होते किंवा आहेत त्यात यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबरच विनायक पाटील यांचाही समावेश करावा लागेल.

विनायक पाटील यांचा राजकीय प्रवास सुरू झाला तो नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील कुंडेवाडी या छोट्याशा गावाच्या सरपंचपदापासून, पुढे ते महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक, उद्योग, क्रीडा खात्याचे मंत्रीही झाले. काही काळ ते वनविकास महामंडळाचे अध्यक्ष होते. शेती हा त्यांचा आवडीचा विषय होता. विशेषतः पारंपरिक शेतीपेक्षा नवे प्रयोग करून व्यापारी तत्त्वावर किफायतशीर शेती करता येईल का याचा विचार ते सतत करीत असत. अपारंपरिक शेतीत विशेषतः वनशेतीत त्यांनी विशेष काम केले म्हणूनच त्यांना 'सहकारी वनशेतीचे जनक' मानले जाते. त्यांनी शेतीत केलेल्या उल्लेखनीय कामांसाठी संयुक्त राष्ट्रसंघाचा 'ट्री फार्मर ऑफ इंडिया', आणि पर्यावरण, निसर्ग संवर्धन संस्कृती इत्यादि क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला दिला जाणारा जिनिव्हा येथील अत्यंत प्रतिष्ठेचा 'रोलेक्स पुरस्कार' मिळवणारे तर ते एकमेव भारतीय आहेत.

विनायक पाटील यांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे हे खरे असले तरी आपण येथे त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचाच प्रामुख्याने विचार करणार आहोत. यशोधन, निलगिरीची शेती, एक्केचाळीस वृक्ष, ऑइल ग्लूम टु ऑइल ब्लूम, जेट्रोफा २००३, आणि महाराष्ट्र शासनाचा अनंत कान्हेरे पुरस्कार प्राप्त 'गेले लिहायचे राहून' हे ललित लेखन अशी त्यांची ग्रंथसंपदा. 'गेले लिहायचे राहून' हे

२०१६ मध्ये राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेले, त्यांच्या स्फुट लेखांचे पुस्तक. या पुस्तकाच्या सुरुवातीला आपल्या मनोगतात दिलीप माजगावकर यांनी विनायक पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पदर उकलून दाखवले आहेत, 'विनायकरावांची मैफल रंगली नाही, असे मला कधीच आठवत नाही. स्नेहाचा, मैत्रीचा तानपुरा मागे सतत वाजत राहतो. कधी स्वतःची फजिती सांगणारा, कधी इतर कुणाची फिरकी घेतलेली-त्याचे वर्णन करणाऱ्या, कधी एखाद्या गुगलीने ऐकणाऱ्याचीच विकेट काढणारा नरम मिश्किल विनोदाचा ताल मध्यमलयीत चाललेला, आणि मग विनायकराव कितीतरी किस्से, प्रसंग, घटना आणि त्यातून कितीतरी माणसे, केवढा तरी काळ तुमच्यापुढे जिवंत करतात. अगदी यशवंतराव – कुसुमाग्रज–शरद पवार–प. जसराजांपासून ते साध्यासुध्या रस्त्यावरच्या अन् गाडीत प्रवासात भेटलेल्या सामान्य माणसांपर्यंत.

विनायकरावांच्या ह्या मैत्रस्पर्शाचा परीस जसा राजहंस प्रकाशन परिवाराला आणि व्यक्तिश: मला लाभला; तसंच तो कैक संस्थांना, अनेक कुटुंबांना आणि असंख्य व्यक्तींनाही लाभला आहे. राजकीय क्षेत्र, कृषी क्षेत्र, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्र – अशा कितीतरी क्षेत्रांमध्ये गेली पाच दशके भरीव योगदान दिले आहे. सांस्कृतिक क्षेत्राबद्दल म्हणायचे झाले, तर विनायकराव 'नाशिकचे' अनभिषिक्त सांस्कृतिक मंत्री म्हणूनच ओळखले जातात. या प्रत्येक क्षेत्रात त्यांना आलेले अनुभव आणि त्यांचे स्वत:चे विचारमंथन यातून एक समृद्ध संचित त्यांच्यापाशी जमा झालेले आहे. त्यांचा स्वतःचा चिंतन स्वर त्यांनी अनेक लेखांमधून, अनेक सदरांमधून, स्फुटलेखनातून अन् व्याख्यानांमधून विविध स्थळी आणि विविध वेळी व्यक्त केलेला आहे. राजहंस प्रकाशनाचे दिलीप माजगावकर यांनी अत्यंत समर्पक शब्दांत विनायकरावांचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे.

विनायकराव पाटील खरे तर मौखिक परंपरेत जास्त रमणारे होते. त्यांचे वेगवेगळ्या प्रसंगीचे भाषण म्हणजे वाङ्मयीन मेजवानीच असायची. इंदिरा संत यांना नाशिक येथे जनस्थान पुरस्कार प्रदान करण्यात आला' त्या वेळी त्यांनी केलेले प्रास्ताविक त्यांची वाङ्मयीन समज किती प्रगल्भ होती हेच दर्शवणारे होते. 'गेले लिहायचे राहून' मध्ये त्यांनी नामदेव ढसाळ यांच्यावर एक लेख लिहिलेला



आहे, तो वाचला तरी त्यांची वाङ्मयीन समज किती प्रगल्भ होती हे लक्षात येते. ढसाळांविषयी ते म्हणतात, 'कवितेपुरता तुकारामाचा खरा वंशज. तुकारामाच्या वाट्याला जे जे भोग आले, ते सगळे नामदेवाच्या वाट्याला आले. दुःख, दारिद्र्य, अवहेलना, ग्राम्य कवी म्हणून संभावना.

परंतु, या सगळ्यांचा त्याने बाऊ केला नाही व भांडवलही केले नाही. या अनुभवातून त्याने स्वतःचे असे तत्त्वज्ञान विकसित केले. त्याच्याशी लढायचा व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग कवितेतून मांडला. ढसाळ यांची कविता करमणूक नव्हे; तर तत्त्वज्ञान आहे. ती तुम्हाला गोंजारत नाही, तर ती तुमच्या कानाखाली सणसणीत आवाज काढते आणि या फटक्याने आपण गोंजारले जाण्यापेक्षा जास्त सुखावतो.' मराठी वाचकाला नामदेव ढसाळ यांनी गदागदा हलवले होते. आशयापेक्षा ढसाळ यांच्या शब्दांचीच चर्चा अधिक झाली, हे त्यांचे निरीक्षण, आणि साहित्याची समज.''

विनायकराव यांच्या भाषणाची आणि लेखनाची शैली सारखीच होती. मोजके प्रभावी आणि समर्पक शब्द वापरून अत्यंत प्रवाही शैलीत ते प्रसंग उभा करत असत. त्यांच्या या लेखनशैलीचे श्रेय ते स्वत: बाबासाहेब पुरंदरे यांना देतात. १९६९ ते १९७५ या कालखंडात त्यांनी बाबासाहेब पुरंदरे यांच्या सोबत बरीच भटकंती केली. या भटकंतीत त्यांची विविध विषयांवर चर्चा होत असे, किस्सा कथन होत असे. विनायकरावांची कथनाची शैली पाहून बाबासाहेब पुरंदरे यांनी त्यांना जे सांगता, जसे सांगता तसे

लिहा असा आदेश दिला. विनायकराव लिहायला लागले आणि त्यांना शैली सापडली. त्यांच्या शैलीत एक सहजता, अकृत्रिमता आणि प्रामाणिकता आहे. कुठेही तिला शृंगारीत करण्याची, सजवण्याची गरज पडत नाही. गेले लिहायचे राहून या पुस्तकात संग्रहित लेख त्यांनी वेगवेगळ्या कालखंडात लिहिले असले तरी त्यातील सर्वच लेखांचे एक वैशिष्ट्य आहे, यातील एकही व्यक्तिचित्र ती व्यक्ती हयात नसताना लिहिलेले नाही. हयात असलेल्या माणसाविषयी लिहिल्याने आपोआपच लेखनाची प्रामाणिकता वाढते.

'गेले लिहायचे राहून' मधील लेखांची अनेक वैशिष्ट्ये आहेत. महत्त्वाचे म्हणजे यातील प्रत्येक लेखाला अनुभवाचे प्रामाण्य आहे आणि प्रत्यक्षाचे प्रमाण आहे. विशेष म्हणजे दीर्घ काळ राजकीय क्षेत्रात वावर असल्याने राजकीय आणि प्रशासकीय गुंतागुंतीचे साक्षीदार असलेले विनायकराव आपल्याला एक वेगळ्या अपरिचित जगाचा जवळून परिचय करवून देतात, तो अत्यंत प्रत्ययी आहे.

लेखन करताना असो की बोलताना शब्दांची योग्य निवड हे त्यांचे वैशिष्ट्य होते. शब्दांच्या विविध छटा समजून घेणे, योग्य आशय व्यक्त करण्यासाठी योग्य शब्दांची निवड करणे ही त्यांची खासियत होती.

साहित्याविषयी त्यांचे स्वतःचे चिंतन होते, आणि वेळोवेळी ते व्यक्त होत असे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेशी निकटचा संबंध असल्याने त्यांचे अनुभवविश्व व्यापक होते. वाचनही बहुपेडी; त्यामुळे अनेकदा त्यांना आत्मचरित्र लिहण्याचा आग्रह होत असे; पण ते नम्रपणे नकार देत असत. तुमच्याकडे असलेला एवढा मोठा अनुभवाचा ठेवा लोकांपर्यंत पोहाचायला हवा असा आग्रह धरल्यावर ते मिष्किलपणे म्हणत, ''राजकारणातल्या माणसाला कधी खरे लिहिता येईल का आणि लेखन खरे नसेल, प्रामाणिक नसेल तर त्याला आत्मचरित्र म्हणत येईल का?'' असे प्रश्न ते उपस्थित करीत असत.

सांस्कृतिक आणि वाङ्मयीन क्षेत्राशी दीर्घ काळ संबंध असल्याने त्यातील चढ-उतारांचे ते साक्षीदार होते. नामदेव ढसाळांपासून ना. धो.महानोरांपर्यंत, आर. के. लक्ष्मण यांच्यापासून जब्बार पटेल यांच्यापर्यंत अनेकांशी त्यांचा संवाद होता. कुसुमाग्रज आणि पु. ल. देशपांडे यांच्याशी तर त्यांचा विशेष स्नेह. 'वनाधिपती' ही उपाधी कुसुमाग्रजांनी त्यांना दिली होती. विविध साहित्यविषयक चळवळींशी त्यांचा निकटचा संबंध होता. महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे वाङ्मयीन नियतकालिक आर्थिक संकटात सापडले असताना त्या नियतकालिकाची छपाईची संपूर्ण जबाबदारी त्यांनी स्वतःवर घेतली. एखादी चळवळ मग ती कोणत्याही विचारधारेची असो, ती रुजली पाहिजे आणि वाढली पाहिजे असे त्यांना वाटत असे आणि त्यासाठी ते सर्वतोपरी मदतही करत असत. अनेक नवोदित लेखकांना व्यासपीठ मिळवून देण्यापासून अगदी प्रकाशक मिळवून देण्यापर्यंत ते मदत करीत असत.

शब्दकोश हा त्यांचा आणखी एक आवडीचा प्रांत होता. चर्चेमध्ये किंवा वाचन करताना एखादा शब्द अडला, तर लगेच शब्दकोश बाहेर येत असत. त्यांच्या संग्रही विविध भाषांमधील कोश होतेच; पण एखादा शब्द कोशात नाही सापडला, तर त्या त्या क्षेत्रातील संबंधित माणसांशी विनासंकोच संपर्क करीत असत. मराठी, हिंदी, इंग्रजी बरोबरच त्यांचे उर्दूवरही प्रभुत्व होते.

मंत्री असताना त्यांच्या दालनात विंदा. करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, शेळके, ढसाळ, महानोर, अर्जुन डांगळे येत असत. कवितांची मैफल रंगत असे. मंत्र्याच्या दालनात कवितांची मैफल रंगवणारे ते बहुधा एकमेव मंत्री असावेत. एका लेखात ते म्हणतात, 'मैफलीतील बापट, करंदीकर, शेळके गेले. आता नामदेवही गेला. या सर्वांची आठवण येते. भेटीची ओढ आहे, बघूयात केव्हा भेट होते ते.' विनायकरावांचा या सगळ्या कवींना भेटण्याचा दिवस आला तो २३ ऑक्टोबर २०२० रोजी. सगळे नाशिककर त्यांना दादा म्हणायचे. दादा इहलोकीची मैफल आवरून निघून गेले. स्वर्गात पु. ल. देशपांडे आणि नामदेव ढसाळ, आर. के. लक्ष्मण आणि बाळ ठाकरे, व्यंकटेश माडगूळकर आणि ग. दि. माडगूळकर, कुसुमाग्रज आणि कानिटकर, करंदीकर आणि बापट, यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील, शरद जोशी आणि दत्ता सामंत सगळेच बहुधा त्यांची वाट पाहत असावेत.

**डॉ. भास्कर ढोके**
चलभाष : ९४२३०८१०४६

◆◆

# शरच्चंद्र मुक्तिबोध : सूर्ययुगाचे प्रदीप्त गीत!

**''आतडड्यातून अंर्तज्ञान घेऊन येते ती कविता, काळावरील प्राणलहर सत्याची ती कविता'', अशी अन्वर्थक कविता लिहिणाऱ्या शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या जन्मशताब्दी निमित्ताने त्यांच्या काव्याची सौंदर्यस्थळे दर्शविणारा समीक्षालेख**

**डॉ. अजय देशपांडे**

काव्य म्हणजे नव्हे शब्द, नव्हे आशय;
सहज ज्ञानाची पहाट उघडवीत जाणारे
सुखदुःख प्रत्यक्ष, अभिप्राय दक्ष.

**शरच्चंद्र मुक्तिबोध**


कवितेविषयी असे आशयघन भाष्य करणाऱ्या शरच्चंद्र मुक्तिबोधांनी मराठी भाषेत अत्यंत मौलिक असे काव्यलेखन केले आहे. १९३७ ते १९८४ या प्रदीर्घ काळात मुक्तिबोधांनी अत्यंत संथपणे पण अत्यंत सजगतेने काव्यलेखन केले. त्यांच्या कवितेतून त्यांचे मनस्वीपण आणि त्यांची क्रांतिमनस्कता या दोहोंचेही दर्शन घडते. मुक्तिबोधांचे तीन कवितासंग्रह प्रकाशित आहेत.

नवी मळवाट : प्रकाशन वर्ष १९४९
यात्रिक : प्रकाशन वर्ष १९५७
सत्याची जात : प्रकाशन वर्ष १९९८

यांपैकी तिसरा म्हणजे 'सत्याची जात' हा कवितासंग्रह मुक्तिबोधांच्या मृत्यूनंतर चौदा वर्षांनी प्रकाशित झाला.

मुक्तिबोधांची कविता मराठी भाषेतील लक्षणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी कविता आहे. आधुनिक मराठी कवितेच्या प्रवाहात मुक्तिबोधांची कविता अनन्यसाधारण अशी आहे. मुक्तिबोधांची संपूर्ण कविता अतिशय गंभीर प्रकृतीची आणि सृष्टी, व्यक्ती व समष्टी यांचेशी विचारानुबंध ठेवणारी आहे. मुक्तिबोधांनी कवितेतूनच कवितेच्या युगप्रवर्तक कार्याविषयीदेखील काही भाष्य केले आहे. कवितेच्या कार्याविषयी सजग असणाऱ्या मुक्तिबोधांनी कवितेविषयी चिंतन करणाऱ्या कविता लिहिल्या आहेत. मुक्तिबोधांचे काव्यविषयक चिंतन त्यांच्या जीवनदृष्टीशी आणि विचारशीलतेशी अनुबंध ठेवणारे आहे. कवीची आणि कवितेची सृजनशील शक्ती समाज परिवर्तनासाठी प्रेरक ठरत असते, असा विश्वास बाळगणाऱ्या मुक्तिबोधांच्या कवी आणि काव्यविषयक कवितांची काही वैशिष्ट्ये या लेखात नमूद करावयाची आहेत.

'कलावंत हा जीवनाचा मर्मज्ञ असावा लागतो' असे मानणारे मुक्तिबोध कवितेविषयी लिहितात, ''काव्य स्वातंत्र्याची चिरतृष्णा व्यक्त करते. रंगेल्सने स्वातंत्र्याची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे, "Freedom, is the recognition of necessity' नव्या जरुरीची जाणीव म्हणजेच स्वातंत्र्य. अर्थात जीवनाच्या अपूर्णत्वास ओळखून पूर्णत्वाची कल्पना करणे म्हणजेच वास्तविकरीत्या स्वातंत्र्याची आकांक्षा व्यक्त करणे होय. काव्य याच दृष्टीने नवीन भावना आत्मसात करीत असते, स्वतः अधिकाधिक व्यापक, आत्मज्ञानयुक्त होत जाऊन




वाचकांमध्ये आत्मज्ञानयुक्त व्यापकता निर्माण करीत असते. याच अर्थी जडतेच्या व पारतंत्र्याच्या बंधनातून सुटून उत्तरोत्तर नवीन प्रगतीचे टप्पे जवळ आणण्यास काव्यही इतर कलांप्रमाणे साहाय्यभूत होत असते. मानवाची चिरविकासाची ही इच्छा कवीहृदयात निर्माण होऊन त्याच्या भावनांच्या खळबळीतून ती प्रकट होत असते; म्हणूनच ती रसात्मक असते व मानवी मनाला विकसित व समृद्ध करते.'' ( शरच्चंद्र मुक्तिबोध १९६३ पृ. १५) स्वातंत्र्याची, क्रांतीची, परिवर्तनाची प्रेरणा कवितेच्या निर्मितीशी अनुबंध ठेवून असते, तसेच कवितेचे ते प्रयोजन असते आणि कवितेचा परिणाम म्हणजे समाजाच्या मनात स्वातंत्र्याची, क्रांतीची, परिवर्तनाची प्रेरणा निर्माण करणे होय. त्यामुळे कवीने लिहिलेली कविता ही व्यापक अर्थाने सामाजिक निर्मिती आणि सामाजिक शक्तीही असते. यादृष्टीने मुक्तिबोधांची 'नवी कविता' लक्षणीय आहे.–

नवी कविता
आज हृदयी धगधग करी नवा सविता
जळाया लागे प्राणखिंडाचा सखोल गाभा
कसा रोखू मी यातनांची ही प्रदीप्त आभा?
काळ्या रात्रीची पोलादी छाती फोडतो विद्युत्तेजाचा शूल
यातनांची ही काळी डहाळ तीस लागले ज्वालेचे फूल
क्रुद्ध प्रचंड नवा मार्तंड उराउरात पेटला आहे
महाप्रखर त्याचा प्रकाश माझ्या उरात कोंदला आहे.
प्रकाशाचिया सागरावरी कोसळतात काळे पहाड
नभघुमट साठवी तसे ब्रह्मांडभेदी ध्वनी धडाड
त्याच ध्वनींनी प्रतिध्वनींनी प्रकाशगीत नावरे आता
उरी जन्मते नवी कविता
आज हृदयी धगधग करी नवा सविता
(शरच्चंद्र मुक्तिबोध १९८७ पृ. ०४)

येथे स्वातंत्र्याची, क्रांतीची, परिवर्तनाची, विकासाची इच्छा कवीमनात निर्माण होण्याचे कारण सभोवतीच्या मानवी यातनांचे पर्यावरण हे होय. समष्टीच्या दुःखातून समष्टीच्या परिवर्तनाची कविता नवा सविता होऊन जन्माला येणे म्हणजे सामाजिक निर्मिती असणाऱ्या कवितेने सामाजिक शक्ती होणे होय. सामाजिक अंतःस्वत्वाची निर्देशक असणारी कविता सामाजिक अंतः स्वत्वाची निर्माणक होण्याची प्रक्रिया मुक्तिबोधांच्या 'नवी कविता' या शीर्षकाच्या कवितेतून प्रतीत झाली आहे.

'अंत आहे तसा आरंभ आहे' या कवितेतही 'नवे प्रदीप्त गीत' गाण्याचा संदर्भ येतो.

... नव्या सूर्याच्या प्रकाशाखाली बसू दोघेही
गाईन मीहि
नव्या छंदाच्या डफावरती सूर्ययुगाचे प्रदीप्त गीत सूर्ययुगाचे
नवीन नाते, नवीन प्रीती, नवीन रीत!
(शरच्चंद्र मुक्तिबोध, १९८७ पृ. ९३)

मुक्तिबोधांच्या कवितेतील सूर्यप्रतिमा नवसमाज निर्मितीच्या ध्यासाशी, क्रांतिविचारांशी, विधायक कृतिशीलतेशी नाते ठेवणारी आहे. व्यक्ती, समष्टी आणि सृष्टी यांच्यातील परस्पर सुसंवादाचे विचारसूत्र आणि समग्र मानव होण्याची नवी जाणीव या सूर्यप्रतिमांमधून व्यक्त झाली आहे. मुक्तिबोधांच्या सूर्यप्रतिमेत विद्रोहाचा स्वर आहे. मुक्तिबोधांच्या कवितेतील सूर्यप्रतिमा क्रांतिविचारांशी, परिवर्तनाच्या विचारांशी, कृतींशी, समूह जाणिवेशी, समष्टीशी आणि मानवतेच्या विचारांशी अनुबंध ठेवणारी आहे. मराठी कवितेत सूर्य प्रतिमेची नवी अर्थवत्ता स्थापित करण्याचे महत्त्वाचे कार्य मुक्तिबोधांनी केले आहे. मुक्तिबोधांचे हे कार्य आधुनिक मराठी विचार कवितेला, क्रांतिकवितेला, विद्रोही कवितेला नवी विचारशीलता, नवी अर्थवत्ता देणारे आहे. मुक्तिबोधांच्या सूर्यप्रतिभेने

सूर्यकुलाच्या मराठी कवितेत 'सूर्ययुग' निर्माण केले. नवी अर्थवत्ता असलेल्या सूर्यप्रतिमेचे निर्माण आणि तिचे कवितेतील उपयोजन हे मुक्तिबोधांच्या विद्रोहाचे एक रूप होय 'अंत आहे तसा आरंभ आहे.' या कवितेतील वरील ओळींतील 'सूर्ययुगाच्या प्रदीप्त गीतां' चे नाते 'नव्या सूर्याच्या प्रकाशा'शी आहे. कवितेचे नाते भूतकाळ आणि वर्तमानकाळाशी असते; पण कवितेचे लक्ष्य भविष्यकाळ निर्माण करण्याचे असते. नव्या सूर्याच्या प्रकाशाखाली सूर्ययुगाचे प्रदीप्त गीत गाण्याची इच्छा हवा तसा भविष्यकाळ घडविण्याच्या आशावादातून जन्मली आहे. ईप्सित भविष्यकाळाच्या निर्माणाची सृजनशील शक्ती म्हणजे कविता हा आशय 'सूर्ययुगाचे प्रदीप्त गीत' या शब्दांत दडला आहे.


गाणे जाड दणकट लोखंडाच्या हातांचे
वाळलेल्या जर्जरशा थकलेल्या हातांचे
घण मारणाऱ्या, धान्य कापणाऱ्या हातांचे
पृथ्वी उचलून धरणाच्या दोन हातांचे
(शरच्चंद्र मुक्तिबोध १९९९ पृष्ठ ५७)

क्रांतिसन्मुख मानवी सृजनशील प्रज्ञा आणि समूहाची श्रमशक्ती यांच्या एकरूपतेतून नवे मानवतेचे जग घडविण्याचा आशावाद मुक्तिबोधांच्या अनेक कवितांतून व्यक्त झाला आहे. या कवितेत 'गाणे' या शब्दातून नव्या व्यवस्थेच्या निर्मितीचे सूचन झाले आहे. निर्मितिक्षम प्रज्ञा, विचारशीलता, समूहशक्ती, श्रमशक्ती, मानवतेचा विचार यांच्या परस्पर सहकार्याने आकारास येणाऱ्या नव्या, समताधिष्ठित जीवनप्रणालीचे सूचन 'गाणे' या शब्दातून झाले आहे. विचारशील सृजनशक्ती किंवा प्रज्ञाशक्ती आणि समूहाची श्रमशक्ती यांच्या साहाय्याने तळपातळीवरचे माणसांचे जग बदलवणारे 'गाणे' मुक्तिबोधांना हवे आहे. कवितेच्या ठायी असणाऱ्या निर्मितिक्षम विचारशीलतेच्या सामर्थ्यावर मुक्तिबोधांचा विश्वास आहे.

काव्य म्हणजे नव्हे शब्द, नव्हे आशय
सहजज्ञानाची पहाट उघडवीत जाणारे
सुखदुःख प्रत्यक्ष, अभिप्राय दक्ष

काळावरील प्राणलहर सत्याची : ती कविता.
(शरच्चंद्र मुक्तिबोध १९९८, पृष्ठ ९६)

प्रत्यक्ष सुखदुःखाच्या सहजज्ञानाची पहाट उघडवीत जाते ते काव्य, काळावरील सत्याची प्राणलहर म्हणजे




कविता, या दोन्ही प्रतिमांमधून मुक्तिबोध नवसमाजाच्या उभारणीसाठी प्रेरकशक्ती म्हणून कवितेचे वर्णन करतात. खरी कविता जीवन परिवर्तनाचा विचार मांडणारी असते. खरी कविता सत्याचे दर्शन घडवणारी असते. खरी कविता सामाजिक कारणांच्या परिणामांतून जन्मते आणि अनेक सामाजिक परिणामांचे कारणही होत असते. कविता समाजजीवनात परिवर्तन घडवून आणणारी प्रेरकशक्ती असते. जीवनाभिमुख आणि जीवनपोषक, जीवनसंरक्षक असणारी कविता शोषित, पीडितांच्या बाजूने उभारावयाच्या लढाईचे शस्त्रही असते. अशी कविता लिहिणाऱ्या महाकवीला 'साम्यसूर्याखाली नव्या प्रजेच्या विकासाचे गीत गा!' असे आवाहन करण्यामागे मुक्तिबोधांची परिवर्तनवादी, मानवतावादी जीवनदृष्टी आहे.

एक क्षण
एका क्षणामध्ये घडे
युगांचा इतिहास.
यातना...
यातनेच्या पोटामध्ये
गर्गरतो
मूर्तिमंत विश्वास
तोच आज
मागतसे महाकवी
माणसांतला रवी !!




(शरच्चंद्र मुक्तिबोध १९९९, पृष्ठ ५५)

युगांचा इतिहास घडवण्याचे सामर्थ्य ज्याच्या कवितेत आहे, असा महाकवी म्हणजे 'माणसांतला रवी' होय. कवीसाठी उपयोजिलेली 'माणसातला रवी' ही प्रतिमा विचारशील, प्रज्ञाशील क्रांतिकारकाची आहे. युगानुयुगे यातना, उपेक्षा सहन करणाऱ्या शोषित, पीडित माणसांचा या कवीवर विश्वास आहे. 'आतड्यांतून अंतर्ज्ञान घेऊन येते ती कविता' असे म्हणणाऱ्या मुक्तिबोधांना 'यातनांच्या भुईमध्ये विश्वास पेरणारा आणि प्रत्येकाचा 'मी' आता 'आम्ही' मध्ये रूपांतरीत करणारा समष्टीचे रक्त शब्दांत आणि धमन्यांत प्रवाहित करणारा कवी हवा आहे.

जीवनाविषयी...
नव्हे,
प्रत्यक्ष जीवनच
तसे काव्य.

(शरच्चंद्र मुक्तिबोध १९९८, पृ. १९)

एका कवितेतून व्यक्त झालेले हे विचारसूत्र मुक्तिबोधांच्या कवितेसह एकूणच लेखनाच्या केंद्रस्थानी आहे. येथे 'प्रत्यक्ष जीवनच' या शब्दांत भाषा, संस्कृती आणि विचार असणाऱ्या मानवी समूहाचे निसर्गनिर्मित पर्यावरणासह विशिष्ट सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक पर्यावरणातील जगणे अनुस्यूत आहे. मानवी जीवन आणि कविता यांचे परस्पर साहचर्य, एकरूपत्व मुक्तिबोधांना अभिप्रेत आहे. कविता जीवनाविषयी नसते तर कविता हेच जीवन अथवा प्रत्यक्ष जीवन हीच कविता असते. साऱ्या जीवनाचे मोल दिल्यानंतर जीवनाची कविता साकार होत असते. यादृष्टीने मुक्तिबोधांचे, ''आतड्यांतून अंतर्ज्ञान घेऊन येते ती कविता.'', ''काळावरील प्राणलहर सत्याचीः ती कविता'' हे शब्द अन्वर्थक आहेत. कविता समाजाचा विचारांचा प्राणवायू देत असते. कवितेच्या ठायी असणारी आशयघन विचारशीलता समाजात परिवर्तन घडवून आणू शकते, कविता म्हणजे अदम्य सृजनेच्छेची अपूर्व ऊर्जा असते.

कळी एक जन्मताच
शिशिराचा सर्व कावा होतो नष्ट
गाणे हवे जिव्हाळ्याचे, अनावर उमाळ्याचे
गहिवर दाटुनिया येईलसे खरेखुरे गीत गा!
निर्मितीच्या आनंदाचे, जीवनाच्या स्वानंदाचे
साम्य मन्वंतरांच्या गुलाबी पहाटेचे गीत गा!

(शरच्चंद्र मुक्तिबोध १९९९ पृष्ठ ५७, ५८)

या ओळींतून मुक्तिबोधांनी कवितेचे जीवनकार्य स्पष्टपणे सांगितले आहे. मार्क्सवादावरची त्यांची निष्ठाही व्यक्त केली आहे. केवळ कलेने अणि कवितेने जग बदलणार नाही हे कदाचित खरे असेलही; पण हेदेखील खरेच आहे, की जग बदलण्याच्या अनेक विचारशील आणि सृजनशील शस्त्रांपैकी कविता हेदेखील एक शस्त्र आहे; या शस्त्राच्या ठायी परिवर्तनाची अदम्य ऊर्जा आहे. कवितेच्या या सृजनशील आणि विचारशील अदम्य ऊर्जेवर मुक्तिबोधांचा अभंग-अविचल विश्वास आहे,

**संदर्भ –**

१) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'काही निबंध' नागपूर प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९६३

२) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'नवी मळवाट' मौज प्रकाशन गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती १९८७

३) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'यात्रिक' मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती १९९९

४) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'सत्याची जात' मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्रथमावृत्ती १९९८

**डॉ. अजय देशपांडे**

९८५०५९३०३० deshpandeajay15@gmail.com

◆◆

महाराष्ट्र साहित्य पत्रिका । महाराष्ट्र साहित्य पत्रिका

दलितकथा साहित्याचे प्रवर्तक आणि विचारवंत लेखक मा. शंकरराव खरात यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने त्यांच्या कर्तृत्त्वाचा वेध घेणारा लेख.

# शंकरराव खरात : दलितकथा साहित्याचा महान शिल्पकार!

अरुण खोरे

मी व्हाइस चान्सलर झालो खरा; पण दोन ओळी पत्र वाचून घेण्यासाठी लाकडं फोडणारे माझे वडील आपला मुलगा व्हाइस चान्सलर झाल्याचे पाहावयास जिवंत असते, तर त्यांना कितीतरी धन्यता वाटली असती. आपला धाकटा भाऊ कुलगुरू झाल्याचं पाहायला माझ्या बहिणी शेवंता, पवित्रा जिवंत असत्या, तर त्यांना केवढा आनंद झाला असता! माझी आई गावीच होती. त्या वेळी तिने मला गावाहून पत्रानं कळवलं, 'तू मोठ्या जागी गेलास, हे छापून आलं, आम्हाला कळालं.. तरी पण तू आपल्या जीवाला जपून रहा..' आपल्या दूर गेलेल्या मुलाला आई असाच सल्ला देणार!

आजवर मी आयुष्याची वाटचाल केली ती कष्टमय असली तरी मला अंधारातून प्रकाशाचा किरण दिसू शकला; पण माझा दलित समाज आजही त्या गर्द अंधारातून बाहेर पडण्याची धडपड करीत असून आजही तो त्यातून बाहेर पडू शकला नाही, याचीच बोच-खंत माझ्या मनात आहे. त्यामुळे मी अस्वस्थ होतो....

('तराळ अंतराळ', या शंकरराव खरात यांच्या आत्मचरित्रातील पृष्ठ क्रमांक ५०२ वरून).

विसाव्या शतकातील मराठी साहित्यातील महान लेखक आणि दलित कथा साहित्याचे एक प्रवर्तक असलेले शंकरराव खरात यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने मी पुन्हा एकदा तराळ अंतराळ या त्यांच्या आत्मचरित्राची पाने चाळत होतो. हे पुस्तक संपवताना शेवटच्या पानावरील हे मनोगत मला दिसले आणि ते मुद्दाम इथे संदर्भासाठी दिले आहे. आपल्या आत्मचरित्रात तराळकीची कामे करताना आपल्या वडिलांना आणि लेखकाला जे अनुभव आले ते वाचताना आपण जेव्हा शेवटच्या पानावर येतो, तेव्हा आपल्याला शंकररावांची वेदना अधिक अंतर्मुख करते आणि त्यांना वाटणारी बोच ही आपल्याही अंतः करणात निर्माण होते.

शंकररावांचे तराळ अंतराळ हे आत्मचरित्र १९८१/८२ साली प्रसिद्ध झाले होते. त्या वेळी पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी या पुस्तकावर चर्चेचा छोटा कार्यक्रम घेतला होता, त्यात मी सहभागी झालो होतो.

या आत्मचरित्रातील एक वेगळेपण मला तीव्रतेने जाणवले होते आणि ते म्हणजे तराळकीची कामे करत असताना शंकररावांच्या वडिलांनी जे सोसले, त्या सोसलेपणाचा एक अतिशय दुखरा, बोचरा आणि तरीही अस्पष्ट वाटणारा असा सगळा अनुभव यात त्यांनी ओतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने विसाव्या शतकात विषमतेविरुद्ध आणि अस्पृश्यतेविरुद्ध जो महान मुक्ती संग्राम सुरू झाला, या संग्रामाचे पडसाद सामाजिक,

राजकीय, सांस्कृतिक आणि अर्थातच मोठ्या प्रमाणात साहित्य जगतावर उमटले.

अस्पृश्य, मागास, दलित वर्गातील तरुणांची नवी पिढी बाबासाहेबांच्या प्रेरणेने जागी होत होती, शिक्षण घेत होती. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा', या त्यांच्या संदेशाने हे तरुण झगडू लागले होते. मराठी साहित्यात १९५० नंतरच्या कालखंडात ज्यांनी मोठे योगदान दिले; त्यातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, दलित तरुणांच्या आत्मसन्मानाचा लढा चितारणारे आणि जाती व्यवस्था ठोकरणारे बाबुराव बागुल आणि आपल्या दुःखाची मिती आपल्या अंतःकरणात सोसून, समाजातील शोषित वर्गाच्या दुःखाची कथा लिहिणारे, त्यांची वकिली करणारे ॲडव्होकेट शंकरराव खरात या तीन महान लेखकांचा उल्लेख करावा लागेल.

विशेष म्हणजे या तीनही महान लेखकांनी बाबासाहेबांना बघितले होते. त्यातही शंकररावांना तर बाबासाहेबांचा सहवासही लाभला होता. त्यामुळे त्यांच्या साहित्य लेखनाला निश्चितच वेगळे महत्त्व आहे हे लक्षात घेतले पाहिजे. बाबासाहेबांची प्रेरणा घेऊन या मानवतावादी दलित साहित्यातील तीन वडीलधाऱ्या लेखकांनी विसाव्या शतकातील भारतीय आणि मराठी साहित्याचा मूलाधार व्यापक केला, अशी त्यांची नोंद गौरवाने केली पाहिजे.

शंकरराव खरात मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू झाले, त्यापूर्वी पुण्यात त्यांनी वकिलीची परीक्षा दिली. त्यानंतर त्यांनी बाबासाहेबांच्या चळवळीत लक्ष घातले, बाबासाहेबांची त्यासाठी भेट घेतली. आपल्याकडे येणाऱ्या दलित, गरीब, भटक्या वर्गाच्या प्रश्नाकडेही लक्ष दिले... असा एक मोठा प्रवास आपल्या ऐंशी वर्षांच्या आयुष्यात त्यांनी केला.

मराठी साहित्यातील आणि भारतीय साहित्यातील त्यांचे योगदान मोठ्या प्रमाणात दुर्लक्षिले गेले आहे. तुलनेने मराठी समीक्षकांनी नेहमीच्या कंपूशाहीच्या वृत्तीमुळे शंकररावांच्या विलक्षण अशा समर्थ कथा साहित्याची जितकी गंभीर दखल घ्यायला पाहिजे होती, तशी ती घेतली गेली नाही. ही खंत त्यांच्या हयातीत वाटत होती. अनेकदा त्यांच्या घरी गेल्यानंतर ते ती बोलून दाखवत असत.

डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रेरणेने मराठी साहित्यात असणाऱ्या देशातील बंडखोर आणि विद्रोही साहित्याला एक दिशा मिळाली होती. १९५० पूर्वी मराठी साहित्यात जे वेगळे मंथन सुरू झाले त्याच्यामागे बाबासाहेबांच्या सामाजिक समाजवादी चळवळींचा व्यापक मुद्दा होता. त्यांच्या नेतृत्वाखाली महाड येथे मार्च १९२७ मध्ये झालेला चवदार तळ्याचा सत्याग्रह, त्यानंतर त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात मनुस्मृती दहन, त्यानंतर तीन-चार वर्षांनी म्हणजेच १९३०/३१ मध्ये नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह, त्यानंतरच्या काळात पुण्यातील पर्वती सत्याग्रह.. अशा समतावादी आणि मानवी हक्क मागणाऱ्या चळवळी सुरू होत्या. शंकररावांसारख्या अभ्यासू तरुणाचे या चळवळींकडे लक्ष होते. त्यामुळे त्यांच्या आयुष्याला दिशा मिळत होती. त्यांना नंतरच्या काळात बाबासाहेबांचा सहवासही मिळाला.

बाबासाहेबांच्या बरोबर ज्या लक्षावधी लोकांनी, कार्यकर्त्यांनी १९५६ साली धम्मदीक्षा घेतली, त्यात शंकरराव हेही होते. आपल्या साहित्याने त्यांनी नुकताच ठसा उमटवायला सुरुवात केली होती. अतिशय मोठे असे योगदान मराठी साहित्यात देणारे शंकरराव हे लेखनशैली आणि मांडणी याबाबतीत मवाळ आणि नेमस्त होते. भडक अथवा अंगार असलेली भाषा त्यांच्या लेखनात नव्हती. अनुभवाचे गहिरे बोल आणि दुःखाचा आर्त स्वर हा त्यांच्या साहित्यात आपल्याला वाचायला मिळतो, ऐकायला मिळतो.

भारतीय साहित्यातील दलित व्यथा-वेदनेचा पहिला हुंकार हा मराठी साहित्यात उमटला. अनेक लेखकांनी गावकुसाकडची दुःखे मांडायला सुरुवात केली. 'देवा सटवा महार', ही व्यंकटेश माडगूळकर यांची कथा याच वेदनेचा उच्चार होती. प्रा.श्री. म. माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' या कथासंग्रहाने या वर्गाचे दुःख समोर आणले. अनेक तरुण कार्यकर्ते जलशासारखे माध्यम वापरून बाबासाहेबांचा विचार मांडू लागले होते, विषमतेविरुद्ध कडक भाषा वापरून मांडणी करत होते. बाबासाहेबांच्या शेड्युल कास्ट फेडरेशनची स्थापना असेल किंवा त्यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचा मुद्दा असेल; सामाजिक, आर्थिक लोकशाहीचे संदर्भ पुढे येत होते. बाबासाहेब हीच मोठी प्रेरणा या साहित्यातील घडामोडींमागे आणि चळवळींमागे दीपस्तंभासारखी उभी

होती. शंकरराव खरात, बाबुराव बागुल, त्यापूर्वीचे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, नंतरच्या काळातील नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, राजा ढाले, ज. वि. पवार, प्र.ई. सोनकांबळे असे अनेक लेखक लिहू लागले होते.

सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्याचे शंकरराव खरात. त्यांचा जन्म आटपाडीमधला. त्यांच्या वडिलांकडे तराळकीची तीन गावे होती – आटपाडी, दुसरे कामत आणि तिसरे बोंबेवाडी हे गाव. या तिन्ही गावांतील तराळकीची कामे करताना जे विलक्षण, विदारक असे अनुभव आले त्या सगळ्यांची मूस आपल्या विविध कथा आणि कादंबऱ्या यातून व्यवस्थित मिसळून घेत शंकररावांनी अंतःकरणाला पाझर फोडणारे साहित्य निर्माण केले आहे. विशेषत: आपल्या वडिलांकडे मृतदेहावरील नवे कापड आल्यावर त्याचे नवे कपडे करण्याचा काळीज चरकवणारा अनुभव शंकररावांनी लिहिला आहे.

शंकररावांच्या कथांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. ज्यावेळी नवकथांचे अनोखे कौतुक समीक्षक करत होते, त्याचवेळी या काळात आलेल्या खरात यांच्या कथासाहित्याकडे या वर्गाचे पूर्ण दुर्लक्ष होते. इतकेच कशाला, साधी दखलही घेतली जात नव्हती. मात्र शंकरराव लिहीत होते, त्यांचे साहित्य एक अवकाश निर्माण करत होते.

मी वर म्हटल्याप्रमाणे खरात यांच्या कथेत त्यांच्या सोशिकपणाचे कळत-नकळत दर्शन घडत होते. त्यांचे समकालीन असलेल्या बाबुराव बागुल यांच्या कथेतील नायकापेक्षा शंकररावांचा नायक हा सोसणारा होता. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे हा एक अदृश्य असा माणूस मी माझ्या कथेतून साकारण्याचा प्रयत्न केला आहे. संत चोखामेळयाने ज्याप्रमाणे आपले गाऱ्हाणे विठुरायाच्यासमोर मांडले, साधारणत: अवतीभोवतीच्या समाजातील कोलाहलात आपले दुःख मांडण्याचा खरात यांचा प्रयत्नही तसाच होता.

आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग'मधून खरात यांच्या कथा प्रसिद्ध होऊ लागल्या होत्या. विख्यात लेखक वि. स. खांडेकर यांनीही त्यांच्या कथांचे, साहित्याचे भरभरून कौतुक केले होते. अस्पृश्य समाज, भटक्या वर्गातील विविध समूह, गरिबी आणि दारिद्र्यामुळे शरीर विक्रयाकडे वळलेल्या महिला भगिनी आणि महानगरातील झोपडपट्टीतले शोषित, वंचित समूह या सर्वांच्या व्यथा-वेदना आपल्या कथांमधून शंकरराव खरात लिहीत होते.

'बारा बलुतेदार', हा त्यांच्या कथांचा पहिला संग्रह १९५८साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर दोन-तीन वर्षांतच 'सांगावा' हा तराळकीच्या अनुभवांचे विलक्षण दाहक प्रत्यंतर असलेला दुसरा कथासंग्रह प्रकाशित झाला. यानंतर त्यांच्या कथांनी मग मराठी साहित्याला समृद्धीचे एक दालन उभे करून दिले.

तडीपार, टिटवीचा फेरा, सुटका, गावशिव, दौंडी, आडगावचे पाणी, मुलाखत, लिलाव, माझं नाव?, असे अनेक कथासंग्रह प्रकाशित होऊ लागले. शंकररावांनी काही कादंबऱ्याही आपण जे जीवन अनुभवले, आणि पाहिले त्याच्या आधारे लिहिल्या होत्या.

झोपडपट्टी, हातभट्टी, टीनोपाल गुरुजी, मसालेदार गेस्ट हाऊस, मी मुक्त मी मुक्त!, पारधी, फूटपाथ नंबर एक, मी माझ्या गावाच्या शोधात या त्यांच्या काही कादंबऱ्या आहेत.

'सांगावा' हा खरात यांच्या कथांचा मला आवडलेला संग्रह. यातील सगळ्या कथा या त्या काळातील तराळकिचे काम करणाऱ्या आणि गाव महार म्हणून ज्यांना ओळखले जायचे त्यांचे इथल्या जाति व्यवस्थेने कसे शोषण केले याचे प्रतिबिंब असलेल्या आहेत. यातील 'सांगावा' आणि 'पाणी', या दोन कथा अतिशय हृदयस्पर्शी आहेत. त्यातील अनुभवांनी आपल्या काळजाचे पाणी होते. रामा महाराला आणि त्याच्या कुटुंबियांना जाति व्यवस्थेमुळे जे सोसावे लागते, त्यामुळे जे दुःख या वर्गाच्या पदरात पडते, त्याचा कोणताही पैल नाही, असा अनुभव या कथांमधून येतो.

'सांगावा', ही कथा तर त्यांच्या लहानपणीच्या अनुभवातूनच आली आहे. 'पाणी', ही कथा अस्पृश्य वर्गाला पाणी मिळणे किती जिकिरीचे असायचे, या प्रश्नातून त्यांनी लिहिली आहे. या कथेतला सावळा महार हा उन्हामध्ये बाजाराला जात असताना तहानेने व्याकुळ होतो. हा सावळा मग जवळच्या महादेव मंदिरात पाणी प्यायला जातो. दोन पायऱ्यांवर तो बसतो. पुजारी दुरून ते पाहतो आणि त्याला हाकलून देऊ लागतो. सावळा पाण्यासाठी गयावया करतो. तो ज्या पायरीवर बसलेला

असतो, ती जागा शुद्ध करण्यासाठी तो पुजारी पाणी ओततो. सावळा तहानेने व्याकूळ होऊन चक्कर येऊन पडतो. त्याची ही अवस्था बघून पुजारी घाबरतो आणि तो पाण्याचे भांडे त्याच्या अंगावर ओततो. जेव्हा सावळा शुद्धीवर येतो, तेव्हा आपल्या अंगावर पाणी कोणी टाकले, आपण कसे ओले झालो असा विचार तो करू लागतो आणि मग ही महादेवाची कृपा, असे म्हणून पुढे निघतो.

शंकररावांच्या एकूण कथेतला नायक हा सोशिक आहे. याला अपवाद असणारे काही कथेतले नायक दुर्मिळ आहेत. 'सत्तू तराळ', ही कथा अशाच एका मजबुतीने उभा राहू पाहणाऱ्या महार व्यक्तीची आहे. आपल्या पडीक जमिनीवर नंदनवन फुलवणाऱ्या आणि रुबाबात शेती करणाऱ्या सत्तूवर गावच्या पाटलाचा राग असतो. सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून स्वतःची शेती मिळवायचा त्याचा प्रयत्न असतो. त्या शेतीवर कब्जा करण्यासाठी सरकारी अधिकारी जेव्हा येतो तेव्हा हा संतापलेला असतो त्याचा खून करतो आणि मग पुढे त्याला अटक होते.

अर्थात असे बंडखोर नायक खरात यांच्या कथेत फार दुर्मिळ आहेत. अण्णा भाऊ आणि बागुल यांच्या कथेत या नायकांनी मध्यवर्ती स्थान मिळवले आहे. इथे आणखी एका सामाजिक मुद्याचा विचार मी मांडू इच्छितो. ब्रिटिश काळात जाती व्यवस्था संपली नव्हती, त्या काळातील गावगाड्यात असलेल्या अस्पृश्य वर्गाला सवर्ण आणि वरिष्ठ जातींचे जाच सुरू होते. त्या काळात या सर्व वर्गाने जर हिंसक भूमिका स्वीकारली असती, तर मोठ्या प्रमाणात हिंसाचार होऊ शकला असता; पण मानवी प्रतिष्ठेला लज्जास्पद असे वर्तन करणाऱ्या या वरिष्ठ वर्गाच्या परंपरेच्या ओझ्याखाली दबून सोसण्याची भूमिका सर्वहारा वर्गाने घेतली, आणि मग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सोसण्याच्या भूमिकेतून बाहेर पडून आत्म प्रतिष्ठा जपण्याची नवी दिशा दाखवली. म्हणूनच हा वर्ग जाति व्यवस्थेच्या गुलामीतून बाहेर पडण्याचे धारिष्ट्य दाखवू शकला.

बाबासाहेबांची प्रेरणा घेऊन शंकरराव खरात यांच्यासारख्या लेखकांनी जे लेखन केले, त्यामुळे समाजातील उच्चभ्रू आणि सवर्ण वर्गाने त्यातील विचार आणि संदेश लक्षात घेऊन मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केला. त्याचेच काही पडसाद आपल्याला नंतरच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत उमटलेले दिसून आले.

शंकररावांनी अंतराच्या समारोपात बाबासाहेब आंबेडकरांचे एक विधान उद्धृत केले आहे

बाबासाहेब म्हणतात, 'क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले. आ सासाह चाक पूर्ण फिरल्याशिवाय क्रांतीच होऊ शकत नाही. ते चक्र आम्हीच फिरवू...'

बाबासाहेबांची प्रेरणा घेऊन विसाव्या शतकातील शंकरराव खरात यांच्यासारख्या लेखकांनी ही भूमिका प्रामाणिकपणे कार्यकर्ता आणि लेखक प्रवीण बजावली आणि त्याचेच पडसाद आपल्या समाजकारणात आणि साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रातही उमटले. शंकररावांचे योगदान हे महाराष्ट्रातील आणि भारतातील सामाजिक चळवळींच्या संदर्भात तितकेच महत्त्वाचे आहे.

विचारवंत लेखक म्हणून खरात यांनी जे ग्रंथ लेखन केले त्याची नोंद केली पाहिजे. अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा. दलित वाङ्मय: प्रेरणा आणि प्रवृत्ती हे ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. यातील आंबेडकरांची आत्मकथा हा संपादित ग्रंथ विशेष महत्त्वाचा आहे. त्यामुळे बाबासाहेबांच्या एकूण वाटचालीचे महत्त्वाचे टप्पे आपल्या लक्षात येतात. कुलगुरूपदाच्या कालखंडातील काही अनुभव शंकरराव लिहिणार होते; पण त्या पुस्तकाचे लेखन त्यांच्याकडून होऊ शकले नाही.

यावर्षी ११ जुलै २०२१ रोजी शंकरराव खरात यांची जन्मशताब्दी महाराष्ट्राने आणि महाराष्ट्रातील सर्व साहित्य संस्थांनी अतिशय सद्भावनेने साजरी केली पाहिजे. या निमित्ताने आंबेडकरी चळवळ, दलित साहित्य आणि एकूणच भारतीय साहित्य यांचा आढावा घेऊन त्याबद्दलचे वैचारिक मंथन सातत्याने होईल, असा प्रयत्न केला पाहिजे.

**अरुण खोरे**
चलभाष : ९६०४००१८००
arunkhore@hotmail.com

◆◆

महाराष्ट्र साहित्य पत्रिका । महाराष्ट्र साहित्य पत्रिका। महाराष्ट्र साहित्य पत्रिका । महाराष्ट्र साहित्य पत्रिका । महाराष्ट्र साहित्य पत्रिका । महाराष्ट्र साहित्य पत्रिका । महाराष्ट्र साहित्य पत्रिका । महाराष्ट्र साहित्य पत्रिका

‘मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास’ या ज्येष्ठ नाट्यसमीक्षक मा. दत्ता भगत यांच्या ग्रंथावरील समीक्षालेख.

# मराठी नाटक आणि रंगभूमीच्या इतिहासाची पुनर्मांडणी

प्रा. केदार काळवणे

इतिहास लेखन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असते. कोणतेही इतिहास लेखन हे परिपूर्ण नसते, त्यात शोधाच्या अनेक जागा नेहमीच इतिहासकारांना खुणावत असतात. त्या जागांचा शोध अविरत चाललेला असतो. त्यातून नवीन तथ्यांना समोर आणत इतिहासकार विशिष्ट इतिहासाला परिपूर्णतेकडे घेऊन जात सत्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत असतो. म्हणूनच काल लिहिलेल्या इतिहासातील काही बाबींना आज नव्या पुराव्याधारे लिहिलेला इतिहास बाद ठरवत असतो. इतिहास लेखनात इतिहासकाराच्या भूमिकेलाही फार महत्त्व असते. त्याच्या भूमिकेचे पडसाद इतिहास लेखनावर पडण्याची दाट शक्यता असते. ती भूमिका जर सर्वसमावेशक नसेल, तर इतिहास एकसुरी होण्याचा धोका असतो. कोणत्याही इतिहास लेखनाची तटस्थता आणि सज्जड पुराव्यावर आधारलेली मांडणी ही पूर्वअट असते; परंतु इतिहासकाराची भूमिका जर पक्षपाती असेल, तर खोटा इतिहास रचला जातो आणि तोच इतिहास खरा म्हणून समाजात प्रस्थापित होतो. त्यामुळे सत्यहानी होते आणि समाज खोटा इतिहास कुरवाळत वर्तमानाला नासवून टाकतो. इतिहासकाराच्या वैचारिक बांधिलकीचाही प्रभाव इतिहास लेखनावर पडत असतो, त्यामुळे इतिहासाची विशिष्ट बाजूच समोर येण्याची शक्यता अधिक असते. या अनुषंगाने भारतातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन इतिहास लेखनातील अनेकविध उदाहरणे सांगता येऊ शकतात, म्हणूनच पुन्हा इतिहास लेखनाची गरज निर्माण होत असते. त्यातून खरा इतिहास समोर यावा अशी अपेक्षा असते.

मराठी वाङ्मयेतिहास लेखनाच्याबाबतही असेच म्हणता येईल. मुळात एकूण मराठी वाङ्मयाचा समग्रतेने परिपूर्ण असा वाङ्मयेतिहास आजपावेतो सिद्ध झालेला नाही. जो इतिहास लिहिला गेला; तो परिपूर्ण तर नाहीच! शिवाय त्यावर अभिजनी इतिहास लेखनदृष्टीचा प्रभाव आहे. त्या प्रभावामुळे बहुजन लेखन परंपरा दुर्लक्षित राहिली, असे वाटते. तसेच वाङ्मयेतिहास लेखकांचा पक्षपातीपणा आणि सदोष विश्लेषण पद्धतीमुळेही मराठी वाङ्मयेतिहास लेखन एकांगी–एकसुरी बनलेले आहेत. मराठीत इतिहास लेखनाची परंपराही फार दीर्घ नाही. ब्रिटिश उत्तरकाळापासून मराठी वाङ्मयेतिहास लेखनाचे काही प्रयत्न झालेले दिसतात. त्यावरही वसाहतिक इतिहास लेखनाची छाप आहे. वाङ्मयेतिहास लेखन कसे करावे? याविषयीही मराठीत वाद आहेत. त्यामुळेच मराठी वाङ्मयेतिहास लेखनाचे पद्धतीशास्त्र सैद्धांतिक पातळीवर निर्माण होऊ शकलेले नाही. म्हणूनच समग्र मराठी साहित्याची एकसंधपणे समतोल दृष्टी ठेवून यथोचित नोंद

घेऊ शकेल असे इतिहास ग्रंथही सिद्ध होऊ शकलेले नाहीत. अलीकडच्या काळात असे इतिहास लेखनाचे प्रयत्न सुरू झालेले आहेत. त्यातीलच एक महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे प्रा. दत्ता भगत यांचा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेला 'मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास'हा होय. ६४२ पृष्ठांच्या या ग्रंथातून आरंभापासून ते इ.स.१९९० पर्यंतच्या मराठी नाटक आणि रंगभूमीचा विस्तृत आढावा घेतलेला आहे. नाटक(संहिता) आणि रंगभूमी(प्रयोग) यांच्या एकत्रित इतिहास लेखनाचा हा मराठीतील पहिलाच प्रयत्न असल्याने या ग्रंथाचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे.

प्रा. दत्ता भगत हे लोकशाहीवादी-आंबेडकरवादी लेखक, संशोधक, समीक्षक, नाटककार आणि विचारवंत म्हणून सुपरिचित आहेत. विद्यार्थीप्रिय शिक्षक आणि व्यासंगी वक्ते म्हणूनही त्यांची ओळख महाराष्ट्राला आहे. शिक्षक, संशोधक आणि सर्जक या त्रयींचा विलक्षण असा समन्वय दत्ता भगतांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आहे. [१] त्यातूनच त्यांची स्वत:ची अशी वैशिष्ट्यपूर्ण आविष्कारशैली आकाराला आलेली आहे. त्यांनी वेगवेगळे लेखन प्रकार हाताळले असले; तरी नाटककार 'दत्ता भगत'हीच त्यांची प्रतिमा अधिक ठळक झालेली आहे. नाट्यलेखक म्हणून त्यांची देदीप्यमान कारकीर्द मराठी नाट्य इतिहासात अक्षर ठरणारी आहे. त्यांनी केलेली दखलपात्र नाट्यनिर्मिती मराठी नाटक आणि रंगभूमीला नवा आशय प्रदान करणारी आहे. दलित नाट्य चळवळीचे ते साक्षीदार आणि विकासक आहेत. त्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. 'नाटक आणि रंगभूमी'च्या क्षेत्रातील त्यांचा वावर दीर्घ आहे. त्यामुळे यासंबंधीचा त्यांचा अनुभवही मोठा आहे. नाट्यसंहिता लेखक, प्रत्यक्ष प्रयोगात व अभिनय-दिग्दर्शनात सहभाग, नाटकाचे अभ्यासक आणि नाट्यशिक्षक म्हणून त्यांचा गेल्या अर्धशतकापासून नाट्यव्यवहाराशी संबंध आहे. त्यामुळेच प्रस्तुत ग्रंथातील त्यांची निरीक्षणे महत्त्वाची ठरणारी आहेत. त्या निरीक्षणांना अनुभवासोबतच नाट्य व्यासंगाची जोड प्राप्त झालेली आहे. दत्ता भगत यांच्या गेल्या पाच दशकांतील नाट्य चिंतनाचा अर्क या इतिहास लेखनात उतरलेला आहे. शिवाय हे इतिहास लेखन करताना त्यांनी 'समतोल' दृष्टी स्वीकारलेली आहे, त्यामुळे मराठी 'नाटक आणि रंगभूमी'समग्रपणाने समजून घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथ उपयुक्त ठरणारा आहे.

प्रा.दत्ता भगत यांनी मराठी नाटक आणि रंगभूमीच्या वाटचालीचा इतिहास अत्यंत कष्टपूर्वक सिद्ध केल्याचे सदर ग्रंथवाचनातून लक्षात येते. सर्वस्वी नव्या संशोधनावर आधारित ही मांडणी नसली तरीही उपलब्ध माहिती आणि नव्या संदर्भांच्या संयोजनातून समग्र मराठी नाट्यव्यवहार कवेत घेण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न या लेखनातून झालेला आहे. स्वत:ची यासंबंधीची निरीक्षणे आणि मतांमुळे या लेखनाला वजन प्राप्त झाले आहे. सम्यक दृष्टी ठेवून ऐतिहासिक संदर्भांची फेरतपासणी करत केलेली मूल्यमापनात्मक मांडणी हाही या इतिहास लेखनाचा मूलभूत विशेष आहे. नाट्यनिर्मिती-नाट्यचळवळ ही सामाजिक-सांस्कृतिक घटितांच्या पार्श्वभूमीवर आकाराला येत असते, ही दृष्टी या संबंध इतिहास लेखनात प्रा.भगत यांनी स्वीकारलेली दिसते. ते प्रस्तावनेत लिहितात, 'नाटक आणि रंगभूमीच्या उगमाचा शोध घेताना मी कालिक नोंदीच्या पेचातून इतिहास लेखन मोकळे करण्याचा प्रयत्न केला आहे. नाटक आणि रंगभूमीच्या उगमाचा शोध सांस्कृतिक पर्यावरणाच्या इतिहासात घ्यावा अशी दिशा मी स्वीकारली आहे. शिवाय प्रेक्षक नावाच्या घटकाकडेही लक्ष पुरविले आहे.' (पृ.सोळा) हेही या लेखनाचे निराळेपण आहे. घटना, माहिती आणि संदर्भांच्या नोंदी म्हणजे इतिहास नसतो, तर त्यापाठीमागील प्रेरणा आणि कार्यकारणभावाचा शोधही महत्त्वाचा असतो. असा शोध घेत प्रा.भगत यांनी सदरील इतिहासाची मांडणी केलेली आहे. प्रामुख्याने पदवी-पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि नाट्यव्यवहाराचे अभ्यासक डोळ्यासमोर ठेवून हा इतिहास लिहिला असल्याने त्याची भाषा आणि विवेचन पद्धती अधिक सुबोध ठेवण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला दिसतो. नरहर कुरुंदकर आणि वा.ल.कुलकर्णी या दोन समीक्षकांच्या इतिहास लेखनदृष्टीचा स्वीकार केल्याचे प्रा. भगत यांनी मनोगतात नमूद केले आहे. असे असले तरी त्यांच्या दृष्टिकोनाच्या प्रभावाने पूर्णपणाने प्रभावित झालेले हे लेखन नाही. प्रा.भगत यांची स्वतंत्र इतिहास लेखन दृष्टी आहे. तिचा प्रत्यय सदर ग्रंथातून येतो. ती दृष्टी नरहर कुरुंदकर आणि वा.ल.कुलकर्णी संस्कारित आहे, इतकेच

आपणाला म्हणता येईल. हा ग्रंथ संशोधकांनाही मार्गदर्शक ठरणारा आहे. त्याला संदर्भमूल्य प्राप्त झालेले आहे.

मराठी नाटक आणि रंगभूमीच्या इतिहासाची मांडणी करताना प्रा.दत्ता भगत यांनी प्रस्तुत ग्रंथाची विभागणी चार खंडांत (प्रकरणात) केलेली आहे. हेच खंड सदरील इतिहासाचे कालखंड मानलेले आहेत. पूर्वसुरींनी केलेल्या कालखंडाच्या प्रचलित रचनेचीही काही अंशी पुनर्मांडणी प्रा.भगत यांनी समर्पक कारणमीमांसेसह केलेली आहे. प्रस्तुत इतिहास मांडणीतील खंड रचना अशी आहे: खंड एक-प्रारंभपर्व (आरंभापासून ते इ.स.१८८०पर्यंत), खंड दोन-वैभवपर्व (इ.स.१८८० ते इ.स.१९२०), खंड तीन-आव्हानपर्व (इ.स.१९२०ते इ.स.१९५०) आणि खंड चार-विकासपर्व (इ.स.१९५०ते इ.स.१९९०) ही खंडरचना आवश्यक विश्लेषणासह प्रा.भगत यांनी सिद्ध केलेली आहे. त्यांनी खंड एकची पूर्वसीमा म्हणजे मराठी नाटक आणि रंगभूमीचा प्रारंभ इ.स.१८१८ ऐवजी म.सा.प.च्या चौथ्या इतिहास खंडाचा संदर्भ देत इ.स.१८०० ही मानलेली आहे. पेशवाईच्या अस्ताआधी मराठी जीवनशैलीत बदल सुरू झाला म्हणून त्यांनी ही पूर्वसीमा निश्चित केली आहे. ही पूर्वसीमा जरी निश्चित केली असली तरी, मराठी रंगभूमीच्या उगम काळाचा शोध त्यांनी मागील दोन हजार वर्षांतील लोककला प्रकारात घेतलेला आहे. हे या इतिहास लेखनाचे महत्त्वाचे वेगळेपण आहे. प्रथम कालखंडाची उत्तरसीमाही त्यांनी इ.स.१८७४ ऐवजी इ.स.१८८० ही मानलेली आहे. त्याची कारणमीमांसा करताना त्यांनी असे म्हटले आहे की, मराठी रंगभूमीवर अजरामर ठरेल अशा एकाही संहितेचे सादरीकरण या कालखंडात झालेले नाही अथवा अशी एखादी संहिताही लिहिली गेलेली नाही. (पृ.७-८) इ.स.१८८० पर्यंत अशी संहिता निर्माण झाली नसल्याने त्यांनी इ.स.१८८० ही या खंडाची उत्तरसीमा ठरवलेली आहे. संगीत रंगभूमीचा ठळकपणे उदय 'सौभद्र'या नाटकानंतर झाल्या कारणानेही त्यांनी इ.स.१८८०ही उत्तरसीमा मानलेली आहे. त्यांच्या दृष्टीने इ.स.१८०० ते इ.स.१८८० हा प्रारंभपर्वाचा कालखंड मराठी नाटक आणि रंगभूमीच्या जडणघडणीचा काळ आहे. प्रथम कालखंडाच्या सीमारेषेविषयीची ही विभागणी सयुक्तिक आणि नेमकी असल्याचे लक्षात येते.

'वैभवपर्व'या दुसऱ्या कालखंडाची पूर्वसीमा इ.स.१८७५ ऐवजी प्रा.दत्ता भगत यांनी इ.स.१८८० ही निश्चित केलेली आहे. त्याच्या दोन कारणांची विस्तृत चर्चा त्यांनी केलेली आहे. त्यातील पहिले कारण म्हणजे दि.२१ ऑक्टोबर १८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'सं.शाकुंतल' या नाटकाचा प्रयोग केला. ह्या नाटकापासून खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीला स्वतःची ओळख निर्माण करता आली. नाट्यसंहितांमुळे प्रसिद्धीस आलेला बुकीश नाटकांचा प्रवाह इथे खंडित होतो कारण नाटक बुकीश असो, कल्पित असो अथवा पौराणिक असो ते सादरीकरणासाठीच लिहायचे असते ही नवी जाणीव 'सं.शाकुंतल'मुळे रुजायला सुरुवात झाली. (पृ.११७-११८)किर्लोस्कर हे मराठी नाटक आणि रंगभूमीचे युगपुरुष आहेत. त्यांचे लेखन व सादरीकरण इ.स.१८८०पासून सुरू होते; म्हणून दुसऱ्या कालखंडाची पूर्वसीमा वा प्रारंभ येथून प्रा.दत्ता भगत यांनी मानलेला आहे. दुसरे कारण या काळातील सामाजिक-सांस्कृतिक-शैक्षणिक घटितांमधे दडले असल्याचे प्रा.भगत यांनी स्पष्ट केले आहे. आधुनिक मराठी नाटक आणि रंगभूमीच्या इतिहासाचा दुसरा कालखंड इ.स.१८८० ते इ.स.१९२० असा चार दशकांचा गृहीत धरण्यात आलेला आहे. ही चार दशके सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक प्रबोधनाची मानली जातात. या नव्या मंथनाच्या प्रत्यक्ष प्रभावाचा प्रारंभबिंदू प्रा. भगत यांना इ.स.१८८० वाटतो. या ऐतिहासिक टप्प्यावरील चलनवलनाचा थेट परिणाम इतर अनेक घटकांसह मराठी नाटक आणि रंगभूमीवरही झाला आहे. त्यामुळे येथूनच या दुसऱ्या कालखंडाचा आरंभ मानावा, अशी मांडणी प्रस्तुत अभ्यासकाने केलेली आहे. या कालखंडाची उत्तरसीमा त्यांनी पूर्वसुरींप्रमाणेच इ.स.१९२० ही मानलेली आहे. १९२० च्या आसपास मराठी नाटक आणि रंगभूमीवर एक पोकळी निर्माण झाली, म्हणूनच या कालखंडाची उत्तरसीमा १९२० मानणे योग्यच होय. (पृ.१२७)असे त्यांनी म्हटलेले आहे.

तिसऱ्या कालखंडाची कालगणना करताना इतिहासकारांमधे अनेक मतमतांतरे झालेली आहेत. प्रा.दत्ता भगत यांनी मात्र सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन इ.स.१९२० ते इ.स.१९५० हा तीन

दशकांचा तिसरा कालखंड निश्चित केलेला आहे. इ.स.१९२० च्या टप्प्यावर टिळक युगाचा अस्त आणि गांधीयुगाचा प्रारंभ, जातजाणिवेच्या सामाजिक-राजकीय चळवळींचा देशभर झालेला उदय आणि त्यातून घडलेले मराठी लोकमानस या कारणाने तिसऱ्या कालखंडाची पूर्वसीमा इ.स.१९२० मानायला हवी असे प्रा.भगत यांना वाटते, तर २६ जानेवारी १९५० पासून देशात प्रजासत्ताक राजवटीचा प्रारंभ होतो म्हणून या कालखंडाची उत्तरसीमा इ.स.१९५० मानायला हवी असे त्यांना वाटते. या कालखंड निश्चितीची अपरिहार्यता चिकित्सकपणे प्रा.भगत यांनी प्रस्तुत ग्रंथात चर्चिली आहे. त्यामुळे ती सर्वमान्य होईल असे वाटते. या तिसऱ्या कालखंडात व्यावसायिक नाटक उतरणीला लागलेले होते. त्यामुळे हेच नाटक डोळ्यासमोर ठेवून पूर्वइतिहासकारांनी या कालखंडाला 'अंधारयुग', 'तमोयुग' असे म्हटलेले आहे; परंतु प्रा. भगत यांनी या कालखंडाला 'आव्हान युग' किंवा 'आव्हान पर्व'असे म्हटलेले आहे. या काळातील कोणत्याही आव्हानांकडे मराठी रंगभूमीने पाठ फिरवली नाही तर, ती सर्व आव्हाने नाट्य माध्यमातून व्यक्त करीत मराठी रंगभूमी विस्तार पावली. (पृ.२८६)त्यामुळे या कालखंडाला 'आव्हान युग' म्हणावे असे प्रा.भगत यांना वाटते. त्यांचे हे म्हणणे योग्य आणि सार्थ असेच आहे. हा कालखंड शीर्षक बदल आणि त्याला अनुरूप असे विश्लेषण हेही या नाट्येतिहास लेखनाचे महत्त्वाचे वेगळेपण म्हणता येईल.

मराठी नाटक आणि रंगभूमीचा चौथा कालखंड इ.स.१९५० ते इ.स.१९९० हा चार दशकांचा गृहीत धरण्यात आलेला आहे. लोकशाही व्यवस्थेचा अंमल आणि एका नव्या सांस्कृतिक अभिसरणाची सुरुवात या काळात झाली. त्याचा प्रारंभ इ.स.१९५० पासून झाला म्हणून या कालखंडाची पूर्वसीमा इ.स.१९५० ही मानण्यात आलेली आहे. त्यासोबतच मराठी नाटक आणि रंगभूमीच्या विकासाचा प्रारंभबिंदू म्हणूनही हा टप्पा महत्त्वाचा आहे. त्यामुळे ही पूर्वसीमा निश्चिती अर्थपूर्ण आहे. जागतिकीकरणानंतर मराठी नाटकात जाणिवेच्या पातळीवर मौलिक बदल झाले, त्यामुळे येथून मराठी नाटक आणि रंगभूमीची ठळकपणाने दिशा बदलली म्हणून या कालखंडाची उत्तरसीमा प्रा.दत्ता भगत यांनी इ.स.१९९० ही निश्चित केलेली आहे. या संपूर्ण कालखंडात मराठी नाटक आणि रंगभूमीचा विकास झालेला आहे. त्यामुळेच त्याला 'विकास पर्व' असे म्हटलेले आहे. कोणत्याही इतिहास लेखनात कालसीमा निश्चिती ही नेहमीच वादग्रस्त ठरण्याची शक्यता असते. त्यावरून इतिहासकारांमधे विविध मतमतांतरेही असतात. मराठी साहित्य वा नाट्येतिहासाबाबतही असेच घडलेले आहे. कालखंडाच्या सीमारेषा ठरवताना इतिहासकारांसमोर वेगवेगळ्या स्वरूपाचे पेच असतात. बदलाची ठिकाणे नेमकेपणाने हेरून त्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करत इतिहासकाराने ते पेच सोडवायचे असतात. केलेली कालखंड निश्चिती सर्वमान्य होईल अशी कारणमीमांसाही आवश्यक असते. त्यासाठी साहित्य परंपरेच्या वाटचालीचा सखोल अभ्यास, साहित्याच्या सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमीचे अचूक भान आणि साहित्याकडे पाहण्याची निकोप दृष्टी इतिहासकाराजवळ असावी लागते. तरच कालसीमांना सर्वांची स्वीकृती आणि सर्वमान्यता मिळत असते. यादृष्टीने प्रस्तुत इतिहास लेखनात प्रा.दत्ता भगत यांनी केलेली कालसीमांची रचना सर्वस्वीकार्य अशीच आहे. मराठी नाट्येतिहास परंपरेची ही चौखंडात्मक कालिक विभागणी यथोचित आणि वास्तवाला धरून आहे, म्हणूनच ती महत्त्वाची आहे.

मराठी रंगभूमीच्या उगमाचा शोध, मराठी नाटकाच्या उगमाचा शोध, विविध नाट्यप्रकारांचा आढावा, नाट्यतंत्राची जडणघडण आणि समारोप या एकूण पाच प्रकरणांधारे 'प्रारंभपर्व' या पहिल्या खंडाची मांडणी करण्यात आलेली आहे. त्यातून मराठी नाटक आणि रंगभूमीच्या जडणघडणीचा शोध घेत इतिहास कथन केले आहे. प्रारंभीच इतिहास लेखनाचे सूत्र कोणते आहे ते विशद केले आहे. मराठी भाषेतून आविष्कृत होणाऱ्या शब्दसंहितांचा आणि सादरीकरणाचा त्यांच्या स्वरूपाद्वारे निश्चित होणाऱ्या घटकांच्या विकासाचा अथवा ऱ्हासाचा विवेचनात्मक नोंदीचा मजकूर म्हणजे 'मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास' हे माझे या लेखनातील मध्यवर्ती सूत्र (पृ.१)असल्याचे प्रा.भगत यांनी स्पष्ट केले आहे. सदरील इतिहास सामाजिक-सांस्कृतिक दृष्टी स्वीकारून मांडला असल्याने महाराष्ट्रीय संस्कृतीचा भूगोल आणि जीवनशैलीतील बदलाचेही विवेचन संक्षिप्त स्वरूपात

सुरुवातीला आलेले आहे. वाङ्मयेतिहास लेखनाच्या पुनर्विचाराची आवश्यकताही येथे प्रतिपादित केलेली आहे. मराठी रंगभूमीच्या उगमाचा शोध घेताना विविध शक्यता तपासत काही दिशा ध्वनित करण्याचा प्रयत्न प्रा. भगत यांनी केलेला आहे. जागतिक रंगभूमी, लोकरंगभूमी, संस्कृत रंगभूमी, जातककथा आणि पारंपरिक रंगभूमी: तमाशा अशा विविध कोनांतून मराठी रंगभूमीच्या उगमाची कारणमीमांसा त्यांनी केलेली आहे. ही समग्र कारणमीमांसा अर्थपूर्ण आणि मराठी रंगभूमीचा उगम निश्चित करणारी आहे.

रंगभूमीचा उगम आणि नाटकाचा उगम या दोन बाबींमधे फरक आहे. तो फरक स्पष्ट करतच प्रा.भगत यांनी या दोहोंच्या उगमाची चर्चा केलेली आहे. रंगभूमीचा उगम शोधणे ही तशी कठीण बाब आहे; परंतु नाटकाचा उगम वा आरंभ शोधणे ही तुलनेने सोपी गोष्ट आहे. मराठी नाटकाच्या उगमाचा शोध घेताना सहा नाटकांच्या अनुषंगाने प्रस्तुत इतिहासकाराने चर्चा केलेली आहे. 'लक्ष्मी नारायण कल्याण' (इ.स.१६८४), 'सं.सीता स्वयंवर (इ.स.१८४३), 'प्रबोध चंद्रोदय' (इ.स.१८५१), 'तृतीय रत्न' (१८५५), 'व्यवहारपयोगी नाटक' (इ.स.१८५६) आणि 'नाटक थोरले माधवराव पेशवे याजवर' (इ.स.१८६१) ही ती नाटके होत. नाटकाच्या पहिलेपणाची चर्चा करताना प्रचलित मतांची उलटतपासणी करत प्रा.भगत यांनी त्या-त्या नाटकाच्या स्थानाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण केले आहे. नवे पुरावे आणि नव्या माहितीच्या विश्लेषणातून प्रचलित पूर्वमत खोडून नव्या तथ्यांची मांडणी प्रा.भगत यांनी केलेली आहे. या मांडणीनुसार 'लक्ष्मी नारायण कल्याण'हे मराठी रंगभूमीवरील उपलब्ध पहिले नाटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. 'सं.सीता स्वयंवर' हे मराठीतील पहिले नाटक असल्याचे आजपावेतो मानले गेले; परंतु प्रा.भगत यांनी हे मराठीतील पहिले व्यावसायिक नाटक असल्याचे विस्तृत चर्चेधारे नोंदवले आहे. मराठी भाषेत रूपांतरित झालेले पहिले नाटक म्हणून 'प्रबोध चंद्रोदय'या नाटकाचा निर्देश केला आहे. महात्मा जोतीराव फुले यांचे 'तृतीय रत्न'हे नाटक पहिले आधुनिक मराठी नाटक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. फॉर्म आणि आशयाच्या पातळीवर हे नाटक 'आधुनिक' कसे आहे, याची साधार मीमांसा त्यांनी केलेली आहे. 'व्यवहारोपयोगी नाटक'हे नाटकरूप निबंध असल्याचे त्यांनी म्हटले आहे तर, पहिले ऐतिहासिक नाटक म्हणून 'नाटक थोरले माधवराव पेशवे याजवर' याची नोंद त्यांनी केलेली आहे. मराठी नाटकासंबंधीच्या पहिलेपणासंबंधीची ही मांडणी अधिक वस्तुस्थितीला धरून आहे, असे वाटते म्हणून ती सर्वमान्य होण्याची शक्यता आहे.

मराठी नाटकाचा उगम शोधताना उपरोक्त नाटकांव्यतिरिक्त प्रा.दत्ता भगत यांनी या काळातील विविध नाट्यप्रकारांचा आढावा घेतलेला आहे. त्यात तागडथोम नाटके, रूपकात्मक नाटके, संस्कृत नाटकांची भाषांतरे, ऐतिहासिक नाटकांचे योगदान, इंग्रजी नाटकांची भाषांतरे आणि सामाजिक नाटके या प्रकारांचा समावेश आहे. त्या-त्या प्रकारातील नाटकांचे मूल्यमापनात्मक स्वरूप प्रा.भगत यांनी विशद केले आहे. या मूल्यमापनातून सदरील नाटकांचे सामर्थ्य नि मर्यादा अधोरेखित झालेल्या आहेत. हे विवेचन या काळातील विविध नाट्यप्रकारांच्या उगमस्थानांची चर्चा करणारे आणि नंतरच्या काळात विकसित झालेल्या विविध नाट्यप्रकारांच्या बीजभूमीचा शोध घेणारे आहे.

मराठी नाट्यतंत्राच्या जडणघडणीचीही मीमांसा प्रस्तुत ठिकाणी केलेली आहे. विष्णुदास भावे ते किर्लोस्कर या दरम्यान मराठी नाटकांच्या प्रयोगाची जडणघडण चालू होती. किर्लोस्कर यांच्या 'सं.सौभद्र' मध्ये नाट्यप्रयोगाचे अनेक घटक स्थिर रूपात प्रेक्षकांसमोर आले. (पृ.१००) असे म्हणत प्रा.भगत यांनी हा काळ नाटकाच्या शरीररूपाच्या जडणघडणीचा काळ आहे. तसाच नाट्य सादरीकरणाच्याही जडणघडणीचाच काळ (पृ.१०१) असल्याचे मत नोंदवले आहे. एकंदरीत विविध नाट्यप्रकारांच्या उदयाचा आणि नाट्यतंत्राच्या जडणघडणीचा हा काळ असल्याचे प्रा.भगत यांनी केलेल्या विवेचनावरून स्पष्ट होते. आधुनिक मराठी नाटक आणि रंगभूमीच्या बीजरुजवणीचा कालखंड म्हणून या काळाचा निर्देश करता येईल.

'प्रारंभपर्वा'चा समारोप करताना प्रा.भगत यांनी काही महत्त्वाचे निष्कर्ष नोंदवले आहेत. ते लिहितात, इ.स.१८०० ते इ.स.१८८० हा आठ दशकांचा कालखंड आधुनिक मराठी नाटक आणि रंगभूमीच्या पार्श्वभूमीचा

कालखंड आहे. त्यामुळे प्रस्तुत कालखंडात अजर अमर असे एकही नाटक निर्माण झाले नाही. (पृ.१०४)हे त्यांचे निरीक्षण या काळातील नाट्यव्यवहाराचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने मोलाचे आहे. मराठी रंगभूमीला दोन हजार वर्षांची परंपरा असल्याची लोकरंगभूमीच्या अनुषंगाने त्यांनी केलेली मांडणी अभ्यासकांना नाटक नि रंगभूमीच्या अभ्यासाच्या नव्या दिशा दाखवणारी आहे. आधुनिक काळातील पहिले मराठी नाटक कोणते? यावर अभिनिवेशी चर्चा करण्यापेक्षा हा काळ मराठी नाटक आणि रंगभूमीच्या जडणघडणीचा काळ आहे, या दृष्टीने या काळातील नाट्यव्यवहाराकडे पाहावे, हे त्यांचे सूचनही मोलाचे आहे. करमणूक बोधापासून तो जीवनदर्शनापर्यंतचा पहिल्या टप्प्यावरील प्रवास ह्या आठ दशकांतील नाटकात दिसून येतो. (पृ.१०६/७) असे मत मांडत प्रा.भगत यांनी मनातला सनातनीपणा जपतजपत बदल स्वीकारणे हीच मानसिकता मराठी नाटक आणि रंगभूमीचे वेगळेपण निश्चित करीत वाटचाल करते, (पृ.१०७) असा निष्कर्ष या काळातील नाटकांसंबंधी नोंदवला आहे. ही निरीक्षणे या कालखंडातील नाट्यव्यवहाराचे नेमके स्वरूप विशद करणारी आहेत.

'वैभवपर्व'या चार दशकांच्या दुसऱ्या खंडाची मांडणी नऊ प्रकरणांत करण्यात आली आहे. प्रारंभपर्वात मराठी नाटक आणि रंगभूमीला स्वत:चे असे व्यक्तिमत्त्व प्राप्त झालेले नव्हते. वेगवेगळे प्रभाव पचवत मराठी नाटक आणि रंगभूमी घडत होती, आपले रूप सिद्ध करण्यासाठी धडपडत होती; परंतु निश्चित असा आकार तिला प्राप्त झाला नव्हता. अशा या रंगभूमीवर पुणे येथे दि.२१ ऑक्टोबर १८८० रोजी अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'सं. शाकुंतल'या नाटकाचा प्रयोग केला. ह्या नाटकापासून खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीला स्वत:ची ओळख निर्माण करता आली. (पृ.११७)येथून पुढे मराठी नाटक आणि रंगभूमीला आपले व्यक्तिमत्त्व सापडले. हे व्यक्तिमत्त्व अधिक विकसित होत गेले. अशा आशयाची मांडणी या खंडाच्या प्रारंभी 'प्रास्ताविक' नावाच्या पहिल्या प्रकरणात प्रा.भगत यांनी केलेली आहे. ती पायाभूत स्वरूपाची आहे. मराठी नाट्यव्यवहाराच्या वैभवाचा हा कालखंड आहे, म्हणूनच या कालखंडाला अन्य नाट्य इतिहासकारांप्रमाणे प्रा.भगत यांनीही 'वैभवपर्व' असेच अर्थपूर्ण शीर्षक दिले आहे. या कालखंडातील नाटक आणि रंगभूमीच्या विकासाच्या तळाशी जी सामाजिक-सांस्कृतिक घटिते होती, त्याचे नेमके विश्लेषण प्रस्तुत लेखकाने प्रास्ताविकात केले आहे. या काळातील जीवनशैलीतील बदल, घडलेले नवजागरण-प्रबोधन आणि त्याचा मराठी नाट्यव्यवहाराशी असणाऱ्या अनुबंधाची, त्यातून बदललेल्या नाट्यदृष्टीची चर्चा येथे केली आहे. नाटक आणि सादरीकरणातील बदल प्रक्रियेचे स्वरूपही विशद केले आहे.

'वैभवपर्वा'तील चार दशकांतील मराठी नाटक आणि रंगभूमीच्या इतिहासाची मांडणी दोन प्रकारे करण्यात आली आहे. एक ज्यांनी या काळात मराठी नाटक आणि रंगभूमीवर आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटवत मराठी नाट्यव्यवहार समृद्ध केला. अशा स्व-कर्तृत्ववान नाटकवाल्यांचा विस्ताराने आढावा प्रा.भगत यांनी घेतलेला आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर आणि राम गणेश गडकरी हे ते पाच नाटकवाले आहेत. ज्या नाटकवाल्यांना नाट्य वाङ्मयाच्या इतिहासात स्वतंत्रपणे स्थान निर्माण करता आले नाही; परंतु त्यांच्या एखाद्या-दुसऱ्या नाट्यकृतींनी ऐतिहासिक योगदान दिले, अशा लेखनकृतींचाही परिचय येथे करून दिलेला आहे. यासोबतच या काळातील वगनाट्य आणि फार्स यांची केलेली ऐतिहासिक नोंद प्रस्तुत कालखंडातील इतिहासाला समग्रता प्राप्त करून देणारी आहे. इ.स.१९०० ते इ.स.१९२० या दोन दशकांतील मराठी नाटक आणि रंगभूमीची वेगळी पार्श्वभूमी येथे सांगितलेली आहे. एकाच कालखंडातील प्रवृत्ती बदलातील बारकावे स्पष्ट करण्यासाठी अशा प्रकारच्या पार्श्वभूमीची मांडणी करणे आवश्यक असते. ती मांडणी येथे इतिहासकाराने केलेली दिसते. त्यामुळेच हा इतिहास अधिक वस्तुनिष्ठतेकडे जाणारा ठरतो.

विष्णुदास भावे यांनी मराठी व्यावसायिक रंगभूमीचा प्रारंभ केला म्हणून ते व्यावसायिक रंगभूमीचे जनक ठरतात; पण या रंगभूमीला स्थैर्य प्राप्त करून देण्यात आणि तिला घडवण्यात अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या ऐतिहासिक कार्यारंभामुळेच या खंडाला इतिहासकारांनी 'वैभवपर्व'असे शीर्षक दिले

आहे. या अनुषंगाने किर्लोस्कर आणि रंगभूमीचा विस्तृत परिचय प्रा.भगत यांनी करून दिलेला आहे. नाटक व रंगभूमी हा उद्योग आहे हे गृहीत धरून या उद्योगाचे व्यवस्थापन, या उद्योगात सामील असणाऱ्या व्यक्तींच्या आयुष्याची, त्यांच्या कुटुंबांची काळजी ह्यासारख्या गोष्टींचे सामाजिक भान अण्णासाहेब किर्लोस्करांना होते. (पृ.१६०) या प्रा.दत्ता भगत यांच्या विधानातून किर्लोस्करांचा व्यावसायिक दृष्टिकोन आणि त्यातून या रंगभूमीच्या विकासाचे गमक लक्षात येते. किर्लोस्कर यांनी निर्मिलेल्या रंगभूमीला अधिक समृद्ध करत आशयघन बनविणारे नंतरचे नाव म्हणजे गोविंद बल्लाळ देवल. ते किर्लोस्करांचे शिष्य होते. किर्लोस्करांनी सुरू केलेल्या नाट्य उद्योगाचा देवलांनी विविधांगाने विस्तार व उत्कर्ष कसा होईल ह्याचा प्रयत्न केला. (१८०) असे मत नोंदवत प्रा.भगत यांनी देवल आणि त्यांच्या रंगभूमीचा परिचय करून दिलेला आहे. या खंडाच्या प्रारंभीच्या दोन दशकांत मराठी नाटकांत जी नाट्यगीतं आली त्यातून त्या गीतांनी नाट्य संगीताला उपशास्त्रीय संगीताचा दर्जा मिळवून दिला. 'नाट्यसंगीत'हे मराठी नाटकाचं ह्या दोन दशकांतलं एक व्यवच्छेदक लक्षण आहे.(पृ.१८०)असे निरीक्षण नोंदवत प्रा.भगत यांनी या दोन दशकांतील नाटकाच्या मुख्य प्रवृत्तीचे अधोरेखन केले आहे.

'वैभवपर्वा'तील शेवटच्या दोन दशकांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर आणि राम गणेश गडकरी यांनी मराठी नाटक आणि रंगभूमीला नवा आयाम प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. कोल्हटकरांनी या काळात संगीत रंगभूमीला नवे वळण दिले. प्रस्तुत इतिहासकाराने नोंदवलेली कोल्हटकरांसंबंधीची दोन निरीक्षणे महत्त्वाची आहेत. ते लिहितात, त्यांनी जाणीवपूर्वक मराठी रंगभूमीला सामाजिक आशयाचे पाठबळ दिले. (पृ.१९४) आणि यश मिळो अथवा न मिळो प्रामुख्याने सामाजिक प्रश्न त्यांनी मराठी नाटकात केंद्रस्थानी आणले. (पृ.१९२) असे म्हणत त्यांनी कोल्हटकरांच्या नाटकांचे योगदान विशद केले आहे. खाडीलकर यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिप्रधान नाट्यसंहिता लेखन-सादरीकरणाचे युग आणि गडकरी यांनी केलेल्या कलात्मक नाट्यलेखनाचा आरंभ याचा समर्पक आढावा येथे येतो. १९०० ते १९२० ह्या दोन दशकांत मराठी रंगभूमी समृद्ध करण्याचे जेवढे जाणीवपूर्वक उपक्रम राबविले गेले तेवढे उपक्रम अन्य कुठल्याही काळात राबवले गेले नसावेत. (पृ.२४९) हे या खंडासंबंधीचे प्रा.भगत यांचे भाष्य मोलाचे आहे, म्हणूनच या दोन दशकांना 'मराठी रंगभूमीचे सुवर्ण युग' असे संबोधले गेले आहे. वैभवपर्वातील प्रमुख नाटककारांबरोबरच इतरही काही योगदानात्मक नाट्यकृतींचा परिचय आणि त्यांचे महत्त्व विशद केले आहे. या दुसऱ्या कालखंडातील मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास लिहिताना अनेक पातळ्यांवरील बदलाचे विश्लेषण प्रा.दत्ता भगत यांनी केलेले आहे. नाट्य संहिता, तिचा आशय-फॉर्म, सादरीकरण, तांत्रिकता, नट, सामाजिक-सांस्कृतिक घटितांच्या बदलासह विविध घटकांतील बदलांचा चिकित्सक वेध घेत हा इतिहास साकारतो.

सोळा प्रकरणांत तिसऱ्या खंडाच्या नाट्येतिहासाची मांडणी प्रा.भगत यांनी केलेली आहे. मराठी नाट्यव्यवहाराच्या दृष्टीने हा कालखंड वेगवेगळ्या आव्हानांचा असल्याने त्याला 'आव्हानपर्व' असे त्यांनी संबोधले आहे. ते लिहितात, १९२० ते १९५० या तीन दशकांत निर्माण झालेल्या नव्यानव्या आव्हानांकडे मराठी रंगभूमीने पाठ फिरविली असे म्हणता येत नाही, मराठी नाटकाचा प्रेक्षक रंगभूमीपासून दूर गेला असेही म्हणता येत नाही. उलट या सर्व आव्हानांचा इष्टापत्ती म्हणून त्याने स्वीकार केला असेच आपणाला आढळून येते, म्हणूनच या कालखंडाला 'आव्हानयुग'हेच संबोधन अधिक योग्य आहे असे मला वाटते.(पृ.२७९)

ही त्यांची मांडणी नवी आणि या कालखंडाचा नेमका स्वभाव सांगणारी आहे. इ.स.१९२० च्या टप्प्यावर घडून आलेल्या सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय स्थित्यंतराने पुढील काळात समग्र भारतीय नि महाराष्ट्रीय समाजजीवनात लक्षणीय बदल घडून आले. मराठी रंगभूमीसमोर नवी आव्हाने उभी राहिली. चित्रपट, आकाशवाणी, ग्रामोफोन अशा नवमाध्यमांचा उदयही या खंडात झाला. या काळातील एकूणच वातावरण संघर्षमय स्वरूपाचे होते. त्याचा वेध घेत या काळातील नाटकांची चिकित्सा प्रा.भगत यांनी केलेली आहे. या काळातील विविध नाट्यधारांना आपल्या

विवेचनात सामावून घेत मराठी नाटक आणि रंगभूमीचा सदर इतिहास अधिक परिपूर्णतेकडे नेण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो.

प्रायोगिक रंगभूमीचे प्रारंभिक रूप म्हणून दिवाकरांच्या नाट्यछटांचा परिचय आणि त्यांच्या कामगिरीचा यथोचित वेध येथे घेतलेला आहे. मराठी नाट्यव्यवहारातील त्यांचे स्थान नेमकेपणाने विशद केले आहे. भा.वि.वरेरकर यांचे मराठी रंगभूमीवरील कार्य सामाजिक प्रबोधनाचा रंगमंचीय आविष्कार कसा आहे, याचे साधार विवेचन प्रा.भगत करतात. प्रायोगिक रंगभूमीचे भान आणि नाटक हा आत्माविष्काराचा एक कला प्रकार आहे. ह्या दोन्ही जाणिवा निर्माण होण्याइतपत पार्श्वभूमी वरेरकरांच्या नाट्यकार्याने केल्याचे प्रा.भगत सूचित करतात. या कालखंडातील इतिहास लेखनाचे वेगळेपण म्हणजे 'जलसा आणि जातजाणिवेच्या नाटकांचा' वेगळा विचार करत त्याचा इतिहास प्रा.भगत यांनी सिद्ध केला आहे. सत्यशोधकी जलसे व आंबेडकरी जलसे यांच्या प्रेरणा-स्वरूप आणि जलसाकारांचा स्थूल आढावा येथे घेण्यात आला आहे. जलसे हीच या काळातील जातजाणिवेची नाट्यरूपे असल्याचे म्हटले आहे. प्रबोधनकार ठाकरे आणि वि. दा. सावरकर यांच्या नाटकांची जातजाणिवेच्या दृष्टीने केलेली चिकित्सा मूलगामी स्वरूपाची आहे. वि.दा.सावरकरांच्या राजकीय भूमिकेचे पडसाद असणाऱ्या नाटकांचा परिचयही करून देण्यात आला आहे. चळवळींना प्रतिसाद देणाऱ्या नाटकांचा निराळा विचार करून त्यांचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न प्रा.भगत यांनी केलेला आहे. चळवळीसाठी जनमानस तयार करण्याचे काम रंगभूमी कशी करीत होती याचे अंदाज अशा नाटकांच्या आधारे बांधता येतात, असे प्रा.दत्ता भगत यांनी म्हटले आहे. जलसे, जातजाणिवेची नाटके आणि चळवळीची रंगभूमी असा नवा दृष्टिकोन घेऊन त्यांना मराठी नाटक आणि रंगभूमीच्या इतिहासात सामावून घेण्याचा प्रयत्न यानिमित्ताने प्रथमच होतोय, असे वाटते.

नाट्यमन्वंतर या संस्थेचे कार्य मराठी नाट्य इतिहासात मोलाचे मानले जाते. या संस्थेची स्थापना इ.स.१९३० च्या आसपास झाली. या संस्थे अंतर्गत २ जून १९३३ रोजी मुंबई येथे वि.वि.वर्तकांनी रूपांतरित केलेल्या 'आंधळ्याची शाळा' या नाटकाचे पहिले सादरीकरण झाले. व्यावसायिक उद्दिष्ट न ठेवता वर्तमान विषयाला प्राधान्य देणारे हे नाटक त्या काळाच्या दृष्टीने 'अत्यंत अपूर्व'असल्याचे प्रा.भगत यांनी नोंदवले आहे. त्याची सखोल चर्चा प्रस्तुत ठिकाणी केलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक नाटके लिहिणारे पहिले नाटककार म्हणून श्रीपाद नृसिंह बेंडे यांचा निर्देश प्रा.भगत यांनी केला आहे. एक उपेक्षित नाट्यलेखक म्हणून त्यांची घेतलेली नोंद आणि त्यांच्या नाट्यलेखनाच्या योगदानाची केलेली चर्चा महत्त्वाची आहे. या इतिहास लेखनात कामगार रंगभूमीचा वेगळा विचार प्रा.भगत यांनी केलेला आहे. या अनुषंगाने कामगार रंगभूमी आणि नाटकांचा स्थूल परिचय करून दिलेला आहे. सांगली येथे १९४३ साली संपन्न झालेला नाट्यमहोत्सव मराठी रंगभूमीच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरलेला आहे. या महोत्सवामुळे मराठी नाटक आणि रंगभूमीवर काय परिणाम झाला त्याची चर्चा केली आहे.

पूर्वार्धातील आचार्य अत्रे यांची नाटके, व्यावसायिक रंगभूमीला नवे वळण देणारे वि.वा.शिरवाडकर यांचे 'दुसरा पेशवा'हे नाटक आणि व्यावसायिक रंगभूमीला उर्जा देणारे नाट्यलेखक म्हणून मो.ग.रांगणेकर यांच्या नाट्य कर्तृत्वाची मीमांसा केलेली आहे. मराठी माणसाचा अभिमान विषय असलेल्या 'नाट्यसंगीता'च्या या काळातील स्थितीगतीचाही वेध घेतलेला आहे.

प्रस्तुत कालखंड मराठी नाटक आणि रंगभूमीच्या दृष्टीने ऱ्हासाचा कालखंड मानला जातो, म्हणूनच त्याला 'अंधारयुग'असे संबोधले गेले; परंतु दत्ता भगत यांना हे मान्य नाही. या कालखंडासंबंधी ते लिहितात, स्वातंत्र्यानंतर मराठी नाटक आणि रंगभूमी पुरेशी विस्तारित झाली, समृद्ध झाली त्याचे फार मोठे श्रेय १९२० ते १९५० या कालखंडातील आव्हानांना आहे. हा मराठी रंगभूमीचा पडता काळ आहे; पण ते अंधारयुग नव्हते. फक्त व्यावसायिक रंगभूमी बरीच क्षीण झाली होती असा हा कालखंड आहे. (पृ.३६०) ही या काळातील मराठी नाटक आणि रंगभूमीकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी महत्त्वाची आहे. या कालखंडासंबंधीची ही इतिहासदृष्टी प्रथमच सदरील लेखनाच्या निमित्ताने प्रकट होते आहे. नाट्यपदाशिवाय गद्य नाटक सादर होऊ शकेल ही नवी

जाणीव याच काळात रुजू लागल्याचेही निरीक्षण त्यांनी मांडले आहे. यासंबंधी प्रा.भगत म्हणतात, आज नाटक हे गद्य स्वरूपातच असते ही जाणीव आता स्थिर झाली, त्याचे श्रेय या कालखंडाला जाते. त्याचप्रमाणे नाटक हाही एक आत्माविष्काराचा साहित्य प्रकार आहे याविषयीचे नवे भान याच कालखंडाने दिले. (पृ.३६०) हे निरीक्षण या काळातील नाट्यव्यवहाराचा आशय अचूकपणे सांगणारे आहे. मराठी रंगभूमीवरील तंत्राचा नवा विचार, उत्तम अभिनयासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याची जाणीव, नाट्यमहोत्सवाचे आयोजन, नाट्यस्पर्धांसाठीची वातावरण निर्मिती, भारतीय भाषेत मराठी नाटके अनुवादित व्हायला हवीत हे भान या साऱ्या बाबी याच कालखंडाची देण असल्याचे सूचन प्रा.भगत यांनी केले आहे. याच काळापासून मराठी माणसांच्या दैनंदिन जीवनाजवळ नाटक गेल्याचे मूलगामी भाष्यही त्यांनी केले आहे. हे सारे विवेचन या कालखंडाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे आहे.

'विकासपर्व'हा चार दशकांचा कालखंड मराठी नाटक आणि रंगभूमीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. हाच कालखंड नव्या समाजरचनेचा आणि राष्ट्र बांधणीचा कालखंड आहे. स्वातंत्र्यानंतर आकाराला आलेल्या लोकशाही व्यवस्थेचे सर्वदूर परिणाम झाले. सर्वच सामाजिक व्यवस्थांच्या पुनर्रचनेची प्रक्रिया या काळात घडली. 'संविधान' मूल्यांचे पडसाद अनेकविध घटकांवर पडले. नव्या काळाने उभ्या केलेल्या प्रश्नांनी समाजमनाची घुसळण झाली. त्यातून नवे बदल घडून आले. त्याचा परिणाम मराठी नाटक आणि रंगभूमीवरही झाला. हा काळ एका नव्या सांस्कृतिक अभिसरणाच्या प्रारंभाचा असल्याचे मत प्रा.भगत यांनी मांडले आहे. या काळात मराठी नाटक आणि रंगभूमीचा अनेक अंगाने विकास घडून आला, म्हणून त्याला 'विकासपर्व'असे म्हटले गेले आहे. केवळ नाट्यवाङ्मयाच्या निर्मितीवर नव्हे तर सर्वच कलांच्या निर्मितीवर या कालखंडातल्या राजकारणाचा, सांसदीय ध्येयधोरणांचा, आंतरराष्ट्रीय संबंधांचा आणि अतिशय वेगाने प्रगत होत असलेल्या तंत्रज्ञानाचा अतिशय खोलवर परिणाम झाला आहे. हा परिणाम एकरेषीय नसून अत्यंत गुंतागुंतीचा आहे. (पृ.३७१) या परिणामांचा अन्वयार्थ शोधत प्रा.भगत यांनी या काळातील मराठी नाटक आणि रंगभूमीची विकाससूत्रे विशद केली आहेत. तेवीस प्रकरणांच्या आधारे या खंडातील इतिहासाची मांडणी त्यांनी केली आहे.

'कामगार रंगभूमी'च्या उत्कर्षाचा हा काळ आहे. १९४० पासून पुढे जवळपास चार दशके या रंगभूमीने आपले स्थान निर्माण करत मराठी रंगभूमीला योगदान दिले. त्या योगदानाची तपशिलात जाऊन चर्चा प्रा.भगत यांनी केलेली आहे. अण्णा भाऊ साठे यांनी या काळात तमाशा रंगभूमीला वेगळे वळण दिले. तमाशा रंगभूमीला थेट सर्वसामान्य माणसांच्या समस्यांच्या अभिव्यक्तीशी जोडले हे अण्णा भाऊ साठे यांचे ऐतिहासिक कार्य होय (पृ.३९७) या शब्दांत त्यांच्या कार्याचे वेगळेपण सांगत त्यांच्या रंगकार्याचे विश्लेषण केले आहे. विद्याधर गोखले यांच्या रूपाने संगीत रंगभूमीचे झालेले पुनरागमन आणि बाळ कोल्हटकर यांनी व्यावसायिक रंगभूमीला दिलेल्या नव्या वळणाची कारणमीमांसाही येथे करण्यात आली आहे. या काळात प्रायोगिक रंगभूमीचे नवयुग सुरू झाले. १९५० नंतरची रंगभूमी ही 'प्रायोगिक' नाटकांच्या चळवळीची रंगभूमी आहे. पुढच्या चार दशकांत प्रायोगिक नाटकांनी अनेक वळणे घेतली, नाटक समृद्ध केले. पृ.४२४) असे म्हणत प्रा.भगत यांनी तिचे स्वरूप स्पष्ट केले आहे. नाट्यवाङ्मयातील दीपस्तंभ म्हणून पु.ल.देशपांडे, युगधर्माचे लेखक म्हणून विजय तेंडुलकर, नाट्य रूपांतराचा वेगळा प्रवाह निर्मिणारे लेखक म्हणून जयवंत दळवी आणि या काळातील व्यावसायिक रंगभूमीचे शिल्पकार म्हणून वसंत कानेटकर यांच्या रंगकार्याच्या योगदानाचा विस्तृत परिचय प्रा.भगत यांनी करून दिलेला आहे. या चारही नाट्यलेखकांच्या नाटकांचे प्रा.भगत यांनी केलेले मूल्यमापन आणि विशद केलेले स्वरूप-विशेष मुळातून वाचण्यासारखे आहे.

प्रस्तुत कालखंडात व्यक्तिरेखाप्रधान व्यावसायिक नाटकांचाही प्रवाह दिसतो. त्याचेही स्वरूप येथे विशद केले आहे. या काळात व्यावसायिक रंगभूमीला समृद्ध करणारे नाव म्हणजे वि.वा.शिरवाडकर आणि या रंगभूमीचा विस्तार करणाऱ्या आचार्य अत्रे, मधुसूदन कालेलकर, प्रा.मधुकर तोरडमल आदी नाटककारांचा आढावा येथे घेण्यात आलेला आहे. हा नुसता आढावा नाही तर त्या-त्या नाटककारांच्या संहितांची बारकाईने

चिकित्सा करत प्रा.भगत यांनी आपली मते नोंदवली आहेत. हा काळ प्रायोगिक रंगभूमीच्या समृद्धीचा काळ आहे. ही समृद्धी महेश एलकुंचवार, गो.पु.देशपांडे आणि सतीश आळेकर यांच्या नाटकांमुळे आलेली आहे. ह्यांनी १९७० ते १९९० या दोन दशकांत मराठी प्रायोगिक रंगभूमी समृद्ध केली. स्वत:चा एक प्रेक्षक वर्ग निर्माण केला. हे तिघेही समकालीन लेखक; पण त्या तिघांचे लेखन आणि सादरीकरण परस्परांपासून वेगळे आहे. (पृ.५३६) असे निरीक्षण नोंदवत प्रा.भगत यांनी त्यांच्या नाट्यलेखनाचे वेगळेपण अधोरेखित केले आहे. दलित नाटक आणि रंगभूमीची एक धारा ठळकपणे या काळात उदयाला आलेली आहे. 'जातजाणिवेचे नाटक' या शीर्षकाखाली त्याचा परामर्श घेतला आहे. दलित नाटक मराठी रंगभूमीवरील समस्याप्रधान नाटकाशी नाते असणारे नाटक आहे, (पृ.५५९)या भूमिकेतून त्यांनी या नाटकांकडे पाहिले आहे. याशिवाय या काळातील रंगभूमीचा विस्तार करणारे रत्नाकर मतकरी आणि व्यावसायिक नाटकांना बांधेसूद वळण देणारे सुरेश खरे यांच्या नाट्यकार्याची नोंद केली आहे. विसाव्या शतकाच्या अस्ताआधीचे संजय पवार, मकरंद साठे, शफातखान, जयंत पवार आणि अजित दळवी-प्रशांत दळवी यांच्या कार्याचाही स्थूल परिचय करून दिला आहे. भाषांतरित नाटके, एकांकिका लेखन-सादरीकरण, बालरंगभूमी आणि नेपथ्यविचार यांचा वेगळा विचार करून त्याचा इतिहास या प्रकरणात मांडला आहे.

प्रस्तुत कालखंडाच्या शेवटी उपसंहारात इ.स.१९५० ते इ.स.१९९० या चार दशकांतील नाटक आणि रंगभूमीचे काही महत्त्वाचे विशेष प्रा.भगत यांनी नोंदवले आहेत. या काळात प्रेक्षक बदलला. विभिन्न वर्ण व विविध जातींचे मध्यमवर्गीय प्रेक्षक निर्माण झाल्याने त्यांना बांधून ठेवणारे नवे व्यावसायिक नाटक निर्माण झाले. वास्तववादी रंगभूमीच्या आवश्यकतेतून नवे नाटककार उदयाला आले. त्यातून कामगार रंगभूमी, जातजाणिवेचे नाटक, कौटुंबिक-चर्चाप्रधान-प्रायोगिक नाटके लिहिली गेली. नाटकाच्या शब्दरूपासोबतच प्रकाश, ध्वनी, नेपथ्य यांची प्रयोगात एकात्मता वाढली. नाट्यस्पर्धांमुळे गावोगावी प्रेक्षक निर्माण झाला. यासह इतरही काही विशेषांची नोंद भगत यांनी केलेली आहे. या काळात प्रायोगिक रंगभूमीने मराठी रंगभूमीला महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. यासंबंधी प्रा. दत्ता भगत लिहितात, ह्या चार दशकांतील प्रायोगिक आणि समांतर रंगभूमीने मात्र एक केले, मराठी शब्दसंहितेला नाटकी गद्यातून मुक्त केले... मुळात नाट्यलेखनासाठी सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील पेच केंद्रस्थानी आल्यामुळे तिथे कृतक शैली अतिशय विसंवादीच ठरली असती म्हणून नाटकातला हा शैलीनिष्ठ नाटकीपणा गळून पडला हे या काळातील प्रायोगिक रंगभूमीचे मराठी रंगभूमीला योगदान आहे. (पृ.६२१) यासह या काळातील एकूणच मराठी नाटक आणि रंगभूमीच्या विकासाची सारांशरूपी कारणमीमांसा केली आहे. ही कारणमीमांसा या काळातील नाट्यव्यवहाराचे स्वरूप विशद करणारी आहे.

ऐतिहासिक अन्वयार्थाची नवी निरीक्षणे या ग्रंथातून व्यक्त झाली आहेत. ही निरीक्षणे गेल्या दोन शतकांतील एकूणच मराठी समाज, संस्कृती, साहित्य आणि नाटक याकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारी आहेत. या अनुषंगाने उदाहरणादाखल दोन निरीक्षणांचे स्वरूप पाहता येईल. प्रा.भगत महात्मा फुले यांच्या साहित्यातील समाजभानाबद्दल लिहितात, म.फुले नाटक लिहून पुरस्कार समितीकडे पाठवतात. तोपर्यंत लौकिक जीवनातल्या सामाजिक समस्येवर मराठी भाषेत कुणीही नाटक लिहिलेले नाही. फार कशाला, सामाजिक समस्येला कादंबरी वाङ्मयातसुद्धा स्थान मिळालेले नाही. सामान्यपणे सर्वच साहित्य प्रकारांत अत्यंत अद्भुतरम्य काल्पनिक कथानक अथवा पौराणिक कथानक वाङ्मयनिर्मितीचा आधार म्हणून वापरले जात असे. यावरून म.फुले हे काळाच्या किती पुढे होते याचा आपण तर्क करू शकतो. (पृ.५४१) हे निरीक्षण महात्मा फुले यांचे लेखन आणि तत्कालीन साहित्याचे स्वरूप याकडे पाहण्याचा नवाच दृष्टिकोन देणारे आहे. दुसरे निरीक्षण असे, जात जाणिवेचा काच आज सर्वच जातींना होतो; पण जन्मदलित लेखक वगळता अन्य कुणाही लेखकाला जात जाणिवेशी थेटपणे भिडण्याची हिंमत होत नाही. हेही मराठी नाट्य वाङ्मयाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. (पृ.५५८) येथेही जातवास्तव आणि मराठी लेखक यासंबंधाकडे पाहण्याची नवीच दृष्टी हे निरीक्षण देते. अशी अनेक निरीक्षणे सदर ग्रंथात आहेत. ही निरीक्षणे वाचकांच्या

आकलनाला दुरुस्त करणारी आहेत. नव्या संशोधकांनाही विषय पुरवणारी आहेत.

सामाजिक-सांस्कृतिक दृष्टीने इतिहासाची मांडणी हे या ग्रंथाचे महत्त्वाचे वेगळेपण आहे. दोन शतकांतील सर्व नाट्यप्रवाहांचा अंतर्भाव, प्रचलित कालखंडाची पुनर्मांडणी आणि कालखंड शीर्षकाचे आशयसूचक नवे नामकरण यामुळेही हा ग्रंथ वेगळा ठरतो. पूर्व इतिहासग्रंथापेक्षा अद्ययावत इतिहास या ग्रंथात उपलब्ध झालेला आहे. विष्णुदास भावे हे व्यावसायिक रंगभूमीचे उद्गाते; परंतु महात्मा जोतीराव फुले हे आद्य आधुनिक नाटककार आहेत. जीवनदर्शन आणि आजच्या आधुनिक रंगभूमीचे आशयात्मक वेगळेपण म.फुले यांच्यापासून सुरू होते, ही प्रा.भगत यांची या इतिहासातून ध्वनित झालेली भूमिकाही या इतिहासाला वेगळेपण प्राप्त करून देते. जातजाणिवेची नाटके या शीर्षकाखाली प्रथमच नवी मांडणी येथे करण्यात आली आहे. कामगार रंगभूमी आणि उपेक्षित नाटककारांना ठळक करण्याचा प्रयत्न या इतिहासाने केला आहे. ‘विजय तेंडुलकर: युगधर्माचे लेखक’ याप्रकारे नाटककारांच्या योगदानाचे प्रवृत्तीसूचक शीर्षकातून वेगळेपणाचे अधोरेखन केले आहे. प्रयोगाच्या दृष्टीने येणाऱ्या तांत्रिक बाजू आणि बालरंगभूमीचा वेगळा आढावा घेतला आहे. नाट्यस्पर्धा आणि एकांकिका स्पर्धांचे योगदान विशद केले आहे. आपली भूमिका विशद करत नाट्यसंहितांची तटस्थपणे समीक्षा केली आहे. प्रस्तुत इतिहास लेखनाला वैचारिकता आणि वक्तृत्वशीलतेचा स्पर्श झाल्याने ग्रंथ वाचनीय झालेला आहे. प्रा.दत्ता भगत हे फुले-आंबेडकरी विचारधारेचे लेखक असले तरी त्यांच्या विचारधारेचे पडसाद या इतिहास लेखनावर पडलेले नाहीत. ऐतिहासिक वस्तुस्थितीच्या परिप्रेक्ष्यात त्यांनी सम्यकपणे इतिहास मांडणी केलेली दिसते. त्यामुळेच हा इतिहास मराठी नाटक आणि रंगभूमीच्या सर्वधारांना सामावून घेऊ शकलेला आहे. हाही प्रस्तुत इतिहास लेखनाचा महत्त्वाचा गुणधर्म आहे.

प्रत्येक खंडाच्या शेवटी परिशिष्टात त्या-त्या कालखंडातील नाटकांची कालानुक्रमे यादी दिलेली आहे. ही यादी नाट्य अभ्यासक, विद्यार्थी आणि रंगकर्मींना उपयुक्त ठरणारी आहे. मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास समजून घेताना ही एकत्रित दिलेली यादी अत्यंत महत्त्वाची वाटते. यादीमुळे त्या-त्या खंडातील ठळक नाटके अधोरेखित होतात; शिवाय त्यांचा कालानुक्रम लक्षात येतो. कोणत्याही नाटकाचे इसवीसन चटकन शोधता येते. इतिहास विवेचनाच्या ओघात निसटून जाणारे संदर्भ यादीमुळे उजागर होतात. यादीचा ग्रंथात असणारा समावेश इतिहासाला समग्रता आणतो. मराठीत सर्वमान्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाङ्मयाच्या इतिहास ग्रंथातही अशाप्रकारे त्या-त्या वाङ्मय प्रकाराच्या कालानुक्रमे याद्या दिलेल्या दिसत नाहीत. अर्थात अशी यादी समाविष्ट असली म्हणजे तो इतिहासग्रंथ परिपूर्ण असतो आणि ज्यात समाविष्ट नाही त्यात अपूर्णता असते, असे माझे म्हणणे नाही; पण यादी असेल तर विवेचित इतिहास समजून घेण्यास ती पूरक नि साह्यभूत ठरते, इतकेच माझे म्हणणे आहे. यादृष्टीने प्रस्तुत इतिहास ग्रंथाचे हेही एक वेगळेपण नोंदवता येईल. याशिवाय परिशिष्टात त्या-त्या खंडाच्या शेवटी आवश्यक संदर्भसूची जोडलेली आहे. त्यामुळे या ग्रंथाला ससंदर्भता प्राप्त झालेली आहे. ‘वैभवपर्व’या दुसऱ्या खंडाच्या शेवटी परिशिष्टात इ.स.१८८० ते इ.स.१९२० या कालखंडातील महत्त्वाच्या सामाजिक-सांस्कृतिक व नाट्यविषयक घटना दिलेल्या आहेत. मराठी नाटक आणि रंगभूमीची वाटचाल समजून घेणाच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या आहेत.

मराठीतील सांस्कृतिक इतिहास ग्रंथात प्रस्तुत ग्रंथाचे योगदान महत्त्वपूर्ण असणार आहे. तरीही या ग्रंथाच्या मर्यादाही लक्षात घेणे गरजेचे आहे. दोनशे वर्षांतील मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास हा केवळ ६४२ पृष्ठांत बसवल्याने इतिहासाचे संक्षेपीकरण येथे झालेले दिसते. त्याचा अधिक विस्तार होण्याची आवश्यकता होती. कदाचित महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचा हा प्रकल्प असल्याने ही मर्यादा या ग्रंथाला पडलेली असावी. या इतिहासाने सर्व नाट्यप्रवाहांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला असला तरी स्त्री नाटककारांची वेगळी नोंद या इतिहासात अपेक्षित होती; पण येथे अशी वेगळी नोंद घेतलेली दिसत नाही. पुष्पलता राजापुरे-तापस लिहितात, एकंदरीत पाहता नाट्येतिहास असो अथवा रंगभूमीचा इतिहास असो अथवा प्रबंधाकरिता नाटककारांची निवड असो. तसेच संशोधक-अभ्यासक स्त्री असो अथवा पुरुष सर्वांकडूनच स्त्री - नाटककार अभ्यासकीय दृष्टिकोनांतून

दुर्लक्षित राहिलेले दिसतात.[२] हेच मत बळकट करणारा हाही इतिहासग्रंथ आहे. तांत्रिक दृष्टीनेही काही दोष या ग्रंथात राहिलेले आहेत. ग्रंथाची मांडणी नेटकी झालेली नाही. ग्रंथाच्या प्रारंभी सामायिक अनुक्रमणिका असायला हवी होती; पण ती दिलेली नाही. लेखनविषयक दोष आणि मुद्रणदोषही राहिलेले आहेत.

सदरील मर्यादा लक्षात घेऊनही या ग्रंथाचे महत्त्व अबाधित राहते. वाङ्मयेतिहास लेखनाचा एक नवा आदर्श या ग्रंथाने प्रस्थापित केलेला आहे. या ग्रंथासंबंधी बाबा भांड म्हणतात, ''अभिरुचीचे भिन्न भिन्न स्तर, लेखनप्रकारातली विविधता आणि दोनशे वर्षांतील नाट्यवाङ्मयाची विकसनशीलता या तिन्ही घटकांचा समन्वय करीत नाट्यवाङ्मयाचे इतिहास लेखन करण्याचा हा एकल प्रयत्न आहे. या दृष्टीनेही या लेखनाचे वेगळे महत्त्व आहे. दत्ता भगत हे साक्षेपी अभ्यासक असल्यामुळे त्यांनी कुठल्याही प्रवाहाचे विवेचन करताना हेतुत: एकांगी भूमिका घेतली नाही. पूर्वग्रहाने हे लेखन सदोष नाही.''[३] यादृष्टीने या ग्रंथाचे ऐतिहासिकत्व लक्षात घेणे गरजेचे आहे. मराठी नाटक आणि रंगभूमीच्या इतिहासाची पुनर्मांडणी करण्याचा मूलभूत प्रयत्न या ग्रंथाने केलेला आहे.

**संदर्भ:**

१. सूर्यनारायण रणसुभे, 'माझे स्नेही:दत्ता भगत', संपा. प्रल्हाद लुलेकर, जातक (प्रा.दत्ता भगत गौरवग्रंथ), कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जुलै २०१५,पृ.३०६.

२. पुष्पलता राजापुरे-तापस, 'मराठी नाटकाचा इतिहास', आमची श्रीवाणी(मराठी वाङ्मयेतिहास : नवे दृष्टीकोन-विशेषांक), का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, वर्ष:२६, अंक १, ऑक्टो २०१८ ते जाने २०१९, अंक २,फेब्रु-मे २०१९ (संयुक्त अंक), पृ.९९.

३. बाबा भांड, 'अध्यक्षांचे निवेदन', प्रा.दत्ता भगत, 'मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१९, पृ. सहा.

(सदर लेखासाठी प्रा.दत्ता भगत लिखित 'मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१९, प्रथमावृत्ती आधाराला घेतलेली आहे. कंसात दिलेले पृष्ठ क्रमांक याच आवृत्तीतील आहेत.)

**प्रा. केदार काळवणे**
चलभाष : ७०२०६३४५०२
kedar.kalwane.28@gmail.com

◆◆

**'महाराष्ट्र साहित्य परिषदे'** चा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

## भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य

संपादक : **डॉ. अश्विनी धोंगडे**




**ग्रंथाची वैशिष्ट्ये**

- मराठीसहित हिंदी, इंग्रजी, तेलुगू, कन्नड, गुजराती, तामिळ, मल्याळम, उडिया, बंगाली, पंजाबी, उर्दू, आसामी या भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्याचा मागोवा घेणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ.
- त्या त्या भाषांतील अभ्यासक-संशोधकांचे सखोल अभ्यासपूर्ण लेख.
- दर्जेदार मांडणी, छपाई व उत्तम बांधणी.
- महत्त्वाच्या लेखकांच्या छायाचित्रांचा विशेष विभाग.
- अभ्यासकांसाठी एक महत्त्वाचा संदर्भमूल्य असलेला ग्रंथ!


**किंमत : ८०० रुपये**

**संपर्कः प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११०३०. दूरध्वनी : ०२०-२४४७५९६३**

समकालीन साहित्याची गंभीर आणि परखड समीक्षा करणाऱ्या प्रा. नीतीन रिंढे यांच्या 'पासोडी' या ग्रंथावरील समीक्षालेख

# पासोडीः परखड चिकित्सेची

**राजीव जोशी**




पुस्तकाचे नाव : **पासोडी**
लेखक : **नीतीन रिंढे**
प्रकाशकः **पपायरस प्रकाशन**
प्रथमावृत्ती : **एप्रिल २०२०**
पृष्ठेः **२२०** किंमत : **३३०/-**

करोनाकाळातून आपण अजूनही जात आहोत आणि म्हणूनच येणाऱ्या काळातल्या एकूणच साहित्य व्यवहाराबद्दल प्रकाशक, संपादक, मुद्रक, पुस्तकांचे पुरवठादार, पुस्तकं दुकानदार कोणीही घ्या, कुणात संभ्रम, कुणात नैराश्य असणं स्वाभाविक आहे. यात वितरकांचा समावेश केलेला नाही याचं कारण, काही अपवाद वगळता, वितरण म्हणजे कायमच एक बला मानली जाते. बिच्चारे वाचक... ते तर सदैव छापून आलेल्या तुकड्यावरच जगत आलेले, दिलं तरी ठीक, नाही दिलं तरी 'चालतंय'. असं चित्र डोळ्यासमोर येऊ लागलं असतानाच एका कवी मित्राने (फोनवरच) ठासून सांगितलं, की यापुढे मुद्रित माध्यमांना कोणतंही भवितव्य नाहीये, वाचनालयं गोडाऊन होणार आहेत. दिवाळी अंकांचा प्रतिसाद माहितंच आहे, उत्साहवर्धक नाही, तसं पेपरात छापूनच आलंय. पाश्चिमात्य देशांत पुस्तकं ई-बुकच्या स्वरूपात प्रकाशित होत आहेत, वाचली जात आहेत, आपल्याकडेही छापील पुस्तकं कोणी काढणार नाही, वाचणार तर कुणीच नाही आणि नवीन पिढी तर नाहीच नाही.. बापरे, आता आपल्या दीडशे वर्षांच्या वाचनालयांचं गोडाऊन होणार? या विचाराने मला धस्स झालं. बरं, असा दावा करून या सन्मित्राने थांबावं ना? त्याने त्याच्या नवीन संग्रहाविषयी बोलणं सुरू केलं. त्याला म्हटलं, ''अरे खूप वाईट दिवस येणारेत ना, मग तू

संग्रह डिजिटली प्रकाशित कर, छापतो तरी कशाला?'' असं म्हटल्यावर त्याने फोनच ठेवला. याचाच अर्थ एक मोठ्ठा संभ्रम पसरत चाललाय, पसरवला जातोय.

एकीकडे पुस्तकांची दुकानं, प्रकाशन संस्था बंद पडत असताना, किताबखाना सारखं पुस्तकांचं दुकान आगीत भस्मसात होण्याचा दुर्दैवी प्रसंग कालपरवाचा असताना श्रीपाद चौधरी, भूषण कोलते या दोन वेड्यांनी 'पपायरस' सारखं अद्ययावत पुस्तकाचं दुकान काढावं, ते ही संस्कृतीचा कोंभ करपून जातो अशा शापित गावात हे धाडसच आहे. बरं, इतकं करून हे दोघं थांबते तर ठीक. आज अनेक प्रकाशक लिटररीली डिजिटल होत असताना, या जोडगोळीने चक्क प्रकाशन संस्था सुरू करावी, भयग्रस्त कोरोनाच्या 'पिक' काळात अतिशय देखण्या स्वरूपात त्यांनी डॉ. नीतीन रिंढे यांच्या समीक्षणात्मक लेखनाचं पुस्तकं प्रकाशित करावं हे सारं कौतुकास्पद आहेच, नकारात्मकतेनं ग्रासलेल्यांना सकारात्मकतेचा संदेश देणारंही आहे.

नितीन रिंढे एकूणच साहित्याकडे, विशेषत: समकालीन साहित्याकडे, गंभीरपणे पाहणारे समीक्षक आहेत. मराठीच नाही, तर भारतीय आणि जागतिक साहित्याविषयी त्यांचा अभ्यास, व्यासंग याचं उदाहरणं म्हणजे त्याचं 'लीळा पुस्तकांच्या' हे पुस्तक. पुस्तकांवर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांपैकी हे एक महत्त्वाचं पुस्तक. 'लीळा पुस्तकांच्या' वाचून त्यात उल्लेखिलेल्या पुस्तकांना मिळवून वाचून काढणारे वाचक मला माहीत आहेत. गेल्या काही वर्षांत मुक्तशब्द, नवअनुष्टुभ, आपले वाङ्मय वृत्त आदि नियतकालिकांतून समकालीन कादंबरी, कविता तसेच जागतिक साहित्य आणि भारतीय भाषेतल्या साहित्यकृतींवर केलेलं लेखन त्यांचा व्यासंग, चिंतन व नीरक्षीरविवेकता दाखवणारं आहे. 'लीळा पुस्तकांच्या' या शीर्षकातून रिंढे वाचकांना महानुभाव पंथाकडे नेतात तर 'पासोडी'तून चार शतकांपलीकडल्या दासोपंत आणि त्यांच्या पासोडीशी जोडतात. आताच्या पिढीला दासोपंत आणि त्यांची पासोडी माहिती असणं असंभवच, म्हणूनच नीतीन रिंढेंची पासोडी काय आहे हे कळण्यासाठी दासोपंत व त्यांची पासोडी समजून घेणं महत्त्वाचं आहे.

दासोपंतांच्या वाङ्मय मंदिराचा कळस म्हणजे त्यांची पंचीकरण 'पासोडी' होय. चाळीस फूट लांब आणि चार फूट रुंद अशा कापडावर पंचीकरण, अध्यात्मज्ञानाचा विषय, चित्राकृतींतून मांडलेली ही पासोडी मराठी संतवाङ्मयात अनन्य, अपूर्व व एकमेवाद्वितीय अशीच म्हणावी लागेल.

अशा पासोडीवर पिढ्यानपिढ्या अमूल्य विषय अमीट राहावा या उद्देशाने दासोपंतांनी 'कापड' हे वैशिष्ट्यपूर्ण माध्यम वापरून चित्राकृतीतून अध्यात्मासारखा विषय प्रतिपादन करणे ही कल्पनाच मुळात अभिनव आहे. यातूनच दासोपंतांतील कलावंताच्या सर्जन व सृजनशक्तीचे दर्शन घडते. दासोपंत एक उत्तम चित्रकार होते याची साक्ष पासोडीतील चित्रांवरून सहजच मिळते. संपूर्ण पासोडीच्याभोवती सुरेख आणि सुबक अशी वेलबुट्टी काढलेली आहे. चित्रांतील रेषा अत्यंत भावसूचक भासतात. त्यातील वळणे (स्ट्रोक्स) कुशल चित्रकाराचे दर्शन घडवितात. विशेष गोष्ट अशी की, प्रत्येक चित्रात त्यात मावेल असा त्या चित्राचा कार्यकारणभाव व्यक्त करणारा मजकूर योजनाबद्ध रीतीने लिहिलेला दिसतो. कुठेही अक्षरांची दाटी नाही किंवा बळेच मजकूर कोंबून बसवलेला नाही. कुठेही खाडाखोड नाही. नियोजनपूर्वक संतुलित असे हे नेटके चित्रमय वाङ्मय विलक्षण म्हणावे लागते.

दासोपंतांनी सव्वालक्ष पदांचा 'पदार्णव' रचला. आजमितीस त्यांची ३००० ते ३५०० पदेच उपलब्ध आहेत. मध्ययुगातील ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ या पूर्वसुरींच्या रचनांचा मंद परिमळ, तरीही स्वयंप्रज्ञ भावानुभवांची सुसंघटित आशयघन, भक्तीपर पदरचना संत दासोपंतांनी केली. त्यात ओवी, धवळे, ध्रुवा, चौचरणी, जती, अभंग, पद, प्रबंध, आरती, शेजारती, लळित आरती, भारूड, गवळण, विरहिणी, पाळणा, हिंदोळा, कूट, स्तोत्र, श्लोक, अष्टक यांचा समावेश होतो. यातील चौचरणी, जती, ध्रुवा हे आकृतिबंध प्राचीन महानुभावी वाङ्मयात आढळतात. त्यानंतर ते दासोपंतांनीच हाताळलेले दिसतात. तसेच दासोपंतांची 'हिंदोळा' आकृतिबंधाची रचना एकूणच संत वाङ्मयात लक्षणीय आहे. भारूडसदृश 'लळित पदे' म्हणजेच

विविध 'रूपके' दासोपंतांनी रचली. तसेच दासोपंतांची काही नाट्यात्मक दीर्घ पदेही (पदनाट्य) संत वाङ्मयातील काव्य क्षेत्रात विलक्षण ठरतात.

यावरून नीतीन रिंढे यांच्या लेखसंग्रहाचं पासोडी हे नाव किती औचित्यपूर्ण आहे याचा प्रत्यय येतो. 'पासोडी'चं गणेश विसपुते यांनी तयार केलेलं मुखपृष्ठ पासोडीचं काल्पनिक टेक्श्चर-टाईप कल्पक व कौतुकास्पद आहे. मराठी लेखक व त्यांचं साहित्य, पाश्चिमात्य लेखक व त्यांचं साहित्य या बरोबरच ग्रंथ व व्यवहार, वाङ्मयीन संस्कृती याविषयी मौलिक चिंतन असणाऱ्या दोनशे वीस पानांच्या पुस्तकाचे चार भाग आहेत. पहिला भाग भालचंद्र नेमाडे, विलास सारंग, किरण नगरकर, अरुण कोलटकर, भुजंग मेश्राम यांच्या लेखनाविषयी आहे. आधुनिकता आणि आधुनिकवाद या संकल्पना स्पष्ट करत नेमाडे-सारंगांना आधुनिकतावादाचे सहप्रवासी म्हणताना त्यांची केलेली विचारतुला तौलनिक विश्लेषणाचा वस्तुपाठ आहे. या अनुषंगाने रिंढे नेमाडे आणि सारंग यांच्या लेखनाचं स्वाट ॲनलिसिस करून डीएनएच वाचकांच्या, अभ्यासकांच्या हातात ठेवतात, त्याचं चिकित्सक आणि परखड विच्छेदन करतात.

लेखकाने मातृभाषेतून लेखन करावे ही भूमिका नेमाडेंनी मांडली, सर्जनशील लेखनही मराठीतून केलं, मात्र समीक्षा इंग्रजीतून लिहिली. सारंगांनी आधुनिकता वादाचा किल्ला एकट्याने लढवला असला तरी या क्षीण होत चाललेल्या प्रवाहात नेमाडेंनी आधुनिकतावादाची कास सोडली नाही, वास्तववादाचा पुरस्कार केला. रिंढे, नेमाडे व सारंगांना आजच्या मराठी साहित्यातले परस्परविरोधी दोन ध्रुव मानतात. वास्तववाद, आधुनिकवाद, प्रखर आधुनिकतावाद, वस्तुनिष्ठ-आत्मनिष्ठ लेखनाची चर्चा करताना आधुनिकतावादी साहित्य समाजाने का स्वीकारलं नाही याची सखोल चर्चा करतात, उत्तम वास्तववादी कादंबऱ्यांमागच्या लेखनप्रेरणेची मीमांसा करतात. कादंबरीकार नेमाडे व समीक्षक नेमाडे ही दोन रूपं दाखवताना कादंबरीकार नेमाडेंनी चाकोऱ्या मोडण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्या समीक्षेने नव्या चाकोऱ्या तयार झाल्या, असं निरीक्षण नोंदवतात. १९८०नंतरची मराठी कादंबरी सारंग-नेमाडे या दोघांच्याही कादंबऱ्यांच्या वाटेनं न जाता नेमाडेंच्या समीक्षेच्या वाटेनं गेली असं निर्णायक निरीक्षण नोंदवतात. नेमाड्यांनी समीक्षा लेखनात स्वतःच्या साहित्याविषयी मुळीच लिहिलं नाही, तर सारंगांना स्वसमर्थनार्थ स्पष्टीकरण द्यावं लागलं याचं कारण सारंग मध्यमवर्गीयपणावर वारंवार बोट ठेवत गेल्याने त्यांचं लेखन आणि समीक्षा साहित्यविश्वाला अप्रिय झाली असावी असा निष्कर्ष काढतात. रिंढे उत्तर आधुनिकतावादाला 'मंतरलेलं पाणी' म्हणतात. उत्तर आधुनिकतावादाने कलेची उच्चवर्णीयता मोडीत काढली असली तरी ते शोषितांच्या प्रतिकाराचं हत्यार बनू शकतं, प्रस्थापितांच्या दमनाचं साधन बनू शकतं याचं सूचन हा द्रष्टेपणा दाखवतात.

मराठी कवितेत ॲकॅडमिक पातळीवर साठोत्तरी, नव्वदोत्तरी, महानगरी, ग्रामीण असे काही टप्पे विद्यापीठातील प्राध्यापकांनी अभ्यासाच्या सोयीसाठी तयार केले. त्यातूनच पुढे महानगरी कवी, देशीवादी असा 'नवता'वादी भेदाभेद सुरू झाला आणि मग काही इकडचे काही तिकडचे, अस्सल कम-अस्सल अशी जातरचना सुरू झाली. खरंतर साठचं दशक अनेक अंगांने महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येण्यापासून लिटिल मॅगझिनची चळवळ या दशकाची देण आहे. घटनांचे परिणाम कवीमनावर होऊन कविता लिहिली जाते. महानगरातला म्हणून महानगरी कविता किंवा जागतिकीकरण म्हणून जागतिकीकरणाची कविता असं होत नाही. कवितेला काळाचे व समाजाचे समग्र भान असावे लागते. रिंढेनी 'मराठी कवितेतला फॅशनेबल उत्तराधुनिकतावाद' या प्रकरणात भारतीय सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिप्रेक्षात जागतिकीकरणाच्या प्रभावाची, त्यातल्या वास्तवाची चिकित्सा करताना यातल्या रिॲलिटीचा - व्हर्च्युअल आणि ग्राउंड - घेतलेला धांडोळा हे मायक्रोस्कोपिक विच्छेदन आहे.

ज्ञानपीठ पुरस्कार कोणत्याही भाषेतल्या लेखक-कवींसाठी महत्त्वाचा असतो. आजपर्यंत छप्पन भारतीय लेखकांना हा पुरस्कार मिळाला त्यात फक्त चार मराठी, त्यातले एक भालचंद्र नेमाडे. साध्या राज्य पुरस्कारांत लाटालाटी करणारी आपली जमात जातपात, उजवं-डावं

करणारी, आपल्या परिवाराच्या पदरात पुरस्कार पाडून घेणारी. मग सर्वोच्च असला म्हणून काय झालं, ज्ञानपीठ तरी अपवाद कसा असावा? यातही मराठीतले दि.पु.चित्रे, ग्रेस, कोलटकर, विजय तेंडुलकरांपासून अनेक वंचित ठेवले गेलेले. मराठी वाचकांपर्यंत इतका बारीक-सारीक तपशील जात नाही त्याला वाचकांची उदासीनताही कारणीभूत असते, म्हणूनच 'पासोडी' मधला या विषयावरचा लेख यातल्या वास्तवावर, वृत्तीवर आणि एकूणच पुरस्कारातल्या छाछूगिरीवर प्रकाश पाडणारा म्हणून वाचनीय आहे.

आशियाई इंग्रजी कवितेत मानाचं स्थान मिळवणारे अरुण कोलटकर मराठीत 'महत्त्वाचे दुर्लक्षित' कवी आहेत. पासोडीमध्ये अरुण कोलटकर व त्यांच्या कवितेविषयी दोन लेख आहेत. एक सोपेपणातली अवघडता आणि दुसरा मरणोत्तर कवीचं असणं. यात कोलटकरांच्या चिमटीत न येणाऱ्या कवितेच्या वेगळेपणाचा, कवितेच्या भाषेचा शोध लेखकाने घेतलाय. गांभीर्याचा मुखवटा धारण न करता विचारात पाडणारी, गुदगुल्या करणारी, अंतर्मुख करणारी, भानावर आणणारी, डोळ्यात अंजन घालणारी, हसवणारी आणि तरीही न रडवणाऱ्या कवितेतला प्राणवायू आजच्या चारोळ्या आणि मंचीय आरोळ्यात कसा गुदमरला हे दाखवून दिलेलं आहे.

पासोडीतल्या इतर विभागात पोलन्यो, पामुक, पेस्सोआ, सारामागू असे जगप्रसिद्ध कादंबरीकार, उदासीन वाचक, पुस्तकांचे नाहीसे होणे अशा अनेक विषयांवरचं लेखन रिंढे यांच्या अफाट वाचनाची साक्ष त्याचबरोबर ग्रंथव्यवहाराची सजगता आहे. कादंबऱ्यांविषयीचे लेख म्हणजे जागतिक आणि मराठी कादंबऱ्याविषयीचं प्रदीर्घ चिंतन आहे. काळाचं आव्हान स्वीकारून कष्टपूर्वक कादंबऱ्या लिहिणारे लेखक, काळाची गुंतागुंत पकडण्यासाठी त्यांना करावे लागणारे प्रयोग, कथानकांचे व्यामिश्र प्रवाह, वाचकांना थकवणारी आणि चकवणारी निवेदनाची मांडणी या सव्यापसव्यातून लेखक जात असला तरी स्वतःला थकवून घेणारे वाचक या लेखकांना भेटतील, काही व्यथा आहे आणि 'डोक्याला ताप चांगला' असं मानणाऱ्या विचक्षण वाचकाची प्रतीक्षाही. पासोडीत रिंढेंनी नोबेल पुरस्कार प्राप्त सारामागूच्या ब्लाईंडनेसवर लिहिलंय. या कादंबरीचा भा.ल.भोळे यांनी केलेला अनुवाद संपूर्ण कोरोना काळात आठवत राहिला कारण अंधत्वाचा सरसकट संसर्ग, त्यातली गूढता, रोगाविषयी मनामनातली भीती, ग्रासलेल्याशी माणसांचं आणि व्यवस्थेचं वर्तन कोरोनाकाळाशी जुळणारं आहे, आपण ते पाहतच आहोत.

आज भूमिका घेणं हा वरचेवर चघळला जाणारा विषय. लेखकाला राजकीय भूमिका असावी का? असा प्रश्न विचारल्यावर सारामागू म्हणतो, ''ती भूमिका नसते, नागरिक म्हणून त्यांचं कर्तव्य असतं. कलावंत-लेखकाच्या आधी तो नागरिक असतो.'' पुढे सारामागू म्हणतो, ''आपण लोकशाही व्यवस्थेत राहतो हा लोकांचा भ्रम आहे. सध्या दिसतोय तो लोकशाहीचा ढाचा आहे. आतून ही लोकशाही जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अशा न-लोकशाही संस्थांद्वारा चालवली जाणारी उमरावशाही आहे. हे सर्व अस्वस्थ करणारं असलं तरी भानावर आणणारं आहे.''

पासोडी वाचताना हे सर्व गांभीर्याने घेण्याइतपत आपण सजग आहोत का असा प्रश्न मनात येतो. असं परखड लिहिलेलं वाचलं जाणं हे आपणच आपल्याला समृद्ध करणं आहे. 'अहो रूपम् अहो ध्वनीच्या' च्या सध्याच्या काळात जात-पात, नातेसंबंध, सगेसोयरे, वैचारिक लागेबंध यापलीकडे जाऊन शोधसमीक्षेच्या प्रांतात तडजोड न करता परखड लिहिणाऱ्या रिंढेंची पासोडी अद्वितीय व आजच्या काळातली एकमेव आहे.


**राजीव जोशी**
चलभाष : ९५९४०७४४५३
josrajiv@gmail.com

◆◆

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सुप्रतिष्ठ प्राध्यापक डॉ. राजा दीक्षित यांच्या जीवनावरील गौरवग्रंथ, ‘इंडियन मॉडर्निटी : चॅलेंजेस अँड रिस्पॉन्सेस’ या डॉ. जास्वंदी वांबूरकर संपादित गौरवग्रंथावरील समीक्षालेख

# ‘आधुनिकता’ केंद्रित प्रा. राजा दीक्षित गौरवग्रंथ

प्रा. गणेश राऊत




पुस्तकाचे नाव : **इंडियन मॉडर्निटी : चॅलेंजेस अँड रिस्पॉन्सेस**
संपादक : **डॉ. जास्वंदी वांबूरकर**
प्रकाशक: **द युनिक फाऊंडेशन**
प्रथमावृत्ती : **नोव्हेंबर**
पृष्ठे: ३५०     किंमत : ३५०/-

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेमध्ये ‘इंडियन मॉडर्निटी : चॅलेंजेस अँड रिस्पॉन्सेस’ या इंग्रजी ग्रंथावर लेख लिहिण्याचे सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे हा ग्रंथ इंग्रजीत असला तरी तो महाराष्ट्र केंद्री आहे. मराठी साहित्याचा विपुल आधार घेऊन, मराठीतील अस्सल कागदपत्रे अभ्यासून हा ग्रंथ संपादिका डॉ. जास्वंदी वांबूरकर यांनी तयार केला आहे. भारतीय पातळीवरील आधुनिकता आणि महाराष्ट्र पातळीवरील आधुनिकतेचा आजतागायतचा प्रवाह ही या ग्रंथाची मुख्य कल्पना आहे. डॉ. जास्वंदी वांबूरकर यांनी अनेक गौरवग्रंथांचा अभ्यास करून हा गौरवग्रंथ सिद्ध केल्याचे आपणास समजते. ज्यांच्यावर हा गौरवग्रंथ आधारित आहे, त्या डॉ. राजा दीक्षित यांच्या जीवनाचा समग्र आढावा त्यांनी घेतला आहे. तो अत्यंत अभ्यासपूर्ण आहे. इथून पुढच्या काळात ज्यांना गौरवग्रंथ काढायचा आहे, त्यांना या ग्रंथाचा अभ्यास करावाच लागेल. खरं म्हणजे, गौरवग्रंथ कसा सिद्ध करावा याचा तो उत्तम नमुना आहे.

शिक्षकांच्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण कोणता तर त्यांच्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंच्या जीवनावर गौरवग्रंथ काढणे. हा आनंद नुकताच डॉ. श्रीधर मधुकर ऊर्फ राजा दीक्षित यांना मिळाला कारण त्यांच्या विद्यार्थ्यांनी, सहकाऱ्यांनी एकत्र येऊन ‘इंडियन मॉडर्निटी : चॅलेंजेस अँड रिस्पॉन्सेस’ हा ३५० पृष्ठांचा गौरवग्रंथ तयार

केला. हा गौरव ग्रंथ म्हणजे डॉ. दीक्षित यांच्या विद्यार्थ्यांवरील प्रेमाचे आणि विद्यार्थ्यांनी डॉ. दीक्षित यांच्यावर केलेल्या प्रेमाचे एक प्रतीक आहे.

विद्यार्थ्यांवर निरपेक्ष प्रेम करणारे, ज्ञान संपादन करण्यावर आणि ते मुक्त हस्ते देण्यात आनंद मानणारे, इतिहास आणि काव्य या अभिजात क्षेत्रात गती असणारे म्हणून डॉ. राजा दीक्षित ओळखले जातात. डॉ. दीक्षित हे एकाच वेळी अध्ययन –अध्यापन करणारे शिक्षक, कवी, इतिहास संशोधक, ख्यातनाम वक्ते आणि एक अति दुर्मिळ कोटीतील चांगला माणूस म्हणूनच मला दिसले आहेत. शिक्षक म्हणून दीक्षित सर कृतार्थ आहेत. नियतीने त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना भरभरून दिले. आयुष्याच्या पूर्वार्धात संघर्ष, प्रतिकूलता, हिणविण्याचे प्रसंग, अस्थिरता या सगळ्याचा सामना सरांनी केला. इतिहासाच्या क्षेत्रात कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक म्हणून कारकीर्द सुरू करून विद्यापीठीय क्षेत्रात सुप्रतिष्ठ प्राध्यापक (एमिरेट्स प्रोफेसर) म्हणून नियुक्त होण्यापर्यंतची वाटचाल त्यांनी केली आहे. स्वतःच्या व्यावसायिक कारकिर्दीतील सर्वोच्च सन्मानाच्या आणि स्वतःच्या वैचारिक योगदानाला मान्यता देणाऱ्या पदावर त्यांची नियुक्ती झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागात हे भाग्य डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्यानंतर डॉ. दीक्षित यांनाच मिळाले. असे कितीतरी सन्मान त्यांच्या नावावर जमा आहेत. ज्या फर्ग्युसनमध्ये त्यांची कारकीर्द सुरू झाली, त्या महाविद्यालयाचा इतिहास त्यांनी संपादित केला. डॉ. वि.मा. बाचल यांनी हा ग्रंथ लिहिला आहे. पुढे ज्या विद्यापीठात त्यांची कारकीर्द आकाराला आली त्याच पुणे विद्यापीठाचा (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) इतिहास त्यांनी लिहिला. हे भाग्य फार थोड्यांना लाभते. दोन्ही कामांवर/ ग्रंथांवर 'दीक्षितमुद्रा' किंवा 'राजामुद्रा' उमटली आहे. २०१८ मध्ये इतिहास क्षेत्रातील भारतातील सर्वोच्च शासकीय संस्था म्हणजे 'इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च' या संस्थेवर त्यांची सदस्य म्हणून नियुक्ती झाली. ते इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे या संस्थेचे विश्वस्त आहेत. ही सगळी पदे त्यांच्याकडे चालत आली.

डॉ. दीक्षित ज्यासाठी प्रसिद्ध आहेत त्या भागाकडे आपण वळूयात. 'इतिहास, समाजविचार आणि केशवसुत' या विषयावर त्यांनी एम.फील. केले आहे. या विषयाला मान्यता मिळवण्यापासूनच त्यांना विरोधाला तोंड द्यावे लागले; परंतु या विषयावरील त्यांच्या प्रबंधाला विद्यापीठात 'ज' (ओ) ही सर्वोच्च श्रेणी मिळाली. पीएच.डी. पदवीसाठी 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र: मध्यमवर्गाचा उदय' या विषयावर त्यांनी सखोल संशोधन केले आहे. मराठीतील विज्ञानविषयक व इतिहासविषयक लेखन, वेस्टर्न इंडिया: हिस्ट्री, सोसायटी अँड कल्चर, पुणे विद्यापीठाचा इतिहास, निवडक शेजवलकर, समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड २,३, प्रार्थना समाजाचा इतिहास या संशोधनपर ग्रंथांनी डॉ. दीक्षित यांनी संशोधनाच्या क्षेत्रात नवनवे मानदंड निर्माण केले. स्मरणिकांचे नेमके संपादन, शोधनिबंधयुक्त प्रोसिडिंग्ज, ४० पेक्षा जास्त शोधनिबंध, मराठी विश्वकोश आणि अन्य कोशांमधील नोंदी, विविध ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना, इंग्लिश, मराठी ग्रंथांची परीक्षणे (३५ पेक्षा जास्त), १९ पाठ्यपुस्तकांचे लेखन आणि ४२ पाठ्यपुस्तकांचे संपादन, १५० पेक्षा जास्त वृत्तपत्रीय व नियतकालिकांमध्ये लेख, १०० पेक्षा जास्त कविता, ४ लघुकथा, १ एकांकिका, 'युनिव्हर्सिटी ऑफ पुणे' या इ.एम.आर.सी.च्या फिल्मचे पटकथा लेखन, इंटरनेटवरील लेखन, ६ नियतकालिकांचे संपादक व सल्लागार मंडळाचे सदस्य असा हा गौरवग्रंथ प्रसिद्ध होईपर्यंत दीक्षित सरांची भरभक्कम कामगिरी आहे. या कामगिरीची कल्पना गौरवग्रंथाच्या शेवटी दिलेल्या प्रा. दीक्षित यांच्या विस्तृत लेखनसूचीवरूनही येऊ शकते. अशा या व्यक्तिमत्त्वाचे गुणसंकीर्तन त्यांच्या विद्यार्थिनी डॉ. जास्वंदी वांबूरकर यांनी ग्रंथातील स्वतंत्र लेखात केलेले आहे. मसापच्या वाचकांना मागील एका अंकात 'प्रार्थना समाजाचा इतिहास' या ग्रंथावर लेख वाचल्याचे स्मरत असेलच. प्रार्थना समाजाचा इतिहास या जुन्या ग्रंथाला त्यांनी आधुनिक काळाशी सुसंगत करून आणि प्रार्थना समाजाच्या कार्यातील स्त्रियांच्या योगदानाला योग्य तो न्याय देऊन आदर्श संपादन कसे करावे, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

पुस्तकाच्या अंतरंगात डोकावण्यापूर्वी काही गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ अमोल पाटील आणि संपादकांनी तयार केले आहे. ते अर्थवाही आहे. 'केसरी' पत्र, 'स्त्री पुरुष तुलना' हा ग्रंथ, 'बहिष्कृत भारता'च्या अंकावरील चित्र, महात्मा गांधीजींचा चरखा, 'अयोध्येचा राजा' या चित्रपटाची जाहिरात आणि भारतीय राज्यघटना या ठळक गोष्टी घेऊन मुखपृष्ठाची रचना केली आहे. बारकाईने विचार केल्यास भारतीय आधुनिकता याच

टप्प्याने पुढे सरकत गेल्याचे आपणास दिसून येईल. अशा प्रकारच्या वैचारिक ग्रंथाला अतिशय योग्य असे मुखपृष्ठ तयार करण्यात आले आहे. याचे विशेष कौतुक केले पाहिजे कारण अनेकदा ग्रंथाविषयी लिहिताना मुखपृष्ठकार, मांडणीकार यांच्याकडे दुर्लक्ष होते. आतमध्ये टंक आकार (फॉन्ट साईज) अतिशय योग्य आणि वाचनीय वापरला आहे. त्यामुळे डोळ्यांना अजिबात त्रास होत नाही. अन्यथा अनेक पुस्तकांमध्ये टंकाचे प्रयोग म्हणजे डोळ्यांवर अन्यायच असतो. मलपृष्ठावर डॉ. राजा दीक्षित यांचे उत्तम छायाचित्र आहे. मलपृष्ठावरही खरं म्हणजे आतलाच टंक वापरायला हरकत नव्हती. कदाचित कमी जागेत भरपूर मजकूर द्यायचा असल्यामुळे वेगळा टंक वापरला असावा.

प्रास्ताविकात प्रकाशक मुक्ता कुलकर्णी यांनी 'द युनिक फाउंडेशन, द युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन प्रा. लि.' यांच्या वतीने भूमिका मांडली आहे. स्पर्धा परीक्षा केंद्र चालविणारी संस्था मनात आणल्यास किती उत्तम प्रकारचे सामाजिक, वैचारिक, लोकोपयोगी कार्य करू शकते, हे आपणास कुलकर्णी यांच्या मनोगतातून समजते. संपादिका डॉ. जास्वंदी वांबूरकर यांनी ऋणनिर्देशात या ग्रंथाच्या निर्मितीस ज्यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग लाभला, त्यांची नोंद केली आहे. पुढे लगेचच त्यांनी आपले गुरू डॉ. राजा दीक्षित यांचा परिचय करून देणारा प्रदीर्घ (१८ पृष्ठे) लेख लिहिला आहे. या लेखातून डॉ. दीक्षित यांचे चौफेर व्यक्तिमत्त्व उभे करण्यात संपादिका यशस्वी झालेल्या आहेत.

१५ पृष्ठांच्या संपादकीयात डॉ. वांबूरकर यांनी ग्रंथामागील वैचारिक अधिष्ठान मांडले आहे. त्यानंतर इरिना ग्लुशकोव्हा, वर्षा शिरगावकर, अरविंद गणाचारी, उमेश बगाडे, मधुमिता बंदोपाध्याय, चंद्रकांत अभंग, चंद्राणी चॅटर्जी, श्रद्धा कुंभोजकर, मीना वैशंपायन, यशवंत सुमंत, अभिधा धुमटकर, रश्मी कोंड्रा, चैत्रा रेडकर आणि जास्वंदी वांबूरकर या अभ्यासकांचे लेख आहेत. हा ग्रंथ आपणास एका संदर्भ संपन्नतेचा अनुभव देतो.

डॉ. जास्वंदी वांबूरकर यांची संपादकीय दृष्टी आणि ग्रंथ निर्मितीतील त्यांचे योगदान लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या एस.एन.डी.टी. विद्यापीठात अध्यापनाचे कार्य करतात. आधुनिक महाराष्ट्र, मराठी वाङ्मय, भारतीय इतिहास लेखनशास्त्र पद्धती, इतिहासातील लिंगभाव हे त्यांच्या खास अभ्यासाचे विषय आहेत. त्यांची ४ पुस्तके आणि २४ संशोधनपर निबंध प्रसिद्ध आहेत. विभावरी शिरूरकर यांच्या साहित्यावर आधारित आणि नवा दृष्टिकोन मांडणारा त्यांचा पीएच.डी.चा प्रबंध आहे. 'इतिहासातील नवे प्रवाह' हे डायमंड प्रकाशनने प्रसिद्ध केलेले त्यांचे पुस्तक आवर्जून वाचावे असे आहे. आजही त्यांनी स्वतःला विविध अभ्यास विषयांमध्ये गुंतवून घेतले आहे.

प्रा. डॉ. राजा दीक्षित यांच्या संशोधनाशी सुसंगत असा विषय घेऊन ग्रंथाची मांडणी करण्यात संपादकांनी मोठे औचित्य दाखविले आहे. एकोणिसावे शतक हा त्यांच्या आवडीचा आणि संशोधन, चिंतनाचा विषय. त्यामुळे भारतातील आधुनिकतेची सुरुवात आणि सुरुवातीच्या कालखंडाने व्यापलेले समग्र जीवन, या व्यापकतेतून आधुनिकतेला मिळणारा प्रतिसाद (कधीकधी विधायक आणि विरोधीसुद्धा) हा या ग्रंथाचा आत्मा आहे.

संपादिका या संदर्भात लिहितात, 'आधुनिकता ही निरनिराळ्या संस्कृतींमध्ये आणि राष्ट्रांमध्ये वैविध्यपूर्ण रीतीने अभिव्यक्त झालेली एक बहुआयामी प्रक्रिया आहे. पाश्चात्त्य जगाच्या तुलनेत आधुनिक भारताची जडणघडण एका अनोख्या संक्रमणातून झाली. भारताने प्रबोधन, आधुनिकतेचे युग आणि भांडवली व्यवस्थेतील संक्रमण या जटील घडामोडी एकाच काळात, वासाहतिक सत्तेच्या छायेखाली अनुभवल्या. भारतात विविध प्रदेशांत आणि विविध समूहांमध्ये आधुनिकतेचे अभिसरण व आविष्कारही भिन्नभिन्न होते. प्रत्येक प्रदेशाचा इतिहास, भौगोलिक रचना, भाषा, संस्कृती या घटकांमध्ये विविधता असल्यामुळे येथे बहरलेली आधुनिकता खूप वैशिष्ट्यपूर्ण होती. परंपरा आणि नवता यांच्या द्वंद्वातून येथील आधुनिकता साकारली.'

भारतात आधुनिकता इंग्रजांच्या आगमनानंतर आली नाही, तर तिची पायाभरणी त्याही अगोदर पासूनच सुरू झाली होती. या संदर्भात प्रा. डॉ. अ.म. देशपांडे यांनी 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये एक नवी दृष्टी देणारा लेख लिहिला होता. तो लेख तेव्हा इतिहासाच्या वर्तुळात खळबळ उडविणारा ठरला. येथील समाजात १८ व्या शतकात हळूहळू बदल घडत होते. हे बदल मंदगतीने घडत होते आणि ब्रिटिशांनी त्याला गती दिली. येथील समाजात बदलाची प्रक्रिया घडायला सुरुवात झाली नसती, तर ब्रिटिशांना येथे बदल घडवून आणणे शक्य झाले नसते,

अशा स्वरूपाची सगळी साधक-बाधक चर्चा संपादकांनी संपादकीयात केलेली आहे.

१५ पृष्ठांच्या संपादकीयात जवळपास २० देशी-परदेशी अभ्यासकांच्या संशोधनाचा धांडोळा घेऊन आधुनिकतेची सांगोपांग चर्चा करण्यात आली आहे. आधुनिकतेच्या संकल्पनेचे मूळ, अकादमिक क्षेत्रात ही संकल्पना केव्हा आली, या संकल्पनेचा विकास कसा होत गेला याची उत्तम मांडणी करण्यात आली आहे. या संपादकीयात व्यक्त करण्यात आलेल्या सगळ्याच मतांशी आपण सहमत होऊ असे नाही; परंतु हे संपादकीय संदर्भांनी भरले आहे. त्याचा मराठीत अनुवाद होणे गरजेचे आहे. संपादकांनी कष्ट घेतल्याचे आपणास ठायी ठायी जाणवते. ग्रंथाच्या शेवटी लेखकांची एकत्रित माहिती देण्यात संपादकांनी योग्य ते औचित्य साधले आहे.

ग्रंथातील पहिल्याच लेखात रशियन विदुषी इरिना ग्लुशकोव्हा यांनी संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या जनमानसातील प्रतिमेच्या संदर्भात चर्चा केली आहे. या संतांची काढण्यात आलेली चित्रे, छापण्यात आलेली चित्रे, चित्रपटांच्या माध्यमातून (उदा. संत ज्ञानेश्वर महाराज- शाहू मोडक, संत तुकाराम महाराज- विष्णुपंत पागनीस) जनमानसावर उमटलेली प्रतिमा याचा लेखात बारकाईने वेध घेतला आहे. ग्लुशकोव्हा यांच्या काही मतांबद्दल आपली मतमतांतरे असू शकतात (उदा. संतांची प्रतिमा), परंतु त्यांनी ज्या बारकाईने अभ्यास केला आहे, त्याने आपण थक्क होतो. गोंधळेकर आणि संत प्रतिमेचे चित्र, रा. चिं. ढेरे यांचे संदर्भ त्यांनी दिले आहेत. बाळशास्त्री जांभेकर यांचा जो संदर्भ दिला आहे त्यासंदर्भात लेखिकेने, मूळ प्रत पाहायला मिळाली नाही असे मोकळेपणाने कबूल केले आहे. परदेशी संशोधक ज्या पद्धतीने कष्ट घेतात ते आम्हाला खूप काही शिकविणारे आहे. या संतांची चित्रे, त्या चित्रांमधील बारकावे, आभूषणे, वस्त्रालंकार, चेहरेपट्टी या अनुषंगाने त्यांनी चर्चा केली आहे. संत तुकाराम महाराजांवरील जुन्या चित्रपटांपासून ते अगदी अलीकडच्या जितेंद्र जोशी यांच्या अभिनयाने गाजलेला संत तुकाराम यांच्यावरील चित्रपटाचा आढावा घेऊन लेखिकेने उत्कृष्ट शोधनिबंध सादर केला आहे. पृष्ठ क्रमांक ६७ वर माधव चंद्रोबा डुकले हे नाव चुकले आहे. ते दुसऱ्या आवृत्तीत दुरुस्त होईलच. 'चंद्रोबा' ऐवजी 'कांडोबा' झाले आहे.

प्रा. डॉ. वर्षा शिरगावकर हे इतिहासाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव आहे. भूदेव मुखोपाध्याय आणि विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्यावरील शोध निबंधाच्या माध्यमातून त्या महाराष्ट्र आणि बंगाल यांच्या अंत:संबंधावर जणू भाष्य करीत आहेत. संपादकीयातसुद्धा या शोधनिबंधाच्या संदर्भात ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर. सी. दत्त, रवींद्रनाथ टागोर यांचे उल्लेख केलेले आहेत. विविध सामाजिक सुधारणांच्या संदर्भात उपयुक्त माहिती या शोधनिबंधात आहे. हा लेखसुद्धा संदर्भांनी अगदी खच्चून भरला आहे.

'केशवचंद्र सेन यांची १८६४ मधील मुंबई भेट आणि त्याला 'यंग बॉम्बे' कडून मिळालेला प्रतिसाद' या विषयावरील लेख अरविंद गणाचारी यांनी लिहिला आहे. बॉम्बे गॅझेट, इंदुप्रकाश, टाइम्स ऑफ इंडिया अशा पत्रांचा योग्य तो वापर करून गणाचारी यांनी आपले संशोधन सादर केले आहे. ज्या 'महाराजाला एबल केस'चा उल्लेख त्यांनी केला आहे, त्या केसवर खरं म्हणजे एक स्वतंत्र प्रकरण होईल, एवढे ते महत्त्वाचे आहे; पण अर्थात तो लेखाचा मुख्य विषय नाही. याच लेखात पृ. क्र. १०९ वर तळटीपेचा आकडा ४१ ऐवजी १ असा छापला गेला आहे. तो मुद्रणदोष आहे. तो संदर्भ देण्याच्या पद्धतीशास्त्रानुसार पुढील आवृत्तीत दुरुस्त होईल, अशी अपेक्षा आहे. ब्राह्मो समाज आणि प्रार्थना समाज यांच्या कार्याचे योग्य विश्लेषण केले आहे.

महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रा. डॉ. उमेश बगाडे यांनी प्रकाश टाकला आहे. पर्यायी संस्कृतीचे जनक, पर्यायी शैक्षणिक व्यवस्थेचे निर्माते अशा महात्मा फुले यांच्या कार्याचा सर्वांगीण वेध त्यांनी घेतला आहे. महात्मा फुले हे एक सेंद्रिय विचारवंत आहेत. या शोधनिबंधातून बगाडे यांनी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे योग्य ते मूल्यमापन केले आहे. या ग्रंथातील या लेखात सगळ्यात जास्त संदर्भांची नोंद आहे. एका अर्थाने संदर्भांनी युक्त असा हा विस्तृत लेख आहे.

मधुमिता बंदोपाध्याय यांनी 'बॉम्बे, बरोडा अँड सेंट्रल रेल्वे कंपनी'च्या अभ्यासाच्या माध्यमातून आधुनिकतेचा वेध घेतला आहे. विविध समाज घटकांवर झालेले रेल्वेचे काही चांगले परिणाम आणि तेवढेच दुष्परिणाम 'मुंबई-अहमदाबाद' रेल्वेमार्गाचे आहेत, हे त्यांनी दाखवून दिले आहे. असाच अभ्यास भारतभर होणे आवश्यक आहे.

प्रा. डॉ. चंद्रकांत अभंग यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण संशोधनावर आधारित लेखात आजतागायत न सुटलेल्या मैलासफाईच्या प्रश्नाची दखल घेतली आहे. ब्रिटिशांच्या काळात ही व्यवस्था सुरू झाली आणि एकविसाव्या शतकातही चालू आहे. या व्यवस्थेचे शंभर टक्के यांत्रिकीकरण आपणास आजही जमलेले नाही. या भारतव्यापी समस्येचा आढावा त्यांनी १७ पृष्ठे व्यापलेल्या शोधनिबंधात घेतला आहे. या शोधनिबंधासाठी त्यांनी अभिलेखागारातील मूळ साधने, मोडी कागदपत्रे, सरकारी कागदपत्रे, विशेषतः अहवाल, सर्वेक्षणे यांचा वापर केला आहे. सातारा जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्यांचा आदेश, मिरज म्युनिसिपल कौन्सिलचा जाहीरनामा, बिंदेश्वरी पाठक यांच्या सुलभ शौचालय संस्थेने उपलब्ध करून दिलेली दोन छायाचित्रे, जी आजही बघितली तरी अंगावर काटा येतो, नाशिक नगरपालिका व शहर यांची गेल्या शंभर वर्षांची वाटचाल, १८६४ ते १९६४ यांची आकडेवारी यातून ब्रिटिशकालीन ते स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सगळा प्रश्न उलगडून दाखविण्यात आलेला आहे. या ग्रंथात रोजच्या जगण्याशी संबंधित असणारे जे मोजके लेख आहेत, त्यांपैकी हा एक महत्त्वाचा लेख आहे. अन्य लेखांमध्ये इतिहास, इतिहासाचे तत्त्वज्ञान, वैचारिक चर्चा, व्यक्तिगत कर्तृत्व यांची साधक-बाधक चर्चा आहे. व्यक्तीला आणि पर्यायाने समाजाला भेडसावणाऱ्या प्रश्नांची चर्चा करणारा हा लेख आहे. भले हा लेख उपाय सुचवणारा नसेल; परंतु प्रश्नाची उग्रता दाखवून देणारा आहे.

महात्मा गांधी यांच्या साबरमती आश्रमात स्वच्छतेच्या कामासंदर्भात जे प्रयोग झाले, ते लक्षात घेणे आवश्यक आहे. बाळकोबा भावे, विनोबा भावे यांनी या आश्रमात मैलासफाईचे काम केले. गांधीजींनी हे काम पुढे आश्रमात राहणाऱ्या सर्वांनाच करायला सांगितले. विनोबा सुरगाव या वर्धा भागातील गावी मैलासफाईचे विधायक कार्य करीत होते. अप्पासाहेब पटवर्धन यांचेही कार्य या संदर्भात महत्त्वाचे आहे. अलीकडच्या अभ्यासकांनी याची नोंद घेणे आवश्यक आहे.

प्रा. डॉ. चंद्राणी चॅटर्जी या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात इंग्रजीचे अध्यापन करतात. त्या फुलब्राईट फेलोशिपधारक अभ्यासक आहेत. त्यांनी या ग्रंथातील लेखात 'बंगाली आणि मराठी भाषेतील सॉनेट उर्फ सुनीत' च्या माध्यमातून, साहित्य हा इतिहास आहे, असे दाखवून दिले आहे. त्यांनी तुलनात्मक विश्लेषणावर भर दिला आहे. या काव्यातून नव्या समाजजीवनाचा वेध घेता येतो. जे सामाजिक चित्रण त्यातून दिसते, त्यातून आपणास समकालीन इतिहासाचा वेध घेता येतो. इतिहास आणि साहित्य याचा परस्पर संबंध कसा असतो हे त्यांनी दाखवून दिले आहे.

प्रा. डॉ. श्रद्धा कुंभोजकर या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात इतिहास विभाग प्रमुख आहेत. त्यांनी एकोणिसाव्या शतकातील मराठी नाटकांच्या अभ्यासातून आधुनिकतेचा वेध घेतला आहे. त्यासाठी त्यांनी ३८ नाटकांचा आढावा घेतला आहे. डॉ. मीना वैशंपायन यांनी शंकर पांडुरंग पंडित यांच्या कार्याचा वेध घेतला आहे. त्यांनी पंडित यांना 'फरगॉटन ओरिएंटॅलिस्ट' (विस्मृतीत गेलेले पौर्वात्यवादी अभ्यासक) म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर पंडित यांचे कार्य मोलाचे असूनही ते उपेक्षितच राहिले. उपेक्षितांचे अंतरंग जाणून डॉ. वैशंपायन यांनी त्यांना योग्य तो न्याय आपल्या शोधनिबंधातून दिलेला आहे. कै. प्रा. डॉ. यशवंत सुमंत यांनी सेनापती पांडुरंग महादेव बापट यांच्या राजकीय विचारविश्वाचा वेध घेतला आहे. अत्यंत अभ्यासपूर्ण असा हा धांडोळा आहे. त्यांनी राजकीय विचारांची उत्तम पद्धतीने चिकित्सा केली आहे. सेनापतींचे ब्रिटिश सत्तेविषयीचे आकलन, त्यांनी घेतलेला भारताच्या भविष्याचा वेध माननीय आहे.

प्रा. डॉ. अभिधा धुमटकर या बहुभाषिक विद्वान आहेत. त्यांनी महाराष्ट्राच्या एका तुलनेने दुर्लक्षित केले गेलेल्या शिल्पकाराचा 'डॉ. हेरॉल्ड मान' यांचा आढावा घेतला आहे. कृषी, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील त्यांचे अजोड कार्य अधोरेखित केले आहे. त्यांचे कार्य पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्याची गरज आहे. मान यांच्या कार्याचे पुरेसे चीज झालेले नसले तरी मान हे काय दर्जाचे संशोधक होते हे आपणास समजून येते. डॉ. रश्मी कोंड्रा या डॉ. दीक्षित सरांच्या पीएच.डी.च्या विद्यार्थिनी आहेत. 'लोकमान्य टिळक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा चित्रपट विषयक दृष्टिकोन' या विषयावर त्यांनी लेख लिहिला आहे. वरवर पाहता या शीर्षकाचे आपणास आश्चर्य वाटू शकते; परंतु लेख वाचल्यावर आपले समाधान होते. लोकमान्य टिळक स्वदेशीच्या भूमिकेतून चित्रपटाकडे बघत होते. श्रीनाथ पाटणकर, बाबूराव पेंटर, भालजी पेंढारकर, आचार्य अत्रे यांच्या कार्याची योग्य ती दखल या लेखात घेतली गेली आहे.

दादासाहेब फाळके यांचे या संदर्भातील कार्य महत्त्वाचे आहेच. त्यासही लेखिकेने न्याय दिला आहे. नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया यांनी 'श्रद्धांजली आणि शब्दचित्रे' हे महात्मा गांधीजी लिखित पुस्तक प्रसिद्ध केले आहे. गांधीजींनी 'यंग इंडिया'च्या ४ ऑगस्ट १९२० च्या लेखात (पृ. १२०) एक आठवण दिली आहे. ती येथे महत्त्वाची आहे. गांधीजी लिहितात, 'त्यांनी (टिळकांनी) इंग्लंडला भेट दिली तेव्हा इंग्रज ज्युरींचा त्यांचा अनुभव वाईट होता. तरीही त्या भेटीमुळे ते ब्रिटिश लोकशाहीचे खंदे पुरस्कर्ते झाले आणि चित्रपटासारख्या दृश्य माध्यमांद्वारे पंजाबला ही शिकवण द्यावी, अशी आश्चर्यकारक सूचना त्यांनी केली.' लोकमान्य टिळक चित्रपट या माध्यमाकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघत होते हे समजण्यास महात्माजींचे निरीक्षण पुरेसे आहे. निरक्षर जनतेला चित्रपटाच्या माध्यमातून साक्षर करता आले नाही तरी शहाणे करता येईल, यावर राष्ट्रीय नेत्यांचा विश्वास होता. चैत्रा रेडकर यांनी 'पंढरपूर सत्याग्रह आणि साने गुरुजी' यावर लेख लिहिला आहे. विविध पुराव्यांच्या आधारे महाराष्ट्रातील एका महत्त्वाच्या प्रश्नाला त्यांनी न्याय दिला आहे. सामाजिक समता, मंदिर प्रवेश लढा यासाठी भारतीय संस्कृतीचे अभ्यासक असणारे साने गुरुजी राजकीय लोकशाहीचा मार्ग सोडत नाहीत हे महत्त्वाचे आहे. संपादिका जास्वंदी वांबूरकर यांनी विभावरी शिरूरकर यांच्या लेखनातून कळणारा इतिहास, स्त्रीवाद (खरं म्हणजे या भूमीतला देशी स्त्रीवाद) यावर मांडणी केली आहे. त्यांच्या पीएच.डी. संशोधनाचा हाच विषय आहे. विभावरी शिरूरकर यांना आजही या संदर्भातील योग्य ते श्रेय दिले जात नाही. ही खंत दूर करण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे करून त्यांचे कार्य समोर आणले आहे.

या ग्रंथाच्या निमित्ताने आधुनिकतेची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू व्हावी, ही अपेक्षा. या ग्रंथाचे मराठीत भाषांतर करण्याची गरज आहे. आता अपेक्षा आहे ती वाचकांच्या प्रतिसादाची. ज्यांना ज्यांना भारतीय माणसांविषयी आणि त्यांच्या प्रश्नांविषयी आस्था आहे, त्यांनी हा ग्रंथ संग्रही ठेवायलाच हवा.

**प्रा. गणेश राऊत**
चलभाष : ८४५९७७२०१८

## जाहिरातीचे दरपत्रक

**सप्रेम नमस्कार!**

महाराष्ट्र साहित्य पत्रिका हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मुखपत्र असून मराठी साहित्य-संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे त्रैमासिक आहे. म.सा.पत्रिकेला १०४ वर्षांची दीर्घ परंपरा लाभली आहे. म.सा.पत्रिकेत मराठी साहित्याच्या विविध प्रवाहांचा आणि प्रकारांचा परामर्श घेतला जातो. पत्रिकेने विशेषांकही प्रकाशित केले आहेत. साहित्यसंशोधनविषयक लेख पत्रिकेतून नियमितपणे प्रकाशित केले जातात.

ग्रंथपरीक्षणे आणि वाङ्मय समालोचन करणारे लेख पत्रिकेमध्ये प्रसिद्ध होतात. समकालिन साहित्य व्यवहारावर म. सा. पत्रिकेतून भाष्य केले जाते. संशोधक, विद्यार्थी आणि मराठी रसिक यांनी सदैव पत्रिकेला उदंड प्रतिसाद दिला आहे. महाराष्ट्रातील सर्व थरांतील रसिक वाचक पत्रिका वाचतात. १३,५०० प्रती इतक्या संख्येने पत्रिका छापली जाते आणि आजीव सभासदांना अंक मोफत पाठविला जातो. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेला आपल्या व्यवसायाची, प्रकाशनांची अथवा शुभेच्छापर संदेशांची जाहिरात देऊन पत्रिकेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे, ही विनंती.


**– प्रकाशक आणि संपादक**
**(म. सा. पत्रिका)**

| जाहिरातीचे दरपत्रक | |
|---|---|
| कव्हर २ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| कव्हर ३ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| मलपृष्ठ ४ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| आतील पान (कृष्णधवल) | रु. ४,०००/- |
| आतील अर्धे पान (कृष्णधवल) | रु. २ ,०००/- |
| आतील पाव पान (कृष्णधवल) | रु. १,०००/- |

प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये लिखित 'साहित्य संशोधन स्वरूप आणि उपयोजन' या ग्रंथावरील परीक्षण.

# साहित्य संशोधन स्वरूप आणि उपयोजन

**प्रा. डॉ. शिरीष लांडगे**




पुस्तकाचे नाव : **साहित्य संशोधन स्वरुप आणि उपयोजन**
लेखक : **प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये**
प्रकाशकः **स्नेहप्रकाश प्रकाशन, श्रीरामपूर**
प्रथमावृत्ती : **५ ऑक्टोबर २०२०**
पृष्ठेः १७४ किंमत : २००/-

मराठी संशोधनामध्ये सैद्धांतिक आणि उपयोजित लेखन सातत्याने होत आलेले आहे. असे लेखन मुख्यतः विद्यापीठीय चौकटीत होत असते. अनेकदा त्यामागे काही हेतू, गरजा असतात. प्रबंधलेखन, चर्चासत्रे, कार्यशाळा अशा निमित्ताने हे लेखन होते. अशा लेखनाची उपयुक्तता किती? अशा प्रकारच्या लेखनातून साहित्यव्यवहार, संशोधनव्यवहाराला कितपत मदत मिळते? यावर अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. अर्थात अशा नकारात्मक दृष्टीने पाहण्याचे फार काही कारण नसावे कारण अध्ययन, अध्यापन आणि संशोधन ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. यामध्ये काही मोजके अध्यापक अध्यापनाबरोबर संशोधनही करीत असतात. सातत्याने चिकित्सा करीत असतात. अशा काही मोजक्या अध्यापकांमध्ये डॉ. बाबुराव उपाध्ये यांचा समावेश होतो.

डॉ. बाबुराव उपाध्ये हे सतत लेखन, वाचन, साहित्यविषयक उपक्रम, अध्ययन, अध्यापन आणि संशोधनात व्यग्र असतात. त्यांनी कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र असे सर्जनशील लेखन केले

आहे. तसेच समीक्षा आणि संशोधन केले आहे. साहित्यक्षेत्रामध्ये दीर्घकाळ कार्य केलेल्या डॉ. बाबुराव उपाध्ये यांचा 'साहित्य संशोधन स्वरूप आणि उपयोजन' हा ग्रंथ स्नेहप्रकाश प्रकाशन यांनी नुकताच प्रकाशित केला आहे.


या ग्रंथामध्ये डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी वेळोवेळी लिहिलेले लेख समाविष्ट केले आहेत. त्यामध्ये साहित्य संशोधन, संशोधन पद्धतीतील नवीन प्रवाह, साहित्य संशोधनाच्या नव्या दिशा, भाषिक विषयाच्या संशोधन संधी, साहित्य संशोधन आणि पत्रात्मक अभ्यास आराखडा, संवादपर्वमधील साहित्यिकांची पत्रे, मराठी कवितेच्या निमित्ताने, नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कथा, आईची माया कथेच्या निमित्ताने, मराठी कादंबरी स्वरूप व संदर्भ, आनंद यादव यांच्या आत्मचरित्रपर कादंबऱ्यांच्या निमित्ताने, झोंबीमधील स्त्री जीवन, २००२ नंतरची दलित आत्मकथने, ग्रामीण साहित्याचे स्वरूप, साठोत्तरी ग्रामीण साहित्य, १९९० नंतरचे मराठी ग्रामीण साहित्य, प्रसारमाध्यमे स्थिती व गती, प्रसारमाध्यमे आणि साहित्य, प्रसार माध्यमे आणि समाज, प्रसार माध्यमातील मराठी, प्रसारमाध्यमेः जाहिरातींचे भाषिक कौशल्य, सामाजिक भाषाविज्ञान, आदिवासी समाज स्थिती आणि गती, मराठी विषय अभ्यासक्रम निमित्ताने असे वेगवेगळ्या विषयांवरील लेख आहेत.

त्यामधून साहित्य संशोधन काय आहे? भाषिक संशोधनाचे स्वरूप, नवीन प्रवाह, संशोधनपद्धती, संशोधनाच्या नव्या दिशा, संशोधनातील संधी स्पष्ट होतात. तसेच विविध ग्रंथांची समीक्षाही येते. एकाच ग्रंथामध्ये मराठी समीक्षा, संशोधन, उपयोजित समीक्षा, सैद्धांतिक, उपयोजित मराठी आणि भाषाविज्ञान अशा विविध विषयांवर डॉ. उपाध्ये हे लिहितात. तसे पाहिले तर हे वेगवेगळे विषय आहेत. त्यांना एका सूत्रात बांधण्याचा प्रयत्न केला आहे; पण हा प्रयत्न केवळ प्रयत्न या पातळीवर राहतो. एक सूत्र हाती येत नाही. संशोधनाचे एक सूत्र घेऊन त्या प्रकाशात उपयोजन झालेले दिसत नाही कारण, एका दीर्घ कालखंडामध्ये लिहिलेले हे शोधनिबंध आहेत.

पण 'दिसामाजी काहीतरी लिहीत जावे' यानुसार डॉ. बाबुराव उपाध्ये हे सतत साहित्यविषयक विचार करीत असतात, लेखन करीत असतात. या विचारांचा प्रभाव आणि परिणाम त्यांच्या एकूणच लेखनावर होताना दिसतो. त्यांनी प्रसंगपरत्वे वेगवेगळ्या विषयांवर समीक्षालेख लिहिले. हे सर्व लेख या ग्रंथातून एकत्र वाचायला मिळतात. यातून डॉ. उपाध्ये यांच्या संशोधनाचा प्रवास उलगडतो. वाचक अशा या संशोधन लेखांची चिकित्सा करतील, त्यातील चांगल्या-वाईटाची चर्चा करतील. अशी अपेक्षा व्यक्त करायला हरकत नसावी. कोणत्याही ग्रंथाच्या बाबतीत हे सर्वथा आवश्यक असते.

**डॉ. शिरीष लांडगे**
चलभाष :८३२९०२८५६२

◆◆



# मराठी विज्ञानकथा समीक्षाः नवा दृष्टिकोन

**मराठी साहित्यातील विज्ञानकथा या साहित्यप्रकाराच्या समीक्षेच्या नव्या दृष्टिकोनाची मांडणी करणारा लेख.**

संतोष नानाभाऊ पाटील

२० व्या शतकाच्या प्रारंभी विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे परिणाम मानवी जीवनावर दिसू लागले. विज्ञान तंत्रज्ञानाच्या जाणीव जागृतीमुळे पाश्चात्त्य व अमेरिकन वाङ्मयाचा विज्ञान-तंत्रज्ञान वर्णन विषय झाला. याचा प्रभाव भारतीय साहित्यक्षेत्रावर उमटू लागला. भारतातील प्रादेशिक भाषांमध्ये 'विज्ञान' या साहित्याचा विषय झाला. स्वातंत्र्योत्तर मराठी वाङ्मयात 'विज्ञान साहित्य' या वाङ्मयातील विज्ञान व मानवी जीवन यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कथा या साहित्य प्रकाराने वेग धरला. मराठी विज्ञान साहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक व एकांकिका या प्रकाराच्या अनुषंगाने लेखन केले जात आहे. त्यात 'विज्ञानकथा' हा सर्वांत जास्त लिहिला गेलेला वाङ्मय प्रकार आहे.

'विज्ञानकथा' हा कथाप्रकार पाश्चात्त्य वाङ्मयातून आला व रुळला. मराठी विज्ञानकथा ही बहुतांशी इंग्रजी व अमेरिकन विज्ञानकथांवर जोपासली गेली आहे, त्यामुळे २० व्या शतकाच्या अखेरीपर्यंत मराठी विज्ञानकथांवर पाश्चात्त्य विज्ञानकथांची छाप दिसून येते. विज्ञानकथा संकल्पना व स्वरूप लक्षात घेताना पाश्चात्त्य लेखक व समीक्षकांनी व्यक्त केलेली मतेही महत्त्वाची ठरतात. विज्ञानकथा म्हणजे काय? विज्ञानकथेचे स्वरूप कसे आहे? या विषयी वेगवेगळी मते मांडली आहेत. पाश्चात्त्य व भारतीय लेखकांनी मांडलेल्या विज्ञानकथेविषयी विचार व स्वरूपात नंतरच्या समीक्षकांनी कालानुरूप व्यक्त केलेल्या विचारांमुळे बदल व विस्तार होत गेला. भारतीय व पाश्चात्त्य मतांच्या, विचारांच्या अनुषंगाने विज्ञानविषय लालित्यपूर्ण भाषाशैलीतून वैचारिक पातळीवरून आविष्कृत होऊ लागला. याविषयी 'डॉ. फुला बागुल' यांचे मत असे आहे, की ''विज्ञानकथा ही ललित कथेसारखीच असते. विज्ञानकथाकारांचा हेतू वैचारिक तपशील पुरवण्यापेक्षा उद्याच्या वैज्ञानिक पर्यावरणात मानवी अस्तित्वाचा वेध घेणे हाच असतो.'' वरील मतानुसार विज्ञानकथेत रंजनमूल्य व वैज्ञानिक प्रबोधन यांना महत्त्व आहे. मानवी भावभावनांना प्रमुख स्थान असते. पाश्चात्त्य विचारवंतांनी विज्ञानकथेच्या व्यक्त केलेल्या विचारावरून डॉ. निरंजन घाटे यांनी विचार मांडला, की ''भविष्यकाळात घडणारी आजपर्यंतच्या विज्ञानाला धक्का लागू न देणारी, नवं तंत्रज्ञान कल्पून लिहिलेली कथा म्हणजे विज्ञानकथा.'' डॉ. घाटे यांनी व्यक्त केलेल्या मतानुसार विज्ञानाभिमुखता हाच विज्ञानकथेचा आत्मा असला, तरी ललित वाङ्मयाची तत्त्वे व घटक त्यात अंतर्भूत असतात हे सर्वमान्य झाले.

मराठी विज्ञानकथेला श्री. बा. रानडे यांच्या 'तारेचे हास्य' (१९९५) या कथेपासून खऱ्या अर्थाने स्वतंत्र कथालेखनास सुरुवात झाली. १९७५ नंतर जयंत नारळीकर, निरंजन घाटे, बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, सुबोध जावडेकर यांनी विज्ञानकथेचा प्रांत गाजविला. नंतरच्या काळात शुभदा गोगटे, मंदाकिनी गोगटे, माधुरी शानबाग, संजय ढोले, मेघश्री दळवी, शरद पुराणिक, शिरीष देशपांडे, सुनील विभुते यांच्या लेखणीतून स्वतंत्र व आशयदृष्ट्या वैविध्यपूर्ण सूत्रांतून विज्ञानकथा लिहिल्या जाऊ लागल्या. प्रारंभीच्या काळात विज्ञानकथा प्रवाहाच्या समृद्धीसाठी चळवळीचे रूप स्वीकारावे लागले. मराठी विज्ञान परिषद व नियतकालिकांनी यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. आज एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दोन शतकांत विज्ञानकथांनी वर्तमानपत्रं, दिवाळी अंक, मासिके यांत अढळपद प्राप्त केले आहे.

विज्ञानकथांचे लेखन व गतीचा विचार केला असता प्रारंभी अशक्य कोटीतल्या वेडगळ अथवा बाल कल्पना म्हणून दुर्लक्षित असलेल्या या वाङ्मय प्रकाराकडे वाचकांचे लक्ष वेधले गेले ते जयंत नारळीकर, निरंजन घाटे यांच्या विज्ञानकथांमुळे. या लेखकांनी कथा तर लिहिल्याच; त्यासोबत विज्ञानकथा साहित्य या संदर्भात समीक्षाविषयक लेखन करून विज्ञानकथा संकल्पना, स्वरूप, प्रयोजने स्पष्ट करून विज्ञानकथा समीक्षेचा नवा दृष्टिकोन दिला. त्याचबरोबर डॉ. व. दि. कुलकर्णी, डॉ. सु.म. तडकोडकर, डॉ. अनिल सपकाळ, डॉ. म. सु. पगारे, लक्ष्मण लोंढे, बाळ फोंडके, सुबोध जावडेकर यांनी विज्ञानसाहित्याची समीक्षा केली. आजच्या परिस्थितीत डॉ. मोना चिमोटे, प्रा. डॉ. फुला बागुल, डॉ. देवयानी चव्हाण, डॉ. सुदर्शन दिवसे, प्रा. डॉ. शिवाजीराव सोनालकर यांच्या समीक्षणात्मक लेखनातून विज्ञानकथा हा कथाप्रकार जनसामान्यांपर्यंत पोहोचलेला आहे.

विज्ञानाभिमुखता हाच विज्ञानकथेचा आत्मा आहे. विज्ञान व कलात्मकता यांचे मिश्रण होऊन विज्ञान व ललित ही दोन पृथकपणे वावरणारी वेगवेगळी क्षेत्रे विज्ञानकथा साहित्याच्या रूपाने साहचर्य साधत आहेत. यामुळे वाङ्मयीन मूल्यमापन व वैज्ञानिक चिकित्सा या दुहेरी पातळीवर मूल्यमापन करणे हा समीक्षेचा दृष्टिकोन स्वीकारला आहे.

विज्ञानकथांचा मराठी साहित्यात शिरकाव होऊन सुमारे १०० वर्षे झाली. विज्ञानकथा लेखनाची गती व वेग वाढलेला आहे. याच्या तुलनेत विज्ञानकथांची समीक्षा त्रोटकच आहे. यासाठी ललित वाङ्मय व विज्ञान या दोन अंगाने होणाऱ्या समीक्षेतही नवा दृष्टिकोन यायला हवा. याबाबतीत डॉ. निरंजन घाटे यांचे विचार स्वीकारणे आवश्यक आहे. ते म्हणतात, ''मराठीमध्ये अलिकडच्या काळात विज्ञान साहित्यासंबंधी प्रबंध लिहिले जाऊ लागले आहेत. त्यातील जे काही प्रबंध माझ्या पाहण्यात आले ते अत्यंत ढिसाळ होते. केवळ इकडची तिकडची माहिती एकत्र गोळा करून तर काही वेळा संदर्भविरहित, काही वेळा संदर्भासहित घेऊन मांडले जात आहेत.'' वरील मताचा विचार करून तर विज्ञानकथा समीक्षाविषयीची दृष्टी बदलली पाहिजे. विज्ञानकथा लेखनाला एकेरी बाजूने स्वीकारले, तर विज्ञानकथा साहित्याची दुसरी बाजू लक्षात यायला उशीर होईल. समीक्षकाने गंभीर व वैचारिक अंगाने विज्ञानकथांचे मूल्यमापन करावे असे निरंजन घाटे यांचे मत आहे.

विज्ञानकथेत विज्ञान व ललित यांचा मेळ आहे का? रंजनात्मक व चिंतनात्मक बाजू मांडल्या आहेत का? मानवी जीवनाशी संबंधित कोणत्या समस्यांना कथेने स्पर्श केला आहे? वाचकांना गुंतवून, गुंगवून ठेवण्याचे कार्य करते का? कथेने हाताळलेला विषय समाजाच्या गतीचे, परिवर्तनाचे कोणते चित्रण करते? विज्ञानकथेतून कोणती जीवनमूल्ये प्रकट होतात? विज्ञानकथा अतिदूरच्या, दूरच्या का जवळच्या वास्तवाचा तळ कलात्मक कल्पनेने पकडण्याचा प्रयत्न करते का? कथानक, व्यक्ती, कुटुंब, समाज परिस्थिती यांचे परस्पर साहचर्य आहे का? वास्तवताविषयक विसंगती आहे का? या बाजूंनीही विज्ञानकथेचे मूल्यमापन झाले पाहिजे. विज्ञानकथा वाङ्मयाची आकलन व आस्वादाची क्षमता निर्माण झाली पाहिजे. विज्ञानकथेत मांडलेली समस्या विज्ञानाच्या अज्ञानामुळे झाली, की माणसाच्या अविवेकी वापरामुळे या अंगाचा विचार झाला पाहिजे. विज्ञानकथेत विज्ञानाचा स्पर्श मानवी व्यवहारांतून प्रकट होतो, की

मानवी व्यवहाराच्या अपरिहार्यतेसाठी विज्ञानाचा प्रवेश होतो या पैलूचाही विचार व्हावा अशा विविध अंगांनी विज्ञानकथेची चिकित्सा झाली पाहिजे.

विज्ञानकथा साहित्यात सामाजिक जाणिवांविषयी अजूनही वाव आहे. याविषयी प्रा.डॉ. संतोष अ. तागड मत नोंदवतात, की 'विज्ञानसाहित्य हे सामाजिक बांधिलकी व्यक्त करणारे साहित्य आहे. लेखकांच्या साहित्यनिर्मितीची प्रयोजने ही वैज्ञानिक बांधिलकीतून आढळतात. त्यामुळे सामाजिक जाणिवा, विकृती या घटकांचे संदर्भ या विज्ञानसाहित्यात येत नाहीत.' तर डॉ. शिवकुमार सोनालकर यांनी वेगळे मत मांडले आहे. ते लिहितात, की 'विज्ञानकथा ही कथा हवीच; पण त्यात विज्ञानही महत्त्वाचे आहे. विज्ञानाने कितीही वाटचाल केली, कितीही प्रगती केली, त्यामुळे जीवनशैली कितीही बदलली, तरी मानवाचे मन, स्वभाव व मानवाचे भावविश्व यावर त्याचा प्रभाव पडणार नाही. माणूस, कुटुंब व समाज या ललित आणि विज्ञानकथांच्या समान अवस्था आहेत.' तसेच 'विज्ञानकथा ही एकाचवेळी बहुउद्देशीय काम करीत असते. त्यात विज्ञान असते, सामाजिक जीवन असते, मानवी भावभावनांचे तरंग असतात, शिवाय परिणाम-दुष्परिणामांची सांगड असते, तसेच भविष्यातील मानवी जीवनाच्या दिशाही असतात. असे बरेच पैलू विज्ञानकथेत असतात,' असे मत डॉ. संजय ढोले नोंदवतात. अशा परस्पर मतांचे कथेतून शोध घेऊन मांडणी केली पाहिजे.

विज्ञानकथेचे मूल्यमापन करताना त्यातील वाङ्मय, विज्ञान सिद्धांत व प्रायोगिकता शोधली पाहिजे. स्त्री जीवन, कृषी जीवन, निसर्ग-लष्करी व संरक्षणविषयक पैलू, ललित साहित्य व विज्ञान साहित्य यांची तुलना, सांस्कृतिक, सामाजिक जीवन, विज्ञानकथा लेखकांच्या एकाच विषयावरील विज्ञानकथांची तुलना, मनोविश्लेषणात्मक पातळीवर व्यक्तिरेखांचा अभ्यास, दोन कालखंडातील विज्ञानकथांमधील भाषाशास्त्रीय तुलना, जैव संशोधनाचा लोकजीवनावरील प्रभाव यांची नव्या दृष्टिकोनातून समीक्षा व्हावी.

वरील विषयांच्या अनुषंगाने डॉ. सुबोध जावडेकर व डॉ. सुनिल विभुते यांच्या विज्ञान कथेतील यंत्रमानव या विषयावर प्रत्येकी एका विज्ञान कथेचा व डॉ. संजय ढोले व जयंत नारळीकर यांच्या पर्यावरणीय बदलांसंदर्भातील कथांचा आढावा घेतला आहे. तसेच डॉ. संजय ढोले यांच्या दोन कथांतून कृषी संस्कृतीच्या समस्यांचा आढावा घेतला.

एकाच विषयावर समान आशयसूत्र असलेल्या डॉ. सुबोध जावडेकर यांची 'मित्र मानवाचा' (गुगली १९९१) आणि डॉ. सुनिल विभूते यांची 'निर्णय' (विस्मयकारी विज्ञानकथा) या विज्ञानकथांचा तुलनात्मक विचार करता येईल. मित्र मानवाचा या कथेतील सरकारी अधिकारी असलेला यंत्रमानव प्रियालचे पशुप्रेम ओळखतो व प्रियाल यांच्या घरी कुठलाही प्राणी नसल्याचे खोटे बोलतो. तसेच प्रमाणपत्रही देतो. येथे जावडेकरांना यंत्रमानवात संवदेनशील मन असते, असे सुचवायचे आहे. मानवापेक्षा यंत्रमानव मानवाचे मित्र आहेत हा विचार ही कथा देते, तर निर्णय या कथेत हॉटेलात नोकर म्हणून आणलेल्या यंत्रमानवामुळे कामाची गती व नोकरांची समस्या सुटते, सर्व कामे अचूकपणे व अविरत, अथकपणे करतो; पण यंत्रमानव मानवाची जागा घेऊ शकत नाही कारण त्याच्यात यांत्रिकपणा असतो व तो उघड होतो कारण हॉटेलात येणारी स्त्री व दोन मुलांच्या संदर्भातला प्रसंग रामु यंत्रमानव यांत्रिकपणे हाताळतो, तर मनोज नावाचा मुलगा हा घाबरून मालकाला सांगून मधुमेही रुग्ण असलेल्या स्त्रीचे प्राण वाचवतो. याचा अर्थ यंत्रमानवाला भावना नसतात, तो दुसऱ्यांवरील संकटे समजून घेऊ शकत नाही. यंत्र ते यंत्रच आहे. 'यंत्रमानव' आशयसूत्र असलेल्या सर्वच कथांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल. या कथांचे मूल्यमापन करून यंत्रमानवाविषयी वाचकांची असलेली द्विधा व दोलायमान स्थितीवर नव्या दृष्टिकोनातून विचार करता येईल.

पर्यावरण, औद्योगिकीकरण, निसर्ग, लोकसंख्या, प्रदूषण यांच्यावर विज्ञानाचा झालेला परिणाम त्यामुळे मानवी जीवनांवर पडलेला प्रभाव या विषयांवर मराठी भाषेत विज्ञानकथा लिहिल्या आहेत. डॉ. जयंत नारळीकर यांची 'काचेचा पक्षी' (टाईम मशीनची किमया, १९९४) या कथेतून घातक वायूप्रदूषण थांबवणे व प्रदूषणाचे धोके माहीत असूनही ते टाळण्याचे कारण, त्यामागे स्वार्थी

मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडवले आहे. अतुल गोडबोले या शास्त्रज्ञाची असलेली ही कथा, त्याने केलेले संशोधन हे लोककल्याणासाठी आहे. याला संशोधनात्मक यश मिळवण्यासाठी भारतात वावच नाही, तर प्रदूषण याच समस्येला वीजनिर्मितीही कारणीभूत असते. भविष्यातील विजेचे संकट टाळता येऊ शकते, असा आशावाद डॉ. संजय ढोले यांच्या 'जिद्द' (प्रेमाचा रेणू) या कथेतून व्यक्त होतो. या कथेचा नायक डॉ. महेंद्र मोरे अलिप्त राहूनही गावकऱ्यांच्या विजेच्या समस्येविषयी पूर्ण जाणून घेतो; पण सरकारी अनास्थेमुळे प्रारंभी अपयश येते. शेवटी तो संशोधनपूर्वक वादळामुळे जी वीज चमकते त्यावर आधारित प्रकल्प तयार करून त्या विजेला शोषून घेऊन गाव प्रकाशमान करण्यात यशस्वी होतो. या कथांमधून पर्यावरणीय समस्या व त्या सोडवण्यासाठी असलेली शासनाची अनास्था, तरीही जिद्दीने सर्व गोष्टी साध्य करणारी माणसे समोर येतात.

विज्ञानकथांमधील कृषिजीवनातील व्यथा ह्या वास्तव असून त्यात भविष्यात सुधारणा होण्याचे आशादायक चित्र दिसून येते. कृषिजीवनाचा वेध डॉ. संजय ढोले यांनी 'शापित' (अश्मजीव) आणि 'कोळीष्टक'(संकरित) या कथांमधून घेतलेला आहे. 'शापित' या कथेत शेतकरी आत्महत्या ह्या ज्वलंत विषयाला हात घातलेला आहे, या संदर्भात पिकांमध्ये जनुकीय बदल घडवून आणणे, शेती उत्पादनात वाढ व शेती व्यवस्था सुधारेल, असा आशावाद व्यक्त केला आहे. या कथेत गणेश ताम्हणे व त्याच्या मित्रांच्या मदतीने शेतकरी आत्महत्येची कारणे शोधतो. समस्याप्रधान विज्ञानकथेतून कृषिजीवन उलगडत जाते. गावातील पाच शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यामुळे गणेश व इतर सवंगडी यांच्या जीवनातील मानसिक संघर्ष टिपण्यात लेखक यशस्वी झाले आहेत, तर 'कोळीष्टक' या कथेत शेती व शेतकऱ्यांची डोकेदुखी ठरलेल्या उपद्रवी कीटकांचा बंदोबस्त करण्यासाठी व शेतकऱ्यांचे दुःख दूर करण्यासाठी स्पायडर फार्मिंगचा प्रयोग करतात. मात्र कीटक भक्षी कोळी यांची प्रतिकार क्षमता वाढल्याने मवाळ जातीचे कोळी नष्ट होऊन हिंसक वंशाचे कोळी निर्माण झाले. शेतकरी शेती पिकवण्यासाठी व उत्पन्न वाढीसाठी वेगवेगळे खर्चिक व इतर प्रयोग करतो. मात्र शेतकऱ्यांच्या जीवनात संकटे आ वासून उभी राहतात म्हणून त्यात शेतकऱ्यांनाच कसे नुकसान सहन करावे लागते याकडे विज्ञानकथा लक्ष वेधतात, म्हणून कृषिजीवनाचा वेध घेताना समीक्षेच्या ह्या नव्या दृष्टिकोनातून मूल्यमापन करता येईल.

**निष्कर्ष :–**

१) विज्ञानाभिमुखता हा विज्ञानकथेचा आत्मा असला, तरी विज्ञान व ललित वाङ्मयाचे घटक विज्ञानकथेत असतात. त्यामुळे विज्ञान व वाङ्मयीन दृष्टीने विज्ञान कथेचे मूल्यमापन आजपर्यंत झालेले आहे.

२) विज्ञानकथा वाङ्मयाची पारंपरिक समीक्षेसह सामाजिक, पर्यावरणीय व मनोविश्लेषणात्मक अंगाने चिकित्सा करता येईल.

३) विज्ञानकथेत कृषिजीवनाचाही वेध घेतला आहे. त्यामुळे विज्ञानकथांना सामाजिक संदर्भ व मानवी–जीवनातील समस्यांचा स्पर्श असतो.

४) एकाच आशयसूत्रावर लिहिलेल्या दोन वेगवेगळ्या लेखकांच्या विज्ञानकथा लेखनाबाबतचा दृष्टिकोन तुलनात्मक पद्धतीने लक्षात येतो.

**संदर्भ :–**

१) प्रा. डॉ. बागुल फुला, मराठी विज्ञान साहित्य : समीक्षा व संशोधन, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे प्र. आ.जून १३, पृ. क्र. २०

२) डॉ. घाटे निरंजन, अंतर्भूत डॉ. दिवसे सुदर्शन (संपा) विज्ञानवादी मराठी साहित्य शोध आणि बोध, प्र. आ. जानेवारी १७ , पृ ४७

३) डॉ. घाटे निरंजन, जगप्रसिद्ध विज्ञानकथा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २०११, पृ. १२८

४) प्रा. डॉ. तागड संतोष, अंतर्भूत, डॉ. अविनाश सांगोलेकर (संपादक) मराठी विज्ञान साहित्य स्वरूप आणि समीक्षा, विद्यावार्ता, हर्षवर्धन पब्लिकेशन्स, बीड, २०१८

५) प्रा. डॉ. सोनालकर शिवाजी, मराठी विज्ञानकथेच्या विकासाच्या दिशा विविधांगी अभ्यास (लघुशोध प्रकल्प, यु. जी. सी.) प्रादेशिक कार्यालय, पुणे विद्यापीठ, पुणे, सादर २०१५

६) प्रा. डॉ. ढोले संजय, मनातील दोन शब्द, डिंभक, मेहता पब्लिकेशन्स पुणे, प्र. आ. २०१९, पृ. ९

**संतोष नानाभाऊ पाटील**

चलभाष : ९४२११८९०१३३

◆◆

पैठणच्या इतिहासाचा आढावा घेणारा लेख.

# हरवलेले प्रतिष्ठान आणि पैठण

डॉ. दादा गोरे

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. दंडकारण्य काळातली. आपल्या आजच्या संस्कृतीचे काहीच अस्तित्व नव्हते तेव्हाची. गोदावरी वाहत होती. दोन्ही किनाऱ्यावर आणि दूर दूर प्रचंड वनराई. सूर्य किरणंसुद्धा प्रवेश करायला घाबरत. या अरण्यात हत्ती, वाघ, रानडुकरे यांसारखे प्राणी मुक्तपणे वावरत होते. मोर, पोपट, कावळे, असंख्य चिमण्या आणि यांसारखे असंख्य पक्षी मुक्तपणे विहरत होते. पावसाळ्यात पाऊस धो धो कोसळायचा. गोदावरी दुथडी भरून वाहायची. अशा काळात पेतन पेतनिक आर्य मानवी गट उत्तरेकडून गंगेच्या काठाने भटकत भटकत गोदावरीच्या काठावर असलेल्या उंचच उंच डोंगरटेकडीच्या पायथ्याशी येऊन थांबला होता. कुठं सर्व सोयीची वसाहत करता येईल का याचा शोध घेत. निवारा तर हवा होता. पेतन गटाचे प्रमुख काही सोबती बरोबर घेऊन या डोंगरटेकडीवर निघाले. वृक्षराईतून वाट काढत निरीक्षण करत चालू लागले. नदी, हो तेव्हा नदीच होती. गोदावरी गंगा हे नाव तेव्हा कुठे होते तिला. ती येथे या डोंगरटेकडीच्या उत्तर– दक्षिण साधारण मैलभर आणि नंतर डोंगरटेकडीला वळसा घालून पूर्वेकडे वाहत होती. चालत चालत हा गट डोंगरटेकडीच्या कडेने उत्तरेकडून दक्षिण, नंतर पूर्व उत्तर आणि पश्चिम असा भटकला. दोन्ही बाजूला वाहणारी उत्तर– दक्षिण आणि पूर्व खोल नदी आणि पूर्व – पश्चिम बाजूला सुरक्षित उंच भाग, खाली प्रचंड अरण्य. गंगेचा सुपीक भाग. पेतनिक गटाने या डोंगरटेकडीवर वसाहत करण्याचा निर्णय घेतला. टेकडीवरून दूरपर्यंत फक्त हिरवीगार गच्च झाडी दिसत होती. सुरक्षित डोंगरटेकडीवर असलेल्या सपाट जागेवर त्यांनी राहण्यासाठी निवारा शोधला. येथे वसाहत केली. पुढे यालाच 'प्रतिष्ठान' नाव प्राप्त झाले.

इ. स. पूर्व २३० ते इ. स. २३० या काळात सातवाहनचे ४६० वर्षं प्रतिष्ठानवर राज्य होते. लहानपणी सातवाहनांची कथा आई सांगायची. ती अशी, सातवाहन गंगेचा मुलगा. तो मुलगा नसलेल्या कुंभाराला गंगेवर सापडला. कुंभारच्या घरी तो वाढला. कुंभार मातीची भांडी करायचा तेव्हा हा मातीचे घोडे, हत्ती, माणसं, तलवार आणि लढाईचे इतर साहित्य करायचा. लहान सवंगड्यांबरोबर लुटपुटूची लढाई खेळायचा. कुंभार राहायचा त्याच्या घराजवळच एक विहीर होती. त्या विहिरीत तो ही मातीची खेळणी टाकायचा. उज्जैनच्या विक्रमादित्य राजाने प्रतिष्ठानवर स्वारी केली तेव्हा इथल्या राजाला त्याने हरवले. तेव्हा सातवाहनाने गंगेला विनंती केली. गंगेने त्याला अमृताचा कुंभ दिला. त्याने आराधना करून त्या कुंभातील अमृत विहिरीत टाकले. विहिरीतून मातीचे सैनिक जिवंत होऊन निघाले. त्यांनी

विक्रमादित्याचा पराभव केला. राजाला मुलगा नव्हता म्हणून त्याने सातवाहनाला गादीवर बसवले. आज ती विहीर राजवाड्यात आहे; पण तेथे आता जामा मशीद उभी आहे. मला लहानपणी मशिदीत विहीर पाहिलेली आठवते. उद्ध्वस्त झालेली पालथीनगरी सातवाहनाची असेल म्हणावे, तर सातवाहनाचा राजवाडा कसा अजून मशिदीच्या रूपात आहे? हा राजवाडा नष्ट करून तेथे १४ व्या शतकात कधीतरी मशीद बांधली असावी. असे असेल तर बाजूलाच तीर्थखांब आजही अगदी ताठ कसा उभा आहे? प्रतिष्ठानचा राजकीय इतिहास इ. स. पूर्व सहाव्या शतकापासून विस्कळीत अवस्थेत उपलब्ध आहे. सातवाहन, प्रवरसेन आणि वाकाटक घराण्यातील राजांची इ.स.२७५ ते ३३५ पर्यंत सत्ता होती. सातवाहनांची सत्ता इ. स. २१२ मध्ये नष्ट झाली. यानंतर अभिरांची सत्ता इ. स. २८० पर्यंत होती. नंतर चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, खिलजी, बहमनी, विजापूरकर, निझाम यांची सत्ता होती. डोंगरटेकडीवरील प्रतिष्ठान यादव काळापर्यंत सुरक्षित होते. यादवांचा कालखंड इ. स. ८५० ते १३३४ पर्यंतचा. देवगिरीचे यादव म्हणून त्यांची सत्ता भरभराटीची होती. समृद्ध होती. १३३४ च्या काळात अल्लाउद्दीन खिलजीने फितुरीने रामदेव यादवाचा पराभव करून सत्ता ताब्यात घेतली. तेव्हापासून दक्षिणेत मुस्लिम सत्तेचा प्रवेश झाला. पैठण हे तेव्हाही व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. याच काळात मुस्लिमांचा पैठणमध्ये प्रवेश झाला. या डोंगरटेकडीच्या उत्तरेस खालच्या बाजूस एक टेकडी होती. या टेकडीवर दिगंबर जैनमंदिर आज उभे आहे. भगवान महावीरांचा जन्म इ. स. पूर्व ५९९ चा. पूर्व कुंडग्राम (बिहार) येथे झाला. गौतम बुद्धाचा जन्म इ.स.पूर्व ५६३चा. जैन धर्म आणि बौद्धधर्म यांचा कालखंड सारखाच. बौद्ध धर्म मात्र प्रतिष्ठानपासून दूरच राहिला. पैठणला जैनांची वसती होती. जैनपुरा या टेकडीवरच आहे. जैन कधी पैठणला आले हे स्पष्टपणे सांगता येत नाही. या जैन मंदिराचा जीर्णोद्धार १९६४ मध्ये झाला. सुंदर जैन मंदिर आजही उभे आहे; परंतु जैनपुऱ्यातील जैनांची वसती घरे आज नाहीत. येथील जैनांचा असा समज आहे, की जैनमंदिरापासून दूर राहिल्याशिवाय आपला विकास होत नाही म्हणून जैनपुऱ्यातील आपली घरे विकून ही जैन कुटुंबे इतरत्र गेली. आज जैनपुऱ्यात सारी मराठा शेतकऱ्यांची घरे आहेत. इ. स. १७०० नंतर हळूहळू जैनपुरा, परदेशीपुरा, हमालगल्ली, कहारवाडा, चांभारवाडा या वसाहती विकसित झाल्या.

इ. स. १३०० नंतर हळूहळू दक्षिणेत आलेले मुसलमान आपापल्या सोयीनुसार पैठणला स्थायिक झाले. तेव्हा त्यांची वसती स्वतंत्रपणे मुस्लिम मोहल्यात होती. निजाम राजवटीत ती अधिक विस्तारित झाली आणि पैठणच्या समाजाचा एक भाग झाली. त्यांनी मशिदी आणि दर्गे उभे केले. मालेसलाम दर्गा नाथांच्या काळातच कधीतरी उभारला गेला. जामा मशीद याच काळात बांधली गेली. संत एकनाथांच्या काळात मुस्लिम समाज चांगलाच स्थिर झाला होता. एकनाथांच्या अंगावर गुळण्या टाकण्या इतके धाडस त्या समाजातील सिद्धीवली बाबासारख्या माणसात निर्माण झाले होते. अगदी ब्राह्मण गल्लीतही मशिदी उभारल्या गेल्या. या मुस्लिम समाजाचा व्यवसाय कटलरी, स्टेशनरी, शेती आणि निजामाकडे नोकरी हाच होता. बरेच मुसलमान कराडगिरी नाक्यावर टॅक्स वसुली करत.

यादवांच्या काळात महानुभाव पंथीयांचे चक्रधर स्वामी काही काळ पैठणला स्थायिक झाले. कधीतरी त्यांच्या शिष्यांनी पालथ्यानगरीच्या दक्षिणेला गोदावरीच्या काठावर उंच टेकडीवर संशोधन व पुरातत्त्व विभागाने ताब्यात घेतलेल्या पालथ्यानगरीच्या बाजूस महानुभाव आश्रम उभा केला. जो आज महानुभाव पंथीयांचा महत्त्वाचा आश्रम समजला जातो. पैठण तशी संतांची आणि पंडितांची भूमी. संत एकनाथांसारखे सामाजिक एकात्मकतेची भूमिका असलेले संत या भूमीत झाले. ही पैठणच्या दृष्टीने भूषणाची आणि अभिमानाची बाब आहे. कृष्णदयार्णव, अमृतराय यांसारखी महान व्यक्तिमत्त्वे या मातीने दिली. संत ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखी वेद म्हणवून घेतल्यानंतर पैठणच्या कर्मठ ब्राह्मणांनी ज्ञानेश्वरांना शुद्धिपत्र दिले.

इ.स. १६०० नंतर राजपूतांचा एक गट मोगल बादशहा शहाजहानच्या सैन्याबरोबर पैठणला आला. त्यांनी पैठणला वसाहत केली. तिला शहाजानपुरा नाव दिले. तोच पुढे परदेशीपुरा झाला. या वसाहती बरोबरच हमालगल्लीही वसवली गेली. होनाजी गोरे हे याच काळात १६५० नंतर डायगव्हाण येथून पैठणला आले. त्यांनी

हमालगल्लीत आपले घर उभे केले. डोंगरटेकडीच्या खाली मुख्य बाजार याच काळात वसवला गेला. या टेकडीच्या पायथ्याशी असलेली गुजराती समाजाची घरे १७४३ नंतर बांधली गेली. त्र्यंबकदास पटेल यांचे पूर्वज राजाराम पटेल हे व्यापाराच्या निमित्ताने येथे स्थायिक झाले. ते रेशमी कपड्याचे उत्पादन, पैठणी, पगडी यांची निर्मिती आणि शेती करू लागले. पुढे ते वाहतुकीच्या व्यवसायाकडे वळले. इ. स. १७०० नंतर खालचे पैठण पूर्णपणे वसवले गेले.

जातककथा, बौद्ध आणि जैन कथांतून प्रतिष्ठानचा संदर्भ सापडतो. बृहतकल्पसुत्रभाष्य, पिण्डनियुक्ती, गच्छाचारवृत्ती, कल्पसुत्रभाष्य, प्रबंधचिंतामणी, विविधतीर्थकल्प इत्यादी ग्रंथांत प्रतिष्ठानचा उल्लेख आहे, सातवाहन हालचा गाहासत्तसई / गाथासप्तशती हा ग्रंथ याच काळात लिहिला गेला. पैठणची पैठणी आणि प्राचीन तलम व रेशमी वस्त्र निर्मितीची परंपरा खूप जुनी होती. रोमपर्यंत व्यापार होत होता. आज अस्तित्वात असलेल्या तारगल्लीत सोन्याचा आणि इतर वस्त्र निर्मितीसाठी लागणारा धागा तयार होत असे. काही तारुलोक गंगेत नाव/ होडी चालवत. पैठणला सावकारांची परंपराही फार मोठी होती. पेशव्यांनाही कर्ज देणारे सावकार येथेच होते. आमच्या लहानपणी घरातील भांडी ठेवून त्यावर भरमसाठ धान्याचा परतावा घेणारे भरपूर सावकार होते. पैठणी आग्रह हा वाक्यप्रचार सावकारांच्या श्रीमंतीच्या दिखाव्यातून निर्माण झाला. श्रावण महिन्यात एक सावकार ब्राह्मणाला जेवण देत असे. एकदा अर्धे जेवण झाल्यावर एक लाडू खाल्ल्यावर एक सोन्याची मोहर दिली जाईल असे सांगितले. सोन्याच्या मोहापायी लाडू भरपूर खाऊन काही ब्राह्मण जागेवरच मेले. त्यांच्या पगड्या १९५० पर्यंत सावकाराच्या वाड्यातील खुंटीला टांगलेल्या होत्या. खूप खाऊ घालणे हा पैठणी आग्रह.

१२ व्या शतकात प्रतिष्ठानचे कधीतरी पैठण झाले असावे. डोंगरटेकडीवरील पैठण हळूहळू डोंगरटेकडी खालच्या भागात वसवले गेले. उच्चवर्णियांची डोंगरटेकडीवरील बरीच वसाहत इतर समाज घटकांनी ताब्यात घेतली. डोंगरटेकडीच्या खालीही घरे बांधली गेली. वसाहत झाली. बाजार वसवला गेला.

पैठणच्या उत्तर बाजूस भाजी मार्केटला लागून एक प्रचंड वेस होती. तिला २५ ते ३० फूट उंच भक्कम लाकडी दरवाजा होता. १९५५ च्या दरम्यान हा होता. पोळ्याला बैलाची मिरवणूक येथून निघायची. वेशीच्या दोन्ही बाजूला बाहेर महारवाडा, मांगवाडा होता. उजव्या बाजूने उंच चालत गेले की सुतारपार. दक्षिण बाजूस सरळ बाजार. कापड बाजारातून पश्चिमेस दुर्गवाडी, वर जाण्यासाठी भलामोठा पायऱ्यांचा उंच जाणारा रस्ता. त्यावरही वेस नि उंच दरवाजा. चालत चालत शेवटी पश्चिमेला वळण घेतलं, की परत मोठा दरवाजा. नंतर चौक. जुन्या पैठणमध्ये प्रवेश देणारे हे भव्य दरवाजे होते. पश्चिम बाजूनं असेच तीन मार्ग होते. या उंचावरच्या वस्तीत जाण्यास तिन्ही मार्गांवर उंच जाणाऱ्या मोठ्या लांब दगडी पायऱ्या होत्या. आजही आहेत. पूर्वेला गंगेच्या कडेने या मूळ पैठणकडे जाणारे तीन घाट होते. आजही आहेत. नागघाटाच्या अगोदर रंगारहटीच्या दगडी चढावरचा दरवाजा, आज तो नाही. गणेश घाट आणि उदासीबुवांच्या मठाजवळच्या पायऱ्यांचा रस्ता. संत एकनाथांच्या अंगावर गुळण्या टाकलेल्या उंचवट्याच्या रस्त्यावर मोठा उंच दगडी दरवाजा होता. पैठण या डोंगरटेकडीवर कधीकाळी वसवले गेले होते. भाजीबाजार, कापडबाजार, मुख्य बाजारपेठ आणि या डोंगरटेकडी खालील पूर्ण पैठण नंतर कधीतरी वाढले, वसवले गेले. उंच डोंगरटेकडीवर प्रतिष्ठान वसलेले होते. मग या वरच्या प्रतिष्ठानचा बाजारहाट कुठं होता? या प्राचीन पैठणमध्ये प्रचंड मोठेमोठे वाडे होते. या वाड्यातून व्यापार होत असावा. आजही काही चौसोपी वाडे आहेत. पैठणच्या दक्षिणेकडे अगदी शेवटी नागघाट. तेथे अगोदर नागडोह होता. उंच असणारी दरड आणि खोलखोल वाहणारे गंगेचे पाणी. यावर कधीतरी यांच्या अगोदर पालथीनगरी हे मूळ पेतनिक पेतन गटाचे प्रतिष्ठान असावे. हे कशाने जमिनीच्या पोटात गेले. हा प्रश्नच आहे. संशोधन व पुरातत्त्व विभाग याविषयी काही बोलत नाही. आमच्या लहानपणी १९५० च्या दरम्यान नागघाटाच्या अगोदर आणि तीर्थखांबाच्या दक्षिणेकडे प्रचंड मोठेमोठे वाडे होते. ते ओसाड का झाले हे माहीत नाही. माझी आत्या, वडिलांची बहीण चपडे यांचा वाडा याच ठिकाणी होता. प्रतिष्ठान कॉलेजच्या वाटेवरच्या पश्चिमेस असणारे हे पैठण दुसऱ्यांदा मोडले गेले. नष्ट झाले. आमच्यासमोर हे वाडे खोदून नेले गेले. त्यातील

छुप्या संपत्तीसाठी; पण हे प्रचंड मोठे चौसोपी वाडे कुणी कसे विकू शकले अन् का? माहीत नाही.

पैठणची ग्रामरचना जातीव्यवसायनिहाय होती. मूळ डोंगरटेकडीवर वसलेल्या पैठणचा स्थापित आणि विस्थापित इतिहास आहे. आर्य पेतन पेतनिक टोळी ज्यांनी प्रतिष्ठान वसवले, त्याचा काही भाग भूकंपाने जमिनीत गडप झाला. ती पालथीनगरी म्हणजे मूळचे प्रतिष्ठान. पेतन-पेतनिक-पेतईथान-प्रतिष्ठान-पैठण होय. नंतर त्याचा हळूहळू विकास होत गेला आणि साऱ्या डोंगरटेकडीवर वसाहत वसवली गेली. आज लोहारगल्लीच्या दक्षिणेला लागून टेकडीवर असलेल्या नवनाथाच्या मंदिरासमोर अशीच मानवी वसाहत होती. तीही अशीच पालथ्यानगरीसारखी भूकंपाने उद्ध्वस्त झाली असावी. येथे बाललिंग महादेवाचे मंदिर आहे. नवनाथ मंदिर आणि महादेवाचे बाळमंदिर याच्यामध्ये कधी काळी असलेली मानवी वसाहत जमिनीत गाडली गेली असावी. आता अगदी अलीकडे २०-२२ वर्षांत येथे मानवी वसाहत नव्याने झाली आहे. होत आहे. चौथ्या टप्प्यात हळूहळू डोंगरटेकडीखाली पैठणचा विस्तार झाला. पैठणच्या उत्तरेकडून पैठणचा मुख्य प्रवास रस्ता होता, आहे. हा सरळ रस्ता पैठणच्या लोहारगल्लीपर्यंत जातो. याच रस्त्यावर आमच्या लहानपणी बाजारपेठ होती. आता ती मोडकळीस आली. रस्त्याच्या पूर्वेला सुरुवातीला चांभारवाडा, त्याला लागून हमालगल्ली, पोलीस स्टेशन तर पश्चिमेला कहारवाडा, जैनपुरा, परदेशीपुरा, लोणारगल्ली आहे. पुढे भाजीबाजारापर्यंत पटांगण मोकळे होते. त्यातून एक ओढा गंगेला मिळत होता. पावसाळ्यात गोदावरीला पूर यायचा. तेव्हा हे पटांगण पाण्यानं भरून जायचे. मोठा पूर आला, तर बाजारपेठेतून पाणी वाहायचे, जसे १९६६ ला खालचे पूर्ण पैठण पाण्याखाली गेले होते. बसस्टँडवर पाणी होते. त्यात आम्ही पोहलो होतो. नाथमंदिरासमोरील पटांगण पाण्याखाली होते. डोंगरटेकडीच्या खालच्या पैठणच्या वेशीबाहेर महारवाडा, मांगवाडा होता. मुख्य बाजारपेठेच्या पूर्वेला कुंभारवाडा, धनगरगल्ली, माळीवाडा, साळीवाडा, लोहारगल्ली आणि काही मुस्लिमांची घरे होती, तर पश्चिमेला मोंढा, कापडबाजार, त्याला लागून गुजराती समाजाचे पटेल यांची घरे. खिलजीच्या राजवटीत प्रथम येथेच मुस्लिम वस्ती झाली. हमालगल्ली आणि चांभारवाडा याला लागून उत्तरेला मोठी खळवाडी/खळेवाडी होती. ही सारी खळे मराठा, ब्राह्मण आणि गुजराती शेतकरी समाजाची होती. जायकवाडी धरणानंतर ही खळवाडी उठली. ज्याची होती त्यांनी ती जागा विकली. काहींनी घरं, दुकानं बांधली. भाजीमार्केटला लागून सरकारी दवाखाना, टेकडीवरील वस्तीत जाण्याचा उंच रस्ता, सुतारपार, तेथे मारुतीचे मोठे मंदिर आहे, जे या जुन्या पैठणचे होते आहे. साधारण मारुती मंदिर गावाबाहेर असते; पण पैठणला दोन मंदिरं आहेत. कहारवाड्याला लागून गावाबाहेर मारुतीचे दुसरे मंदिर आहे. हे खालचे पैठण वसवल्यानंतर बांधले गेले. जायकवाडी धरणाचे काम सुरू झाले. अनेक गावे पाण्यात गेली. विस्थापित झाली. काही पैठणला आली. जसे नारळ, कावसन, पैठणचा विस्तार झाला. सारे पैठण बाहेरच्या बाजूला विस्तारले गेले. हे पाचव्यांदा विकास झालेले पैठण होय.

पैठणला नगरपालिका झाली तेव्हापासून २४ नगराध्यक्ष झाले. १९५४ ला शंकरराव चव्हाणांचे मोठे बंधू गोपाळराव चव्हाण हे पैठणचे पहिले नगराध्यक्ष झाले. त्यानंतर विठ्ठल लाड, दिगंबरराव कावसनकरस, अनिल पटेल, सोमनाथ जोशी, रंजना पाटेदार, यमुनाबाई पवार, सोमनाथ परदेशी, दत्ता गोर्डे, सुरज लोळगे हे आणि इतर पैठणचे नगराध्यक्ष झाले. जायकवाडी धरणानंतर पैठणचा विस्तार झपाट्याने झाला. धरणाच्या पाण्याखाली विस्थापित झालेली काही गावे पैठणला नव्याने वसाहती करून स्थानिक झाली. आज जुनी बाजारपेठ बंद पडत आहे. नवीन पैठण वसवले जात आहे. पैठणचे धरण हे पैठणच्या दक्षिणेला दूरवर असलेल्या जायकवाडी येथे होणार होते. मूळ मंजूर झालेल्या ठिकाणी धरण बांधले गेले असते, तर पैठणही आज पाण्याखाली असते. दूरदृष्टी असलेल्या शंकरराव चव्हाणांनी हे धरण पैठणच्या उत्तरेस ३ मैलांवर बांधले. पैठणचे धरण म्हणजे शंकरराव चव्हाणांनी आपल्या जन्मगावाला आणि मराठवाड्याला दिलेली देणगी होय.

**डॉ. दादा गोरे**
९४२२२०६८२०। gore.dada@gmail.com

◆◆

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ वा. सी. बेंद्रे लिखित छत्रपती संभाजी महाराजांवरील चरित्राविषयीचा समीक्षालेख.

# वा. सी. बेंद्रेकृत संभाजी चरित्र : आकलन आणि चिकित्सा

प्रा. संतोष शेलार

संभाजी राजांचे चरित्र हा मराठ्यांच्या इतिहासातील एक वादग्रस्त विषय आहे. १९ व्या शतकात शास्त्रीय इतिहास लेखनास सुरुवात झाली. तेव्हापासूनच संभाजीराजांच्या चरित्राच्या अभ्यासालाही सुरुवात झाली. १९ व्या शतकात नि विसाव्या शतकातील पूर्वार्धातले संभाजी एका विशिष्ट प्रकारे चितारले गेले. हे संभाजी रगेल आणि रंगेल होते. स्त्रीलोलूप आणि व्यसनाधीन असे हे संभाजी होते. तसेच ते उग्रप्रकृतीही होते. तमोगुणी नि तापट. त्यांनी आपल्याच राज्यातले उच्च अधिकारी मारले. त्यांच्या काळात राज्याची वाताहत झाली. पुढे त्यांच्या या बेहोषीमुळेच ते औरंगजेबाच्या हाती सापडले. औरंगजेबासमोर मात्र त्यांनी बाणेदारपणा दाखविला. त्याच्यासमोर झुकण्यास नकार दिला. औरंगजेबाने त्यांच्यासमोर धर्मांतराचा प्रस्ताव ठेवला. तो स्वीकारल्यास त्यांना जीवनदान मिळणार होते. संभाजींनी तो प्रस्ताव तर नाकारलाच; पण औरंगजेबाच्या मुलीला त्यांनी लग्नाची मागणी घातली. अर्थात औरंगजेबाने क्रुद्ध होऊन त्यांस हालहाल करून मारले. हा सारा छळ संभाजींनी विलक्षण धैर्याने सोसला. त्यामुळे मराठे पेटून उठले व तीव्र स्वातंत्र्यसंग्रामाला सुरुवात झाली. याच काळात संभाजींवर बरीच नाटकं आणि कादंबऱ्यासुद्धा लिहिल्या गेल्या. त्या सर्वांचा सूर साधारण असाच होता. १९६० साली बेंद्रे यांचे संभाजी चरित्र प्रकाशित झाले, आणि संभाजींचे अगदी नवेच रूप प्रकाशात आले. बेंद्रे यांचा नवा संभाजी हे त्यांच्या ४० हून अधिक वर्षांच्या तपश्चर्येचे फळ होते. आपल्या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ त्यांनी प्रचंड पुरावा उभा केला होता. त्यामुळे संभाजी चरित्र संशोधनात क्रांती झाली होती. या चरित्राचा परिणाम पुढील काळातील संशोधनावर तर झालाच; पण कथा, कादंबऱ्या व नाटकांवरही झाला. संभाजीराजांची प्रतिमा अधिक उज्ज्वल बनली. बेंद्रे यांनी मराठ्यांच्या इतिहासाबद्दल विपुल लेखन केले आहे. मात्र ते ओळखले जातात ते त्यांच्या संभाजी चरित्रासाठी!

बेंद्रे यांनी संभाजी चरित्रावरील संशोधनास १९१८ सालीच सुरुवात केली होती. पुढे १९२९ साली 'छत्रपती संभाजी चरित्र कार्यालय लिमिटेड' या नावाची संस्था त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने नोंदवून घेतली. त्यासाठी त्यांना बराच खर्चही सोसावा लागला. पुढे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड ब्रेबॉन यांनी त्यांना 'रिसर्च स्कॉलरशिप' देण्यासाठी प्रयत्न केले. तसेच बाळ गंगाधर खेर यांनी ती मागणी कौन्सिलपुढे ठेवून मान्य करून घेतली. 'भारत इतिहास संशोधक मंडळ' व

इतरही कित्येक संस्था आणि व्यक्तींनी त्यांना आर्थिक मदत केली. यातून ते अभ्यासासाठी युरोपला जाऊ शकले. या दोन वर्षांच्या कालावधीत त्यांनी १६ वे ते १८ वे शतक या कालावधीतील खूप सारी साधन सामुग्री नकलून आणली. या सामुग्रीमुळे संभाजी चरित्रविषयक साधनांत बरीच मौलिक भर पडली. शेवटी १९६० साली हे संभाजी चरित्र सिद्ध झाले.

**बेंद्रेकृत संभाजी चरित्राची रूपरेखा**

प्रथम बेंद्रे आपल्या लेखनात शिवकालीन महाराष्ट्राचे चित्र रंगवतात. त्यात त्यांनी शिवपूर्व काळापासून आढावा घेतला आहे. देवगिरीचे राज्य बुडणे, बहमनी सुलतानांची सत्ता येणे व त्यांची पाच शकलं पडणे याविषयी ते माहिती देतात. पुढे या शाह्यांचे आपापसातील संघर्ष तसेच त्यातून हिंदू समाजाचा सत्तेत झालेला शिरकाव व या शाह्यांचे हिंदू समाजाविषयी असलेले धोरण याची माहिती येते. पुढे मराठ्यांचा उदय, शिवकाळ व युवराज संभाजीराजेंविषयी माहिती दिली जाते. संभाजीराजे स्वतंत्र वृत्तीने कारभार करणारे असल्यामुळे त्यांची वृत्ती कारभाऱ्यांना जाचक वाटू लागली, असे बेंद्रे म्हणतात. तसेच या मंत्र्यांनी कनिष्ठ मुलाबाबतच्या हळुवार मनोवृत्तीचा फायदा घेऊन मातापितरात तरतम भाव जागृत केला, असेही ते सूचित करतात. थोडक्यात मंत्रिमंडळाच्या स्वार्थी व भ्रष्ट प्रवृत्तीमुळे त्यांनी संभाजीराजे व शिवाजीराजे यांच्यात दुरावा निर्माण केला. परिणामी शिवाजीराजांनी संभाजी-राजांवर काही प्रमाणात अन्याय केल्याचे ते सुचवितात. मंत्रिमंडळ व संभाजीराजे हा संघर्ष पुढे वाढत गेला. शिवरायांनी मंत्रिमंडळाची बाजू घेतली व दक्षिण दिग्विजयाला जाताना रायगडचा कारभार हा सरकारकुनांकडे दिला. अर्थातच संभाजीराजांवर अन्याय झाला. यावर भाष्य करताना बेंद्रे म्हणतात, ब्रह्मनिष्ठेच्या हळुवार वृत्तीने शिवाजीराजांनी आपल्या अनुपस्थितीच्या काळासाठी बारभाईंच्या कारभाराला संमती दिली. स्वार्थी व अप्रामाणिक अण्णाजी दत्तोने व इतर एकदोन कारकून, सरकारकुनांनी अंत:कलहाच्या बीजांकुरास पुष्ट केले. संभाजीराजांस हा अपमान न साहून ते रायगड सोडून आपल्या बापाच्या स्वारीबरोबर बाहेर पडले व शृंगारपुरास जाऊन राहिले. तसेच याच पृष्ठावर त्यांनी ब्राह्मण मंत्रिमंडळात वर्णश्रेष्ठत्व आणि ईर्षा व असूया बळावल्याचेही लिहिले आहे. एकूण हे ब्राह्मण मंत्रिमंडळ हे स्वार्थी, वर्णाभिमानी व ईर्षा व असूयाग्रस्त होते असे बेंद्रे यांना म्हणावयाचे आहे. तसेच इथे शिवाजीराजांवरही ब्रह्मनिष्ठेच्या हळुवार वृत्तीचा आरोप केलेला आहे. पुढे शिवाजी महाराज दक्षिण दिग्विजयावरून परत आले. तेव्हाही मंत्रिमंडळ विरुद्ध संभाजीराजे हा संघर्ष सुरूच होता. त्यातून शिवाजीराजांनी पत्र लिहून संभाजीराजांना कळविले, की 'तू प्रजेला अभय देतोस; पण प्रजा कर बुडवित आहे. तू अमात्यांचा उघड अपमान करीत आहेस. तरी शृंगारपुरीहून उठून तू परळी सज्जनगडास जा.' या दरम्यानच्या काळातच संभाजीराजांनी दिलेरखानाशी सूत जमविले होते. शिवाजी महाराजांनी सज्जनगडी जाण्याचा आदेश देईपर्यंत संभाजीराजांचा निर्णय पक्का झाला आणि ते दिलेरखानास जाऊन मिळाले. त्यानंतर दिलेरखानाने संभाजीराजांच्या मदतीने भूपाळगड घेतला. त्यात बरीच मनुष्यहानी झाली. ७०० मराठ्यांचे हात तोडले गेले. नंतर दिलेरखानाने वेगवेगळ्या लुटीतही खूप क्रौर्य दाखविले. परिणामी संभाजीराजे व त्याचे मतभेद झाले व संभाजीराजे तेथून पळून आले. दरम्यानच्या काळात शिवाजी महाराजांनीही संभाजीराजांच्या सुटकेसाठी प्रयत्न केले होतेच.

पुढे शिवरायांचा मृत्यू झाला. रायगडावरील मंत्रिमंडळाने सोयराबाईंच्या साहाय्याने राजारामाला गादीवर बसविण्याचा प्रयत्न केला. मात्र सरनौबत हंबीरराव मोहिते याने केवळ संभाजीराजांची बाजूच घेतली नाही तर विरोधी मंत्र्यांना कैद केले व तो डाव फसला. नंतर संभाजीराजे गादीवर बसले.

दरम्यान औरंगजेबाचा पुत्र अकबर याने बापाविरुद्ध बंड केले व तो संभाजीराजांकडे आश्रयार्थ आला. त्याला काही राजपूतांचीही साथ होती. त्यांच्या साहाय्याने आपल्याला उत्तरेतही औरंगजेबाविरुद्ध आघाडी उघडता येईल असा विचार संभाजीराजांनी केला. या काळात कैदेतल्या मंत्र्यांना संभाजीराजांनी मुक्त केले होते. या कुमंत्र्यांनी परत एकदा

संभाजीराजांच्या विरोधी कट केला व त्यात अकबरालाही सामील करण्याचा प्रयत्न केला. मात्र अकबराने या कटाविषयी संभाजीराजांना माहिती दिली व संभाजीराजेंनी या कटात सामील असलेल्या मंत्र्यांना देहान्त शासन किंवा इतरही शिक्षा केल्या. या कटाबद्दल बेंद्रे यांनी मनुची व इंग्रजांकडील पत्रे पुरावा म्हणून दिली आहेत.

नंतर स्वत: औरंगजेब दक्षिणेत उतरला आणि एका विषम संघर्षाला सुरुवात झाली. औरंगजेबाने दीड वर्षांच्या कालावधीत आदिलशाही व कुतुबशाही कायमची बुडविली; पण ९ वर्षे संघर्ष करूनही मराठेशाही बुडविणे त्यास शक्य झाले नाही. या सर्व काळात संभाजीराजांचा पोर्तुगीज, सिद्दी व काही प्रमाणात इंग्रजांशीही संघर्ष चालूच होता. हे सारे संघर्ष बेंद्रे यांनी खूप पुरावे देऊन तपशिलाने सांगितले आहेत.

पुढे संभाजीराजे पकडले गेले व औरंगजेबाने त्यांस हालहाल करून मारले. अतिशय बाणेदारपणे संभाजी राजांनी मरण पत्करले. या शेवटच्या घटनेविषयी इतिहासात बरेच गैरसमज प्रचलित होते. त्यांचे साधार खंडन बेंद्रे यांनी केले आहे. उदा. संभाजीराजेंनी औरंगजेबाच्या मुलीस लग्नाची मागणी घालणे, हा सर्व बखरींचा कल्पनाविलास असून समकालीन साधनांत त्यास दुजोरा मिळत नाही, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

संभाजीराजे पकडले गेले असले तरी नऊ वर्षांच्या काळात संभाजीराजांनी संघर्ष करत राज्य राखले होते. मुघलांबरोबर इतर शत्रूंनाही यशस्वीपणे तोंड दिले. आदिलशाही व कुतुबशाही यांची मुघलांविरुद्ध एकी करण्याचा प्रयत्न केला. या ९ वर्षांच्या धामधुमीच्या काळात संभाजीराजांची कार्यक्षमता दिसून येते, असे मत त्यांनी मांडले आहे.

संभाजीराजे हे केवळ योद्धे म्हणून श्रेष्ठ होते असे नव्हे तर काव्यालंकार, शास्त्रे, पुराणे व संगीत यांतही ते पारंगत होते. साधूसंतांचा प्रतिपाळ, गरिबांना मदत, सैन्यासाठी योजना इ.गोष्टी त्यांनी केल्या होत्या. परधर्मीयांच्या धार्मिक आक्रमणालाही त्यांनी प्रखर विरोध केला होता. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांची पत्नी येसूबाई स्वतंत्र शिक्क्यानिशी कारभार पाही. यातून येसूबाईंची योग्यता तर दिसतेच; पण संभाजीराजांनी आपल्या पत्नीला कसे योग्य स्थान दिले होते तेही लक्षात येते.

शेवटी एकूण शंभूचरित्रावर भाष्य करताना ते म्हणतात, संभाजी महाराजांची सांप्रतच्या इतिहासात जी फक्त दुराचारी व दुर्व्यसनी म्हणून जमा केली गेली आहे ती संपूर्णत: काल्पनिक किंवा अवास्तव आहे. या समजाच्या अगदी उलट अशी तत्कालीन वस्तुस्थिती असल्याचे निदर्शनास येते. संभाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीचा कदाचित आयुष्याचाही क्षण नि क्षण 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या मनोवृत्तीनेच वेचला, आणि राजभोग तर राहोच पण सामान्य गृहसुखाच्याही लोभास विन्मुख राहून मोगली परचक्राला तोंड देण्यासाठी कर्तव्यनिष्ठेने म्हणा किंवा स्वराज्यनिष्ठेने म्हणा, त्यांना सतत झगडावे लागले. तसेच आपल्या भीषण मृत्यू समयीच्या कालात धारण केलेल्या स्थितप्रज्ञतेने संभाजी महाराजांनी 'स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:' या गीतावचनाची अति तेजस्वी अशी जाणीव करून देऊन महाराष्ट्राच्या प्रतिकारातील चैतन्य जागृत राखले.

बेंद्रे यांच्या या मांडणीमुळे लोकांचा संभाजीराजांकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. मात्र ही मांडणी अभ्यासकांत सर्वमान्य झाली नाही. कित्येक अभ्यासकांच्या टीकेस ती पात्र झाली आहे. या अभ्यासकांत शेजवलकर, ग.ह.खरे, विजय देशमुख, नरहर कुरुंदकर, शंकरराव सावंत, इ.चा समावेश आहे. काही वादग्रस्त विषयांची चर्चा पुढे करीत आहे.

**संभाजीराजांचे चारित्र्य**

संभाजीराजांना असणारी व्यसने व स्त्रीलोलुपता याविषयी बऱ्याच अभ्यासकांनी संभाजीराजांवर टीका केलेली दिसते; पण बेंद्रे यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. मात्र बेंद्रे यांची ही भूमिका काही अभ्यासकांना मान्य झाली नाही. उदा. शंकरराव सावंत म्हणतात, 'संभाजीची ही स्त्रीलोलुपता देशी व विदेशी बखरकारांच्या व वृत्तकारांच्या टीकेचा विषय बनली आहे. त्यांपैकी अनेक कथा अतिशयोक्ती व

कपोलकल्पित आहेत यात शंका नाही; परंतु अफवांचे पोळे मुळात थोडा तरी सत्यांश असल्याशिवाय पिकेल काय?'

जवळजवळ सर्वच तत्कालीन इतिहासकारांचे संभाजींच्या नैतिक वर्तनाबद्दल अतिशय वाईट मत आहे. यात खाफीखान, मनुची, इटालियन व इंग्रज बातमीदार, बसातीनुस्सलातीनकार, मल्हार रामराव चिटणीस अशा निरनिराळ्या जातींच्या व धर्मांच्या लोकांचा समावेश आहे.

हाच आरोप त्र्यंबक शंकर शेजवलकरांनीही केला आहे. यासाठी त्यांनी इंग्रज कागदपत्रे व इतर बखरींचा आधार घेतला आहे.

यावर भाष्य करताना विजय देशमुख म्हणतात, 'चिटणीस बखर, दि. १७ जाने. १६७६ चे मुंबईकर इंग्रजांचे एक पत्र आणि बसातीनुस्सलातीन यातील उल्लेखावरून तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या शंभूराजांचे एका मंत्र्यांच्या मुलीशी (अनाजीपंत सुरनीस?) प्रेमप्रकरण सुरू असल्याचे दिसते. त्यातूनच मग अनेक दंतकथांचा जन्म होऊ लागला.'

ग.ह.खरे म्हणतात, 'त्याला दारूचे व्यसन होते हे नाकारता येणार नाही; तसेच त्याची स्त्रीविषयक इच्छा केवळ नैतिक नव्हती असेही म्हणता येईल. आता तो दारू, स्त्री व वामाचार यांत किती पुढे गेला होता याचा पक्का अंदाज बांधणे कठीण आहे.'

एकूण असे दिसते की, संभाजीराजांस व्यसने असावीत कारण समकालीन साधने तसा उल्लेख करतात. त्यांच्या स्त्रीलोलुपतेविषयीही समकालीन साधनं बोलतात. त्यात अतिशयोक्ती गृहीत धरली तरीही थोडाफार तथ्यांश असण्याची शक्यता आहे. बेंद्रे याबाबतीत संभाजीराजांचे पक्षपाती वाटतात. व्यसनांच्या बाबतीत पुरावा वापरताना बेंद्रे यांनी कसा सैलपणा दाखविला आहे याचे एक उदाहरण देण्यासारखे आहे. बेंद्रे म्हणतात, 'प्रत्यक्षात सभासदाने जे प्रत्यक्ष पाहिले व अनुभवले तेच लिहून ठेवले आहे. सभासद संभाजीराजे 'फटकळ' होते, असे सांगतो. ते दुर्व्यसनी असल्याचे लिहीत नाही.' प्रत्यक्षात सभासदाने पुढील विधानं शिवरायांच्या तोंडून वदवली आहेत, संभाजी कैफ खाईल, गांजा ओढील, इश्कबाजी करील. एकूण बेंद्रे यांनी पुरावा काटेकोरपणे पाहिला नाही असे वाटते. अर्थात व्यसनांसारख्या गोष्टी जोवर व्यक्तीच्या सामाजिक जीवनावर (उदाहरणार्थ राजकारण) थेट प्रभाव टाकत नाहीत, तोवर ती ऐतिहासिक चर्चेचा विषय होऊ नयेत.

बेंद्रे यांनी सभासदाला सत्य लिहिणारा असे प्रमाणपत्र दिले आहे. मात्र सभासदाची विधानं बेंद्रे यांच्या विरोधी जाणारी आहेत. किंबहुना नंतर जे आरोप मल्हार रामराव चिटणीसाने केले त्याचा थोडक्यात पण पहिल्यांदा उच्चार हा सभासदाने केलेला आहे.

**संभाजीराजांचे मोगलाईत जाणे**

संभाजी मोगलांना जाऊन मिळाला होता, असे बेंद्रे यांनी स्पष्टपणे लिहिलेले आहे. मात्र याचा दोष हा अंत:कलह लावून देणाऱ्या मंत्रीगणांवर टाकला आहे. अण्णाजी दत्तोस या प्रकरणी त्यांनी विशेष दोषी ठरविले आहे. शिवाजी राजांनीही मंत्रीगणांच्या दोषांवर पांघरूण घातले असा त्यांनी आरोप केला आहे. त्यांनी हे विश्लेषण मुख्यत: परमानंदकाव्य या ग्रंथावर विसंबून केले आहे. तसेच यात ब्राह्मण मंत्र्यांवर जातीयवादी मनोवृत्तीचा आरोप तर केलेलाच आहे; पण शिवाजीराजांवरही तो ब्रह्मनिष्ठेच्या हळुवार वृत्तीचा आरोप केला आहे. हे सर्व आरोप नंतरच्या कित्येक अभ्यासकांनी फेटाळून लावले आहेत. उदा.शंकरराव सावंत त्यांच्या ग्रंथात म्हणतात, 'आपल्या सिद्धांतांना पुष्टी देणारी एकही घटना नमूद न करता श्री. बेंद्रे यांनी नोकर, चाकर, मंत्री व सावत्र आई यांच्यावर दुगाण्या झाडल्या आहेतच; पण खुद्द महाराजांवरही शिंतोडे उडविले आहेत. संभाजी व राजाराम यांच्या कौमार्य अवस्थेत त्यांच्याबद्दल तरतमभाव जागृत करण्याचा प्रयत्न एकदा तरी झाला आहे काय ?'

नरहर कुरुंदकर म्हणतात, 'शिवाजीचे मंत्रिमंडळ स्वार्थी लोकांचे बनलेले होते, ही भूमिका कच्च्या पुराव्यावर घेऊन संभाजीचे समर्थन करू नये.' तसेच शिवाजीराजांवरील ब्रह्मनिष्ठेच्या आरोपाबाबत ते म्हणतात, 'शिवाजीचे चरित्र ज्यांच्या डोळ्यांसमोर आहे त्यांना हे विधान मान्य होणे शक्य नाही. उलट आपण

ब्राह्मण असल्यामुळे आपणांस कठोर शासन होणार नाही, या भ्रमात कुणी राहू नये. राजाला धोका घडण्याची अगर कामात कुचराई होण्याची वेळ आली तर ब्राह्मण म्हणून मुलाहिजा ठेवला जाणार नाही, हे बजावण्याइतका शिवाजी कठोर होता.' एकूण असे दिसते, की बेंद्रे यांची ही भूमिका बरीच कच्च्या पुराव्यांवर आधारलेली आहे. संभाजीराजांच्या मोगलाईत जाण्यामुळे जो डाग लागला त्याचे समर्थन होणं कठीण आहे.

**सरकारकून व संभाजीराजे**

संभाजीराजांचे समर्थन करताना बेंद्रे यांनी सरकारकून वा मंत्रीगणांवर बरीच टीका केली आहे. त्याचा काही भाग अगोदर येऊन गेलेलाच आहे. एके ठिकाणी त्यांनी शिवकालीन सरकारकून लाचखोर असल्याचेही म्हटले आहे. आणखी एके ठिकाणी त्यांनी राजघराण्यातील बेबनावास व नंतरच्या भांडणास जर कोणी खरे जबाबदार असतील, तर ते स्वार्थसाधू तंत्रमंत्रीच होत. ही सर्व टीका करताना त्यांनी मुख्यत: दोन साधनं वापरली आहेत. एक म्हणजे परमानंदकाव्य व दुसरे युरोपीयनांची पत्रं. यातलं पहिलं साधन उघड उघड पक्षपाती आहे, तर दुसऱ्या साधनांस प्रत्यंतर पुरावा असल्याशिवाय विश्वास ठेवणं अयोग्य आहे. शंकरराव सावंत यांनी असे दाखवून दिले आहे, की बुधभूषण या ग्रंथात स्वत: संभाजीराजांनीच मंत्री प्रामाणिक असल्याचे म्हटले आहे. मंत्री लोक कसे जुलमी होते हे सांगण्यासाठी त्यांनी काही ठिकाणी फ्रायरचे उतारे वापरले आहेत. त्यात फ्रायर म्हणतो, 'सामान्यत: शिवाजीची सर्व प्रजा एक प्रकारे गुलामगिरीचा अनुभव घेत आहे. देसाई लोकांकडे जमिनी दुप्पट धाऱ्याने जबरदस्तीने देउन त्याची वसुली करण्यासाठी त्यांचा छळ केला जातो. आज कित्येक ब्राह्मण शिवाजीच्या कैदेत असून, ब्राह्मण हे छळापासून मुक्त असावेत असे असतानाही, तापलेल्या सांडसांनी त्यांचा छळ होतो. अशा तऱ्हेने उकळलेला हा पैसा, त्यांचाही असाच छळ होऊन, सुभेदारांना पुढे राजालाच द्यावा लागतो. नंतर त्यांची नेमणूक पुन्हा होऊ शकते. अशा रीतीने मत्स्य न्यायाने प्रजेची नागवण चालू असल्यामुळे फक्त पुरुषच नव्हे तर कुटुंबेच्या कुटुंबे बंधनात खितपत राहतात.' बेंद्रे यांचे इथे म्हणणे असे, की हा उतारा दत्ताजीपंत वकेनिवासबद्दल आहे. अशाच प्रकारचा फ्रायरचा अजून एक उतारा त्यांनी सादर केला आहे. तो त्यांचे मते अण्णाजी दत्तोवर आहे. एकूण शिवाजीराजांचे मंत्री काही प्रमाणात जुलमी होते अशी भूमिका संभाजी चरित्रात येते. विशेष म्हणजे फ्रायरचे हेच उतारे त्यांनी शिवचरित्रातही उद्धृत केले आहेत; पण शिवचरित्रात मात्र त्यांनी फ्रायरच्या मताचे खंडन केले आहे. पुरावा एकच आहे; पण एका ग्रंथात त्यांना तो विश्वासार्ह वाटलेला आहे, तर दुसऱ्या ग्रंथात तो त्यांनी अविश्वासार्ह ठरविलेला आहे. बेंद्रे यांच्या मनात संभाजीराजांविषयी कुठे तरी हळवा कोपरा असावा. त्यातून त्यांच्या लेखनात विसंगती आली आहे.

आणखी एक मुद्दा म्हणजे सर्व (किंवा बहुतांश) ब्राह्मण मंत्री हे अपात्र ठरविल्यामुळे शिवाजीराजांवर किती मोठा अन्याय होतो, हे बेंद्रे यांच्या लक्षात आलेले दिसत नाही.

**परमानंदकाव्य**

संभाजीराजांच्या बाजूने लिहिलं गेलेलं हे एक महत्त्वाचं साधन आहे. बेंद्रे यांनी या साधनाचा भरपूर वापर केला आहे. (त्यांनी या ग्रंथाचं हे नाव वापरलेलं नाही. ते त्यास अनुपुराण हे नाव वापरतात.) खरं तर या साधनाचा इतक्या मोठ्या प्रमाणावर वापर प्रथम बेंद्रे यांनीच केला आहे; पण या साधनाची नीट माहिती देणे, चिकित्सा करणे हा प्रकार त्यांनी केला नाही. ते नक्की कुणी लिहिले आहे हा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला नाही. त्यांनी काही ठिकाणी परमानंद म्हणतो म्हणून या ग्रंथातले श्लोक दिले आहेत, तर काही ठिकाणी गोविंद म्हणतो म्हणून! परिणामी हा ग्रंथ नक्की किती जणांनी लिहिलाय यांविषयी वाचक चाचपडत राहतो. याविषयी देवीसिंग चौहान यांनी 'परमानंदकाव्य हे परमानंदाचे नव्हे' या नावाने सविस्तर लेख लिहिला आहे. शेजवलकरांनीही या ग्रंथाचे कर्तृत्व परमानंदाचे नसल्याचे म्हटले आहे. ते म्हणतात, 'यातील कोणताही भाग परमानंदकृत नाही. त्याच्या देवदत्त नावाच्या लबाड पुत्राने तो संभाजीच्या कारकिर्दीत आपल्या इष्ट

हेतूसिद्ध्यर्थ मागील काही शिवकाल त्यात घेऊन त्रुटीत स्वरूपात कसाबसा रचला व त्याला पुढे या देवदत्ताच्या पुत्रानेच, म्हणजे गोविंदाने, शाहूची मर्जी संपादन करण्यासाठी शाहूच्या जन्माचे रामजन्मासारखे पूर्वाख्यान रचून, पुत्रकामेष्टीरूपाने त्याचा जन्म घडवून आणून जोड दिली. हाही स्वत:ला कविंद्र म्हणूनच म्हणवून घेतो. सांप्रत काळी अभ्यासक त्यास फार दर्जेदार साधन मानत नाहीत. संभाजीराजांचे पक्षपाती साधन मानतात.'

**समारोप**

बेंद्रे यांच्या संभाजी चरित्रामुळे काही गोष्टी निर्णायकपणे समोर आल्या. त्या म्हणजे संभाजीराजांनी ९ वर्षे अथकपणे सर्व शत्रूंशी झुंज दिली. ते पकडले गेले तेव्हाही मराठी राज्य शिल्लक होते. संभाजीराजांच्या दोषामुळे ते बुडालेले वगैरे नव्हते. साधनसामुग्री व खजिनाही होता. बखरींच्या लेखनात अतिशयोक्ती आहे. अर्थात बखरींना खोडून काढता काढता बेंद्रे यांनी लंबक दुसऱ्या टोकाला नेला आहे. असे दिसते, की संभाजी चरित्र हा बेंद्रेंच्या केवळ अभ्यासाचाच नव्हे तर आस्थेचाही विषय होता. बेंद्रे यांच्या चुका मान्य करूनही या ग्रंथाचे मोल अबाधित आहे. या ग्रंथाने इतिहासकारांची संभाजीराजांविषयी दृष्टी बदलून गेली.

**संदर्भ व टीपा**

बेंद्रे वा. सी., प्रथमावृत्तीतील निवेदन, छत्रपती संभाजी महाराज, पार्श्व पब्लिकेशन,२०१३ , (येथून पुढे या ग्रंथाचा उल्लेख 'संभाजी चरित्र' असा करण्यात येईल.)
तत्रैव–
तत्रैव–
संभाजी चरित्र पृ. ८४ .
तत्रैव.
तत्रैव पृ. ८५ .
तत्रैव पृ. ९४
तत्रैव पृ. १०३,१०४
तत्रैव पृ.११७.
तत्रैव पृ. २२९
तत्रैव पृ. ७३४
तत्रैव पृ. ७३८
सावंत शंकरराव, हुतात्मा संभाजी : एक विवाद्य व्यक्तिमत्त्व, मुंबई, १९९१ , पृ. ५२ .
शेजवलकर त्र्यंबक शंकर, श्रीशिवछत्रपती – संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९६४, पृ. १४२, १४३.
देशमुख विजय, शककर्ते शिवराय, खंड २ , छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर, २०१०, पृ. ३७०.
पूर्वोक्त, सावंत शंकरराव, ग. ह. खरे यांचा पुरस्कार, पृ. ४१.
संभाजी चरित्र, पृ. १६८.
जोशी शं. ना., (संपा.), कृष्णाजी अनंत सभासद विरचित छत्रपती शिवाजीराजे यांची बखर, चित्रशाळा प्रकाशन, पुणे,१९६० , पृ. १०८.
पूर्वोक्त, सावंत शंकरराव, पृ. ५९.
कुरुंदकर नरहर, मागोवा, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, २०१५, पृ. ९७.
तत्रैव पृ. ९९.
संभाजी चरित्र, पृ. ५११.
तत्रैव पृ. ६७४.
पूर्वोक्त, सावंत शंकरराव, पृ.६१.
संभाजी चरित्र, पृ. १३१.
तत्रैव पृ. १२७, १२८.
बेंद्रे वा. सी., छत्रपती शिवाजी महाराज, उत्तरार्ध, कोल्हापूर, २०१३, पृ. ४९७, ४९८.
तत्रैव पृ. ४९८, ४९९.
संभाजी चरित्र, पृ. ९६, ९७, ९८.
तत्रैव पृ. १२४, २०८, २०९.
चौहान देवीसिंग व्यंकटसिंग, दख्खनी हिंदीतील इतिहास व इतर लेख, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, पृ.२०९ ते २३०.
पूर्वोक्त, शेजवलकर त्र्यंबक शंकर, पृ. १३१.


**प्रा. संतोष शेलार**
**९४०३९८०१३३**

◆◆

इ. स. पाचवे शतक ते बारावे शतक या कालखंडातील भारतीय इतिहासावरील मा. सुधा रिसबूड लिखित ‘अजेय भारत’ या ग्रंथावरील परीक्षण

# भारतीय इतिहासाचा देदीप्यमान कालखंड

प्रा. डॉ. वर्षा सतीश तोडमल




पुस्तकाचे नाव : **अजेय भारत**
लेखिका : **सौ. सुधा रिसबूड**
प्रकाशकः **कॉन्टिनेंटल प्रकाशन**
प्रथमावृत्ती : **ऑक्टोबर २०२०**
पृष्ठेः ४००    किंमत : ५५० /-

‘एक समान घराणे, समान भूभाग नसतानादेखील केवळ त्यांची परंपरा मानते म्हणून रोमन साम्राज्याला रोमन साम्राज्य मानायचे तर त्याच पद्टीने भारतातील गुप्त काल ते बारावे शतक या काळाला आर्यावर्तीय अथवा भारतवर्षीय अथवा हिंदू साम्राज्य म्हटले पाहिजे अशी भूमिका घेऊन, गेली अनेक वर्षे प्रामुख्याने विज्ञान विषयाशी संबंधित लेखन करणाऱ्या सौ.सुधा रिसबूड यांनी ‘अजेय भारत’ हे पुस्तक लिहिले आहे. गेली सहा वर्षे त्यांनी केलेल्या अभ्यासाचा परिपाक म्हणजे हे पुस्तक.  सुधा रिसबूड या मराठी विज्ञानकथा लेखिका. यांचे अंतरिक्षाचा वेध, कल्पित अकल्पित, गार्डियन हा कथासंग्रह, भारतीय स्त्री एक मीमांसा, भास्कराचार्य ते गॉस गणिताचाच ध्यास, रिचर्ड फाइनमन इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत.

भारतीय इतिहासाच्या पाचवे शतक ते बारावे शतक या आठशे वर्षांच्या कालखंडावर विस्तृत प्रकारची माहिती इतिहासाच्या मूलभूत साधनांद्वारे देणारे ४०० पानांचे हे पुस्तक कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे यांच्या वतीने नुकतेच प्रकाशित झाले आहे.

भारतीय इतिहासाच्या पाचवे शतक ते बारावे शतक या आठशे वर्षांच्या ह्या कालखंडातील इतिहास एपिग्रफिया इंडिका, पुरातत्त्व खात्याचे अहवाल,

असंख्य शिलालेख, ताम्रपट, नाणी आदी साधनांद्वारे या पुस्तकात मांडला आहे. बाराव्या शतकानंतर हा देश परकीय आक्रमकांच्या जाळ्यात सापडला. गुप्त राजवटीनंतर ते मध्ययुगातील आक्रमणापर्यंतच्या ८०० वर्षांतील स्वकीय भारतीय राजवटींचा विस्तृत इतिहास मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

भारतीयांनी रस्ते, भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधने यांच्या अनुभवजन्य ज्ञानातून व उपलब्ध नैसर्गिक साधने वापरून गावागावातून घरे, पाणी, व्यवस्था, घाट कसे बांधले होते याचे विवेचन केले आहे. तत्कालीन स्थापत्यकारांचे अभियांत्रिकी कौशल्य काळाच्या कसोटीवर कसे सिद्ध झाले याचा रोचक इतिहास वाचायला मिळतो. भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यांवरून चालणारा व्यापार, सागरी व्यापारीमार्ग, तत्कालीन चलन व त्यांच्या किमती यांविषयी माहिती दिली आहे. भारतीयांची दाने देण्यामागची मानसिकता आणि त्यांनी कोणत्या प्रकारची दाने दिली हेही मांडले आहे. स्मृतिग्रंथातील आणि ताम्रपटातील न्यायविषयक संज्ञा, त्यांचे संदर्भ दिलेले आहेत.

या कालखंडातील सुमारे ४० घराण्यांचा राजकीय इतिहास, मंदिरे व त्यांच्या रचना, अभियांत्रिकी दृष्टिकोनातून सामाजिक रचना, धार्मिक प्रवाह व तत्त्वज्ञान, शिक्षण, युद्धनीती व शस्त्रे, न्यायव्यवस्था, स्त्रीजीवन, कृषीजीवन इ.विषयी एकूण १४ प्रकरणांमधून माहिती दिली आहे. भारतीय इतिहासाच्या या कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त बाराशेहून अधिक संदर्भ, पुस्तकात तळटीपांच्या स्वरूपात दिले आहेत.

एकूणच आजपर्यंतचा भारताच्या इतिहासाचा अभ्यास हा एका ठरावीक मानसिकतेतून झालेला आहे. अनेक वेळा ठोस पुराव्यांच्या अभावी अनुमान व तर्क यांच्या जोरावर घडलेल्या घटनांचे विश्लेषण केलेले नसते. ते विश्लेषण लेखिकेने सबळ पुराव्यानिशी मांडले आहे. अभ्यासकांसाठी हे पुस्तक म्हणजे एक मैलाचा दगड ठरावे. या पुस्तकामध्ये भूमिका, प्रादेशिक रचना, राजघराण्यांचा राजकीय इतिहास, व्यापार, मंदिरे, दाने, सामाजिक रचना, धार्मिक प्रवाह व तत्त्वज्ञान, शिक्षण, युद्धनीती व शस्त्रे, न्यायव्यवस्था, स्त्रीजीवन, कृषी, सारांश अशी एकूण १४ प्रकरणे आहेत. यांपैकी काही निवडक प्रकरणे आणि त्यांचा विषय पुढील विवेचनावरून सहजपणे लक्षात येऊ शकतो.

इतिहासाचा अभ्यास केवळ राजे-महाराजे, साम्राज्ये, लढाया, युद्धे, भौगोलिक विस्तार यांपुरता मर्यादित न ठेवता समाजजीवनाचा सर्वांगीण पट उलगडण्याची भूमिका घेत लेखिकेने समाजजीवनाच्या विशिष्ट अंगाचा वेध विविध प्रकरणांतून घेतला आहे. उदाहरणार्थ या आठशे वर्षांचा एकसंधपणे विचार केला पाहिजे या मुद्द्यासंबंधीची अनेक उदाहरणे 'भूमिका' या प्रकरणात दिली आहेत. सध्या इतिहासाचा अभ्यास करताना विज्ञान तंत्रज्ञानाचा वापरदेखील मोठा उपयुक्त ठरतो हे लक्षात घेऊन आधुनिक वैज्ञानिक साधने, वैज्ञानिक दृष्टिकोन व भारतीय मानसिकतेतून भारतीय इतिहासाचा अभ्यास करणे कसे आवश्यक आहे याबाबतचे विचारदेखील या प्रकरणात दिले आहेत.

भारतात धार्मिक दृष्टिकोनातून मंदिरांचे महत्त्व आहेच. मंदिरांचा अभ्यास करताना कला, तत्त्वज्ञान, मूर्तिशास्त्र, वास्तुशास्त्र या दृष्टिकोनातून यापूर्वी मंदिरांचा विचार झाला आहे; पण लेखिकेने स्थापत्य अभियांत्रिकीच्या दृष्टिकोनातून या कालावधीतील मंदिर बांधणीसंबंधीचा केला गेलेला विचार 'मंदिरे ' या प्रकरणातून मांडला आहे.

'सामाजिक' या प्रकरणामध्ये भारतीयांनी भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधने यांच्या अनुभवजन्य ज्ञानातून व उपलब्ध नैसर्गिक साधने वापरून गावागावातून घरे, पाणी संधारण व्यवस्था, घाट कसे बांधले गेले याबद्दल विवेचन केले आहे. काही नमुनात्मक सर्वेक्षण तसेच उपलब्ध संशोधनविषयक लेखनाचा आधार घेत हे प्रकरण लिहिले गेले आहे.

'व्यापार' या प्रकरणात भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावरून चालणारा व्यापार, सागरी व्यापारी मार्ग, तत्कालीन चलन व त्यांच्या किमती यांविषयी माहिती दिली आहे. तसेच अरबी लेखकांच्या लेखनाचा आधार घेत त्या काळचा व्यापार व सागरी

मार्ग यांचा नकाशा याचा समावेश या प्रकरणात केला आहे.

या ८०० वर्षांतील न्यायपद्धती कशी होती याबाबत स्मृती ग्रंथातील ताम्रपटातील न्यायविषयक संज्ञा यांचे संदर्भ देत 'न्याय' या प्रकरणाचे लेखन केले गेले आहे. तर भारतात पुढील काळात संस्कृतिक एकता कशामुळे दृढ झाली याचा मुळातून अभ्यास करण्याची भूमिका घेत त्याविषयीचे विवेचन 'धार्मिक प्रवाह व तत्त्वज्ञान' या प्रकरणामध्ये आहे.

भारतीयांची दाने देण्यामागची मानसिकता ही चॅरिटी, डोनेशन, ग्रँट यांसारख्या शब्दांतून व्यक्त होणाऱ्या ब्रिटिश इतिहासकारांच्या मानसिकतेपेक्षा निराळी होती. हे 'दाने' या प्रकरणातून लक्षात आणून देण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. या प्रकरणात या कालावधीत भारताच्या पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण भागातील राजवटींनी जी दाने दिली त्यातील नमुन्यादाखल काही उल्लेख तत्कालीन लेखांवरून दिले आहेत. पाश्चात्त्य इतिहासकारांपेक्षा वेगळी भूमिका घेत भारताचा इतिहास भारतीय दृष्टिकोनातून अभ्यासला पाहिजे असे लेखिकेचे मत आहे. प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये या ८०० वर्षांच्या कालखंडाकडे दुर्लक्ष केले गेले आहे असे निरीक्षण नोंदवत या कालखंडाबाबत अधिक अभ्यासाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन लेखिका करते.

धर्मांतराचा आणि सांस्कृतिक आक्रमणांचा हजार वर्षांचा जबरदस्त रेटा सहन करून त्यानंतरही ब्रिटिशांच्या राजवटीला दीडशे वर्षे लढा देत भारतीय संस्कृती ही आजही भारतीयच राहिली. ती ना पर्शियन संस्कृती झाली ना तिने ब्रिटिशांची संस्कृती स्वीकारली. याची कारणे शोधताना बरेचदा हे विसरले जाते की, ह्याची कारणे ही त्यामागच्या हजार वर्षांच्या इतिहासात आहेत.

भारतीय संस्कृतीची पाळंमुळं इतकी खोलवर रुजवण्याचं कार्य हे ज्या कालावधीत झालं तोच हा पाचव्या ते बाराव्या शतकांचा कालखंड विस्मृतीत गेला. त्याचा विस्तृत अभ्यास हा, भारतीय समाजाने आक्रमणांच्या काळात कुठल्या कुठल्या स्तरावर लढा दिला हे समजून घेण्याकरता आवश्यक आहे.

भारतावर इस्लामी आक्रमकांचा पहिला हल्ला जरी अरबांनी सातव्या शतकात केला असली तरी त्यांना इथे राज्य प्रस्थापित करता आले नाही. उत्तर भारतावर बाराव्या शतकात महमूद घोरीच्या काळात मुस्लिमांनी इथे राज्य स्थापले आणि तिथून पुढे दक्षिणेत एकशे तीस वर्षांनी पुन्हा स्वकीय राजांचे विजयनगरचे साम्राज्य स्थापले गेले; पण विजयनगरचे साम्राज्य हे होयसळांचे राज्य नष्ट झाल्या झाल्या केवळ सात वर्षांच्या आतच का स्थापले जाते, आणि १५६५ मध्ये त्या साम्राज्याचा अंत झाल्यावर सत्तर वर्षांच्या आत शहाजीराजे विजापूरच्या आदिलशाहीशी का बंड करून उठतात? अशा आणि यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे पुस्तक वाचताना मिळतात.

भारताच्या हजारो वर्षांच्या राज्य पद्धतीमध्ये असंख्य राजे आणि असंख्य राज्यं होऊन गेली. भारतीय समाजाला राजा कोण आहे याचे भान आणि जाणीव कधी फारशी नव्हतीच, किंबहुना सर्वसामान्य भारतीयांच्या दैनंदिन जीवनात त्यामुळे काहीच फरक पडत नव्हता त्यामुळे भारतीय समाजात राजनीतीसंबंधी जागरुकता नव्हती.

गाव पातळीवर राजाचे अधिकारी महसूल गोळा करण्यासाठी येत, दाने देण्यासाठी येत; पण गावांच्या नित्य जीवनात ते ढवळाढवळ करत नसत. गावातील आणि नगरातील जीवन लोक ज्या पद्धतीने कंठत होते ते स्वातंत्र्य समाजाला त्या काळातील राज्यपद्धतीमुळे प्राप्त झाले होते आणि म्हणूनच कदाचित भारतीय समाजाला परकीय आक्रमणांचा अर्थ कळायला काही काळ जावा लागला. राजा कोणताही असला तरी आमच्या पूजा पद्धती, आमच्या परंपरा, आमचे सण हे चालूच असतात त्यामुळे कुठलेही राज्यकर्ते असले तरी आमच्या जीवनात काय फरक पडतो? मग स्वकीय राज्यकर्त्यांचे राजकीय स्वातंत्र्य नष्ट झाले की काय होऊ शकते याचे भान सर्वसामान्य व समाजाला येण्यासाठी परकीय आक्रमकांची आक्रमणे समाजाला पुन्हा पुन्हा झेलावी लागली.

हजारो वर्षांच्या स्वतंत्र राजवटीमध्ये राजांचा

सर्वसामान्य जनतेच्या जीवनात अधिक्षेप नसल्यामुळे भारतावर झालेल्या परकीय आक्रमणांची जाणीव करून देण्यासाठी त्या त्या काळातल्या राजकीय नेतृत्वाला पराकाष्ठेचा प्रयत्न करावा लागला आणि केवळ राजकीय नेतृत्वाला नव्हे तर संतांनाही अध्यात्म साधनेबरोबर प्रबोधन करावे लागले म्हणूनच 'खुरसान खास माना किया हिंदुस्तान दराया' अशी बाबराच्या आक्रमणाची प्रतिक्रिया गुरुनानकांनी दिली होती.

त्यापूर्वी राजकीयदृष्ट्या एकसंध नसलेला भारत हा संतांनी पायी हिंडून एका सामायिक सूत्रात बांधण्याचा प्रयत्न मात्र अविरतपणे केला होता. अन्यथा आद्य शंकराचार्यांना भारताच्या चार भौगोलिक दिशांना पीठे स्थापन करण्याची आवश्यकता का भासली असावी? चार वेदांच्या अध्ययनाकरता भारताच्या चारी दिशांना अध्ययन केंद्रे स्थापन करावी असे का वाटले असावे?

ज्यांची वृत्ती पूर्णपणे संन्यस्त होती, ज्यांनी भारतातील तत्कालीन सगळ्या तत्त्वज्ञानांचा पराभव करून अद्वैत तत्त्वज्ञानाची ग्वाही भारतभर फिरवली होती त्यांनी शैव, वैष्णव, सौर गाणपत्य आणि शाक्त पंथीयांच्या देवतांना आणि मूर्तिपूजेला समान सन्मान देऊन पंचायतनाची स्थापना का केली होती? निर्गुणाच्या उपासनेचे महत्त्व पटवून देतानाच संस्कृतमधून त्यांनी रचलेल्या अनेक देवतांच्या सुंदर स्तोत्रांच्या रचना आजही भारतीय समाज गुणगुणतो, कंठस्थ करतो, अनेक नामवंत गायक त्या रचना म्हणताना आजही धन्यता मानतात.

समाजाला हजारो वर्षे एका सूत्रात बांधून ठेवणारा हा धागा ज्या कालखंडात निर्माण झाला तोच हा पाचवे ते बारावे शतकांचा आठशे वर्षांचा कालखंड आहे.

बहुतांश ऐतिहासिक लेखन हे ठरावीक विचारसरणीतून केले जाते. भारतीय इतिहासाचा विचार हा काही विचारकांनी सामंतशाही मॉडेल डोळ्यासमोर ठेवून केला; परंतु तत्कालीन भारतीय समाजाच्या घडामोडींचा अभ्यास हा त्या-त्या काळातील समाजाच्या परंपरा, समजुती, साहित्य यांच्या संदर्भातच केला पाहिजे असे लेखिकेला वाटते. इतिहास मांडताना आणि त्याचा अभ्यास करताना भाषा हे फार महत्त्वाचे माध्यम असते याची लेखिकेला असलेली जाणीव पुस्तक वाचताना जागोजागी येते.

राष्ट्राचे स्वातंत्र्य जपण्यासाठी व्यक्तिगत आणि राष्ट्रीय अशी दोन्ही चारित्र्यं जोपासावी लागतात. त्याची जोपासना का आवश्यक आहे, हे या पुस्तकाच्या अभ्यासातून समजून येते. भारतीय इतिहासाचा देदीप्यमान कालखंड लेखिकेने या पुस्तकात मांडलेला दिसतो. प्राचीन भारताच्या अनवरत चालणाऱ्या इतिहासाच्या प्रवाहाचा गुप्तोत्तर काळ ते बारावे शतक हा सातशे-आठशे वर्षांचा महत्त्वाचा टप्पा आहे. आजवर हा टप्पाच भारतीय इतिहासाच्या वेगवेगळ्या स्तरांवरील अभ्यासातून दुर्लक्षित राहिला होता. त्यावर लेखिकेने इतिहासाच्या गवाक्षातून प्रभावी प्रकाश टाकला आहे.

इलेक्ट्रॉनिक्सचे शिक्षण घेतलेल्या लेखिकेने विषयाची गरज म्हणून यासाठी स्थापत्य अभियांत्रिकीची पुस्तके अभ्यासली आहेत. याचबरोबर आसुद येथील व्याघ्रेश्वर या मंदिराचा केसस्टडी करून इतिहासातील ताम्रपटांच्या आधारे शिवमंदिरांची नावे तशीच का पडली यासंदर्भात नव्याने विचार करण्याची आवश्यकता आहे, असा निष्कर्ष लेखिका काढते.

पुस्तकात दिलेल्या बाराशेहून अधिक तळटीपा या पुस्तकाचे संदर्भमूल्य वाढवतात. अध्ययन केलेला विषय मांडताना भारतीय जीवनाचा इतिहास समजून घेणे म्हणजे भारतीय जीवनाचे तत्त्वज्ञान समजून घेण्यासारखे आहे असा लेखिकेने काढलेला निष्कर्ष विचारात घेण्याजोगा आहे.

**प्रा. डॉ. वर्षा सतीश तोडमल**
चलभाष : ९०९६९५१२००

◆◆

मराठी साहित्यातील ख्यातकीर्त कवी मा. द. भा. धामणस्कर यांच्या काव्याची सौंदर्यस्थळे उलगडून दाखवणारा समीक्षालेख.

# सर्वे भवन्तु सुखिनः

धनंजय तडवळकर

बऱ्याच दिवसात कविता लिहिली नाही, म्हणजे
बऱ्याच दिवसात स्वतःला भेटलो नाही,
स्वतःशीही आतले काही बोललो नाही..

या ओळी आहेत, जो कवी कवितेशी तादात्म्य पावलेला आहे, त्या ऋषितुल्य माननीय द.भा. धामणस्कर , म्हणजेच आबांच्या !

पुस्तकाच्या गावाचे (भिलारचे) उद्घाटनाच्या आदल्या दिवशी मी, माझी बायको, मित्रवर्य सुप्रसिद्ध गझलकार प्रदीप निफाडकर आणि सौ. अनिता वहिनी, आम्ही भिलारला गेलो होतो. मला व प्रदीपला कवितांच्या सेक्शनमध्ये जास्त रस असल्याने आम्ही शोधत शोधत तिथे गेलो.

कपाटातील कवितासंग्रह नीट लावायचे आम्ही ठरवले आणि प्रदीप सांगेल त्याप्रमाणे लावत गेलो. ते लावत असताना, प्रदीपच्या हातात, आबांचा 'बरेच काही उगवून आलेले..' हा कवितासंग्रह लागला. त्याने त्यातील 'आजोबा' ही कविता मला ऐकवली आणि नकळत डोळ्यांच्या कडा ओलावल्या. नंतर त्याने 'नातू', 'माझे मनगटी घड्याळ' या कविता ऐकवल्या आणि मी अक्षरशः भारावून गेलो आणि तिथेच त्यांच्या कवितांच्या प्रेमात पडलो. येताना त्याच विषयावर आमच्या खूप गप्पा झाल्या आणि त्याच प्रवासात आम्ही ठरवले, की एकदा आबांना प्रत्यक्ष भेटायचे. पुण्यात परतल्यानंतर, सर्वांत पहिल्यांदा आबांचे तिन्ही काव्यसंग्रह विकत आणले. त्यातील त्यांचा पहिला काव्यसंग्रह, 'प्राक्तनाचे संदर्भ' मिळतच नव्हता. खूप शोधाशोधीनंतर तो मिळाला; पण त्याची अवस्था ठीक नव्हती पण तो मिळाला याचा मनस्वी आनंद झालेला! अन् त्या दिवसापासून त्यांचे वाचन सुरू झाले.

मग प्रदीपने त्यांना फोन करून त्यांची वेळ घेतली आणि एक दिवस आम्ही डोंबिवली गाठली. (प्रदीपचे आबा आणि त्यांच्या कुटुंबियांशी आधीपासूनच चांगले संबंध असल्यामुळेच हे शक्य झाले, हे नमूद केलेच पाहिजे.) जाताना आम्ही आबांच्याच कविता पुस्तकात बघून वाचत होतो ते थेट आबांचे घर येईपर्यंत!

सीकेपी सभागृहासमोर असलेल्या, आर.बी.आय. च्या कॉलनीतील, 'अकल्पित' हा सरांचा बंगला! अगदी गर्द झाडीत वसलेला आणि आबांप्रमाणेच, ओळखी/अनोळखी पाहुण्यांना आपल्या बाहुपाशात घेण्यास सदैव उत्सुक असणारा! मी त्या दिवशी आबांना प्रथमच पाहत होतो, आत गेलो, सरांना पाहिलं अन् त्यांच्या पायावरच डोकं ठेवावसं वाटलं, मी ठेवून मोकळा झालो. आता या वयात हे फार फार अभावानेच होते; पण त्यादिवशी झाले कारण समोर एक कवी नव्हे तर एक योगी उभा होता, अगदी निःसंग झालेला!

आबांनी साऱ्यांचं स्वागत इतक्या आपुलकीने केले, की त्यांना मी पहिल्यांदा भेटतो आहे वाटलेसुद्धा नाही. यथायोग्य पाहुणचार झाल्यावर सुरू झाली गप्पांची, कवितांची एक अनौपचारिक मैफल! आबांनी आम्हाला त्यांच्या ८/१० कविता वाचून दाखवल्या. ८८ वर्षांचा हा कवी, कविता इतक्या छान आणि स्पष्टपणे वाचत होता की, आम्ही आमचे प्राण कानात आणले होते. त्या दिवशी घड्याळ पळतच होतं आणि आमची परतायची वेळ कधी झाली कळलंच नाही. आम्ही निघालो आणि नको नको म्हणत असतानासुद्धा, आबा आम्हाला सोडायला बाहेरपर्यंत आले. तो दिवस अगदी सोन्याचेच काय हिरे माणकांचे पंख लावून आला होता जणू!

द.भा. धामणस्कर यांचा जन्म १९३० सालचा, अहमदाबादचा. आई लहानपणीच गेली; पण दुसऱ्या आईबद्दल 'सावत्र' हा शब्द चुकूनसुद्धा न काढणाऱ्या आबांनी, अनेकदा हलाखीचे दिवस काढले. दुःख कधीच गोंजारत न बसणाऱ्या आबांनी ते आपल्या कवितेतही येऊ दिले नाही. हा कवी अत्यंत निर्मोही, निगर्वी आणि प्रसिद्धीपासून नेहमीच दूर राहणारा आहे. वयाच्या १७ व्या वर्षी पहिली कविता लिहिलेल्या आबांनी, जे भावलं, जे आतून आलं त्याच कविता लिहिल्या म्हणूनच त्यांच्या केवळ २५० च्या आसपास कविता आहेत. त्यांचा पहिला कवितासंग्रहच मुळी, त्यांच्या वयाच्या ५२ व्या वर्षी आला. १९६० पासून डोंबिवली येथे स्थायिक असलेल्या आबांनी १९८८ पर्यंत रिझर्व्ह बँकेमध्ये नोकरी केली.

निर्व्यसनी, व्यासंगी, शांत, स्वतःबद्दल कमीत कमी बोलणारे आबा हे अनेकांचे श्रद्धास्थान आहे. इतका मोठा कवी असूनही, आवडलेल्या इतरांच्या कविता, आपल्या हस्ताक्षरात वहीत उतरवणे आणि प्रसंगी त्या कवितांचा संदर्भ देणे हे ते अगदी सहजपणे करतात. खरं तर पहिली कविता सत्यकथेत येऊनही आबांनी त्याची शेखी कधीच फिरवली नाही, तो त्यांचा स्वभावच नाही.

त्यांचे आजपर्यंत फक्त तीनच कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

१. प्राक्तनाचे संदर्भ – १९८२, मौज प्रकाशन

२. बरेच काही उगवून आलेले– २००१

३. भरून आलेले आकाश – २०१६.

या अतिशय संयमी असलेल्या कवीने कधीच कशाबद्दलही तक्रार केली नाही, ना कधी नशिबाला दोष दिला. आपले समवयस्क आणि समकालीन असलेले कविवर्य मंगेश पाडगावकर (जन्म १९२९) आणि कविवर्य शंकर वैद्य ( जन्म १९२८) यांना मिळत असलेला मानसन्मान पाहून, या त्यांच्या मित्रास नेहमी आनंदच होत असे. आपला दुसरा कवितासंग्रह, 'बरेच काही उगवून आलेले' आबांनी त्या मित्रद्वयीला अगदी कृतज्ञतापूर्वक अर्पण केला आहे.

आता ही चर्चा तर नेहमी होतच असणार, की त्या दोघांइतका मान आबांना का नाही मिळाला? पण हा विचार त्यांच्या मनात येईल ते आबा कसले? कविता लिहिली, ती रसिकांच्या, वाचकांच्या ताब्यात दिली, की ती कविता मग आपली न राहता त्यांची झाली, इतका साधा, सरळ त्यांचा विचार!

आबांचे जे काही महत्त्वाचे गौरव झाले त्यात,

* 'प्राक्तनाचे संदर्भ' ला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार

* ज्ञानपीठाने प्रकाशित केलेल्या भारतीय कविता मे १९८३ ग्रंथात जे पहिले ५ कवी होते, त्यात द.भा.धामणस्कर हे नाव.

* साहित्य अकादमीच्या साठोत्तरी मराठी कवितेत आबांच्या ५ कवितांचा समावेश.

* त्यांच्या कित्येक कवितांचे अनुवाद, हिंदी, कन्नड, बंगाली, गुजराथी आणि इंग्रजीमध्ये झाले आणि ही कविता फक्त महाराष्ट्राची न राहता दूरवर पोहोचली, आणि सर्वांत मोठा गौरव म्हणजे, कणकवली येथील 'आवान ओल' या संस्थेतर्फे एका कवीला दरवर्षी 'द.भा. धामणस्कर' हा मानाचा पुरस्कार देण्यात येतो.

इतरांपासून अलिप्त असणारे आबा, डोंबिवलीच्या काव्य रसिक मंडळाशी मात्र अगदी सुरुवातीपासून जोडले गेले आहेत ते आजतागायत! प्रसिद्धीपराङ्मुख असलेल्या आबांनी किती कवि संमेलनांना हजेरी लावली असेल देव जाणे!

२०१७ साली आबांना एक जीवघेणा अपघात झाला. ते फिरायला गेले असताना, एका मोटर सायकलवाल्याने त्यांना जोरदार धडक मारली. तिथल्या लोकांनीच त्यांना उचलून दवाखान्यात दाखल केले. खूप लागले होते; पण सुदैवाने ते त्यातून बचावले. बऱ्याच काळाने ते घरी आले आणि त्यांनी लगेच त्या मुलाबद्दल चौकशी केली, ज्याने अपघात केला होता. तो तुरुंगात आहे असे समजताक्षणी,

आबांनी सांगितले, ''त्याला सोडून द्या, तो खूप तरुण आहे, त्याला जग अजून पहायचे आहे.''

या विचारांना तुम्ही काय म्हणाल ?

गझलसम्राट सुरेश भट नेहमी म्हणायचे, 'चांगला कवी व्हायचे असेल तर आधी चांगला माणूस व्हा'.. खरंच, आबा आधी चांगले माणूस आहेत आणि म्हणूनच चांगले कवीही!

आबांच्या तीन कवितासंग्रहांपैकी पहिला आहे

**प्राक्तनाचे संदर्भ**

घडणारी प्रत्येक गोष्ट, मग ती माणसांच्या बाबतीत असो, की निसर्गाच्या बाबतीत असो, ही प्राक्तनात लिहिलेली असते म्हणूनच घडते, असं कवीला सुचवायचे आहे का ?

निसर्गात किंवा माणसात घडणाऱ्या अगदी बारीकसारीक गोष्टी, कवी इतक्या सहजतेने टिपतो, की नवल वाटल्याशिवाय राहत नाही. वडिलांना मदत व्हावी म्हणून मुलाने, गणपती विसर्जनाच्या वेळी त्यांच्या हातातील मूर्ती घ्यावी अन् वडिलांना आपल्या परंपरांचं ओझं, मुलाने स्वतःहून घेतलं म्हणून केवळ आनंद न होता, आता आपण, परंपरेचं ओझं, गेल्यामुळे पुन्हा तरुण झालोय असं वाटणं हे कशाचं द्योतक आहे?

अतिशय अल्पाक्षरी कवितेतून मोठा आशय सांगण्याच कवीचं कसब सुरेखच! कवीची कविता ही साध्या भाषेमुळे आत्म्याला भिडणारी आहे. आपल्या अनुभवसंपन्नतेवर भर देणारा हा कवी, फुलांच्या कविता

लिहिताना लिहितो....
वसंत येतो तेव्हा फुले येतात,
असे पुस्तकात वाचलेले;
फुले येतात तेव्हा वसंत असतो,
हे स्वतः पाहिलेले...

डोळसपणे आयुष्य जगल्यामुळे, हे अनुभव अगदी सहजतेने कवितेत उतरताना दिसतात.

याच संग्रहातील 'निष्पाप सूर्योदय' ही रचना खाटीक खान्यातील कत्तल होणाऱ्या बोकडांवर, तर 'दे हाता शरणागता' ही कविता अपंग माणसांवर केलेली आणि त्यांना न्याय देणारी आहे. झाडं, फुलं, पानं, ऊन, यांच्यावरच्या सर्वच कविता, निसर्गाची वेगवेगळी रूपे घेऊन आपल्याला भेटत राहतात. तीच गोष्ट वेगवेगळ्या माणसांबद्दलच्या, त्यांच्या अनुभवांच्या बाबतीत म्हणता येईल. हा कवी माणसांमधील 'हिरवेपण' आणि निसर्गातील 'माणूसपण' शोधण्यात नेहमीच गुंतलेला दिसतो. याच संग्रहातील 'हे ही आवश्यक असते' आणि 'नवीन व्हावे' याही कविता वेगळ्या आणि वेगळा विचार देणाऱ्या आहेत. पहिल्या कवितेत कवी पुन्हा आपल्या अनुभवावर विश्वास ठेवावा हे सांगताना, चैत्र कधी आहे हे पंचांगाला न विचारता, पोपटी पालवीला विचारावे, असं सांगताना, योग्य प्रश्न, योग्य त्यालाच विचारावेत असं सांगून जातो, तर ' नवीन व्हावे 'मध्ये कवी म्हणतो..

नवीन व्हावे, जशी झाडे नवीन होतात
अंगभर पाने, फुले लेऊन..
जुने शरीर जीर्ण वस्त्रासारखे
फेकून दिल्याशिवाय ...

शरीराचा त्याग न करता, माणसाला झाडासारखं, नवीन होता आलं पाहिजे. किती नवीन आणि अनोखी कल्पना ही! काही जुन्या कल्पनांना धक्का देणारी !

त्यांची 'फुले आणि ते' ही कविताही निसर्ग आणि माणूस यांचा परस्परविरोधी संबंध दाखवणारी आणि सर्जनशील माणसाचे डोळे उघडणारी. कवी म्हणतो,

१. एक रहस्य सांगावे म्हणून
फुले पाकळ्या उघडतात, तेव्हा
समस्त आस्तिक तिथेच पोहोचलेले असतात
फुलांच्या परड्या घेऊन.

२. त्यांना एक फूलही
निर्मिता यायचे नाही तुझ्यासारखे
म्हणून तर ते तत्परतेने
उमललेली फुलेच नाहीशी करतात.

३. फुलता येत नाही म्हणून
फुले तोडणारे लोकच
उडता येत नाही म्हणून
पाखरांना पिंजऱ्यात ठेवतात.

या तीनही चार/ चार ओळींच्या कवितेत जगण्याचे तत्त्वज्ञान दडलेलं आहे असं मला नक्की वाटते. जे मोठ–मोठ्या पोथ्यापुराणे वाचून समजेल, ते या ओळींनीही सहज समजेल.

वसंत गेल्यावरही असतात कुठे कुठे
वसंतात फुललेली फुले...

तू निघून गेल्यावर
शब्दांनी धारण केलेल्या अर्थासारखी.

अनेक शब्द खर्चूनदेखील हे दु:ख (?) नीट सांगता आले नसते, ते आबांनी एकच उदाहरण देऊन इतकं छान सांगितले आहे की कमाल वाटते. मानवी दु:खसुद्धा निसर्गाच्या द्वारे सांगण्याचे हे कसब खूपच छान आहे.

हा कवी निसर्गाच्या इतक्या जवळ आहे की, निसर्गातील अगदी बारीक बारीक गोष्टीसुद्धा त्याच्या नजरेला पडतात आणि मग साहजिकच त्याचा मानवाच्या वृत्तीशी आपोआप संबंध जुळून येतो. याच ओळी पाहाना,

भक्त-अभक्ताचा विचार न करता
झाड फुलत राहिले ;
भक्त-अभक्ताचा विचार नव्हता
म्हणूनच झाड फुलत राहिले...
पूर्ण फुलून देठाशी हलक्या झालेल्या
नि:संग फुलाला
वाऱ्याची झुळुकही
मृत्यूकडे कशी मिरवीत नेते !

मानवी आयुष्य यापेक्षा वेगळे असू शकते काय? आपण कितीही झिडकारले तरी जे घडणार आहे ते आपण नाकारू शकत नाही. प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी होणारच नाहीये; पण जे असेल ते आपल्याला स्वीकारावे लागणारच.

आबांच्या अगदी वेगळ्या अशा तरी या कवितेतल्या या चार ओळी पाहा,

दिवेलागणीस सगळेच दिवे
निमूट लागतील असे नाही,
थोडे काही लागले तरी
दिवेलागण झालीच असेल...

याच संग्रहातील त्यांच्या अजून कविता म्हणजेच 'पाय पसरण्यापुरत्या मातीत' आणि 'मोर.'

या कवितांमधून कवीला बहुधा असे सुचवायचे आहे, की आपल्या छोट्याशा आयुष्यात आपण जे काही कमावलेलं आहे, ते आपण जाण्यापूर्वीच वाटून टाकलेलं चांगलं ! झाड जसं फुलं येतायेत तोवरच आपला फुलांचा सारा बहर वाटून निरिच्छ होते. माणसाच्या साध्या साध्या इच्छाही पूर्ण होतील याची खात्री नाही कारण संसारात आधी आपल्यावर असणारी बायको-मुलांची जबाबदारी आपण पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो आणि त्यात सर्व बळ / पैसा संपून जातो आणि आपली इच्छा... म्हणूनच कवी म्हणतो,

आपल्या मोरांनाही फक्त स्वावलंबन शिकवावे
नाचायचा क्षण आला की त्यांनी, ढगांचीही वाट
पाहू नये...

झाडांवर, फुलांवर, पानांवर निरतिशय प्रेम करणाऱ्या कवीला, स्वार्थासाठी झाडे तोडणाऱ्या मानवाचा प्रचंड संताप आहे, हे त्याच्या 'झाडे सत्तेवर आली की' या कवितेवरून बघायला मिळते. कवी म्हणतो,

(कवितेच्या काही ओळी)

माणसे
निरपराध झाडांवर प्राणांतिक हल्ले करतात;
त्यांचे हातपाय तोडून त्यांना
बेमुर्वतखोरपणे
उघड्यावर रचून ठेवतात...
माणसांच्या राज्यात हे असेच चालायचे,
उद्या झाडे सत्तेवर आली की तीही
तोडलेल्या माणसांची हाडे
अशीच उघड्यावर रचून ठेवतील ;

एरवी शांत संयमी असणारा हा कवी, निसर्गावर होत असलेला हल्ला उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाही आणि त्याची कविता आपोआपच धारदार होते.

पण आकाश, उजेड, चांदणे, अंधारात प्रकाश देणारे छोटे दिवे यांचा विषय आला, की कवी पुन्हा आपल्या शांत स्वभावाकडेच वळतो आणि आपल्या 'दिवे' या कवितेत म्हणतो,

दिवे असावे जगनमित्रसे
कुणाशीच त्या वैर नसावे
तिमिराशीही जमेल तेव्हा
हितगुज त्यांनी रोज करावे ..

**'बरेच काही उगवून आलेले'** आबांचा हा दुसरा कविता संग्रह. हाही संग्रह पानं, फुलं, कळ्या, झाडं यांनी भरलेला आहेच; पण माणूस आणि निसर्ग यांचं नातं अजून घट्ट करणारा आहे.

आईबद्दल सांगताना ते लिहितात, आई गेल्याचे मला कधी कळलेच नाही, तिच्या सर्वच्या सर्व आठवणी या तिच्या येण्याच्याच आहेत. किती सकारात्मक विचार!

दु:खात तर ती साथ करतेच; पण बऱ्या दिवसांतही, चुकून एखादी चूक होऊ नये म्हणून, ती सतत जागरूक असते. अनेक आठवणी सांगत असताना, शेवटी कवी म्हणतो,

..अशा तिच्या आठवणी फक्त ती येण्याच्या.
ती कधी गेली हे, खरं म्हणजे, मला माहीतच नाही.

ही कविता वाचत असताना, सतत आत काहीतरी हलत असते, आणि कधी कधी ते डोळ्यावाटे बाहेरही पडते.

आईबद्दलची कणव आपण समजू शकतो; पण कवीला तशीच, किंबहुना थोडी जास्त कणव, आपुलकी, पैशासाठी काम करणाऱ्या, लहान लहान मुलां/मुलीं बद्दलही वाटते. 'कंदील विकणारी मुले' या कवितेत, कवीने अनेक बिकट प्रसंगामुळे मुलांना कराव्या लागणाऱ्या कामाबद्दल अतिशय पोटतिडकीने लिहिले आहे. श्रीमंतांना ते सांगतात, ही सारी अंधारात वावरणारी मुले, तुमच्या आयुष्यात मात्र केवळ 'प्रकाश' देण्यासाठीच आली आहेत. शेवटी कवी लिहितो,

रात्र असलेल्या प्रदेशातील ही, अभागी मुले..
त्यांना आहे एकदम मान्य तुमचा
सर्वाधिकार प्रकाशावरचा.म्हणून तर ती
तुमचाच प्रकाश अधिक वैभवशाली दिसावा
यासाठी.. काठ्यांना रंगीबेरंगी आकाशकंदील
अडकवून भर बाजारात..
तुमचीच वाट पाहत उभी आहेत...

या ओळी वाचताना सर्वसामान्य माणूस नि:शब्द झाल्याशिवाय राहत नाही.

प्रेम करणं ही मानवाची अगदी सहज क्रिया आहे आणि कवी तर त्यातून सुटूच शकत नाही. कवी कबूल करतो की, मी झाडांवर, आकाशावर, पक्ष्यांवर, उन्हावर, चांदण्यावर आणि माणसांवरदेखील मनस्वी प्रेम करतो. मी माझ्या सहज भावनांना नाकारत नाही आणि कोणाची प्रेम न करण्याची कारणेही ऐकण्यात कवीला काही स्वारस्य नाहीये. तो सरळ सांगतो,

मी सर्व चराचराशी निगडित : सूर्यास्त
पाहताना मीही होतो निस्तेज ; सांजवताना
काळाभोर हळूहळू .मी नष्ट होतो रात्रीच्या
अंधारात आणि उगवतो
नवा दिवस उजेडतांना
नवा जन्म झाल्यासारखा ..

निसर्गातील पक्षीसुद्धा माणसाला कितीतरी गोष्टी सहज शिकवून जातात; पण आपण आपल्यातच इतके मग्न असतो, मस्तीत असतो, की ना आपल्याला त्यांचा इशारा कळतो ना त्यांनी केलेली कृती! आपल्या एका छोट्या कवितेत, ते खूप छान सांगून जातात,

माझी चाहूल लागताच पक्षी
घाबरून आकाशात उडाला...मी
माझ्या सुभाषितांच्या वहीत एक
नवीन वाक्य लिहिले :
क्षुद्राकडून धोका संभवताच शहाणे
विराटाकडे धाव घेतात..

मानवी जीवनाशी निगडित अनेक सुंदर सुंदर कविता या संग्रहात आपल्याला आढळतात.

'दुराव्यानंतर' ही अशीच कविता. आपल्याच माणसाशी आपण प्रयत्न करूनही, आपल्याला सुसंवाद साधता येत नाही, जे प्रामुख्याने सांगायचे आहे, ते ही सांगता येत नाही आणि मग ते सारे बोलणे निरर्थक वाटायला लागते. मानवी स्वभावाचे अणू रेणू, इतक्या सुरेख रीतीने, खूपच कमी वेळा काव्यात टिपले गेले असतील.

'माझे मनगटी घड्याळ' ही अशीच एक सर्वांगसुंदर कविता, म्हटलं तर फक्त निर्जीव घड्याळाची, म्हटलं तर आपल्याबरोबर संपूर्ण आयुष्य घालवणाऱ्या अर्धांगिनीची! तरुण असल्यापासून अगदी वार्धक्यापर्यंत विनातक्रार साथ देणाऱ्या आपल्या प्रिय पत्नीची! कवितेचा शेवट, डोळ्यांच्या कडा नकळत ओलावतो,

आता एका विलक्षण योगायोगाने
मी व माझे मनगटी घड्याळ
एकदम बंद पडलो तर प्रश्नच नाही; पण
थोडे पुढे -मागे झाले तर
एक करार आम्ही आधीच करून ठेवलाय:
मागे राहील त्याने अखेरपर्यंत
एकटेच
विनातक्रार
टिकटिकत राहायचे...

आपल्या नुकत्याच झालेल्या नातवावरची कविता असो किंवा आजीची नातवाबद्दलची कविता असो, नातू एकच; पण आजी आजोबांच्या भावना किती वेगवेगळ्या आणि हृदयात सहज घर करणाऱ्या !

मानवी स्वभावाचे विविध पैलू अलगद टिपतानाच निसर्गातील अनेकविध गोष्टींचे यथार्थ वर्णन हा कवी अगदी बारकाईने करतो. केळीचे पान ते काय; पण त्याचे वर्णन वाचताना, आपण नेहमी पाहत आलेलो केळीचे पान आपल्याला आठवतच नाही आणि आपण कवितेतील पानाशी तद्रूप पावतो; पण शेवटी जेव्हा कवीला त्या पानाचा देखणेपणा चंचल वारा नाहीसा करील अशी भीती वाटते, तेव्हा आपल्याही अंगावर नकळत काटा येतो.

'पानगळ' ही रचनासुद्धा म्हटलं तर झाडाची म्हटलं तर माणसाच्या जीवनाशी निगडित. आपल्याकडे सत्ता, संपत्ती असताना, सगळे सगेसोयरे जवळ करतात; परंतु एकदा आपण कफल्लक झालो, की कोणीच विचारेनासं होतं.

निसर्गाचे, पक्ष्याचे एक अतिसूक्ष्म निरीक्षण कवी एका लहान कवितेत असं करता,

सूर्योदय होताच पक्ष्याने, झाड खाली करायचे;
सूर्यास्त होताच आकाश.
म्हणजे पूर्ण चोवीस तास
ना झाड आपलं असतं,
ना आकाश ..!

निसर्गाशी भावसंवाद साधणारा हा कवी, आपल्या 'बागकाम' या कवितेतून सांगतो,

तुम्ही बागेची नीट काळजी घेतलीत, झाडांना नीट पाणी घातलेत, तण वेळीच उपटून टाकलेत, तर बाग पूर्णपणे तरारून तर उठतेच आणि अद्भुत घडते :

आपण बागेत आलो की झाडे पिंजऱ्यातील
पाळीव पोपटासारखी प्रेमळ शीळ घालतात.
एखादा दिवस आपण दिसताच ती जागच्या
जागी, घरच्या पोपटासारखाच, आनंदाने
थयथयाटही करतील.. आपण
अगदी मनावरच घेतलं तर काय अशक्य आहे ?

वरील ओळी कवीचा निसर्गाविषयीचा, मानवा विषयीचा दुर्दम्य आशावाद दर्शवतात. आपण निसर्गावर निर्व्याज प्रेम केले, तर निसर्गदेखील तेवढंच किंवा काकणभर जास्तच प्रेम आपल्यावर करेल हा अद्भुत विचारच किती प्रेरणादायी आहे.

जीवापाड प्रेम करणाऱ्या मित्राचा जेव्हा अंत होतो, तेव्हाच्या पिळवटून टाकणाऱ्या भावना कवीने 'दिवंगत प्रिय मित्रासाठी' या कवितेत मांडल्या आहेत. तुला वरती कितीही त्रास झाला तरी ईश्वराकडे पुन्हा 'शरीर' मागू नकोस असं त्याला काकुळतीने सांगताना कवी म्हणतो,

शरीराबरोबर सगळीच लचांड मागं लागतात...
अन्न-वस्त्र-निवाऱ्यासारख्या स्थूलांपासून ते
आपल्याला हीन-दीन करणाऱ्या आपल्याच
सूक्ष्मातिसूक्ष्म इच्छापर्यंत.विसरलास काय?

अशी आगळीवेगळी प्रार्थना कोणी मित्र करू शकेल काय?

'निरोपसमारंभ' ही कविता उगाचच हळवं करून जाते. उगाचच यासाठी, की प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी हा क्षण येणारच असतो, मग तो खेळातून असो, नोकरीतून असो वा संसारातून असो! निरोप समारंभात माणूस हसतमुख दिसला तरी त्याचे ते हास्य तात्कालिक असते, म्हणून कवी म्हणतो,

यजमानांनी प्राण पूर्वीच काढून घेतलेले;
तरीही, मूर्तीची प्रभा अजूनही विलक्षण
झगझगीत वाटतेय यावर जाऊ नका.
थोड्याच वेळात, संधिप्रकाश संपून
अचानक काळोख पडावा तशी
सगळी हवा उदास होईल ....

आजोबांना बोट धरून नेत, त्याचंच जग
त्यांना दाखवतो तेव्हा,
मिटत चाललेले आजोबा म्हणतात :
बरं का उन्हा, आकाशा, झाडांनो, पक्ष्यांनो,
फुलांनो, उद्यापासून बहुदा बिट्टू एकटाच
तुमच्या चौकशीला येत जाईल;
बदल्यात, वारसाहक्कानेच जणू, त्याला
कुठेच, कधीच एकटं वाटणार नाही
एवढं मात्र बघा..

आबांच्या 'आजोबा' या अप्रतिम कवितेतील या ओळी! पूर्ण कविता वाचत असताना, सर्रकन डोळ्यात अश्रू कधी येतात हे समजतही नाही.

माझी ही सर्वांत आवडती कविता! आशयघन, प्रवाही, उत्कट, हुरहूर लावणारी आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आपल्या पुढील पिढीसाठी, वारसाहक्काने, काय मागे ठेवावे, हे नकळत पण ठामपणे सांगणारी! कितीदाही वाचा, तरीही परत परत वाचावीशी वाटणारी!

'गरिबाच्या बाळासाठी'ही कविता कवीचा

सामान्याविषयी असणारा जिव्हाळा दाखवणारी !

मूल गरिबाच्या घरचं असलं तरी, त्यालाही सारं मिळायला हवं कारण ईश्वरामुळेच ते या जगात आले आहे. आपण त्या बाबतीत काही करायला विवश आहोत, याचं जास्त दुःख कवीला होतंय, म्हणून कवी प्रार्थना करतो..

पण त्यापूर्वी बाळासाठी भगवंताला एक
साकडं घालीन :
तूच 'हो' म्हटल्यामुळे एक मूल इथं आलंय.
त्याला 'नाही' कधीच ऐकू येणार नाही एवढी
व्यवस्था तुला केलीच पाहिजे ..

ही कविता आणि तिचा शेवट वाचल्यावर आपण नि:शब्द होतो.

जे कवी टाळ्यांच्या गजरात हरवून जातात आणि रंगमंचीय कविता ऐकवून टाळ्या घेत राहतात, त्यांबद्दल आबा म्हणतात,

कविता वाचनाला
सतत दाद मिळत गेली याचा
खेद होतोय ;
बरं वाटतं म्हणून अविवेकानं
वेड्यासारखं पीत गेल्यासारखं वाटतंय

**'भरून आलेले आकाश'**

हाही संग्रह मानवाचे मानवाशी आणि मानवाचे निसर्गाशी असलेले तसेच निसर्गाचे निसर्गाशी आणि निसर्गाचे मानवाशी असलेल्या आदिम सत्याबद्दलच बोलतो पण अगदी वेगळ्या पद्धतीने, वेगळ्या प्रकारे!

'फुलांचं जिणं' या कवितेत माणूस, झाडावरची फुले जरी देवासाठी रोज तोडत असला तरी झाडाला रोज नवीन फुले देऊन निसर्ग माणसाला पुरून उरतो. आपली फुले ओरबाडताना, झाडाला यातना होतच असणार आणि वाईटही वाटत असणार पण युगांपूर्वीच देव झाडाला भेटलाय अन् म्हणालाय,

रडू नकोस, झाडा, परत रात्री येईन, नवी फुले
देऊन जाईन...
तेव्हापासून, देवाने रात्री फुले द्यायची, भक्ताने
सकाळी न्यायची, हेच फुलांचे जिणे झाले...
माणूस, देव आणि निसर्ग यांची एवढी चांगली आणि
समजूतदार गट्टी, कुठे पाहण्यास मिळेल?
जी गोष्ट फुलांची, तीच गोष्ट पाण्याची..
मला काय करायचंय इतकं पाणी ?
डोंगर म्हणाला आणि धुवाधार पावसाचा थेंब
नि थेंब त्याने फुलणाऱ्या, फळणाऱ्या
मातीकडे पोहोचवला.
निर्मोही मातीने, निरिच्छ आईसारखं आवश्यक
तेवढं ठेवलं आणि बाकीचं--
चराचराच्या नंतरच्या तहानेसाठी--
नद्यांना, विहिरींना पाठवलं.

पाणी या आबांच्या अजून एका सुरेख निसर्ग कवितेच्या या काही ओळी! निसर्गातील कोणीही आपल्याला आवश्यक जेवढं हवंय तेवढंच आपल्याकडे ठेवतो आणि बाकीचे पुढे पाठवतो. ही ऋतुचक्राची गती, मानवाबाबतही खरी ठरते तर हा संघर्षच ना होता !

'बागेतल्या मोरांची गाडी' ही कविता वाटते लहान मुलांसाठीची; पण मला वाटते त्यात एक गर्भित अर्थ दडलेला आहे.

बागेतील नकली मोरांची गाडी म्हणजे लहान लहान मुलांसाठी एक आकर्षण! त्यात बसून चक्कर मारणे हा मुलांचा आवडता छंद; पण पावसाळ्यात ही गाडी बंद! कवीने त्याबद्दल माळ्याला विचारले तर माळी म्हणाला,

चिंता करायची नाय दादा!
पाऊस संपला की सगळे मोर परत येतायेत
बागेत--
ल्हान्या लेकरांचा लला कुनाला सुटलाय?
शिवाय ( थोडं माज्या मनचं सांगतो )
शेरात गाडी वडून पैसे जमवल्याबगर
मोरांनाबी आपल्या ढगामागनं
जाता येत नाय बगा !

खेड्यातून नोकरीधंद्यासाठी शहरात आलेली माणसं, पैसा मिळवून, मगच आपल्या गावात जत्रेला, सणाला जातात अन् तिथे चार पैसे खर्च करू शकतात. त्याच्याशी ही कविता कदाचित मिळतीजुळती !

निसर्ग नेहमीच स्वतःची अशी काही तरतूद करतो, की ज्यामुळे तो फारसा कोणावर अवलंबून आहे असे वाटत नाही. आबांची अशीच एक सुंदर कविता म्हणजे ..

पानांना जन्म दिल्यानंतर अगदी थोड्या ओलाव्यावर, झाडं आपलं अस्तित्व टिकवून असतात, मग ते पानांना जन्म देतात आणि तीच पानं मग ओलावा राखण्यासाठी खालच्या

जमिनीवर सावली धरतात. पानगळीत पानं, आत्मदहन करून, तळाशी आपला देह पसरतात. कवी म्हणतो,

हे युगानुयुगे चालत आलेले.
पानगळ झाली की पाने
आपला देहच पसरतात खालच्या मातीवर
उन्हाला दूर ठेवण्यासाठी जरी सर्वच
नष्टही होतात नंतर कशी कशी
पण तेव्हाना नवीन पाने
आलेली असतात झाडातून :
झाडासाठीच !
ही एक शिकवण आहे जुन्या / नव्या पिढीसाठी !
संस्कारांना वाचविण्यासाठी!

**बागेतल्या कविता**

१. कौतुक झाडांचे करावे,
ती पाखरांसारखी नंतर उडून जात नाहीत:
तुमच्यासाठी फक्त एक
निरभ्र आकाश ठेवून !

२. पानांना झाड
अनावश्यक वाटू लागले, की त्यांना
पाचोळा व्हायचे वेध लागलेले असतात!

३. उजाडण्यापूर्वीच
या छोट्या बागेतील पिवळी पाने
मला झाडून टाकली पाहिजेत:
कालची शुष्क पाने पाहात झाडांनी
परत पाने गाळू नयेत म्हणून !

या तिन्ही कविता म्हटलं तर निसर्ग कविता आणि विचार केला तर मानवी आयुष्यात हरघडी घडणाऱ्या हकिकती, माणसाला खूप काही शिकवणाऱ्या, विचारप्रवृत्त करणाऱ्या!

संग्रहातल्या, 'रेश्मा' आणि 'घरकुल' या दोन कविता, मानवी स्वभावाशी, त्याच्या सुखदुःखाशी अगदी निगडित. 'रेश्मा' ही तर चित्रपटातील एक स्टंट गर्ल! तिचं अवघं आयुष्यच रोज पणाला लागलेलं. पडद्यावरील साहसी दृश्यात, जेव्हा प्रेक्षक, हिरॉइनसाठी टाळ्या वाजवत असतात, तेव्हा ते साहसी दृश्य खरोखरी साकारणारी रेश्मा मात्र आपल्या जखमांवर उपचार करत असते. शिवाय हिरॉईनच्या मानाने, तिला पैसेही खूप कमी! कवीचा जीव तीळतीळ तुटतो अन् कवी तिला विचारतो,

सुरक्षित बगिच्यातील 'प्यारभरी सांसे' मात्र खूप महत्त्वाची
अशा हिशेबाने ते तनख्याचे वाटप करतात, तेव्हा आपल्या
अनौरस जखमांना तू कोणते प्रश्न विचारतेस ?
चित्रपटसृष्टीतील एक दलित आहेस तू,
रेश्मा ! कसं कळत नाही तुला गरीब पोरी,
की काही रुपयांच्या मोबदल्यात ते तुझी
जान मागतायेत परत परत?

ही अशी साहसी दृश्य करणारे सारे कलाकार आणि त्यांच्याबद्दलची कणव या कवितेत प्रखरपणे दिसून येते. कवितेत अगदी कधीतरीच (?) हाताळलेला हा विषय, इथे कवीने अगदी थेट हृदयापर्यंत पोहोचवला आहे. कवीची त्यांच्याबद्दलची कणव आणि आंतरिक तळमळ हेच या कवितेचं मूळ आहे. कवितेची मांडणीही सुरेख असल्यामुळे ती वाचत असताना, आपणही त्यात नकळत गुंतत जातो.

'उदास घरकुलासाठी' ही कवितासुद्धा अंतरात खळबळ माजवणारी तरीही शेवटी सकारात्मकतेकडे वाटचाल करणारी! मुलं नसलेलं घर आणि त्यात कर्त्याची नोकरी गेलेली. सर्वत्र केवळ उदासी पसरलेली! दोघांनाही कशातच रस उरलेला नाही, घरात, अंतरात केवळ अंधार पसरलेला; पण जगायला तर हवंच आणि त्यासाठी ही उदासी, हा अंधार नाहीसा केलाच पाहिजे. कवी शेवटी म्हणतो,

ठेवून द्या खोलीच्या मध्यावर साध्या, रंगीबेरंगी
फुलांचा गुच्छ, जो या वातावरणावर
निराशानाशक फवारा मारील..
घरात मूल नाही म्हणून काय झाले?
ठेवा ना थोडे लाल जांभळे फुगे आणि
खेळणी घरात आणून.मुले येतीलच ;
न आली तरी घराला वाटेला,
खेळणी आहेत म्हणजे मुलेही आहेतच
आणि वातावरण
बघता बघता बदलून जाईल!

ही सकारात्मकता असा एखादा शुद्ध मनाचा, द्रष्टा कवीच जगाला देऊ शकतो, आणि आबा अगदी तसेच आहेत.

आपण घर घेतो तेव्हा हौसेने अनेक वस्तूही घेत असतो; पण नंतर नंतर त्यांची निगा राखली जात नाही, त्यांच्याकडे फारसं लक्षही दिलं जात नाही, साफही केलं जात नाही, केवळ त्या निर्जीव आहेत म्हणून! त्या

वस्तूंवरही सुंदर कविता होऊ शकते, हे आपल्याला या संग्रहातील 'वस्तू' ही कविता वाचल्यावर लक्षात येईल. निसर्ग, मानव यांच्या कविता वाचताना जेव्हा आपण मानवनिर्मित वस्तूवरची, हृदयाला स्पर्श करणारी कविता वाचतो तेव्हा अचंबित झाल्याखेरीज राहत नाही. कवी म्हणतो, आपल्या हातांना वस्तूंना स्वच्छ ठेवायला शिकवा आणि आपल्या जागेवरून त्यांना 'निष्कासित' करू नका. कवी म्हणतो,

आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या
हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा
कृतज्ञतापूर्ण निरोपाचा त्यांचा हक्क
शाबूत ठेवावा.

या ओळी आपल्याला विचार करायला प्रवृत्त करतात.

'समस्त भणगांना आवर्जून' आणि 'शहरातील भेटी' या कविता एकमेकांना पूरकही आहेत आणि विरोधीही. आपलं गाव सोडून साऱ्यांनीच शहराचे रस्ते धरलेले आणि आता त्या जुन्या रस्त्यांचे त्यांना विस्मरण झालेले! सारी सुखं हरवून बसलेत हे नवे शहरवासी!

शहरातील चालीरीती, रीतिरिवाजापासून ते अजूनही अनभिज्ञ! शहरातील माणसं, कामापुरते बोलणार, गरज असेल तर व्यवस्थित, गरज नसेल तर फार जुजबी! या सर्वांचे यथार्थ वर्णन वरील दोन्ही कवितेत.

'निष्पाप रोपटे' वरवर अगदी साधी वाटणारी कविता मला वाटते, गरीब आणि श्रीमंत हा भेद दाखवणारी असावी. कितीही माया लावली, प्रेम केलं तरी ही माया असणारी माणसं, गरिबांना कितपत संगत देतील सांगताच यायचं नाही. सुंदर कविता!

खूप वेळा आपल्याला जे नको असते तेही स्वीकारावे लागते आणि त्यामुळे कदाचित, आपल्यातही बदल होऊ शकतो; परंतु निर्मळ पाणी ज्याप्रमाणे सगळी घाण आपल्यात सामावून घेते, त्याप्रमाणे आपल्यालाही, पदरात पडलेली घाण पचवून स्वच्छ राहता आलं पाहिजे. आश्वासन, या कवितेत कवी शेवटी म्हणतो,

भेटणाऱ्या हरेक साधकाला सांगतो की
बाबा रे,
नको असलेलेही शांतपणे स्वीकारून
आपले डबके स्वच्छ ठेव....

हे मोठं तत्त्वज्ञान कवी किती सहज आणि सरळ शब्दांत सांगून जातो.

आताच्या काळाला अगदी योग्य कविता म्हणजे या संग्रहातील 'दु:स्वप्ने' ही कविता. सध्या जगभर जो मातम चाललाय तो केवळ आणि केवळ मानवाने निसर्गाची कोणतीही तमा न बाळगता, निसर्गाची हानी चालवली आहे ना, त्यामुळेच! कवी म्हणतो, कोणी गळणाऱ्या पानांनी गाडी घाण होते म्हणून झाडं तोडतात तर कोणी पावसात, वाऱ्याने झाड पडून आमच्या गाडीचे नुकसान होईल म्हणून झाडं तोडतायेत तर कोणी 'झाडांमुळे व्ह्यू ऑबस्ट्रक्ट होतो' म्हणून झाडं तोडायला निघालेले! कवीला हे सर्व अगदी लाजिरवाणे वाटतंय, म्हणून तो म्हणतो..

आमच्याच माणसांचे हे सर्व
दिवसभर आठवत राहते, मला
झाडासमोरून मान
वर करून जाणे अवघड जाते!

झाडांविषयीची, एकूणच निसर्गाविषयीची अपार माया कवीच्या मनात दाटलेली जाणवत राहते. 'शुभेच्छापत्रे' ही अशीच सुंदर आणि भावगर्भ कविता! माणसांविषयीची, विशेषतः गरीब माणसांविषयीची कणव, त्यांच्याबद्दल कवीच्या मनात असलेली आदरभावना यांना साद घालणारी कविता! नवीन वर्षा निमित्ताने कवीला दोन शुभेच्छापत्रे येतात. एक असते कृष्णाचे तर दुसरे त्याचा गरीब पण स्वाभिमानी मित्र, सुदाम्याचे! कृष्ण राजा असूनही, आपली आठवण ठेवतो म्हणून कवीला आनंद झाला आहेच ; पण गरीब असूनही, पैसे खर्च (दानत नसतानाही) करून, सुदाम्याने आपली आठवण ठेवली म्हणून कवीला परमानंद झालाय. त्यातून कवीची वृत्ती दिसून येते. चटका लावणारी कविता,

'आयुष्यात कुणापुढे हात पसरला नाही'
असे बोलायचे नाही; म्हणायचे
त्याने कृपाळूपणे मजवर तशी
वेळच येऊ दिली नाही!

ही चारच ओळींची, 'त्या'च्या संदर्भात असलेली कविता! एक अमर्याद तत्त्वज्ञान असलेली! कर्ता करविता तो आहे, आपण अज्ञानी असल्यामुळे, जे काही घडतं ते माझ्यामुळे असं समजून मोकळे होतो; पण खरंच तसं असतं का? वस्तुस्थिती अशी असते की, त्याच्याशिवाय झाडाचं पानही

हलत नाही तर इतर गोष्टी घडणं अशक्यच! पण आपला अहंकार, आपल्याला कधीच गप्प बसू देत नाही; परंतु ज्याने जे. कृष्णमूर्ती यांच्या विचारांची साधना केली आहे, त्या कवीला आपण कोण आहोत आणि आपला अधिकार काय? याची जाण नक्कीच असणार आणि म्हणूनच त्यांच्या हातून अशी अर्थपूर्ण कविता लिहून घेतली असणार.

देवावरील म्हणा किंवा आपल्या कर्मावर म्हणा दुर्दम्य विश्वास असल्यानेच कवीकडून 'रस्ता ओलांडताना' ही विश्वासपूर्ण कविता लिहिली गेली असेल. अंधाऱ्या रात्री, दोन्ही बाजूंनी वाहनांची प्रचंड जा ये चालू असताना, एक ट्रॅफिक पोलीस, दोन ज्येष्ठांना रस्ता ओलांडायला मदत करतो आणि नंतर गायब होतो तेव्हा कवी म्हणतो,

चांगलेच सोंगडे आहात,महाराज. पण मी
ओळखलं तुम्हाला! तुमचा वास्तविक संदेश
मला मिळालेला आहे :
'माझ्या मागनं या म्हणजे काही अवघड नाही.
पैलतीरी पोहोचवायची जबाबदारी माझी'
मी बरोबर आहे ना, महाराज

कवितेवर निर्व्याज प्रेम करणारा, कवितेलाच आपलं सर्वस्व मानणारा कवीच, कविता लिहायची म्हणजे काय ते सांगू शकतो. तो म्हणतो,

कविता लिहायची म्हणजे
भक्ताची लीनता घेऊन
सत्याच्या, म्हणजेच देवाच्या
अधिक जवळ जाण्याची
संधी स्वीकारायची;
सत्यातच वस्तीला असलेल्या
शिवाचा, सुंदराचा
साक्षात परिचय होण्यासाठी
प्राणच जणू पणाला लावायचे!

कवितेची यापेक्षा सुंदर व्याख्या असेल? किंवा असावी का? कोणताही कवी जेव्हा वरील विचार विचारात घेऊन कविता करेल तेव्हा प्रत्येक कवीची शिवाइतकीच सुंदर असेल.

'नवे ज्ञान' या कवितेतून एक वेगळाच अनुभव कवीला अनुभवायला मिळतो. स्वतःच्या मुलाला वडिलांना कधी स्कुटरवरून स्टेशनवर सोडायचे सुचत नाही; पण त्याचे शल्य तोवर बोचत नाही जोवर त्यांच्या मित्राचा मुलगा त्यांना स्वतःहून स्टेशनवर सोडत नाही. गोष्ट किती साधी, आपल्या आयुष्यात किंवा आजूबाजूला नेहमी घडणारी; परंतु कवी ती टिपतो आणि मग कशाला आपलं अन् कशाला परकं म्हणायचे तेच कळेनासे होते. आपल्यांबद्दलचे सारे तर्क गळून पडतात अन् कवी म्हणतो, एक नवे ज्ञान मिळाले आहे. दु:ख ही एक तर्कनिष्ठ गोष्ट असते, आणि निखळ आनंद हीच एकमेव तर्क नसलेली वास्तवता!

वार्धक्याकडे वाटचाल चालू असताना, अनेक विचार मनात येत असतात आणि कदाचित भयभीतही करत राहतात, आणि सर्वसामान्य माणसांच्या ते खूपच उशिरा लक्षात येते.

आपल्या 'सूर्यास्तानंतर' या कवितेत कवी म्हणतो,

सूर्यास्तानंतरचे आकाश आपले नाही हे
फारच उशिरा ध्यानी आलेल्या दिङ्मूढ
पक्ष्यासारखा मी.
डोईवर 'निघून जा, निघून जा' चा
तगादा लावणारे आकाश, आणि खाली
फांदीच्या टोकावरही विसावू देण्यास
मज्जाव करणारी झाडे...

ही कविता वाचल्यानंतर डोळे मिटून फक्त त्या नियंत्याचे स्मरण करण्यावाचून, दुसरे काही आपण करू शकू? आणि आबांची 'प्रार्थना' ही कविता मानवजातीच्या अखेरपर्यंत राहील अशीच आहे. आपल्या बोलण्यातून एखादाही उणा किंवा वावगा शब्द जाऊ नये अशी ते ईश्वराकडे करुणा भाकतात. ते म्हणतात,

माझे निर्हेतुक, आपुलकीचे शब्दही
तुम्हाला दुखावतील, तेव्हा माझ्या
दुर्भाग्याची परमावधी झालेली असेल.
मला काहीच बोलायचे नसेल तेव्हा ;
मी फक्त भगवंताची
परत परत करुणा भाकेन व म्हणेन :
'मला अधिक शहाणा कर.वेगळा,
दुष्ट अर्थ संभावणार नाहीत असे
करुणाघन शब्दच ओठावर येऊ देत !'

आपल्या आचरणामुळे नाहीच; पण बोलण्यामुळेही कोणी माणूस दुखावला जाऊ नये, अशी बुद्धी ठेवणारा हा कवीमाणूस.

या तीन संग्रहांतील अशा २५१ कविता! प्रत्येक कविता म्हणजे मनाच्या कप्प्यात जपून ठेवावा असा ठेवा! मला खूप आवडलेल्या, भावलेल्या

( तशी तर प्रत्येक कविताच एकेक मोती आहे )
कवितांचा, मला समजलेला अर्थ मी यातून मांडला आहे.

या कविता पुन्हा पुन्हा वाचताना, जाणवलेली अजून एक वेगळी गोष्ट म्हणजे आबांचा शब्दसंचय ! ग.दि. मांना आपण 'शब्दप्रभू' म्हणूनच ओळखतो. आबांच्या कविता वाचताना, ऐकताना असाच शब्द खजिना आपल्या समोर येतो आणि अगदी थक्क व्हायला होतं. ही शब्दकळा काहीतरी वेगळी आहे हे सतत जाणवत राहते. त्यांनी वापरलेले काही शब्दच पहाना..सुइराचं पान, अनाग्रही, मुखर आनंद, अरुवार, भयार्त आत्मे, निबद्ध, पानांतीक वेदना, अननभूत सोहळा, वितृष्ण, अंतरलीन, अकिंचन, वावदूक महामूर, जयिष्णु युद्ध, पर्युत्सुक इत्यादी अनेक. हे शब्द वाचताना, त्यांचा अर्थ आणि संदर्भ लक्षात येताच वाचणारा स्तिमित होतो.

१९४७ साली कविता लेखन सुरू केलेल्या आबांनी ऑक्टोबर २०१९ ला वयाची नव्वदी पूर्ण केली आहे. हा सगळा कवितेचा प्रवास एखाद्या शांत समंजस नदीसारखा होता. त्यांच्या निसर्ग कविता इतक्या विपुल प्रमाणात आणि इतक्या समृद्ध आहेत, की बालकवींनंतर इतकं प्रगल्भ लिहिणारा निसर्ग कवी म्हणून त्यांची नोंद व्हावी.

त्यांची प्रत्येक कविता मनाला भिडणारी, संवाद साधणारी आणि सर्वसामान्य माणसाला समजेल अशा भाषेत असते. ही कविता कुठेही आक्रस्ताळी होत नाही. ही कविता पंचमहाभूतांविषयी आहे, आत्मसंवाद साधणारी आणि एकंदरच चिंतनशील आहे. निसर्ग म्हणा किंवा माणूस म्हणा, सर्वांच्याच बाबतीत करुणेचा एक प्रांजळ उमाळा या प्रत्येक कवितेत दिसतो.

सुरुवातीला गोंदवलेकर महाराजांचा अनुग्रह नंतर ओशोंच्या वाणीने मंत्रमुग्ध झालेले आणि शेवटी जे. कृष्णमूर्तींच्या विचारांनी फुलून गेलेले आबा म्हणजे सगळ्यातून चांगलं घेणारे आणि आपल्या कवितांमधून जगाला देणारे एक अद्भुत रसायन आहे. तिसरा कवितासंग्रह आपल्या लाडक्या सुनेस अर्पण करताना ते लिहितात,

आई आणि मुलगी
यांच्या मायेचा
क्षणोक्षणी प्रत्यय देणारी
माझी स्नुषा – सौ. अनीहास
आशीर्वादपूर्वक...
... आबा

सुनेचे नावच 'अनीहा' म्हणजेच तृप्त किंवा निरिच्छ! आबांच्या सोबतीने ती अन् तिच्या सोबतीने आबा, तृप्त न झाले तरच नवल!

सून, पत्नी, नातू  अशा घरातील सर्वच सदस्यांवर मनापासून प्रेम करणारे आबा, म्हणूनच तर इतक्या विलक्षण पद्धतीने कविता लिहू शकले असतील? प्रत्येक कविता भावोत्कट आणि जीवनासंबंधी एक वेगळा विचार देणारी आहे आणि म्हणूनच वाचकाच्या अंतरंगात चिरकाल सुगंध पसरवणारी आहे असं मला प्रामाणिकपणे वाटते.

या लेखाचा शेवट त्यांच्याच एका कवितेने करणं जास्त सयुक्तिक होईल. ही कविता म्हणजे आबांच्या आयुष्याचे सारच म्हणता येईल, म्हणून त्यांचीच ही कविता...

मी
मी पृथ्वीचा ; पाण्याचा
चुकून शिडकावा झाला तरी
उमलून येणारा...
मी पाण्याचा ; पदरी पडेल
ते स्वीकारीत विनातक्रार
पुढे जाणारा ...
मी तेजाचा ; जिवंतपणाचा
हरेक उत्सवाचा
प्राण असलेला...
मी वाऱ्याचा ; ताजेपण
अखंडित राखण्यासाठी
सतत वाहणारा...
मी आकाशाचा ; भिंतींनी
घेरला जात असतानाही आपले
आकाश सांभाळणारा ...

**टीप :**
१. सरांच्या काही कवितांचा मला भावलेला अर्थ लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे. कवितांचे परीक्षण करण्याची माझी हिंमत नाही.
२. खालील लेखकांच्या लेखाचा, हे लिखाण करताना मला उपयोग झाला. मी त्यांचा ऋणी आहे.
मा. प्रदीप निफाडकर, मा. नारायण लाळे, मा. राजीव जोशी, मा . रामदास खरे

**धनंजय तडवळकर**
चलभाष : ७८४१९८५८४२

◆◆

१९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीमध्ये आलेल्या दुष्काळ चित्रणाचा आढावा घेणारा समीक्षालेख.

# १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील दुष्काळाचे चित्रण

प्रा. किसन माने

प्रस्तावना :-

ग्रामीण जीवनाचा कणा हा शेती आणि शेतकरी आहे. भारतीय जीवन शेतीवर अवलंबून असून शेतीचा मुख्य मूलाधार पाऊस आहे. भारतीय शेती हा पावसावर चाललेला जुगार आहे, हे देशातील व महाराष्ट्रातील अनेक दुष्काळांवरून स्पष्ट होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सार्वत्रिक निवडणुकांमुळे व शिक्षणामुळे ग्रामीण समाजाला आपल्या हक्कांची जाणीव झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकेंद्रीकरणामुळे ग्रामविकास योजना, पाणीपुरवठा योजना, सहकार, आणि शिक्षण यामुळे परंपरागत गाव आणि शेती यात बदल होऊ लागले. शाळा-महाविद्यालयांतून शेतकरी-कष्टकरी बहुजन समाजाची मुले शिक्षित झाली. उच्चशिक्षणामुळे आपल्या भोवतालच्या समाजजीवनाच्या व वास्तवाच्या जाणिवा झाल्या. खेड्यातील शेतकऱ्यांच्या पाणी, वीज व शेतमालाला हमीभाव या प्रश्नांनी कादंबरीकाराला स्वस्थ बसू दिले नाही. दुष्काळाने ग्रामीण शेतकरी उद्ध्वस्त होतो. गावगाडा कोलमडून पडत आहे. तसे पाहिले तर प्राचीन व मध्ययुगीन भारतातील दुष्काळांचे उल्लेख वेद, रामायण, चाणक्याचे अर्थशास्त्र, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास, संत कबीर इत्यादींच्या साहित्यात पाहावयास मिळतात. सन १३९६ ते १४०८ दुर्गादेवीच्या काळातील सतत बारा वर्षांचा दुष्काळ, सन १४६० दामाजीपंत, सन १६३० शिवजन्माच्या वेळचा, याशिवाय सन १७४७, १७८७ हे मराठवाड्यातील मोठे दुष्काळ, सन १७९० ते ९२ पुणे व नगर सन १८७६ व १८९६ या ब्रिटिशांच्या काळातील उल्लेख पाहता निसर्गावर अवलंबून असलेली महाराष्ट्रातील शेती आहे. सन १९७२ च्या दुष्काळाने जो धक्का दिला यातून ग्रामीण भागातील पाणी प्रश्नांची प्रखरता निर्माण झाली आणि त्यातून संवेदनशील लेखक सजग झाला, म्हणून १९८० नंतर दुष्काळाने निर्माण झालेला पाणीप्रश्न केंद्रस्थानी ठेवून कादंबरी लेखन करणारे अरुण साधू, रा. रं. बोराडे, भीमराव वाघचौरे, विश्वास पाटील, मोहन पाटील, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, सुरेखा शहा, रेखा बैजल, बाबुराव गुरव, नामदेव माळी या कादंबरीकारांनी दुष्काळ आणि पाण्याचे चित्रण करून ग्रामीण समाजातील प्रस्तुत विषयाला वाचा फोडली.

**दुष्काळी कादंबरी लेखनाच्या प्रेरणा :**

प्राचीन व मध्ययुगीन काळातील दुष्काळाचा विचार करता जगणे दुष्कर करून सोडणारा काळ म्हणजे दुष्काळ. पाणी या संज्ञेशी दुष्काळ जोडला गेला आहे. पाऊस कमी पडणं हे दुष्काळ पडण्याचे कारण तसे जंगलतोड, लोकसंख्या वाढ, अज्ञान आणि नियोजनाचा अभाव

हीसुद्धा दुष्काळ निर्माणाची कारणे आहेत. राजकीय धोरण, सामाजिक अकार्यक्षमता, चुकीच्या उपाययोजना हे प्रश्न दुष्काळ पडण्याची कारणे आहेत. दुष्काळावर कायमचे उत्तर शोधण्यासाठी आपण परिघावर फिरत आहोत, रिंगणात शिरत नाही. पर्जन्यमान कमी म्हणून दुष्काळ व पाण्याचा प्रश्न सुटणार नाही याविषयी दि. मा. मोरे म्हणतात, 'पावसाच्या लहरीपणावर नियंत्रण आणणे सध्या तरी मानवाच्या आवाक्याबाहेर आहे; पण पडलेला पाऊस अधाशाप्रमाणे जमिनीवर आणि जमिनीच्या खाली साठवून ठेवणे हे आपल्या हातात आहे, यात कसलीही कसर राहता कामा नये, यालाच आपण पाणी साठविण्याची जलसंस्कृती वा जलविवेक म्हणू.[१] पाणी हे निसर्गाने मानवाला दिलेले विनामूल्य वरदान आहे. या वरदानाचीसुद्धा अनमोल देणगी आहे म्हणून पाण्याचा नाश हेच दुष्काळाचे व पाणीटंचाईचे महत्त्वाचे कारण आहे.'

भारतात अनेक राजे, संत, समाजसुधारक राष्ट्रपुरुषांनी दुष्काळ निर्मूलनासाठी पाण्यासंबंधी समग्र विचार मांडला आहे. पाणी समस्या ही काही निसर्गानं निर्माण केली नाही म्हणून दुष्काळ हटवण्यासाठी पावसाचे पाणी धरून ठेवावे लागेल, हे सांगताना छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात, 'दुर्गावरील पाणी बहुत जतन करावे. दुर्गावरी आदी उदक पाहून दुर्ग बांधावा. पाणी नाही, उदक नाही ते स्थळी बांधणे आवश्यक झाले तरी आदी खडक फोडून तळी टाकी पर्जन्यकाळापर्यंत संपूर्ण दुर्गास पाणी पुरेल ऐसी मजबूत बांधावी.[२] ही त्यांची दूरदृष्टी म्हणजे पाणी व्यवस्थापनाचा उत्कृष्ट व अचूक नियोजनाचा भाग मानावा लागेल. पाणी ही मूल्यवान वस्तू काटकसरीने वापरणे ही शिवाजी महाराजांच्या काळातील संकल्पना अजूनही समाजात नीटपणे रुजली नाही, असे जाणवते. दुष्काळात पाण्याच्या योजनेकरिता अहिल्यादेवीने तलाव खोदले, विहिरी खणल्या, कुंडे तयार केली, नदीवर घाट, पाणपोई यांसारख्या पाणी योजना राबवून आदर्श निर्माण केला आहे. दुष्काळात व पाणीटंचाई काळात तलाव, धरणे बांधावीत तरच शेतकऱ्यांचा फायदा होईल हे महात्मा फुले यांनी ब्रिटिशांना ठणकावून सांगितले. राजर्षी शाहू महाराजांनी दुष्काळावर मात करण्यासाठी राधानगरीसारखे मोठे धरण बांधून कृतिपूर्ण विचार केला. एम. विश्वेश्वरैय्यांनी कावेरी नदीवर कृष्णसागर या प्रकल्पाची आखणी व उभारणी केली. स्वातंत्र्यपूर्व काळात दुष्काळ निर्मूलनासाठी वैचारिक लेखनाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाणी ही राष्ट्रीय संपत्ती मानून नदीजोड प्रकल्प राबवून वाया जाणारे पाणी दुष्काळी भागाला देण्याची अभिनव योजना मांडली. याविषयी कटक येथे १९४५ रोजी ते म्हणाले, ''पाणी ही राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे पुराच्या पाण्याविषयी तक्रार करण्यापेक्षा या पुराच्या पाण्याचा मानवाच्या विकासासाठी धरणे बांधून कसा उपयोग करता येईल हा दृष्टिकोन बाळगला पाहिजे.''[३] पाणी योजनांना आकार देणारा सजग दृष्टिकोन दुष्काळ निर्मूलनाच्या प्रबोधनाचा, प्रेरणेचा पाया मानावा लागेल. महाराष्ट्रात सर्वाधिक धरणे असूनही दुष्काळावर आपण अद्यापही मात करू शकलो नाही. केवळ नद्यांचे पाणी अडवून धरणे बांधून दुष्काळाचा प्रश्न सुटणार नाही तर भूजल स्रोत टिकवण्यासाठी पाणी पुनर्भरण, पाणी अडवा, पाणी जिरवा यांसारख्या योजना कराव्या लागतील.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५२ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. डॉ. ए. एन. खोसला यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय जलआयोग स्थापन केला. डॉ. के. एल. राव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध नद्यांतील पाण्याचा अभ्यास केला म्हणूनच कोयना, उजनी, जायकवाडी धरणे उभारली. याशिवाय जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळेंनी पाणी प्रकल्पासाठी कृतिपूर्ण योगदान दिले. बी. आर. देऊसकर यांनीही पाणीप्रश्नांवर अभ्यासपूर्वक काम केले. स्वातंत्र्यानंतर शिक्षण मिळाले आणि स्वजाणिवेतून दुष्काळाचे चटके सहन कराव्या लागलेल्या जनतेचे जीवन ऐकले, पाहिले आणि अनुभवले. यातूनच अनेक लेखकांना, कादंबरीकारांना दुष्काळी कादंबरी लेखनाच्या प्रेरणा मिळाल्या.

**प्रादेशिक कादंबरीतील दुष्काळ जाणिवांचे दर्शन :**

महाराष्ट्रात विविधता आहे म्हणून शेती, शिक्षण आरोग्य, पाणी या विभागांचा समसमान विकास होण्याच्या दृष्टीने कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर असे प्रशासकीय विभाग व घटक पाडले. महाराष्ट्रात प्राकृतिक (नैसर्गिक) प्रदेश रचनेच्या दृष्टीने पश्चिमेकडील कोकणपट्टी, सह्याद्री रांग,

पूर्वेकडील पठारी प्रदेश, उत्तरेकडील सातपुडा पर्वताच्या रांगा व लगतचा प्रदेश, उत्तर दक्षिण वैनगंगा खोरे त्यापासूनचे डोंगर आणि वनप्रदेश हे पाच विभाग आहेत. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र या नावांनी संबोधतो, हे प्रदेश भौगोलिकदृष्ट्या असमानतेचे असल्याने महाराष्ट्राचा आडवा पट्टा सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यापासून ते धुळे शिरपूरपर्यंत पर्जन्यछायेचे प्रदेश म्हणून दीडशे तालुके व पंधरा-सोळा जिल्हे दुष्काळात होरपळतात म्हणून परंपरेने दुष्काळी भागात पाण्याची टंचाई आजही जाणवते. दुर्मिळ संसाधन म्हणून पाण्याला जपावे लागेल. याविषयी माधवराव चितळे म्हणतात, ''पाणी हे दुर्मिळ नैसर्गिक संसाधन आहे व गरजेच्या मानाने भविष्यात अधिकच दुर्मिळ होत जाणार आहे. [४] असे पाणीबचतीला महत्त्व दिले, तरच दुष्काळावर मात करू शकतो.'' व्यंकटेश माडगुळकर, गो.नि.दांडेकर, रा.रं.बोराडे, अरुण साधू, भीमराव वाघचौरे, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, सुरेखा शहा, रेखा बैजल, मोहन पाटील व बाबुराव गुरव या लेखकांनी ग्रामीण जीवनाचा कणा असलेल्या कृषीला प्राधान्य देऊन त्या त्या प्रदेशातील हवामान, लोकजीवन, पाऊस-पाणी, तेथील पिके यातून वेगवेगळ्या प्रदेशातील दुष्काळांचे उठावदार पद्धतीने आपल्या कादंबऱ्यांत चित्रण केले आहे. दुष्काळामुळे मानवी जीवनातील उलथापालथ, लोकांचे स्थलांतर, भूकबळी, पशूंची दयनीय अवस्था यामुळे विस्कटलेली गावगाड्याची घडी या सर्वांचे परिणामकारक चित्रण 'बनगरवाडी' या प्रादेशिक कादंबरीमधून दिसून आले. 'दिवस कसे जातील' या कादंबरीत ना.वि.कुलकर्णी यांनी दुष्काळावर भाष्य करून दुष्काळामुळे लोकांना मुंबईला पोट भरण्यासाठी जावे लागते. खेडेगावातून स्थलांतरित होणाऱ्या दुष्काळग्रस्तांचे चित्रण स्वातंत्र्यपूर्व काळातील या कादंबरीतून केले आहे.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर शिकलेल्या पिढ्यांच्या जीवनावर दुष्काळी चित्रणांच्या कादंबऱ्यांचा प्रभाव पडला, त्यामुळे त्यांनी आपली प्रादेशिक अस्मिता लोकजीवन, जनावरे, प्राणी व पशू यांची तडफड दुष्काळामुळे कशी होते ह्या जाणिवा वास्तववादी दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला. त्यातून अस्सल कृषिकेंद्रित साहित्य निर्माण झाले. शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या दुष्काळाची दाहकता व त्याची कारणमीमांसा त्या त्या प्रदेशातील लोकजीवनावर झालेला दुष्काळाचा परिणाम १९८० नंतरच्या लेखकांनी अंतर्मुख होऊन कादंबरीच्या रूपाने मांडला; परंतु काही मोजक्याच कादंबऱ्यांतून दुष्काळाचे प्रभावी चित्रण येताना दिसते.

**१९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील दुष्काळ :**

अरुण साधू यांच्या 'शापित' या कादंबरीतील ज्ञानोबा आणि सोनबा दुष्काळामुळे कुटुंबासह गाव सोडून दुष्काळी कामाचा शोध घेण्यासाठी बाहेर पडतात. मराठवाडा परिसरात सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे त्यांना पोट भरण्यासाठी गावोगाव फिरावे लागते. त्याच पद्धतीने काम शोधत असतानाच कुटुंबाची ताटातूट होते. जगण्यासाठी बाहेर पडलेले वामन आणि रुक्मिणी मुंबईला जातात आणि तेथेही दुष्काळाचे जथ्थेच्या जथ्थे पाहायला मिळतात. दुष्काळग्रस्तांच्या व्यथा, वेदना मांडत सामाजिक शोकांतिकेचा धागा या कादंबरीत विणलेला दिसतो. दुष्काळग्रस्तांच्या कुटुंबांची कहाणीच या कादंबरीतून प्रत्ययास येते. स्वातंत्र्यानंतरही ग्रामीण समाजाच्या, शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नामुळे निर्माण होणाऱ्या दुष्काळासारख्या समस्यांचे निर्मूलन करता आलेले नाही. त्यामुळे या समस्येने ग्रामीण लोकांचा भ्रमनिरासच केला आहे. दुष्काळामुळे अनेकांना शिक्षण घेता आले नाही, तर काहींना अनेक भोग भोगून विविध कामे करत जीवन जगावे लागले. दुष्काळग्रस्तांच्या अस्थिर वाटचालीचे चित्रण 'मी' माध्यमातून भीमराव वाघचौरे यांनी 'रानखळगी' त स्वत:चा प्रवासच रेखांकित केला. दुष्काळ आणि दुष्काळग्रस्त हेच केंद्र या कादंबरीत ठेवून मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या दयनीय समकालीन वर्तमानावर भाष्य करणारी ही कादंबरी आहे.

अस्मानी आणि सुलतानी या दोन बाबी मराठवाड्यात हातात हात घालून वावरतात. एका बाजूने नैसर्गिक अवर्षण आणि दुसऱ्या बाजूने राजकीय कर्तृत्वाच्या इच्छाशक्तीचा अभाव यांमुळे मराठवाड्यात सिंचनाची स्थायी व्यवस्था नाही म्हणून आजही माणसे आणि जनावरे यांना दुष्काळाला सामोरे जावे लागते. रा.रं.बोराडे यांच्या 'चारापाणी' तील नायक सुखदेव उच्च

शिक्षण घेऊन गावी येतो, तेव्हा गावात पडलेल्या दुष्काळाने विषण्ण (दुःखी) होतो. कुटुंब, शेती आणि पशुधनाची होरपळ त्याच्या मनावर ठसते. याविषयी रा.रं.बोराडे लिहितात, 'आसी हाय बघ आमची पाण्याची हालत. आता हा टँकर उद्या ह्याच वेळात येणार, तोवर एवढ्याच पाण्यावर समद्यांना भागवावं लागल. प्यायलाबी ह्येच पाणी आन् सांडाय लवंडायलाबी हेच पाणी.'[५] असा दुष्काळामुळे पाणीटंचाईच्या स्थितीचा ग्रामीण जीवनावर मूलगामी परिणाम होता. चारापाणी नसल्याने जनावरे सोडून द्यावी लागतात. मग नायक चारापाण्याची सोय व्हावी म्हणून अधिकारी आणि पदाधिकारी यांना भेटतो, तरीही प्रश्न सुटत नाही. शेवटी आंदोलनाचे हत्यार उचलल्याशिवाय, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांना एकत्र घेऊन लढा दिल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही ही आपल्या हक्काची जाणीव झालेल्या दुष्काळग्रस्त ग्रामीण नायकाचे चित्र अधोरेखित करून आजही दुष्काळाची चित्तरकथा संपलेली नाही, हीच कादंबरीतली वास्तवता आजही पदोपदी प्रत्ययास येते. मराठवाड्यातील दुष्काळाने लोकजीवनावर झालेला परिणाम नायक सुखदेव नारायणराव, राहीबाई, मल्हारी, बाळबा, शेलार, दत्तू या पात्रांच्या बोलीभाषेतून कथानकाला भारदस्तपणा लेखकाने आणून दुष्काळाच्या तीव्रतेची वाचनीयता वाढविली आहे. मराठवाड्यातील उसना-पासना, किडूक-मिडूक, तडका-मडका यांसारखे बोली भाषेतील सारखे शब्द उत्कट प्रत्यय आणून देतात.

दुष्काळामुळे निर्माण झालेला पाणीप्रश्न सदानंद देशमुखांनी 'तहान' कादंबरीत केंद्रस्थानी ठेवला आहे. पर्यावरणाचा नाश आणि वारंवार पडलेला दुष्काळ यामुळे भेडसावणारी तीव्र पाणीटंचाई हा प्रश्न अजेंड्यावर घेऊन पोलीस, बँक, शाळामास्तर, दवाखाना व हॉटेल इत्यादींना पाणीपुरवठा करणारा बबन पैसे मिळविण्यासाठी बैलांचा उपयोग करतो. ग्रामीण समाजाच्या ठणकणाऱ्या पाणी या जखमेची वेदना ध्वनित करणारी आणि पाणीटंचाई ही आपल्याला संधी मानून पैसे कमवून सुखी जीवन जगणारा नायक 'तहान' कादंबरीत उभा करून वाचकांना वर्तमान वास्तवाचे भान आणून दिले आहे. मानवी जीवनाला व्यापून टाकणाऱ्या पाणीप्रश्नावर भाष्य करताना द. ता. भोसले म्हणतात, 'आपल्या प्रत्येक क्षणाला नि जीवनाच्या कणाकणाला नि संवर्धन, विकसनाला हे पाणी अत्यंत अनिवार्य गोष्ट आहे, हे सत्य 'तहान' कादंबरीच्या वाचनानंतर आपल्या मनावर खोलवर ठसत जाते.'[६] अशी सर्वांच्या जीवावर उठलेली पाणी टंचाई अस्वस्थ करून टाकते. हंडाभर पाण्यासाठी माणसांना दोन-दोन मैल उन्हात जाऊन दुष्काळी काळात पाणी आणावे लागते. बबन, राघोजी, रामकोर, वर्षा, देवराव, बापू, भगवान होगे, जगन तुपकर (ढाबावाला) प्रमोद नवले (वार्ताहर) लक्ष्मण होगे या पात्रचित्रणातून कादंबरीच्या आशयाला मूल्यात्मकता प्राप्त झाली आहे. आवश्यक तिथे म्हणी वापरल्याने कादंबरीची सौंदर्यात्मकता उठावदार झाली आहे. वैदर्भीय बोलीभाषेचा वापर हे 'तहान' या कादंबरीचे बलस्थान आहे. लेखक म्हणतात, 'काई खरं नाई सालं, पेलाभर पाण्याचा धर मनाई राह्यला.. पाण्यावाचून लोक तडफडून मरायला लागले.'[७] असे मानवी जीवनातील पाण्यामुळे निर्माण होणारी स्थिती आजही भविष्याचा विचार करायला लावणारी आहे, म्हणून दुष्काळाचे निर्मूलन करायचे असेल, तर पाण्याची मूलभूत समस्या शासन व समाजाने संघटित होऊनच सोडवावी लागेल.

अन्न, पाणी व निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा. त्या वेळेवर भागल्या नाहीत तर माणसे सैरभैर होतात. दुष्काळाने शापित झालेल्या पाण्यावाचून तडफडणाऱ्या राजस्थानसारख्या वाळवंटी दुष्काळी भागाचे परिवर्तन करण्यासाठी जल, जंगल, जमीन यांना पुनर्जीवित केले पाहिजे. हा ध्यास घेऊन जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह यांनी हजारो जोहड तलाव बांधून ग्रामीण जीवन उद्ध्वस्त होणाऱ्या समाजासमोर एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला. याचे चरित चित्रण 'जोहड' मध्ये सुरेखा शहा यांनी केले. हे ग्रामीण भागातील आशावाद निर्माण करणारे जीवनदर्शन उभे केले आहे.

दुष्काळ हटवायचा असेल, तर पाणीप्रश्न हा केवळ शासकीय चौकटीत बंदिस्त न ठेवता सामाजिक व्यासपीठावर आला पाहिजे. शेती व पिण्याच्या पाण्याविषयी रचनात्मक काम होण्यासाठी अधिकारी व पदाधिकारी यांच्याकडे तळमळ व संवेदनशीलता असली तरच दुष्काळावर आपण मात करू शकतो. अशा

दुष्काळी भागातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी कार्य करणाऱ्या समीर या नायकाचा जीवनविस्तार रेखा बैजलांनी 'जलपर्व' त मांडला आहे. खेडेगावात पाणीपुरवठ्याची नळयोजना आल्याने परंपरेने पखालीच्या साह्याने करणारा पाणीपुरवठ्याचा व्यवसाय बंद होणार म्हणून गावात नळयोजना येऊ नये, असे नायक पुंजाला वाटते. पारंपरिक चाललेला हा आपला बलुतेदारीचा व्यवसाय बंद झाला, तर उत्पन्नाचे साधन आपल्याजवळ राहणार नाही, यामुळे आपली ओढाताण होईल; परंतु नव्या विचारांचा बदल स्वीकारावा हे ग्रामीण जीवनानुभव वास्तवस्पर्शी बाबाराव मुसळेंनी 'पखाल' मध्ये मांडले. याशिवाय पाणी, सर्ज्या, छावणी या दुष्काळी स्थितीचे चित्रण करणाऱ्या वेगवेगळ्या प्रदेशांतील लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांत बोली भाषेतून साकारलेल्या कलाकृती वाचकाला अंतर्मुख करतात. दुष्काळाची दाहकता, प्रखरता निर्माण तर करतातच; परंतु कुटुंबाची, समाजाची होणारी वाताहत चटका लावून जाते हीच या कादंबऱ्यांची यशस्वीता मानावी लागेल.

**दुष्काळ चित्रणाच्या कादंबरीकारांच्या मर्यादा :**

१९८० नंतर उदयाला आलेल्या ग्रामीण कादंबरीकाराला १९७२ च्या दुष्काळाची पार्श्वभूमी लाभली आहे. दुष्काळात अन्नपाण्यावाचून स्थलांतरित होणारी माणसे, चारा-पाण्यावाचून तडफडून मरणारी जनावरे हे खेड्यातील वास्तवजीवन महाराष्ट्र निर्मितीनंतर जन्मलेल्या अनेक लेखकांनी पाहिले, अनुभवले आणि भोगलेसुद्धा. दुष्काळाने उद्ध्वस्त होणारा गाववाडा आपल्या कादंबरीचा विषय बनवून नैसर्गिक अवर्षणाबरोबर मानवी मनाच्या विविध पैलूंचे दर्शन व्यंकटेश माडगूळकर, रा. रं. बोराडे, अरुण साधू, भीमराव वाघचौरे, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, मोहन पाटील, विश्वास पाटील, रेखा बैजल, सुरेश शिंदे यांच्या कादंबऱ्यांतून घडते. हे कादंबरीकार विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या वेगवेगळ्या प्रदेशांतील असल्याने त्या प्रदेशातील भौगोलिक परिस्थितीची जाण आहे. त्या प्रदेशात धरणांची संख्या कमी असल्याने केवळ पावसावरच अवलंबून राहावे लागते. शिवाय एक हजार ते अकराशे फूट खोदाई करून पाणी उपसा करणे, हा जमिनीवरचा अत्याचारही दुष्काळाचे व पाणीटंचाईचे कारण आहे. पावसाचे पाणी अडविणे, जिरवणे याचे चित्रण मात्र फारसे येताना दिसत नाही. दुष्काळाने माणसांचे, जनावरांचे आणि पशू, पक्षी व प्राणी यांच्या तडफडीचे, हालअपेष्टा या जाणिवांचे वर्णनच करताना दिसतात. त्याच्या मुळाशी ते गेलेले नाहीत. ही त्यांच्या कादंबरी लेखनाची मर्यादाच अधोरेखित होते. दुष्काळी परिस्थितीवर, प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रयत्न सुरू आहेत; परंतु ग्रामीण साहित्यिक व कादंबरीकार शेतकऱ्यांना समजून घेण्यासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचले नाहीत. त्यामुळे पाणीप्रश्नांच्या संदर्भातील नव्या लेखकांच्या कादंबरी लेखनातून शेतकऱ्यांनी केलेल्या नव्या घडामोडींचे चित्रण आलेले दिसत नाही. ग्रामीण जीवनावर लेखन करणारे बहुतांशी साहित्यिक जन्माने जरी ग्रामीण असले तरी नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने निमनागर, नागर व महानगरीय भागात वास्तव्याला असल्याकारणाने शेतकऱ्यांच्या शेतातील जाणवणारे पीळ त्यांना तितक्या प्रमाणात जाणवतीलच असे नाही. अनुभूतीच्या लेखनापेक्षा सहानुभूतीवर आधारित कादंबरी लेखनाचे सूत्रच लेखकांनी स्वीकारल्याचे दिसते. कुटुंबातील व्यक्ती आई, वडील, भाऊ व नातेवाईक यांची दुष्काळामुळे व पाणीटंचाईमुळे झालेली दुर्दशा हे नोकरदार लेखकांच्या लेखनाचे विषय बनून कादंबरीत आलेले दिसून येतात.

दुष्काळाने उद्भवणारी चारापाण्याची समस्या हा विषय 'चारापाणी'त रा. रं. बोराडेंनी सकृतदर्शनी मांडला. पाऊस कमी झाल्याने दुष्काळ पडतो. ही दुष्काळ स्थितीची चौकट माणसांना आणि जनावरांना चारा पाण्याच्या प्रश्नाने सतावीत असते; परंतु प्रस्तुत कादंबरीत चाराच मध्यवर्ती विषय ठेवून पाणी प्रश्नाला बगल दिली आहे. ही कादंबरीला पडलेली मर्यादा आहे, तर सदानंद देशमुखांनी 'तहान' मध्ये पाणीटंचाईने खेड्यांचे जीवन कसे विस्कळीत होते, हे लेखनाचे प्रमुख सूत्र ठेवले. पाणीटंचाईच्या काळात बैलांचे हाल करून पाण्याचा पैसा करणे ह्या व्यापारी दृष्टिकोनाचा नायक दाखवून पाणीप्रश्न समजून घेऊन त्याची दाहकता मांडण्याचा प्रयत्न 'तहान' मधून केला आहे; परंतु पाण्यावाचून उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांचे चित्रण अभावानेच येते, ही कादंबरीची

मर्यादा सांगताना द. ता.भोसले म्हणतात, 'पाण्यावाचून सैरावैरा धावणारा गाव आपल्याला पुन्हा पुन्हा भेटतो; पण पाण्यावाचून उद्ध्वस्त झालेला आणि जगण्यासाठी आटापिटा करणारा अल्पभूधारक कोरडवाहू शेतकरी कमी प्रमाणात चित्रित झाला.' ८ असे जरी असले तरी चराचराला भाजून काढणारा दुष्काळ अन् त्यामुळे निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई हा विषय 'तहान' कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे; परंतु कौटुंबिक जीवनाचे चित्रण या कादंबरीत अधिक येते. 'शापित', 'पांगिरा', 'पखाल', 'जोहड', 'जलपर्व', 'सर्ज्या', 'पाणी' व 'छावणी' कादंबऱ्यांतून दुष्काळी चित्रणातून अजूनही ग्रामीण जीवनाशी निगडित असणारे उल्लेख करता आले असते; परंतु पर्यावरणाच्या नासाडीतून निर्माण होणाऱ्या दुष्काळ या दृष्टीने या दुष्काळाकडे बघितले असावे, असे दिसते.

### समारोप :

व्यक्ती आणि समष्टी या पातळीवर दलित साहित्यातील वेदना आणि विद्रोह अधिक वास्तवदर्शी दिसतो. ग्रामीण साहित्यातील दुष्काळाने येणाऱ्या दुःख जाणिवा, वेदना तितक्या प्रखरपणे आल्याचे दिसत नाही कारण दुष्काळाची अनुभूती घेणाऱ्या शेतकऱ्याकडे लेखनतंत्र अवगत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांनी केलेले अस्सल ग्रामीण लेखन कादंबरीमध्ये आलेले नाही. ग्रामीण जीवनाचा भाग असलेल्या; परंतु शहरात स्थायिक असलेल्या लेखकांनी सहानुभूतीपूर्ण लेखनतंत्राच्या सामर्थ्याने केलेले लेखन हेच ग्रामीण लेखन म्हणून स्वीकारल्याशिवाय आपल्या समोर आज तरी दुसरा पर्यायच दिसत नाही.

### निष्कर्ष :

१) मराठवाड्यात सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दुष्काळ; परंतु पाणी या विषयाला कादंबऱ्यांतून केंद्र बनविले नाही.

२) दुष्काळ आणि पाणीप्रश्नांमुळे ग्रामीण जीवनाचे संदर्भ बदलत आहेत, याची ग्रामीण कादंबरीकारांनी म्हणावी तितकी नोंद घेतलेली दिसत नाही.

३) निसर्गाचा लहरीपणा आणि मानवाची बेफिकिर वृत्ती यामुळे दुष्काळाला सामोरे जावे लागते हे पाणीप्रश्नाचे वस्तुनिष्ठ जीवनदर्शन समकालीन कादंबरीत घडून येताना दिसत नाही.

४) शेतकऱ्यांनी शेती हा व्यवसाय कंपनी म्हणून करायला हवा.

५) पाणीप्रश्न जेवढा महत्त्वाचा तेवढेच त्यावरील उपायही महत्त्वाचे.

६) ग्रामीण कादंबरीकार दुष्काळात पाणीप्रश्नाचे फक्त वर्णनच करतात, त्याच्या मुळाशी गेलेले दिसत नाहीत.

७) सभोवतालचे ग्रामीण वास्तव खूप झपाट्याने बदलत आहे. हे बदल समजून घेऊन ग्रामीण कादंबरी लेखन व्हावे.

८) प्राणिमात्रांच्या जिव्हाळ्याच्या पाणीप्रश्नाला केंद्रित ठेवून उंची वाढविणारी कादंबरी आजच्या वर्तमानात लिहिली जावी.

९) अस्मानी आणि सुलतानी दुष्टचक्रात अडकलेला शेतकरी 'चारापाणी'त प्रभावीपणे चित्रित झाला नाही.

१०) ग्रामीण कादंबरीतील पाणीप्रश्नाची पार्श्वभूमी लाभलेल्या 'तहान'ने वाचकाची अभिरुची वाढविली आहे.

### संदर्भ :


१) मोरे. दि. मा. 'दुष्काळाची दाहकता सुसह्य करण्यासाठी' लेख- 'पाणी उद्याची दिशा' संपा. धाराशिवकर मुकुंद, मनोविकास प्रकाशन, पुणे. प्र. आ. २०१३. पृ. ७१.

२) रामचंद्रपंत अमात्य- 'आज्ञापत्रे आणि राजनीती' संपा.जोशी.शं.ना., भिंगारे ल.म, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. १९६०. पुनर्मुद्रण १९८८. पृ.४७

३) धाराशिवकर मुकुंद, संपा. 'पाणी उद्याची दिशा', मनोविकास प्रकाशन, पुणे प्र.आ.२०१३. पृ.२१५.

४) चितळे माधवराव, 'महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल खंड १', प्र.आ.१९९९. पृ.७४८

५) रा.रं.बोराडे, 'चारापाणी', साकेत प्रकाशन, औरंगाबाद. प्र.आ.१९९०. पृ.१३.

६) भोसले.द.ता., 'साहित्य आस्वाद आणि अनुभव', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई प्र.आ.२०१२. पृ.१७०

७) देशमुख सदानंद, 'तहान' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र.आ.१९९८. पृ.१६७.

८) भोसले.द.ता., 'साहित्य आस्वाद आणि अनुभव', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. प्र.आ. २०१२. पृ १७४-७५.



**प्रा. किसन माने**

चलभाष : ९४२३३२७४१


◆◆

महाराष्ट्र साहित्य पत्रिका । महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जनस्थान पुरस्काराने सन्मानित माजी संमेलनाध्यक्ष मा. मधु मंगेश कर्णिक यांच्या कादंबरी लेखनावरील समीक्षालेख.

# मधु मंगेश कर्णिकांच्या कादंबऱ्यांमधील विविध जीवन-जाणिवा

प्रा. डॉ. बाळासाहेब अनुसे

प्रास्ताविक –

१९६० नंतरच्या कालखंडातील एक महत्त्वाचे प्रतिभाशाली साहित्यिक म्हणून मधु मंगेश कर्णिक यांचा गौरवास्पद उल्लेख होतो. प्रस्तुत कालखंडात त्यांनी साहित्य लेखनात आपला ठसा उमटविलेला आहे. कोणताही साहित्यप्रकार असो त्यांची लेखणी वेगवेगळे रूप धारण करते. त्यांनी एकूण दहा कादंबऱ्या लिहिल्या. प्रत्येक कादंबरीतून वेगवेगळ्या जाणिवा त्यांनी रेखाटल्या आहेत. कोकणच्या ग्रामीण पार्श्वभूमीचे चित्रण काही कादंबऱ्यांतून आले आहे. तसेच मुंबई महानगरीतील झोपडपट्टीपासून उच्चभ्रूंच्या जीवनापर्यंत त्यांनी वस्तुनिष्ठ चित्रण केले आहे. लेखन करत असताना त्यांनी नेहमीच सामाजिक दृष्टिकोन बाळगला. त्याचप्रमाणे स्त्री-पुरुष संबंधातील गहनगूढता, कार्पोरेट संस्थातील गुंतागुंत, राजकारण, दलितांचे प्रश्न, विविध क्षेत्रांतील स्त्रिया, वृद्ध, बालके यांसारख्या विविध विषयांवर लिहीत असताना त्यांनी माणूस आणि त्यांचे जगणे याकडे जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. त्यामुळे त्यांचे साहित्य वास्तववादी झाले असून, त्यात जिवंतपणा असल्याचे जाणवते. या सर्व गोष्टींचा विचार करता त्यांच्या जीवन जाणिवा विविध टप्प्यावर बदलताना दिसतात. प्रस्तुत लेखात याच अनुषंगाने विचार केलेला आहे.

मधु मंगेश कर्णिकांची 'देवकी' ही कादंबरी १९६२ साली प्रकाशित झाली. तिला मॅजेस्टिक पुरस्कार प्राप्त झाला आहे. या कादंबरीतील देवकी या सुंदर, उत्कट, प्रीतीभावना हृदयात जागवणाऱ्या मुग्ध वृत्तीच्या भाविणीला विनाशाच्या काठावर असताना बाबीकाका नावाचा बालमित्र पुन्हा भेटतो. प्रवाहाच्याविरुद्ध पोहताना या अव्यक्त प्रीतीच्या धाग्यात सूक्ष्मपणे गुरफटलेल्या दोन जीवांची व्याकूळ कहाणी कर्णिकांनी येथे रेखाटली आहे. ही कादंबरी वाचकाला हुरहूर लावते. मनाला चटका लावून जाते. देवालयांच्या आश्रयाने जगणाऱ्या भाविणींचे करुण जीवन हा विषय अनेक लेखकांना जिव्हाळ्याचा वाटला आहे. मराठी साहित्यात बा.भ.बोरकर यांची 'भावीण', जयवंत दळवी यांची 'महानंदा', सुभाष भेंडे यांची 'जोगीण' या कादंबऱ्यांतून भाविणींचे जीवन चित्रण आले आहे. कर्णिकांच्या 'देवकी' या कादंबरीत 'देवकी' भाविणीच्या त्यागाची कहाणी आली आहे. बाबीकाका खोत आणि देवकी यांची आदर्श प्रेमकथा आहे. प्रेमासाठी गावाशी वैर पत्करणारे बाबीकाका देवकीशी विवाह करत नाहीत. तेव्हा शेवटी भाविणीचे जीवन म्हणजे देवाच्या पायावर वाहिलेले फळ, या मानसिक परंपरेत वाढलेली देवकी आपल्यामुळे बाबीकाकांचा संसार उद्ध्वस्त होऊ नये म्हणून गाव सोडून निघून जाते. तत्कालीन समाज जीवनात असणाऱ्या रूढी-परंपरांचा मानवी जीवनावर

किती खोलवर परिणाम झाला आहे याचे वास्तव चित्रण कर्णिक करतात. बाबीकाका देवकीवर प्रेम करतो; पण शेवटपर्यंत तिच्याशी लग्न करत नाही. हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. या संदर्भात मधु मंगेश कर्णिक म्हणतात, पंचवीस वर्षांपूर्वीचा मी नवोदित लेखक कादंबरीच्या माध्यमाला नव्यानेच हात घालीत होतो. मनावर काही आदर्शवादाची पुटे होती. नायकाने धीरोदात्तपणे, त्यागशील वृत्तीने वागायचे असते असेच तेव्हा वाटायचे आणि प्रेमामध्ये त्यागभावना आली म्हणजे सगळे कथानकच आदर्श बनून जाते. देवकी आणि बाबीकाका यांची प्रीतीभावना मी अगदी हळुवारपणे, संयमाने रेखाटली आहे. इतकी की शेवटी ते दोघेही एका शय्येवर झोपतात; पण तरीही देवकी आणि बाबीकाका एकमेकांपासून दूर राहतात! शरीर मिलनाचा मोह दोघेही टाळतात. १.कर्णिकांच्या आदर्शवादी भूमिकेमुळे प्रश्न अनुत्तरीत राहून कादंबरीचा धागा तुटताना दिसतो. या कादंबरीतून कर्णिकांनी भाविणीच्या जीवन–जाणिवा रेखाटल्या आहेत.

'माहीमची खाडी' ही कर्णिकांची कादंबरी १९६९ साली प्रकाशित झाली. या कादंबरीला महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला आहे. या काळात मर्ढेकरांपासून सुरू झालेला नवसाहित्याचा प्रवाह रुजला होता. कवितेबरोबरच कादंबरीही नव्या वाटा शोधताना दिसते. फडके, खांडेकर, माडखोलकरप्रणीत मध्यमवर्गीय अभिरुची मागे पडली होती. स्वप्नरंजनात्मक चित्रणाहून वास्तव चित्रणाकडे लेखकांचा कल वाढला होता. ग्रामीण वाङ्मय आणि दलित वाङ्मयाने अलक्षित जीवनानुभवाची क्षेत्रे धुंडाळली होती. त्याचवेळी शहरी बकालवस्ती म्हणून ओळखली जाणाऱ्या झोपडपट्टीचे चित्रण वास्तवपणे होऊ लागले. जयवंत दळवींची 'चक्र', मधु मंगेश कर्णिकांची 'माहीमची खाडी' या कादंबऱ्या पहिल्या परंपरेतील आहेत. नंतर भाऊ पाध्ये यांच्या 'वासुनाका' या कादंबरीने खळबळ उडविली. भा.ल.पाटलांच्या 'वस्ती वाढते आहे' या लेखनाने वास्तव जीवनदर्शनाचा विस्तार केला. त्याप्रमाणे कर्णिकांनी समाज वास्तवाचा धागा पकडला. 'माहीमच्या खाडी'तून कर्णिक झोपडपट्टीतील मानवी जीवनाचे वास्तव चित्रण करतात. कादंबरीतील काही व्यक्तिरेखा वगळता सर्व माणसे पोटार्थी आहेत. तसेच वासनेच्या आहारी गेलेली आहेत. त्यांच्या नीतिमूल्यांचा ऱ्हास झालेला दिसतो. आहार, निद्रा, भय, मैथुन या गरजांसाठी जगणारी माणसेही येथे आहेत. वेगवेगळ्या मार्गाने पैसा कमविणे, हवा तसा खर्च करणे ही येथील माणसांची जीवनशैली आहे. वासना, लाचारी, लबाडी हा त्यांचा जीवनधर्म होऊन बसला आहे. अज्ञान, दारिद्र्य, बेरोजगारी ही त्यामागील कारणे असली तरी तेथील माणसांच्या जगण्याचे वेगळेपण कर्णिक कादंबरीत यथार्थपणे चित्रित करतात. म्हणूनच 'देवकी' पेक्षा 'माहीमची खाडी' मधील जाणिवा वेगळ्या आहेत. कर्णिकांचे अनुभवविश्व विस्तारत गेल्याचीच ही साक्ष आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये .

माहीमची खाडी अस्थिर आणि कुबट जीवनाचे प्रतीक बनते. मशिदी आणि कत्तलखाना एकाच भागात असावे हे जीवन जगणाऱ्या माणसांकडे सर्वच स्तरांतील लोकांचे दुर्लक्ष झाल्याचे लेखकाने निदर्शनास आणले आहे. एकूण 'माहीमच्या खाडी'तील मानवी जीवनाचे चित्रण कर्णिकांनी सूक्ष्मतेने केले आहे. तेथील रूढी, परंपरा, दुःख, दैन्य, दारिद्र्य, उपासमार, व्यसनाधीनता, अस्वच्छता, बकालपणा इत्यादींचा वेध कर्णिकांनी घेतला आहे. कर्णिकांच्या माहीमची खाडीतील वास्तव चित्रणाबाबत प्रा. व.दि.कुलकर्णी म्हणतात, 'माहीमची खाडीमध्ये या जीवनाचे आणि त्यातील समस्यांचे अत्यंत वास्तववादी चित्रण श्री. मधु मंगेश कर्णिक यांनी केले आहे.' २. कादंबरीतून उपेक्षितांचे वास्तव चित्रण आले असल्याने व.दि.कुलकर्णी यांचे विचार पटण्यासारखे आहेत. मधु मंगेश कर्णिक हे स्वत: काही काळ झोपडपट्टीत वास्तव्यास असल्याने त्यांनी हे जीवन जवळून पाहिले आहे, अनुभवले आहे. त्यामुळे त्यांच्या चित्रणात अधिक जिवंतपणा आला आहे.

मधु मंगेश कर्णिक यांची 'सूर्यफूल' ही कादंबरी १९६६ साली मॅजेस्टिक प्रकाशनाने प्रकाशित केली. ही कादंबरी म्हणजे माणसाच्या मनातील सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तीचे चित्रण करणारी आहे. १९६३ साली कर्णिक हाजीअलीच्या नाक्यापर्यंत फिरायला आले असता, त्यांना पावसाने जसे थांबवले तसेच एका पांगळ्या मुलाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. छत्री कोणाकडेच नव्हती. कर्णिक झटकन एका बाजूला उभे राहिले. पावसापासून त्यांनी आपला बचाव केला; परंतु अपंग मुलगा हळूहळू खुरडत

येतो तेव्हा लेखक त्याला आधार देतात. तेव्हापासून त्याचा परिचय झाला. तो मुलगा अनेकदा लेखकाला भेटला. अशा एका अनामिक मुलाची कहाणी 'विशू' या व्यक्तिरेखेच्या आधारे लिहिली आहे. विशू या एका तरल कल्पनाशक्ती आणि कलावंताचे संवेदनक्षम मन घेऊन जन्मलेल्या दुर्दैवी मुलाची हकिकत आहे. मध्यमवर्गीय व्यवस्थेमध्ये पिचलेल्या कुटुंबातील ताण-तणाव, आईचे वत्सल पुत्र प्रेम आणि शारीर पातळीवरील त्याच्या तरल मनाची अगतिक तगमग चित्रित केली आहे. तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना विशू आणि त्याची बालमैत्रीण यांच्यातील सूक्ष्म, नाजूक भावबंध आणि त्यांची पूर्ती अपूर्तीच्या सीमारेषेवरील अस्वस्थ तगमग हे सारे कर्णिकांनी आस्थेने चित्रित केले आहे. एकूणच माणसाला जीवन जगत असताना धडधाकट शरीर नसेल, तर किती अडचणी निर्माण होऊ शकतात याचा वेध कर्णिकांनी घेतला आहे. कादंबरीतील विषयाचे वेगळेपण तसेच जीवन जाणिवेतील पृथगात्मता प्रकर्षाने जाणवल्याशिवाय राहत नाही. याशिवाय लेखकाच्या बदलत्या वैविध्यपूर्ण जाणिवांचा येथे प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.

'निरभ्र' ही मधु मंगेश कर्णिकांची कादंबरी १९७३ला प्रकाशित झाली. या कादंबरीतून कर्णिकांनी विषयाचे नावीन्य शब्दबद्ध करताना दक्षिण रत्नागिरीतील एका तालुक्यात प्रत्यक्ष घडलेली कहाणी सांगितली आहे. या कादंबरीतील दिनकर आणि रतन यांच्या प्रेमाची वर्णने अवास्तव वाटतात, कादंबरीत भडकपणा आणि अतिरंजितपणा आला आहे. वास्तवापासून ती दूर जाते. परिणामी दिनकरची ती भोगकथा आहे असे वाचकाला वाटू लागते. दिनकर यांचे प्रेमसंबंध, मामा-मामी यांच्यातील वैचारिकता रेखाटण्यात लेखक अयशस्वी झाले आहेत. अंजनीचे दिनकरच्या आयुष्यात येणे आणि लगेच निघून जाणे हे सर्व कृत्रिम असल्याचे वाचकाला सतत जाणवत रहाते. एकूणच दिनकर हा वैचारिक, नैतिक, कर्तृत्वाची पातळी नसलेला आहे, त्यामुळे कादंबरी वाचकाच्या मनाची पकड घेत नाही.

मधु मंगेश कर्णिक यांची 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी १९८२ ला प्रकाशित झाली. या कादंबरीतून त्यांनी करुळ-कणकवली-सिंधुदुर्ग प्रदेश जिवंत केला आहे. १९७२ साली स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव मोठ्या थाटात साजरा झाला. दलित वर्ग मात्र आहे तिथेच राहिला. त्याचे दारिद्र्य नष्ट झाले नाही. उपेक्षा थांबली नाही. स्वातंत्र्याची सनद प्राप्त होऊनही उपेक्षितांना सुख मिळाले नाही. या सामाजिक घटनांच्या पार्श्वभूमीवर एका दलित कुटुंबाचा जीवनपट कर्णिक उभा करतात. शिवनाक, धुरपदा, गोपाळ, नलिनी, पांडुरंग, मालती, वेणू, भादूर, विठोबा चौकेकर, आनंद, केशव गावदेकर, प्रा.सहदेव व अन्य व्यक्तिरेखांच्या आधारे या कादंबरीतील जीवनपट शब्दबद्ध केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही दलितांच्या आर्थिक परिस्थितीत परिवर्तन झाले नाही. बौद्ध धर्मांतराचाही उपयोग झाला नाही. दलित कार्यकर्त्यांनी आंबेडकरांच्या मृत्यूनंतर समाज विकासाऐवजी शे.का.प.चे विभाजन करून स्वार्थाकडे लक्ष दिले. दलितांना काहीच लाभ झाला नाही. राखीव जागांचा फायदाही मिळाला नाही. दलित सर्वार्थाने वंचित राहिले. हा या कादंबरीचा विषय आहे. रक्ताचा संकर, आंतरजातीय विवाह आणि शिक्षणाशिवाय दलितोद्धार नाही हे सांगण्याच्या उद्देशाने लेखन झाले आहे. स्वातंत्र्यानंतरचा जातिभेद, अस्पृश्यता, धनिकांची अरेरावी, दलित कार्यकर्त्यांची स्वार्थी वृत्ती, जागृती, धर्मांतर इत्यादी गोष्टींवर लेखकाने शिवनाक कदमाच्या कुटुंबाच्या पंचवीस वर्षांतील स्थित्यंतराचा आलेख मांडून प्रकाश टाकला आहे. कादंबरीतील सर्व लेखन सामाजिक अंगाने झाले आहे. आजही दलितांच्या परिस्थितीत काही फरक पडला आहे असे वाटत नाही. दलितांच्या कित्येक पिढ्या रूढीग्रस्ततेमुळे, सामाजिक अन्यायामुळे आणि विषमतेमुळे स्वातंत्र्यपूर्व काळात नष्ट झाल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात सुधारणा आल्या; पण त्या कागदोपत्रीच राहिल्या. सामाजिक वास्तव मात्र भयावह आहे. या विसंगतीचे आणि दलितांच्या अंतरंगाचे चित्रण कर्णिकांनी केले आहे. कर्णिक यांची 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी सामाजिक आशय प्रगट करणारी आहे. अस्पृश्यांविषयीचा आदर व्यक्त करणारी आहे. अस्पृश्यांच्या तीन पिढ्यांची हकिकत सांगता- सांगता सामाजिक वास्तवालाच ते स्पर्श करतात.

'जुईली' ही कर्णिकांची कादंबरी १९८५ साली प्रकाशित झाली. या कादंबरीत लेखकाने कोकणात जन्म घेतलेल्या एका मनस्वी स्वभावाच्या सुंदर मुलीची

हृदयाला भिडणारी कहाणी चित्रित केली आहे. जुईली ही बालपणी कवितेत रमणारी, मोठेपणी नाटकातील रंगीबेरंगी जगावर भाळणारी, एका विलक्षण आवेगाने दशावतारी नाटकातील भालच्या प्रेमात गुरफटणारी आहे. आपल्या 'पॅशनेट' स्वभावाचा बळी ठरणाऱ्या जुईलीची व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटली आहे. 'जुईली' म्हणजे कर्णिकांच्या 'देवकी' या नायिकेनंतर पुन्हा एकदा त्यांच्या लेखणीतून साकार झालेली अविस्मरणीय नायिका आहे. तसे पाहता ही कहाणी जुईलीची असली तरी कोणत्याही मनस्वी आणि कलासक्त माणसाची ती शोकांतिका आहे. जे जे सुंदर वाटेल त्यावर भाळून आवेगाने तेथे सर्वस्व वाहणाऱ्या उत्कट आणि स्वैर स्वभावातच त्या दुःखाची बीजे असतात. जुईलीच्या आयुष्यात ती बीजे फार लहानपणापासून रुजत होती. लेखकाने जुईलीच्या स्वभावातील विविध पैलूंचा परामर्श घेतला आहे. तिच्या आयुष्यात येणाऱ्या अनेक घटनांचा मागोवा घेतला आहे. जुईली, तिची आई पार्वती, मैत्रीण निर्मला, भाल, गिरीश सुर्वे, भिमा मामी इत्यादी व्यक्तिरेखा आपापल्या स्वभावानुसार लेखकाने रेखाटल्या आहेत. कादंबरीत अतिरंजित वर्णनंही आली आहेत. असे असले तरी कर्णिकांची ही कादंबरी जाणिवेच्या पातळीवर वाचकांची उत्कंठा शेवटपर्यंत ताणून धरते. व्यक्तिरेखांमधील विविध जाणिवा पाहावयास मिळतात .

'कातळ' या १९८५ साली प्रकाशित झालेल्या कादंबरीतून अंधश्रद्धा, निष्क्रियता आणि दुसऱ्यांचा दुस्वास करण्याची वृत्ती यांचा कातळ फोडण्याची जिद्द बाळगून कोकणात परतलेल्या दिगंबर आणि अवधूत यांच्या प्रयत्नांची कथा कर्णिकांनी चित्रित केली आहे. निसर्गाचे वरदान लाभलेले असूनसुद्धा देवदेव, रूढी, परंपरा आणि दुसऱ्याचा तिरस्कार करण्यात रमणाऱ्या कोकणी माणसाचा स्वभाव बदलल्याखेरीज तेथे काहीही नवीन करणे शक्य नाही, असा निर्वाळा अवधूतच्या व्यक्तिरेखेतून लेखकाने दिला आहे. अवधूतचे कुटुंब आणि गाव यांची ही कहाणी आहे. गावातील केशव खोताची कारस्थाने आणि त्याविरुद्ध अवधूतचा संघर्ष असे स्वरूप कादंबरीला प्राप्त होते. या संघर्षात अवधूतला यश मिळत जाते. त्याच्या मामाच्या मुलाशीच बहिणीचा विवाह होतो. या निमित्ताने कादंबरीत प्रणय प्रसंग आलेला आहे. विषयाचे वेगळेपण असले तरी काही प्रमाणात रंजकता येताना दिसते. एकूणच कर्णिकांनी विविध व्यक्तिरेखांच्या अनुषंगाने जाणिवा प्रकट केल्या आहेत.

'सनद' ही कर्णिकांची १९८५ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. यामध्ये त्यांनी शासकीय सेवेत असताना उच्च पातळीवरील शासन यंत्रणा पाहिली. तसेच ती राबविणारी भ्रष्टाचारी, स्वार्थी आणि महत्त्वाकांक्षी, वशिलेबाजी नोकरशाही पाहिली. भारतामध्ये लोकशाही आहे. लोकशाहीप्रणीत सरकार कारभारविषयक धोरणे ठरविते आणि नोकरशाहीच्या मार्फत त्या धोरणांच्या अनुषंगाने अंमलबजावणी केली जाते. या प्रक्रियेमध्ये नोकरशाही फार महत्त्वाची भूमिका पार पाडते. राज्यकर्त्यांपेक्षा हे शासनकर्ते प्रबळ असतात. ही पोलादी चौकट जेव्हा भ्रष्टाचाराने ठिसूळ होते तेव्हा काय घडते ते गेल्या काही वर्षांत आपला देश प्रत्यक्ष अनुभवित आहे. लोकशाहीत भ्रष्ट नोकरशाहीचा विळखा पडणे म्हणजे देशाचे दुर्दैव होय. कर्णिकांनी लेखकाच्या संवेदनशील मनाचे आणि जागरूक नागरिकांच्या डोळ्यांनी जे पाहिले त्याला 'सनद' या छोटेखानी कादंबरीत शब्दबद्ध केले आहे. प्रेमा चौबळच्या रूपाने लेखकाचे मनोगत प्रकट झाले आहे. हे पात्र एक आदर्शाचा नमुना आहे. लोकशाहीला नोकरशाही ग्रासते तेव्हा एक तरी व्यक्ती सरळ आणि प्रामाणिक असून, खंबीर उभी राहते. एकूणच या कादंबरीतून जीवन जाणिवा व्यक्त करताना आदर्शाचे उदात्तीकरण करणे हा भाग दिसतो, तर दुसरीकडे आदर्शाबद्दल होणारा भ्रमनिरास लेखकाने आपल्या जाणिवेनुसार व्यक्त केला आहे. म्हणूनच 'सनद' ही कादंबरी वाचकांना नेहमीच एक प्रत्ययकारी, वास्तवदर्शी वाटत आली आहे.

मधु मंगेश कर्णिकांची 'वारूळ' ही कादंबरी १९८९ साली प्रकाशित झाली. लघुउद्योग विकास मंडळाच्या कामात त्यांनी जाहिरातींचे जग पाहिले होते. या अनुभवांवर ही कादंबरी आधारलेली आहे. उद्योग व्यवसायात आपले स्थान जिद्दीने निर्माण करणाऱ्या कर्तबगार स्त्रीचे चित्र रंगवताना आबा भालेरावांची दोन मुले मुरलीधर व रत्नाकर, त्यांच्या सुना बकुळ आणि मीनाक्षी यांच्या जीवनातील ताणतणाव रेखाटले आहेत. मीनाक्षी ही कर्तबगार स्त्री व्यक्तिरेखा साकारली आहे, तर बकुळ ही चंचल स्वभावाची आहे. उद्योग व्यवसायात

मीनाक्षी अधिक चमकते. सबंध कुटुंबाची झालेली वाताहत लेखकाने विविध जाणिवांच्या माध्यमातून साकारली आहे .

'संधिकाल' ही कर्णिकांची १९९९ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. तिला 'भैरू रतन दमाणी' साहित्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. कर्णिकांची ही महत्त्वाची कादंबरी आहे. या कादंबरीत स्वातंत्र्योत्तर काळातील एका सारस्वत कुटुंबाच्या तीन पिढ्यांची हकिकत सांगितली आहे. कोकणात त्यांना नशीब काढता येत नाही. त्यासाठी ही माणसे मुंबईत येतात. तेथेच स्थिर होतात. तेव्हा तीन पिढ्यांत त्यांच्या कामगार वारसांनी नशिबाची निरनिराळी वेडीवाकडी वळणे पाहिली; पण ही कादंबरी म्हणजे केवळ एका कुटुंबातल्या पिढ्यांची हकिकत नाही, तर तो स्वातंत्र्योत्तर काळातील मुंबईत घडलेल्या अगणित घडामोडींचा इतिहास आहे. त्यात राजकीय, सामाजिक, औद्योगिक क्षेत्रांतील चळवळी आणि त्यांचा उगम, विकास, ऱ्हास यांची हकिकत येते. काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, चळवळ, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, गोदीतील बॉम्बस्फोट, शिवसेनेचा उदय आणि भरभराट, अन्य जाती–जमातींचे मुंबईतले आक्रमण, मराठी माणसांची पीछेहाट या सर्व प्रश्नांचे विवेचन वेगवेगळ्या जाणिवांमधून लेखकाने केले आहे. ते वास्तव स्वरूपात मांडण्यात कर्णिकांना यश आले आहे. 'संधिकाल' कादंबरीच्या संदर्भात म.द.हातकणंगलेकर म्हणतात, ''मधु मंगेशांची संधिकाल वाचताना श्री.ग.प्र.प्रधान यांच्या 'साता उत्तराची कहाणी' या कादंबरीची आठवण येते. तसेच अरुण साधू यांच्या महाराष्ट्रातील राजकीय जीवनावरच्या 'मुंबई दिनांक', 'सिंहासन' सारख्या कादंबऱ्या आठवतात. प्रा.प्रधानांनी प्रामुख्याने राजकीय पक्ष, तत्त्वज्ञान, कार्यकर्ते, नेते यांचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या भावजीवनाला फार महत्त्व दिले नाही. अरुण साधू यांनी महाराष्ट्रातील राजकीय शक्तीच्या उदयाचे, सत्ताकारणाचे, प्रमुख जातींच्या सत्ता स्पर्धेचे, नैतिक अध:पाताचे चित्रण नाट्यमय पद्धतीने केले आहे. मधु मंगेशांनी कोकणातून मुंबईत आलेल्या एका मध्यमवर्गीय सारस्वत कुटुंबाच्या तीन पिढ्यांचा इतिहास मांडला आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या या महानगरातील, राजकीय, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक घडामोडींना स्पर्श केला आहे. या तीन पिढ्यांत जो नैतिक ऱ्हास झाला, स्त्री–पुरुष संबंधात जी शिथिलता आली, तिच्याबद्दल जी बेपर्वाई निर्माण झाली आणि पैसा, सत्ता, उपभोग याचे थैमान पसरले याचा पट आपल्यासमोर उलगडला आहे. ज्या कुटुंबात समाधी पुरुषाची दंतकथा अवतरली, त्या कुटुंबाच्या नैतिक अध:पाताचे आणि त्या संबंधीच्या वेगळ्या बाजारू दंतकथांचे जाळे आपल्यासमोर पसरले आहे. त्यातील आधुनिक सुखोपभोगाचे आणि उघड्यावागड्या शृंगाराचे चित्रण त्यांनी धाडसाने, जाणकारीने केले आहे. आधुनिक मराठी कादंबरीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून या कादंबरीकडे पाहता येते.''

'संधिकाल' कादंबरी वाचत असताना हातकणंगलेकर यांच्या या विचारांचा प्रत्यय येतो. कर्णिकांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील विविध घडामोडींचा आढावा घेतला असून एस.के.च्या अपघाती मृत्यूने संधिकाल थांबलेला असतो.

**समारोप –**

मधु मंगेश कर्णिक यांनी 'देवकी' (१९६२) या कादंबरीने कादंबरी लेखनास प्रारंभ केला असून, 'संधिकाल' (१९९९) या कादंबरीपर्यंतच्या त्यांच्या लेखन प्रवासात सातत्याने विषयाचे नावीन्य जपण्याचा प्रयत्न केला. कोकणातील भावीण या प्रथेपासून ते तेथील दशावतारी कलावंताची शोकांतिका, अस्पृश्यांचे जीवन चित्रण, लघुउद्योग, महामंडळातील भ्रष्टाचार, अपंगांचे दुःख, विवंचना, मुंबई महानगरीतील झोपडपट्टीचे चित्रण, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील विविध सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परिवर्तन, उघड्या – वागड्या शृंगाराचे चित्रण, विविध चळवळी, राजकीय व्यक्ती इत्यादींचा यथार्थपणे वेध घेण्यात कर्णिकांची कादंबरी यशस्वी झाली आहे.

**संदर्भ :**

१. कर्णिक मधु मंगेश : 'माझ्या कादंबऱ्यांकडे मागे वळून पाहताना', ललित – एप्रिल –१९८८, पृ .३७

२. कुलकर्णी व . दि. , 'माहीमची खाडी' – उपेक्षित समाजाचे वास्तववादी चित्रण, ललित– जानेवारी– १९७० , पृ .३०

३. हातकणंगलेकर म.द., 'मानाचे पात्र', ललित– जानेवारी – २००० , पृ .०९

**डॉ. बाळासाहेब अनुसे**

चलभाष : ८६०५०२७१४६

◆◆

# अभिरुची रुंदावणाऱ्या दोन धीट कादंबऱ्या

स्त्री– पुरुष संबंधाविषयी गंभीर चिंतन करणाऱ्या आणि आदर्श अपेक्षा व्यक्त करणाऱ्या 'देहाचिये गुंती' आणि 'आकाश उजळताना' या अंजली सोमण यांच्या कादंबऱ्यांवरील समीक्षालेख.

डॉ. अंजली जोशी

मानवी नातेसंबंध हे माणसाला नेहमीच गूढ वाटत आलेले आहेत. त्यातून स्त्री–पुरुष संबंध हा खरं तर अतिशय नाजूक व संवेदनशील विषय तसंच आंबटशौकिनांनी आंबट केलेला विषयही आहे. हा विषय केवळ संवेदनशील नाही आणि पाणचट चेष्टेचाही नाही, तर गंभीर आहे; पण त्या गंभीरतेला हळुवारपणाची सुंदर झालर आहे. कोणत्याही कलाकाराला या विषयाचं आकर्षण असतं. गायक, नर्तक, चित्रकार, शिल्पकार, लेखक यांच्यासारख्या प्रत्येक कलाकाराला या विषयाचं सादरीकरण करण्याची ओढ असते. याचं शास्त्रीय कारण माणसातली 'काम' ही मूलभूत भावना होय. निसर्गानं निर्माण केलेली मानवाची कामभावना ही मूलभूत गरज त्याच्या प्रत्येक कर्माशी निगडित असते. याचं भान आणि जाणीव ज्या कलाकाराला उत्तम प्रकारे असते त्याच्याकडून श्रेष्ठ कलाकृतीची निर्मिती होते. भारतीय कलेची परंपरा पाहिली तर हे लक्षात येते. म्हणूनच स्त्री –पुरुष संबंधांमधल्या शृंगाराला ललित कलाकृतीमधे महत्त्वाचं स्थान आहे. या शृंगाराचं प्रगटीकरण करताना कलाकाराला खूपच सांभाळून, संयम ठेवून कलाकृती निर्माण करावी लागते नाहीतर ती कलाकृती अश्लील तरी वाटते किंवा चक्क फसते तरी. म्हणूनच स्त्री–पुरुष संबंध हा विषय अवघड घाटातल्या निसरड्या वाटेवरच्या प्रवासासारखा आहे. या वाटेवरून जाताना कलाकाराला खूप सांभाळून प्रवास करावा लागतो तेव्हाच त्याच्याकडून श्रेष्ठ कलाकृतीची निर्मिती होत असते.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या अंजली सोमण यांच्या 'देहाचिये गुंती' (या कादंबरीला २०२०चा मालतीबाई दांडेकर पुरस्कार प्राप्त झाला आहे.) आणि 'आकाश उजळताना' या दोन कादंबऱ्या अशाच अवघड वाटेवरच्या आहेत. मात्र त्यांनी हा प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला आहे, हे कादंबऱ्या वाचल्यानंतर स्पष्टपणे दिसून येते. अंजली सोमण या समीक्षक आणि संशोधक होत. त्यांच्या प्रस्तुत दोन कादंबऱ्या धरून एकूण चार कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. संशोधक वृत्तीच्या समीक्षकाने ललित साहित्यकृतीची निर्मिती करणं हीदेखील तशी जिकिरीचीच गोष्ट होय कारण संशोधकाची संशोधनवृत्ती आणि समीक्षकाची चिकित्सावृत्ती ललित साहित्यकृतीमधे अडचणीची ठरू शकते. साहित्यकृतीमधे हळुवारपणा न येता कदाचित ती

बोजड किंवा चर्चात्मक स्वरूपाची होण्याची भीती असते. त्यामुळे संशोधकाने ललित साहित्यकृतीची निर्मिती करणं ही एक धाडसी प्रक्रिया आहे असं वाटतं. अंजली सोमण यांच्या कादंबऱ्या पाहता त्यांनी ही प्रक्रिया अत्यंत यशस्वीपणे पूर्ण केल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

देहाचिये गुंती या कादंबरीच्या शीर्षकातूनच त्यातल्या विषयाचं गांभीर्य लक्षात येतं. योगेश, विद्या, प्रेमा आणि क्रांती या चार व्यक्तिरेखांच्या निवेदनातून कादंबरी पुढं जाते. परम ही व्यक्तिरेखा इतरांच्या माध्यमातून उलगडत जाताना दिसते. योगेश आणि क्रांती हे जोडपं, विद्या व तिचा नवरा परम, प्रेमा व तिचा नवरा या तीन जोडप्यांच्या माध्यमातून लेखिकेने स्त्रीपुरुष यांची मानसिकता, त्यांचे एकमेकांविषयीचे विचार, नवरा बायको नात्याविषयीचं चिंतन, शारीरिक सुखाबाबतची नवराबायकोची मतं असा मोठा वैचारिक पट या कादंबरीतून चित्रित केला आहे. परम हा आध्यात्मिक गुरू होऊन तरुण पिढीला परमानंदाचा खरा मार्ग दाखवण्याच्या प्रयत्नात असतो; परंतु प्रत्यक्षात गोष्ट अशी असते की, स्वतः परम हा कामसुखाच्या बाबतीत दुबळा असतो त्यामुळं त्यानं स्वतःच्या कमजोरीवर आध्यात्मिकतेची, परमानंदाची चादर घातलेली असते. तो मुळात हाडाचा प्राध्यापक असल्याने त्याला कोणत्याही विषयाचं ज्ञान मिळवण्यात अडचण येत नसते. त्याचा फायदा तो लोकांना आकर्षून घेण्यासाठी करत असतो. त्याच्या या जाळ्यात योगेश, विद्या, प्रेमा, क्रांतीसारखे हुशार लोकंदेखील फसतात. खऱ्या सुखाच्या, आनंदाच्या ओढीने ते परमकडे आकर्षिले जातात, त्याच्या बहुश्रुततेला आणि देखण्या व्यक्तिमत्त्वाला भुलून अगदी त्याचे अंधभक्त होऊन जातात; परंतु जेव्हा परमचं अंतरंग त्यांना दिसतं तेव्हा सगळे हडबडून, गडबडून जातात. परमची पत्नी विद्या हिने त्याला बरोबर ओळखलेलं असतं. तिच्या तोंडून लेखिकेनं परम खरा कसा होता हे सांगितलं आहे. परम म्हणजे निव्वळ पलायनवाद. त्याच्या डोळ्यांतील आत्मविश्वास म्हणजे स्वतःच्या भित्रेपणावर पांघरूण घालण्यासाठी त्यानं केलेलं नाटक होतं, सोंग होतं! ज्या वेळेस योगेश परमच्या प्रभावातून बाहेर येऊन आत्मपरीक्षण करतो तेव्हा त्याच्या मनातले विचार म्हणजे जणू कादंबरीचं तात्पर्यच होय. शरीर, भावना, बुद्धी आणि तुमचे सामाजिक संबंध यांत समतोल असावा लागतो तरच तुम्ही निरोगी, सुखी आयुष्य जगू शकता. 'देहाचिये गुंती' सारखी वेगळी दृष्टी देणारी कादंबरी वाचकाची अभिरुची तर विकसित करतेच तसंच स्त्री-पुरुष संबंध, कामजीवन यांसारख्या नाजूक विषयाची कक्षादेखील रुंदावते.

'आकाश उजळताना' ही कादंबरी स्त्री पुरुषांमधल्या प्रेमाच्या सहजीवनाची अपेक्षा करणारी कादंबरी आहे. अपेक्षा ही नेहमीच आदर्श असते. त्यामुळे त्या सहजीवनाचं एक सुंदर, टुमदार घरकुल लेखिकेने या कादंबरीत उभं केलेलं आहे. निनाद, विभा आणि इरा या तीन व्यक्तिरेखांच्या माध्यमातून ही कादंबरी फुलत गेली आहे. विभाच्या मृत्यूनंतर तिचं आत्मवृत्त तिची मुलगी इरा वाचते. त्यातून तिला नव्यानं तिची आई कळत जाते आणि तिचे वडीलही. या कादंबरीतही निनाद हा विभा आणि इराच्या माध्यमातून वाचकांना कळत जातो. प्रौढ वयातले निनाद आणि विभा हे दोघेही विवाहित असून एकमेकांकडे ओढले जातात आणि त्यांच्यात एक सहजसुंदर असं प्रेमाचं नातं निर्माण होतं. त्या नात्याचा आदर दोघंही करत असतात. स्त्री-पुरुष यांच्यामधलं सुंदर सहजीवन हे शारीरिकतेच्या माध्यमातून किती हळुवारपणे घडत जातं याचं एक सुरेख चित्र लेखिकेने निनाद आणि विभा या दोन व्यक्तिरेखांमधून रेखाटलं आहे. इरा ही विभाची मुलगी एकदम बेदरकार वृत्तीची, भावभावनांना फारसं महत्त्व न देणारी, रूढी-परंपरांना सतत विरोध करणारी, मनस्वी आणि अत्यंत हुशार. अशी ही इरा आईच्या आत्मवृत्ताचं हस्तलिखित वाचल्यानंतर निनादच्या सहजीवनाबद्दलच्या, स्त्री-पुरुष संबंधांबद्दलच्या आणि एकंदरीतच सकारात्मक जीवनपद्धतीबद्दलच्या विचारांनी पार बदलून जाते

आणि तिच्या मनातलं मळभ दूर होऊन तिच्या मनातला अवकाश उजळून जातो. आई आणि मुलीतला वैचारिक संघर्ष लेखिकेने अतिशय कुशलतेने दाखवला आहे. केवळ काळंपांढरं चित्र रंगवलेलं नाही. जेव्हा इरा प्रथम विभाचं हस्तलिखित वाचायला सुरू करते तेव्हा संतापून ती जमिनीवर टाकून पायानं तुडवते आणि म्हणते, ''नो वे, ममा, आय ॲम नॉट गोइंग टू ॲक्सेप्ट युवर अफेअर.'' मात्र जसंजसं विभाचं हस्तलिखित वाचत जाते तशी ती स्थिर होत जाते आणि तिच्या वागण्यातदेखील फरक पडायला लागतो. पुरुषाकडे पाहण्याची तिची दृष्टी बदलते. स्त्री-पुरुष सहजीवन हे केवळ शारीरिक सुखावर अवलंबून नसतं, तर ते एकमेकांप्रति असणाऱ्या प्रेमावर, आदर देण्यावर अवलंबून असतं. ती एक सुरेख देवघेव असते. हळुवार, तरल भावभावनांची गुंफलेली सुगंधित माळ लेखिकेने या कादंबरीद्वारे वाचकांना दिली आहे असे वाटते.

'देहाचिये गुंती' आणि 'आकाश उजळताना' या दोन कादंबऱ्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. 'देहाचिये गुंती' २०१७ मधे प्रकाशित झाली आणि 'आकाश उजळताना' २०२०मधे प्रकाशित झाली आहे. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे कलाकाराला स्त्री-पुरुष संबंध या विषयासंबंधी एकप्रकारचं गूढ आकर्षण असतं. त्याला ते समजून घ्यायचे असतात. अंजली सोमण यांनी याच विषयावर दोन कादंबऱ्या तीन वर्षांच्या अंतरानं लिहिल्या आहेत. तोच विषय पुन्हा कादंबरीतून त्यांना का मांडावासा वाटला असेल? 'देहाचिये गुंती'मधून त्यांनी स्त्री-पुरुष संबंधांविषयीचं गंभीर चिंतन व्यक्त केलं आहे. 'आकाश उजळताना'मधे या संबंधांविषयीची अपेक्षा व्यक्त केली आहे. 'देहाचिये गुंती'मधे स्त्री-पुरुष संबंधांची व्याप्ती सामाजिक, मनोविश्लेषणात्मक, व्यक्तिवादी, स्त्रीवादी असे अनेक कंगोरे प्रसृत करते. या विषयाचं वास्तव जसंच्या तसं स्पष्टपणे लेखिकेने व्यक्त केलं आहे. ते व्यक्त करताना लेखिकेचं चिंतन, मनन किती सखोलपणे घडलं आहे याची जाणीव होते. विद्या, प्रेमा, क्रांती या तीन स्त्रिया आणि योगेश व परम हे दोन पुरुष अशा या प्रातिनिधिक व्यक्तिरेखांद्वारे स्त्री-पुरुष संबंध या विषयाची गुंफण लेखिकेने अतिशय कुशलतेने केलेली आहे कारण या विषयाला अनेक कंगोरे आहेत, त्यामुळे कादंबरी भरकटण्याचा धोका खूप होता; परंतु लेखिकेने अत्यंत संयम ठेवून, शास्त्रशुद्ध माहितीचा आधार घेऊन, मानवी मनाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून आणि मुख्यतः स्त्री आणि पुरुष या दोघांकडे समत्वबुद्धीने बघून 'देहाचिये गुंती' या कादंबरीचे लेखन केले आहे. विचारांच्या मंथनातून निर्माण झालेली ही कादंबरी वाचकांच्या अभिरुचीची कक्षा रुंदावते. वाचकाला या विषयाकडे गांभीर्याने पाहायला भाग पाडते. केवळ उत्सुकता, कुतूहल ही भावना मागे पडून या विषयाचं गांभीर्य वाचकाला मोह घालतं. अशा कादंबऱ्या वाचकाला वाचक म्हणून घडवण्यासाठी महत्त्वाच्या ठरत असतात. याच विषयातली तरलता आणि सुंदरता दाखवणारी 'आकाश उजळताना' ही कादंबरीही वाचकाभिरुची घडवणारी आहे. 'देहाचिये गुंती'मधे या विषयाचं चिंतन झालं असताना ही कादंबरी लेखिकेला का लिहावीशी वाटली असेल, असा प्रश्न साहजिकच वाचकाच्या मनात येतो. आता आणखी काय वेगळं सांगायचं आहे लेखिकेला, असं वाटणं साहजिक असलं तरी दोन्ही कादंबऱ्या एकामागोमाग वाचल्यानंतर या प्रश्नाची उकल आपोआपच होते, म्हणूनच सुरुवातीला या दोन कादंबऱ्या म्हणजे एका नाण्याच्या दोन बाजू म्हटलं आहे. चिंतन व्यक्त करून विषयाची व्याप्ती दाखवता येते मात्र त्या चिंतनातून घडलेलं आकलन हे जास्त महत्त्वाचं असतं. तोच प्रकार 'आकाश उजळताना' या कादंबरीलेखनाबाबत घडला आहे. स्त्री-पुरुष संबंधाचं वास्तव 'देहाचिये गुंती'मधे दाखवून झाल्यानंतर त्या लेखनातून घडलेल्या आकलनाचं सुंदर आणि तरल स्वरूप 'आकाश उजळताना' या कादंबरीत दिसतं. या कादंबरीतून स्त्री-पुरुष संबंधाच्या आदर्शाची अपेक्षा लेखिकेने व्यक्त केली आहे. परिपूर्णता कोणत्याही कलाकृतीत कधीच

असू शकत नाही, त्यामुळे या दोन कादंबऱ्या म्हणजे ठोकताळ्यासारखं हा प्रश्न, हे त्याचं उत्तर अशा नाहीत. दोघी एकमेकांत गुंतलेल्या असल्या तरी दोघींना स्वतंत्र अस्तित्व आहे, म्हणजे स्त्री आणि पुरुष यांच्यातल्या नात्यासारख्या. स्त्री-पुरुष संबंध या एका सूत्राभोवती गुंफलेल्या या दोन कादंबऱ्या दोन आयाम स्पष्ट करतात म्हणूनच विषय आणि आशय या दोन्ही दृष्टीने या दोन्ही कादंबऱ्या वैशिष्ट्यपूर्ण ठरतात.

'देहाचिये गुंती' आणि 'आकाश उजळताना' या कादंबऱ्यांची रचना लेखिकेने त्यातल्या विषयाला अनुकूल अशी केली आहे. 'देहाचिये गुंती'मधे पात्रमुखी निवेदनपद्धतीचा वापर केला आहे. 'आकाश उजळताना'मधे निवेदनपद्धतीचा वापर केला असला तरी त्याचं स्वरूप वेगळं आहे. हस्तलिखिताच्या माध्यमातून व्यक्तिरेखा बोलतात. मात्र एक समान धागा दोन्हीमधे दिसतो तो म्हणजे कादंबरीमधील महत्त्वपूर्ण पुरुष व्यक्तिरेखा इतर व्यक्तिरेखांच्या माध्यमातून बोलते. 'देहाचिये गुंती'मधला परम आणि 'आकाश उजळताना' मधला निनाद दोघंही वाचकांना भेटतात ते इतरांच्या संवादांमधून, विचारमंथनातून. ते प्रत्यक्ष संवाद साधताना दिसत नाहीत. याचं कारण काय असू शकेल याचा विचार करताना जाणवतं की, परम आणि निनाद या दोन्ही व्यक्तिरेखा या लेखिकेच्या मनातल्या वास्तव आणि अपेक्षा व्यक्त करणाऱ्या भावना आहेत. त्यामुळे या भावनांचं प्रगटीकरण स्वतः भावना करू शकत नाहीत, ते इतर कुणीतरीच करावं लागतं. याचा एक चांगला विचार लेखिकेने रचनापद्धतीमधे केलेला दिसतो. 'देहाचिये गुंती' या कादंबरीला घटना-प्रसंगांमुळे एक गती प्राप्त होते. त्यामानानं 'आकाश उजळताना' या कादंबरीची गती स्थिर आहे. याला कारण दोन्ही कादंबऱ्यांची आशयक्षमता आणि घनता होय. रचनापद्धतीच्या दृष्टीनेही या दोन कादंबऱ्या वेगळा अनुभव देतात.

दोन्ही कादंबऱ्यांचं समान वैशिष्ट्य हे की, दोन्हीमधून लेखिकेने काही मूलभूत प्रश्न मांडले आहेत आणि त्यांची उत्तरं द्यायचा प्रयत्न केला आहे. 'देहाचिये गुंती' मधील क्रांती या व्यक्तिरेखेच्या तोंडून विचारप्रवृत्त करणारा मूलभूत प्रश्न लेखिकेने मांडला आहे. तिच्या आयुष्यात काही घडामोडी घडतात, लग्नाबाबतचे तिचे अनुभव तिच्यादृष्टीने चांगले नसतात, त्या वेळी तिच्या मनात विचार येतो, लग्न करून किती जण सुखी होतात कुणास ठाऊक? पण लग्न करण्यासाठी मात्र सारे धडपडत असतात. प्रत्येकाच्या मनात येणारा विचार लेखिकेने क्रांतीच्या तोंडून व्यक्त केला आहे. 'आकाश उजळताना' मधली नायिका विभा हिच्या मनातही पुरुषाबरोबरच्या सहजीवनासंबंधी अनेक प्रश्न येत असतात. तिचा नवरा हा अगदी नवरेशाही गाजवणारा नवरा असतो, तो सहचर नसतो. त्याबाबत तिच्या मनाला लागलेली आस तिला निनादच्या रूपानं समोर येते आणि एखाद्या पतंगासारखी ती त्याच्यावर स्वतःला झोकून देते. तेव्हा ती समाज, नवरा, मुलं, वय अशा कोणत्याही ऐहिक गोष्टींचा विचार करत नाही. ती निनादमधे पूर्णपणे विरघळून जाते आणि स्त्रीपुरुष सहजीवनाची तृष्णा भागवते. एक महत्त्वाचा विचार लेखिकेने निनाद आणि विभा या दोघांच्या माध्यमातून मांडला आहे, खरं तर प्रश्नच व्यक्त केला आहे. स्त्री-पुरुषांचं सहजीवन हे पतिपत्नीच्या नात्याशी निगडित आहे का की ते नात्यापलीकडचं आहे? या प्रश्नाचं उत्तर लेखिकेने निनादच्या माध्यमातून द्यायचा प्रयत्न केला आहे. विभाला तो त्या दोघांच्या नात्याविषयी सांगताना म्हणतो, ''तुझं आणि माझं नातं हे असं आहे, 'ते पहाटेवीण पाहावित'. निर्विकल्प समाधीचा अनुभव देणारं. नात्यास नाव आपुल्या देऊ नकोस काही, साऱ्याच चांदण्यांची जगतास जाण नाही.'' हीच या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना. विभा आणि तिची मुलगी इरा या दोन विचारांचे ताणेबाणे जरी या कादंबरीत असले तरी मूळ आशय हा स्त्री-पुरुषांची एकमेकांची एकमेकांबद्दल असणारी सहजीवनाची अपेक्षा हा आहे. त्यामुळे ही कादंबरी अतिशय तरल आणि हळुवारपणे व्यक्त होते. इराच्या द्वारे आधुनिक विचारांची फटकेबाजी असली तरी त्यामुळे

कादंबरीच्या तरलतेला बाधा येत नाही उलट त्यामुळे कादंबरीची संवेदनशीलता अधिक उठावदारपणे दिसून येते. स्त्री-पुरुषातल्या नात्याची उकल करू पाहणारी ही कादंबरी या नात्याची भावनिकता जाणवून देते. इरासारख्या आधुनिक मुलीलाही स्त्री पुरुषातल्या नात्याची आणि त्यांच्यातल्या सहजीवनाची खरी ओळख होते ती तिच्या आईच्या आणि निनादच्या सहजीवनामुळे. त्यामुळे तिचा या नात्याकडे पाहायचा दृष्टिकोन बदलतो. स्त्री-पुरुषाच्या सहजीवनासाठी नात्याचं बंधन आवश्यक असतंच असं नाही हा विचार अतिशय संयमानं लेखिकेने निनाद आणि विभा यांच्या नात्यातून मांडला आहे. या कादंबरीत स्त्री आणि पुरुष दोन्ही व्यक्तिरेखा त्यांच्या त्यांच्या मूलभूत स्वभावानुसार दाखवल्या आहेत. स्त्रीवर अन्याय करणारे, फसवणारे, लंपट पुरुष अशा सरधोपट पुरुष व्यक्तिरेखा रंगवलेल्या नाहीत. परम, योगेश, योगेशचे वडील, प्रेमाचा नवरा, प्रेमाचा मुलगा, विद्याच्या घरातले वडीलधारे या सगळ्या पुरुष व्यक्तिरेखा स्वतःच्या स्वभावानुसार वागताना दिसतात. त्यामुळेच ही कादंबरी आक्रस्ताळी किंवा एकांगी झालेली नाही. लेखिकेच्या सहजलेखनाचा एक उत्तम आविष्कार या स्त्री-पुरुषांच्या व्यक्तिरेखांमधून आढळतो. ‘आकाश उजळताना’ या कादंबरीतील निनाद, विभाचा नवरा सतीश, तिचा मुलगा मिहीर, इराच्या आयुष्यात आलेले अभिजित आणि तपन या पुरुष व्यक्तिरेखादेखील सहजतेने आलेल्या आहेत. विभाला आणि निनादला न्याय मिळवून द्यायचा आहे असं समजून इतर स्त्री पुरुषांना लेखिकेच्या मर्जीनं वागायला लावलेलं नाही, ही खूप महत्त्वाची गोष्ट या कादंबरीत आढळते. विभाचा नवरा सतीश हा खलनायक नाही तसंच इरा ही दुष्ट, करकरीत मुलगी नाही. विभा आणि इरा या आईमुलीच्या नात्यातला संघर्ष आणि आईच्या मृत्यूनंतरचं मायलेकींमधे निर्माण झालेलं नातं या दोन्ही गोष्टी लेखिकेने कौशल्याने सांगितल्या आहेत. विभाची मुलगी इरा ही तिच्याहून अगदीच वेगळ्या स्वभावाची आहे. महत्त्वाकांक्षी, मनस्वी, बोलायला- वागायला उद्धट वाटेल अशी इरा आहे. याबरोबर उलट विभा आहे. अतिशय संवेदनशील, दुसऱ्याच्या मनाचा विचार करणारी, प्रेमाला महत्त्व देणारी, समर्पित भावना असणारी अशा या विभाचं इराशी जमणं कठीणच. त्यामुळे आपल्या आईचे गुण तिला तिच्या हस्तलिखितातून कळतात आणि ती चकितच होते. आईशी नव्याने ओळख झाल्यासारखी भारली जाते. हे इराचं मानसिक स्थित्यंतर लेखिकेने अतिशय सहजतेनं दाखवलं आहे. मानवी स्वभाववैशिष्ट्यांनी भरलेल्या या व्यक्तिरेखा असल्याने निनाद आणि विभा यांचं सच्चेपण वाचकाला जाणवतं. लेखिकेने आशय, विषय, व्यक्तिरेखा यांच्या रचनेची गुंफण इतकी सुरेख केलेली आहे की, वाचक वाचनपरिणामात अगदी एकरूप होऊन जातो. पतिपत्नी, स्त्री-पुरुष संबंध आणि स्त्री-पुरुषांमधलं सहजीवन या त्रिसूत्रीवर आधारित असणारी ‘आकाश उजळताना’ ही कादंबरी वाचकाची अभिरुची विकसित करतेच आणि मानवी नातेसंबंधांकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी देते.

‘देहाचिये गुंती’ आणि ‘आकाश उजळताना’ या दोन कादंबऱ्या स्वतंत्र अस्तित्व जाणवून देणाऱ्या असल्या तरी त्यांचा विषय आणि आविष्कार यांबाबत समानता जाणवते. कामभावना आणि स्त्री-पुरुष संबंध हे विषय मराठी कादंबरीसाठी नवीन नाहीत, तरीही त्यातली नवीनता लेखकांना वेगवेगळ्या पद्धतीने जाणवत राहत असते हे दर्शवणाऱ्या या दोन कादंबऱ्या आहेत, त्यामुळे या दोन्ही कादंबऱ्यांचा एकत्रित विचार हा एक आनंददायक अनुभव ठरतो.


**डॉ. अंजली जोशी**
चलभाष : ९८५०७१७५०५

◆◆

मानवी वस्तुकरणावर भेदक आणि परखड भाष्य करणाऱ्या प्रणव सखदेव लिखित '९६ मेट्रोमॉल' या कादंबरीवरील समीक्षालेख.

# आभासी मांडणीतून वास्तवदर्शन घडवणारी प्रयोगशील कादंबरी '९६ मेट्रोमॉल'

डॉ. राहूल अशोक पाटील




पुस्तकाचे नाव : **९६ मेट्रोमॉल**
लेखक : **प्रणव सखदेव**
प्रकाशकः **रोहन प्रकाशन, पुणे**
प्रथमावृत्तीः **मार्च २०२०**
पृष्ठेः १२८ किंमत : १५०/-

आजचे मानवी जीवन गतिमान झाले आहे. त्याची गती आणि बदललेली दिशा हा स्वतंत्र अभ्यासाचा आणि संशोधनाचा भाग आहे. आपण मोबाईल, इंटरनेट किंवा ऑनलाईन जगण्याच्या किती आहारी गेलो आहोत किंवा त्यात किती अडकून पडलो आहोत, हे सांगण्यासाठी कुणा तज्ज्ञाची गरज राहिलेली नाही. अशा या बदललेल्या वर्तमानावर बोलण्यासाठी विविध माध्यमे आधुनिक काळात उपलब्ध आहेत. यातीलच एक सक्षम माध्यम म्हणजे साहित्य! त्यातल्या त्यात कादंबरीच्या व्यापक पटावर या बदलातील अनेक पैलू वैविध्यपूर्णतेने मांडता येत असल्याने असे विषय हाताळण्यासाठी कादंबरी हे माध्यम अधिक उपयुक्त, सोयीस्कर व प्रभावी आहे. असे वाटण्यामागचे मुख्य कारण म्हणजे नुकतीच वाचनात आलेली प्रणव सखदेव या तरुण लेखकाची '९६ मेट्रोमॉल' ही लघुकादंबरी!

**कादंबरीकाराबद्दलः**

प्रणव सखदेव हे मराठी साहित्य विश्वाला परिचित असणारे नव्या पिढीतील एक दमदार व प्रयोगशील लेखक आहेत. त्यांनी आजवर कथा, कविता आणि कादंबरी हे तीनही साहित्यप्रकार नेमकेपणाने हाताळलेले असून विविध प्रकारच्या सर्जनशील लेखनात ते सातत्याने सहभागी असतात. २०१२ पासून साहित्य विश्वात

रमलेल्या प्रणव सखदेव यांच्या काही नावीन्यपूर्ण कथा– कविता मराठीतील महत्त्वाची नियतकालिके, दिवाळी अंक आणि विविध दैनिकांतून प्रकाशित झालेल्या आहेत.

'काळेकरडे स्ट्रोक्स' ही कादंबरी, 'निळ्या दाताची दंतकथा' आणि 'नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य' या दोन कथासंग्रहांनंतर मार्च, २०२० मध्ये त्यांनी '९६ मेट्रोमॉल' ही कादंबरी वाचकांसमोर आणली. पुण्यातील रोहन प्रकाशनात संहिता संपादन, संपादकीय संस्करणाचे कामकाज करणारे प्रणव हे 'भाषांतरकार' म्हणूनही सुपरिचित आहेत. साहित्य क्षेत्रात आजच्या तरुण पिढीचे प्रतिनिधित्व करणारा हा लेखक स्वतःची एक प्रगल्भ भूमिका आणि वेगळी मांडणी घेऊन साहित्यातून अभिव्यक्त होऊ पाहतो आहे. त्यांची आजवरची वाटचाल पाहता, भविष्यात अधिक दमदार व वैविध्यपूर्ण लेखन करून मराठी साहित्यात भरीव योगदान देण्याची त्यांची क्षमता अधोरेखित होते.

**कादंबरीची पार्श्वभूमी:**

भाषांतरकार म्हणून साहित्य क्षेत्रात आपला प्रवास सुरू करताना २०१२ च्या आसपास 'ॲलिस इन वंडरलँड' या पुस्तकाचे 'आर्याची अद्‌भुतनगरी' या शीर्षकाने त्यांनी रूपांतर केले. हे लेखन करताना त्यांच्या मनात सहज आले की; जर ही ॲलिस आज प्रत्यक्षात अवतरली तर..? आणि मग अशाच काहीशा कल्पनेतून ही कादंबरी डोक्यात घोळत राहिली. २०१५ च्या दिवाळी दरम्यान सलग आठ दिवसांच्या बैठकीत मूर्त आकार घेत कादंबरी शब्दांत सापडत गेली. रूढार्थाने प्रणव सखदेव यांनी लिहिलेली ही पहिली साहित्यकृती होती. पुढे या लेखनावर अनेकदा संस्कार झाले. संपादन झाले. जाणकारांशी चर्चा झाली. साधारण साडे चार– पाच वर्षांच्या प्रवासातून आकार घेत मार्च, २०२० मध्ये अखेर ही कादंबरी प्रकाशित झाली.

'९६ मेट्रोमॉल' हे एक काल्पनिक, अद्‌भुतरम्य, रहस्यमय आणि मनोरंजक असे महत्त्वाचे 'सायन्स फिक्शन' आहे. आजचे आधुनिक जगणे मांडणारी ही लघुकादंबरी म्हणजे प्रायोगिक स्वरूपाचं व आजच्या काळाशी सुसंगत असं नवं लेखन आहे. मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात व लक्षणीय प्रयोग व्हायला हवेत. अलीकडे निश्चितच ते होताहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नवनवे–दमदार लेखक लिहिताहेत; आपापले अनुभवविश्व जोरकसपणे मांडण्याचा प्रयत्न करताहेत; विशेषतः कादंबरीत ही 'नवता' व 'बदल' ठळकपणे जाणवू लागले आहेत ही समाधानाची व आनंदाची गोष्ट आहे.

असे असले तरी आपल्या या प्रवासाच्या काही मर्यादाही आहेत. विशेषतः आधुनिक मराठी कादंबरीचा विचार करता, अद्‌भुतरम्य स्वरूपाच्या कादंबरीची वाटचाल बरीच मर्यादित राहिलेली दिसते. परिणामी, कल्पनाविश्वातील अद्‌भुतिकांवर आधारित पुस्तके वाचताना वाचकाला ज्या मूलभूत गोष्टींची माहिती वा प्राथमिक ज्ञान असावे लागते ते आपल्याकडे पुरेसे नाही. या सर्व पार्श्वभूमीवर एक नवा– धाडसी प्रयत्न म्हणून '९६ मेट्रोमॉल' या प्रयोगशील कादंबरीकडे पाहता येते.

**कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र व शीर्षक:**

गेल्या दशकभरात आपलं जगणं कमालीचं बदललं आहे. आजचा माणूस कळत–नकळत शेकडो वेगवेगळ्या आणि अनावश्यक गोष्टी–वस्तूंच्या आहारी गेलाय. किती धावायचं, कुठं थांबायचं, आपल्याला काय हवं आणि काय नको याचं भान हरवलेला हा माणूस भौतिक सुख–सोयी विशेषतः ऑनलाईन शॉपिंग, रेव्ह पार्टीज्, इतर व्यसने आणि मनोरंजन यात प्रमाणापेक्षा अधिक अडकून पडला आहे. 'आपण माणूस आहोत आणि या वस्तू आपल्यासाठी आहेत.' याचे भान हरवल्याने स्वतःला आधुनिक– प्रगत वगैरे मानणारा माणूस दुर्दैवाने या वस्तूंच्या हातातील खेळणे होऊन बसला आहे.

या पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकातील माणसाला नैसर्गिक किंवा साधे–सहज जगणे यापेक्षा 'मॉलसंस्कृती' या आधुनिक– भौतिक सुखसोयींयुक्त जगणे अधिक गरजेचे वाटू लागले आहे. आधुनिकतेच्या नादात कळत–नकळत त्याच्या दैनंदिन जगण्यात ज्या छोट्या–मोठ्या गल्लती होत आहेत, त्याकडे लक्ष वेधणे आणि वस्तुस्थितीची जाणीव करवून देणे असे काहीसे सूत्र घेऊन ही कादंबरी साकार होत जाते.

कादंबरीतील नवतरुण नायक उच्चभ्रू– यांत्रिक मॉलमध्ये अडकून पडतो. संपूर्ण कादंबरीभर सैरभैर फिरत राहतो, त्याची इच्छा असताना– नसताना इकडे– तिकडे फेकला जातो; अगदी सर्वसामान्य माणूस एखाद्या उच्चभ्रू मॉलमध्ये भरकटतो, अनावश्यक, निरर्थक फिरत राहतो

तसा! या परिस्थितीशी साधर्म्य असल्याने '९६ मेट्रोमॉल' हे कादंबरीचे शीर्षक यथार्थ वाटते.

थोडक्यात, '९६ मेट्रोमॉल' म्हणजे फोफावलेली मॉलसंस्कृती- बाजार आणि मेट्रो यांचे मिश्रण आहे. त्यात हरवलेली निरागसता, वाढते व्यापारीकरण, सोकावलेला सुखलोलूप काळ, माणसाचा वाढता उपभोगवाद, संकुचित- केंद्रित उपयुक्ततावाद, प्रत्येक क्षेत्रात झालेले वस्तुकरण आणि समग्र मानवजातीचे झालेले ग्राहकीकरण याचे दर्शन या कादंबरीतून घडते. त्यामुळे लेखकाने दिलेले शीर्षक अधिक समर्पक असल्याचे वारंवार जाणवत राहते.

**कथानक:**

कादंबरीचे कथानक आपल्याला प्रारंभी स्वप्नवत वाटणाऱ्या जगात दूर घेऊन जाते आणि शेवटी या सगळ्यांतील निरर्थकता मांडत बाजारकेंद्री मॉलसंस्कृतीत स्वतःचे खेळणे बनवून बसलेल्या माणसाला वस्तुस्थितीचे भान देण्याचा प्रामाणिक प्रयत्नही करते. समकालीन जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या 'मॉलसंस्कृती'ला समोर ठेवून 'मूळ पुरुषाच्या शोधात...' या शीर्षकाखाली लेखकाने कादंबरीची रंजक सुरुवात केली आहे.

पूर्वजांपैकी एक तरुण ॲमेझॉनच्या जंगलात स्वखुशीने वनवासी झाला. तो तिकडे का गेला, याबद्दल कुतूहल निर्माण होऊन लेखक इंटरनेटवर शोध घेत त्याची काही माहिती मिळवितो. ती माहिती त्रोटक असल्याने लेखकाचे समाधान होत नसल्याने लेखक ॲमेझॉनमध्ये जातो. तिथे चौकशी करतो. तिथे ती व्यक्ती बऱ्यापैकी सुप्रसिद्ध- विख्यात वगैरे असल्याने लेखकाला पुरेशी माहिती मिळते. तिथल्या विचित्र लिपीतील सर्वांत जुन्या पुस्तकात 'पार्लेमानोममध्ये (आपल्याकडील उपनिषदांप्रमाणे तिथे असलेला सर्व समावेशक- दिशादर्शक ग्रंथ) तिथल्या जमातीतील प्रत्येक कर्तृत्ववान आणि वाया गेलेल्या माणसांच्या कहाण्या नोंदविलेल्या असतात. आपला पूर्वज तिकडे का गेला असेल, त्याची काय कहाणी असेल अशी उत्सुकता निर्माण करणारी पार्श्वभूमी घेत लेखक प्रणव सखदेव यांनी कादंबरीच्या प्रारंभात कौशल्याने अद्‌भुतता आणताना वाचकांमध्ये कमालीची उत्सुकता  निर्माण केलेली आहे.

कादंबरीची रचना करताना प्रकरणांना आकर्षक व आजच्या व्यावसायिक जगाला परिचित शीर्षके दिल्यामुळे आशयासंदर्भातील उत्सुकता अजूनच वाढते. जसे कीः 'मैं नशेमें हूँ...', 'धर मला, धर मला, धर धर धर...', 'तळ्यात तळं कार्डांचं', 'झिंगझिंगझिंगाट...', 'दाग अच्छे होते है...', 'डब्यात डबे सात...', 'एन्जॉय करा... एन्जॉय करा...', 'अभी तो पार्टी शुरू हुई है...', 'शॉपिंग कराव पायजे...', 'गो गो पोकेमॉन गो...', 'कोर्टातली केस', 'मयंकानाची गोष्ट सफळ संपूर्ण!' या शीर्षकांवरून त्याची प्रचिती येते.

कादंबरीचा नायक मयंक हा शहरातील आधुनिक व बिनधास्त जगणाऱ्या तरुण वर्गाचा प्रतिनिधी आहे. त्याने नुकतेच एकविसाव्या वर्षात पदार्पण केले असून त्याची एक खंत आहे. ती म्हणजे; त्याचे आई वडील त्याला ना लहान म्हणतात ना 'ग्रोन अप' मानतात. मित्रांमध्ये बिनधास्त- बोल्ड असणारा हा तरुण त्याच्या मोठ्या भावासोबत बॅचलर पार्टीत जातो आणि फुकट दारू मिळाली म्हणून मनसोक्त दारू पितो. इतक्यावरच न थांबता त्यापुढे जाऊन तो व्होडका, स्कॉच, व्हिस्की, रम, बिअर, जिन आणि वाईन यांचे 'कॉकटेल चॅलेंज' स्वीकारतो. त्याने केलेले धाडस त्याच्या चांगलेच अंगाशी येते आणि सहाव्या पेगनंतर त्याला ओकारीचा भयंकर त्रास होतो. त्या ग्लानीत तो जे दीर्घ स्वप्न पाहतो त्यात त्याच्या मनाच्या तळाशी दडलेल्या गोष्टींना लेखक रंजकतेचा स्पर्श देत त्याची स्वप्नमय- काल्पनिक जगात यांत्रिक सफर घडवितो. तिथे त्याला मोठा मॉल, आकर्षक रोषणाई, प्लॅस्टिकची झुडपं व एकूणच चकाचक श्रीमंती दिसते. तिथली फुलं खुडण्याच्या प्रयत्नात असताना त्याला कुणाचातरी धक्का लागतो. तो धक्का एका 'मोबाइल ड्यूड'चा असतो. त्याचा पाठलाग करत- करत मयंक एका वेगळ्या विश्वात पोहोचतो, आणि इथून सुरू होते ही जीवघेणी... भयानक कहाणी!

मोबाईल ड्यूडच्या नादी लागल्याने अनपेक्षित व वेगवेगळे चांगले- वाईट अनुभव नायकाला येतात. दंडगोलाकृती व पारदर्शक लिफ्टमधून भरपूर गतीने जाताना आपण रॉकेटमध्ये असल्याचा भास त्याला होतो. 'स्मॉल ब्लॅकहोल' सदृश्य असे ते काहीसे असते. बाहेर विविध वस्तूंच्या जाहिराती, म्युझिक, विविध वस्तूंची विक्री होत असल्याने विक्रेत्यांचे आवाज त्याच्या कानावर सातत्याने पडत असतात. तिथे पोहोचल्यावर भूक लागली म्हणून तो दिलेल्या सूचनेकडे दुर्लक्ष करत 'डबलडेकर

बर्गर विथ मेक्सिकन सॉस' खातो. त्यामुळे तो जाड-जाड आणि भरपूर जाड (ओबेस) होत जातो. या प्रवासात त्याचा परिचय स्वतःच्याच व्हर्चुअल आयडेंटिटी (इनर व्हॉइस) सोबत होतो. आजच्या जगण्यातील सर्वसामान्य माणसाच्या सवयीप्रमाणे छोट्यात छोट्या गोष्टीही आपण जशा सोशल मिडियावर शेअर करतो तसा त्याचा फोटो टॅगलाइनसह पोस्ट करतो. थोड्या वेळाने त्याला आई-वडिलांची प्रकर्षाने आठवण येते. त्यांनी लाड पुरविणे आणि आईने 'जंक फुड खाऊ नकोस' हा वारंवार दिलेला सल्ला त्याला पटतो.

चार-दोन घटना घडल्यावर तो तिथे उपलब्ध 'मिक्स ज्यूस' पितो. त्यामुळे तो क्षणाक्षणाला लहान होत जवळजवळ दहा इंचाचाच उरतो. त्याला चालणेही मुश्किल होते. तो चालताना धडपडतो आणि जवळच असलेल्या क्रेडिट आणि डेबिट कार्डांच्या तळ्यात पडतो. तिथे त्याला पॉस मशिन भेटते. त्याच्याशी संवाद साधल्यावर ''टॅब आणि लॅपटॉपमुळे आमचे जगणे मुश्किल झाले'' असल्याची खंत ते मशिन व्यक्त करते. त्याच तळ्यात पॉस मशिन आणि कार्डांच्या परस्परसंबंधातून आलेल्या टोस्टर, हेडफोन्स, कढई, फ्रीज आणि अशा असंख्य वस्तू असतात. या सगळ्यांनाच तिथल्या भरमसाठ आकड्यांचा त्रास होत असतो. आकड्यांच्या तावडीतून सुटका करवून घेण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न अयशस्वी ठरल्यावर सगळे मयंकच्या सांगण्यानुसार झुम्बा डान्सच्या स्पर्धेत सहभागी होत आकड्यांपासून मुक्ती मिळवितात. डान्सच्या निमित्ताने मयंकला गर्लफ्रेंड रेवाची आठवण येते. विजेत्यांना बक्षिसेही दिली जातात. ती जगातील पहिली अशी स्पर्धा ठरते; ज्यात सहभागी प्रत्येक जण जिंकतो.

पुढच्या प्रवासात मयंकला मोबाइल ड्यूड भेटतो. तो अडचणीत असतो. त्याला मदत करण्यासाठी मयंक बॅगची शोधाशोध करताना दमतो आणि मागचापुढचा विचार न करता समोरच्या जगमध्ये भरलेले 'चंदेरी ड्रिंक'प्राशन करतो. त्यावर 'हवाहवाई' लिहिलेले असते आणि त्या ड्रिंकचा परिणाम म्हणून मयंक फुगत-फुगत मोठा फुगा (बलून) बनतो. मयंकला आता आपल्या कृतीचा पश्चात्ताप होतो; पण पश्चात्तापाने परिस्थिती बदलत नाही. मोबाइल ड्यूड सहकाऱ्यांच्या मदतीने मयंकवर बादली-बादलीभर माती टाकतो. घाण फेकतो. मग ती घाण काढायला साबणाच्या वड्या, भुकटी आणि भरपूर पाणी अंगावर फेकले जाते. कात्रीचा चुकून धक्का मयंकला लागतो आणि मोठा आवाज होऊन मयंकचा फुगा फुटतो. पूर्वीपेक्षा मयंक जरा नॉर्मलला येतो. तिथून कसाबसा पळ काढतो. हा प्रवास इथेच थांबत नाही कारण विविध संकटांपासून वाचण्यासाठी मयंकची खटपट सुरूच राहते. पुढील प्रवासात टॉर्चलॅम्पने मयंकला विमान समजणे- संवाद साधत मनातील व्यथा मांडणे, कॅटरपिलरशी भेट, त्याने दिलेली डार्क आणि मिल्क चॉकलेट्स खाल्यानंतर मयंक पूर्वीप्रमाणे अगदी 'नॉर्मल होणे' असा रंजक प्रवास होत राहतो.

कादंबरीच्या पुढील भागातही मयंकसमोर वेगवेगळ्या अडचणी निर्माण होतात. मिडिया राणीने दिलेल्या पार्टीत जाणे, तिथे शोषणाचा सामना करावा लागणे व तिथून कसेबसे बाहेर पडणे यातून कथानक पुढे सरकते. त्या वेगळ्या विश्वात मयंकच्या हातून खूप गुन्हे घडले असे मानून मिडिया राणीच्या दरबारात मयंकवर केस चालते. त्याला गुन्हेगार ठरवून सगळ्यांच्या मागणीनुसार त्याला त्या वस्तूंच्या हवाली केले जाते. त्याचा बदला घेण्यासाठी सगळे त्याच्यावर तुटून पडतात आणि ''सोडा, सोडा. प्लीज लीव्ह मी... तुम्ही सगळे वस्तू आहात. नुसत्या वस्तू. ब्लडी गुड्स. तुम्ही माझं काहीही वाकडं नाही करू शकत!'', ''जा तिकडे, चुत्तडांनो! गो अवे! दूर व्हा माझ्यापासून.'' असे म्हणत तो जेव्हा शुद्धीवर येतो तेव्हा तो स्वतःच्या घरी मऊ गादीवर सुरक्षित असतो. त्याचे आई-वडील, भाऊ त्याच्या बाजूला काळजीत व त्याला शुद्ध येण्याची वाट पाहत असतात.

काल पार्टीत घडलेली हकीकत मयंकच्या 'ब्रो'ने घरी सांगितलेली असते. झाल्या प्रकाराबद्दल आई-वडील मयंकला क्षमा करतात आणि 'झालं गेलं विसरून जा आणि यापुढे काळजी घे.' असा प्रेमळ सल्ला देतात. आई त्याचा मूड बदलण्यासाठी जेव्हा (मयंकने) दोन दिवसांपूर्वी मागितलेल्या कार्गोसां पँट आणि टी शर्ट घेण्यासाठी मॉलला जाण्याची आठवण करून देते तेव्हा मयंक घर सोडून तिथून दूर दूर पळत कायमचा ॲमेझॉनच्या जंगलात जातो. तिथे जंगल निवासी होतो. आपली जमात निर्माण करतो.

कथानकाच्या शेवटी या सगळ्या रहस्यमयतेचा खुलासा होतो आणि लेखकाची मयंकाना

लोकसमूहाबाबत जाणून घेण्याची उत्सुकताही कादंबरीच्या समारोपासह शमते.

**'९६ मेट्रोमॉल'मधील संवाद व निवेदनपद्धती:**

अशा पद्धतीची वेगळी कादंबरी लिहिताना त्यातील यंत्रांना सूट होणारे नेमके-प्रभावी संवाद लिहिणे आव्हानात्मक आहे; पण प्रणव यांनी ते सहज- सुंदर पद्धतीने साकारले आहेत. आकर्षक- आशयानुरूप आलेले संवाद, अधूनमधून जाणीवपूर्वक पेरलेली जिंगल्स, यांत्रिक गाणी आणि यंत्रानुसार/ पात्रानुसार बदलणारी भाषा यामुळे या नव्या कादंबरीचे प्रवाहीपण टिकून राहते. कथानकामुळे वाचकाची उत्सुकता ताणली जातेच; पण त्याचसोबत वाचताना हे सगळं खोटं आहे, काल्पनिक आहे हे माहीत असूनही लेखकाच्या सहज सुंदर शैलीमुळे वाचक कादंबरीशी बांधून राहतो.

आधुनिक जगण्यात तरुणांच्या तोंडी सहजासहजी वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा कौशल्याने वापर केलेला आहे. अगदी काही शिव्याही कादंबरीत जागोजागी येतात पण त्या उपऱ्या न वाटता सहजतेने येतात व तरुण नायकाच्या मनातील असंतोष- वैताग आणि राग व्यक्त करतात. उदा. ''ब्रो, घरी मॉम- डॅडूला सांगेल. सांगू दे, तेही काही चुत्तड नाहीयेत...'', ''आणि पुन्हा आपली फाटलीय असं समजलं तर ब्रो आपल्याला ब्लॅकमेल करेल.'' (पृ.१६) ''कक्! आय ॲम स्क्रूड अप.'' (पृ.३९) या व अशा काही शिवराळ वाक्यांची नोंद कादंबरीत आहे. कादंबरी व कथानकाची गरज म्हणून आलेली भाषा, संवाद नायकाचे एकूण व्यक्तिमत्त्व प्रकट करतात.

कादंबरी पूर्णतः नायक, त्याचे विचार- (भाव) विश्व या भोवती फिरत असल्याने कादंबरीत प्रथमपुरुषी निवेदन आलेले आहे.

**मोजक्या व्यक्तिरेखांचा प्रभावी वापर:**

कादंबरीत नायक मयंक, त्याचा मोठा भाऊ 'ब्रो', त्याचे मॉम- डॅडू आहेत. काल्पनिक जगात गेल्यावर तिथली मोबाइल ड्यूडसारखी यंत्रे, मिडियाराणी, कँडी, लिपस्टीकपासून तर फ्रीज, टीव्ही, मायक्रोवेव्ह, हॉर्नीपॉर्नी, रेडिओ अशी साधनेही व्यक्तिरेखांच्या स्वरूपात मांडलेली आहेत.

नायककेंद्री कादंबरीत मयंकचे बोलणे त्याची व्यक्तिरेखा ठळक करते. जसे: ''लाईफमध्ये फार हॉलोनेस वाटतो ना मला की, मी सरळ कार काढतो आणि गोव्याला जातो मित्रांबरोबर. मस्तपैकी बीचवर लोळत बियर पितो. पबला जातो. नाहीतर म्युझिक ऐकतो, टी.व्ही. पाहतो. मला असं रिकामपणं नको असतं म्हणजे मी ते फेसच नाही करू शकत कधी. सारखं काहीतरी हॅपनिंग पाहिजे ना. तुझं बरंय, तुला ते जन्मापासूनच मिळालंय. बट आय डोन्ट वॉन्ट टू फेस दॅट.'' (पान ७३) अशी स्वतःची ओळख आणि वर्तन याविषयी बोलताना तो वयानुसार असणारा अल्लडपणाही व्यक्त करून जातो. एक तरुण व्यक्तिरेखा म्हणून त्याचा जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, सारासार विचार आणि समकालीन वास्तव यांचा मेळ या व अशा वर्णनांतून येतो.

लेखकाने काल्पनिक जगातील परिसर चित्रणदेखील कौशल्याने केलेले आहे. कथानकातील नाट्यात्मकता आणि बिनधास्तपणा हे विशेष कादंबरीत आहेत.

**'९६ मेट्रोमॉल'मधील तत्त्वज्ञान- सूचकत्व:**

आजची कादंबरी ही केवळ मनोरंजनासाठी नाही. ती जीवनाला अधिक भिडताना आणि मानवी जगण्याचे विविध पैलू शोधताना दिसते. तिच्यातील विचार, दृष्टिकोन आणि एकूणच चिंतन आपल्याला काय देते- सांगते-सुचविते त्यानुसार कादंबरीचे जीवनमूल्य, उपयुक्तता आणि एकूणच दर्जा ठरतो. आजची आधुनिक कादंबरी ही जगण्याला कवेत घेणारी, आपले प्रश्न आणि जगणे गंभीरतेने मांडणारी आहे. वाचकाला मनोरंजनाचे दोन क्षण अनुभवायला देतानाच असेच काहीसे अंतर्मुख करायला लावणारे विचारही कादंबरी समर्थपणे देते. मार्केटिंग- बाजार- मोठमोठे मॉल- अनावश्यक शॉपिंग- अंगावर धडकणाऱ्या भडक जाहिराती यातून ढवळून निघालेले आजचे भयाण वास्तव, हेच जीवन- ऐश आहे असे मानून त्यात अडकून पडणारी आपली व्यवस्था (विशेषतः तरुणाई) आणि त्यातून निर्माण होणारे शेकडो गंभीर प्रश्न '९६ मेट्रोमॉल' ही कादंबरी कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे समोर मांडते.

एकूणच, भौतिक जगणे- ऐश करणे याचा दुष्परिणाम म्हणून मयंकवर येत जाणारी विविध संकटे याची रंजक वर्णने येतात. भोगवादाकडे सरकल्याने काय सहन करावे लागू शकते, शोषण होऊ शकते याचा सूचक इशाराही कादंबरी देते. आपल्याला साधने भरपूर मिळाली; पण ते वापरण्याचे शहाणपण येणे बाकी आहे. त्यामुळे भावनेच्या आहारी

जाऊन भौतिक सुखांच्या मागे जाताना आपण माणूस आहोत ही जाण व माणसाचे नैसर्गिक- सहजसुंदर जगणे हरवू नये, असा विचार करण्याची गरज कादंबरी अधोरेखित करते.

शहरी- बाजारी- आधुनिक- वरवर चकाचक वाटणाऱ्या जगण्याला वैतागून नायकाचे शेवटी थेट घनदाट जंगलात कायमचे निघून जाणे म्हणजे पलायनवाद नाही तर त्याला खरे जगणे समजले असण्याची ती नांदी आहे. पुढे तो (एक पूर्वज/ माणूस) निसर्गाशी एकरूप होतो. जगण्याची मूलभूत प्रेरणा ओळखून आयुष्य जगतो, असे भविष्यात घडण्याची शक्यताही विचारस्वरूपात लेखक व्यक्त करतो. जगातील कितीतरी विचारवंतांनी 'निसर्गाकडे चला' अशी मांडलेली विचारसरणी आणि या कादंबरीतील विचार- तत्त्वज्ञान यांचा जवळचा संबंध आहे, असे वाटत राहते. बाजारू आणि दिखाऊपणात माणूसपण हरवून बसणे, माणसाने वस्तूंचा अमर्याद वापर केल्याने या भौतिक वस्तूंशिवाय आपले जगणे अपूर्ण- अशक्य आहे असे वाटल्याने माणूस आजही त्या वस्तूंना दूर सारायला/ त्यांचा वापर मर्यादित ठेवायला तयार नाही. परिणामी, आपण वस्तू वापरण्याऐवजी वस्तूच आपल्याला वापरत आहेत की काय अशी आजची स्थिती झाल्याचेही सूचकत्व कादंबरीत आहे.

**'९६ मेट्रोमॉल'चे वेगळेपण व वैशिष्ट्य:**

'९६ मेट्रोमॉल'मध्ये पारंपरिकता- समकालीनलेखन ट्रेण्ड्स टाळलेले आहेत. वाचक- काळाची मागणी किंवा एकूणच इतर साहित्यबाह्य अशा कोणत्याही घटकांचा फारसा विचार न करता वेगळे, आव्हानात्मक 'सायन्स फिक्शन' मांडले आहे. असे प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

काल्पनिकता आणि वास्तव यांची कौशल्यपूर्ण सरमिसळ हे या लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. एकीकडे अद्‌भुत- रंजक वर्णने करताना लेखक दुसरीकडे परखड वास्तवही मांडतो. त्यामुळे ही कादंबरी रंजक- प्रयोगशील- नावीन्यपूर्ण तर ठरतेच; पण त्याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे धाडसी ठरते.

'९६ मेट्रोमॉल'मध्ये आशयाच्या गरजेनुसार लेखकाने तरुणांच्या तोंडी असणारी भाषा वापरली आहे. आधुनिक व बिनधास्त आकर्षक शैलीचा कौशल्याने वापर गरजेनुसार निवेदनात आहे. या कादंबरीची भाषाशैली जिवंत- प्रत्ययकारी असून आजची तरुण पिढी, त्यांचे विविध प्रश्न, मानसिकता व आजचे जग फिक्शनरूपात मांडण्याचा लेखकाचा प्रयत्न कौतुकास्पद व बऱ्याच अंशी यशस्वी ठरला आहे.

हरवलेली निरागसता, वाढते व्यापारीकरण, सोकावलेला सुखलोलूप काळ, माणसाचा वाढता उपभोगवाद, संकुचित- केंद्रित उपयुक्ततावाद, प्रत्येक क्षेत्रात झालेले वस्तुकरण आणि समग्र मानवजातीचे झालेले ग्राहकीकरण याचे दर्शन कादंबरीतून घडते. बाजारपेठेतील विविध जाहिराती, कंपन्यांचे आग्रहीपण, विक्री कौशल्ये यातून सर्वसामान्यांचे या बाजारपेठीय गणितात अडकून पडणे या कटू/कडू वास्तव परिस्थितीला कार्टुन्सची काल्पनिक दुनिया आणि त्यासदृश्य वर्णनांतून गोड कोटिंगसह मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

लेखकाने मनोगतात म्हटले आहे, ''काही गोष्टी आपोआप येत गेल्या.'' पण कोणतेही लेखन विशेषतः कादंबरी लिहिताना विशेष प्रयत्न करावे लागतात आणि त्यासाठी अधिक एकाग्रता आवश्यक असते. ती साध्य करण्यासाठी त्यात मनाने सतत अडकून राहावं लागतं. मनातील आशय- वस्तुस्थिती- विचार- चिंतन यात योग्य समतोल साधत योग्य दिशेने ठरवून लेखनप्रवास करावा लागतो. पूर्णतः वेगळे वातावरण- वेगळे विश्व व तिथे घडलेले घटनाक्रम जाणीवपूर्वक मांडताना कल्पित वास्तवाचा कौशल्यपूर्वक वापर करताना लेखकाला किती तारेवरची कसरत करावी लागली असणार याची कल्पना येते. दोन वेगवेगळ्या पातळ्यांवरचे जगणे शब्दांत- घटनाक्रमात पकडून नेमकेपणाने मांडण्यात लेखक प्रणव सखदेव '९६ मेट्रोमॉल'च्या निमित्ताने यशस्वी झाले आहेत, असे निः संदिग्धपणे नोंदवावेसे वाटते.

त्यामुळे '९६ मेट्रोमॉल' ही आशय- विषयदृष्ट्या एक पूर्णतः वेगळी आणि नव्या धाटणीची कादंबरी असून ती आजचे जगणे कवेत घेऊ पाहणारी अद्‌भुतिका- लघुकादंबरी आहे. तिच्यात नावीन्य आहे. प्रयोगशीलता आहे आणि धाडसही आहे. भविष्यात अशा आशयगर्भ, रंजक व वेगळ्या कादंबऱ्या पाहावयाच्या असतील, वाचावयाच्या असतील, तर या कादंबरीची नोंद घेणे आवश्यक आहे.

**डॉ. राहूल अशोक पाटील**


चलभाष : ९८९०८७२४२६ lrpatil766@gmail.com

◆◆

मा. प्रतिभा राय लिखित आणि मा. उमा दादेगावकर अनुवादित ‘पुण्यतोया’ या कादंबरीवरील परीक्षण.

# पुण्यतोयाः बलात्काराच्या प्रश्नाला भिडणारी कादंबरी

प्रा. किरण गाढवे




पुस्तकाचे नाव : **पुण्यतोया**
लेखिका : **प्रतिभा राय (ओडिया)**
अनुवाद : **उमा दादेगावकर**
संपादनः **कविता महाजन**
प्रकाशकः **मनोविकास प्रकाशन, पुणे**
ओडिया भाषेत १९७९ ला प्रकाशित झाली.
पृष्ठेः २४७  किंमत : २४०/-

भारतीय भाषांतील विविध लेखिकांमध्ये प्रतिभा राय यांचे स्थान त्यांच्या लेखनामुळे महत्त्वाचे मानले जाते. ज्ञानपीठ विजेत्या लेखिका प्रतिभा राय यांनी इ.स.१९७७ मध्ये ‘पुण्यतोया’ ही कादंबरी लिहिली. उमा दादेगावकर यांनी प्रस्तुत कादंबरीचा अनुवाद केलेला असून, कविता महाजन यांनी संपादन केले आहे. ओडिया भाषेतील महत्त्वाची असणारी ही कादंबरी मराठीत इ.स २०१२ साली भाषांतरित स्वरूपात प्रकाशित झालेली आहे.

विवाहित स्त्रीवर झालेला बलात्कार आणि त्यामुळे उद्ध्वस्त झालेले तिचे आयुष्य, हा कादंबरीचा मुख्य विषय आहे. ज्या काळात ही कादंबरी लिहिली गेली त्या काळातील बलात्काराचे प्रमाण आणि आत्ताचे प्रमाण यात मोठा बदल झालेला आहे. सध्या या घटना सर्रास घडताना दिसत आहेत.

‘वर्षा’ ही कादंबरीची मुख्य नायिका. तिच्यावर आकस्मितपणे बलात्काराचा प्रसंग ओढवतो आणि याच घटनेतून वर्षाच्या आयुष्याला वेगळे वळण प्राप्त होताना दिसते. घटना घडल्यानंतर नातेवाईकांपासून नवऱ्यापर्यंत तिचा कोणीही स्वीकार करत नाही. मानवाने निर्माण केलेला समाज स्त्रिया व त्यांच्या सर्वांगावर कशा

पद्धतीने घाण पसरवत राहतो याचे उदाहरण 'वर्षा'च्या माध्यमातून पाहता येते. बलात्काराच्या घटना सध्याच्या काळामध्ये सर्रास घडत असल्याने समाजाचे मन हे निबर बनत चाललेले दिसते. स्वबळावर जगण्याचा प्रयत्न करता करता एक दिवस आपले पति कल्लोळ आपल्याला माफ करतील व घरी घेऊन जातील ही भाबडी आशा वर्षाच्या मनात आयुष्यभर असलेली दिसते. त्यामुळेच ती दुसऱ्या लग्नाचा विचार करत नाही. 'निशिथ' हा तिला साथ द्यायला तयार आहे; परंतु त्याचाही स्वीकार ती करत नाही. मानसिक पातळीवरील स्त्रियांच्या मनातील द्वंद्व 'वर्षा'च्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न लेखिकेने सूचकपणे केलेला आहे. आपल्यावर जो प्रसंग ओढवला त्याला आपण कारणीभूत नाही. त्यामुळे त्यात आपला दोष नाही. 'वर्षा'ला याची कल्पना आहे. तिचे पती 'कल्लोळ' यांना देखील 'वर्षा'चा दोष नाही हे माहिती आहे; परंतु तरीही ते तिचा स्वीकार करू शकत नाहीत. पुरुषी मानसिकता ही किती खोलवर मनात संचार करते. समाजाचा विचार व स्त्री मनाचा विचार यांच्यामधील दरी मानसिकतेत अशा पद्धतीने खोलवर रुतलेली आहे. तिच्यावर अतोनात प्रेम करणारे तिचे पति 'कल्लोळ' तिच्या मनाचा विचार करू शकले नाहीत; पण नाईलाजास्तव त्यांनी तिला घरात घेतले; परंतु तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला नाही. या सर्व बाबींमुळे 'वर्षा' आणि 'कल्लोळ' हे पति-पत्नी दोघेही मानसिक दृष्टीने खचलेले दिसतात. त्यामुळेच ते एकमेकांना सोडण्याचा विचार करतात. विशेषतः 'वर्षा' तसा विचार करते. दुसरे लग्न करून 'कल्लोळ' आपला संसार बसवण्याचा प्रयत्न करतो; पण आयुष्यभर 'वर्षा'चा विचार त्यांच्या मनात घर करून राहतो. चारित्र्यहनन झालेली वर्षाच त्यांच्या डोळ्यासमोर आयुष्यभर राहते. एकंदरीत विवाहित स्त्रीवर बलात्कार झाल्यावर तिचे आयुष्य कशा पद्धतीने पालटून जाते, समाज व कुटुंब स्त्रीकडे कोणत्या नजरेने पाहते हे कादंबरीतून मांडलेले दिसते. पुण्यतोया ही कादंबरी 'वर्षा' ह्या विवाहित स्त्रीवर झालेल्या बलात्काराच्या प्रश्नावर बेतलेली असली तरी, या कादंबरीतून अशा महिलांचा सांभाळ करणाऱ्या महिला आश्रमाचे नागडे सत्य समोर येताना दिसते. 'वर्षा'ला सुद्धा 'सरस्वती हॅप्पी होम'मध्ये गेल्यानंतर अशा प्रकारच्या प्रसंगाचा सामना करावा लागलेला दिसतो. हॅप्पी होमच्या नावाखाली स्त्रियांकडून करून घेतला जाणारा वेश्याव्यवसाय या कादंबरीतून समोर येतो. या सर्व प्रकारच्या अत्याचाराला बळी पडणाऱ्या स्त्रिया निमूटपणे हे सर्व सहन करतात. महिलाश्रमातील संचालिका स्त्री असून देखील त्यांनाही या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवता येत नाही. ''प्रत्येक अन्यायाचा प्रतिकार करण्याचा मार्ग आहे; पण त्या विषयाचा विचार करण्याचा मला अधिकार नाही. माझ्या स्वतःच्या संसारातल्या दुःखाच्या भाराखालीच मी इतकी दबले गेले आहे, की दुसऱ्या कुठल्याही गोष्टीचा विचार करण्याची माझी इच्छा नाही अन् अट्टहास तर नाहीच. हं, पण एक लक्षात ठेव, या अन्यायाचा विरोध करण्याचा विचार जरी केलास तरी नुकसान तुझंच होईल.'' (पृ.१३५) अशा प्रकारे हॅप्पी होमच्या संचालिका हे काम करण्यास मजबूर असलेल्या दिसतात व त्यांनी आत्मसमर्पण केलेलेही दिसते. नाईलाजास्तव एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला कोणत्या पद्धतीने वागणूक देते हे सत्य या कादंबरीतील प्रसंगातून समोर येते. आईचे मुलीवरील संस्कारच अशा पद्धतीचे पारंपरिक असतात की, 'स्त्रियांची भावना ही पुरुषांच्यापुढे समर्पणाची असावी' पुरुषांनी अनाकलनीय पद्धतीने स्त्रियांचा उपभोग घेतलेला असतो, तरीही स्त्रिया पुरुषांना मनमोकळेपणाने माफ करतात; परंतु 'पुण्यतोया' कादंबरीतील नायिका 'वर्षा'वर बलात्कार झालेला आहे. त्याच्यामध्ये तिची चूकही नाही. तरी तिचा नवरा तिला माफ करत नाही हे सत्य या कादंबरीच्या माध्यमातून प्रतिभा राय यांनी मांडलेले दिसते. हा विषय भारतातील असंख्य महिलांच्या संदर्भातील आहे. विवाह हा फक्त लैंगिक भावनांची पूर्तता करण्यासाठी असतो का? ह्या भावना फक्त पुरुषांनाच असतात का? स्त्रियांच्या मनाचा यात किती प्रमाणात विचार केला

जातो? वर्षाची चुकी नसताना नवरा, नातेवाईक, समाजाने तिला का स्वीकारले नाही? असे अनेक प्रश्न वर्षाच्या माध्यमातून कादंबरीतून पुढे येत राहतात. आपली स्वतःची चूक नाही अशी भावना 'वर्षा'च्या मनात सुरुवातीच्या काळात होती. ती असा विचार करते की, माझं मन बंड करून उठलं. का नाही स्वीकार करणार समाज माझा? माझा दोष काय आहे यात? माझ्या स्थितीला मी जबाबदार नाहीये. मी काही आपल्या मर्जीनं राजीखुषीनं कुठल्या परपुरुषाच्या स्वाधीन झाले नाही. (पृ.६४) असे विचार तिच्या मनात येतात; पण पुढे जे घडले ते वर्षाचे आयुष्य उद्‌ध्वस्त करणारे होते. समाज तिच्याकडे पतिता म्हणूनच पाहतो. तिचा कोणी स्वीकार करत नाही. तसेच ज्या ठिकाणी जाईल त्या ठिकाणी तिला अन्याय-अत्याचाराचा, मानहानीचा सामना करावा लागतो. वर्षा ज्या ठिकाणी नोकरी करायची तिथेही तिला असल्या प्रसंगांचा सामना करावा लागला; परंतु 'निशिथ'सारखे काही चांगले पुरुषही या समाजात आहेत हे या कादंबरीतून समोर येते. अर्थात 'निशिथ'नेच तिच्यावर काही कारणास्तव बलात्कार केलेला असतो; पण त्याला त्याची चूक उमगते व तो 'वर्षा'चा स्वीकार करायला तयार असतो. तिचे आयुष्य माझ्यामुळे उद्‌ध्वस्त झाले ही खंतही त्याच्या मनात होती. 'निशिथ' हे वेगळे पात्र कादंबरीत रेखाटलेले आहे. 'निशिथ'च्या रूममधील लिहिलेले 'गोल्डस्मिथ' यांचे वाक्य स्त्रियांच्या जीवनाला विशेषतः अशा पीडित स्त्रियांच्या जीवनाला उभारी देणारे आहे. 'पतन न होणं ही काही मोठी विशेष गोष्ट नाही तर पतनातून उभारी घेणं ही मोठी विशेष गोष्ट आहे.'
(पृ. १३९)

स्त्री व पुरुषांनीही या वाक्यातून बोध घ्यावा हे कादंबरीतून सुचवलेले दिसते. एकंदरीत कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचे स्त्रीजीवनविषयक सखोल चित्रण प्रस्तुत कादंबरीत येताना दिसते. समाजातील विकृत प्रवृत्ती, धारणाही यातून मांडलेल्या दिसतात. 'अपराधी आणि अपराधामध्ये शिकार झालेली 'स्त्री' या दोघांकडेही समाज दोषी म्हणून पाहत असेल, तर हा सामाजिक मानसिकतेचा दोष आहे 'स्त्री'चा नव्हे, हेच प्रतिभा राय यांना अधोरेखित करावयाचे आहे. बलात्काराचे प्रमाण कमी असताना ही कादंबरी लिहिली गेली; परंतु आज त्याचे प्रमाण अधिक वाढले असल्याने व भविष्यातही यात फार बदल न होण्याची चिन्हं दिसत असल्याने ही कादंबरी सार्वकालिक ठरते. 'प्रतिष्ठा ही गोष्ट केवळ आणि केवळ स्त्रियांशी संबंधित आहे, पुरुषांशी नाही' ही बाबसुद्धा कादंबरीत सूचकपणे मांडलेली दिसते. प्रतिभा राय यांची भाषा शैलीदार नाही. साधी, सरळ आहे. घटना मांडून तिच्यातून काहीएक निष्कर्ष काढणं किंवा त्यातून काहीएक तत्त्वज्ञान मांडणं, अशा सरधोपट वाटेने त्या जातात. भावव्याकुळ भाषा, रोमँटिक दृष्टिकोन, पारंपरिक तत्त्वज्ञानाचे उपदेशवजा डोस, सुविचारांचा मारा यामुळे मराठी वाचकांना त्यांचे लेखन काहीसं दूरस्थ वाटू शकेल; पण त्यातलं वास्तव त्यामुळे झाकोळलं जात नाही. (पृ.१५) कविता महाजन यांचे हे मत विचारात घेतले तर, कादंबरीत मांडलेला विषय व समाजातील दाहक वास्तव याची कल्पना येते. अपवादात्मक स्वरूपात साहित्याने अशा विषयाची दखल घेतलेली असली तरी या विषयाच्या अनुषंगाने काहीएक दखल घेतली जात आहे, ही बाब निश्चितच आशादायी आहे.

**प्रा. किरण गाढवे**
चलभाषः ९९२१४९४६९३

◆◆

मा. दा. गो. काळे यांच्या 'आरण्याहत' या काव्यसंग्रहावरील समीक्षालेख.

# आदिबंधात्मक जाणिवेची तरल कविताः 'आरण्याहत'

प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे

आदिबंध ज्याला इंग्रजीमध्ये आर्किटाईप्स असे म्हटले जाते. आदिबंध हे मूल मूलाकार असतात. ग्रहचक्र, ऋतुचक्र, जीवनचक्र हे सनातन आहे. उत्पत्ती, विकास आणि लय हे मूलतत्त्व आहे. आदिबंध हा मूलाकार आकृतिबंध आहे जो हजारो वर्षांपासून चालत आलेला आहे. या मूलतत्त्वाला प्रतीत करणाऱ्या सृष्टिचक्रातील अनेक बाबी आहेत. ब्रह्मा, विष्णू, महेश हे उत्पत्ती, विकास आणि लय यांचे आदिबंध आहेत. सूर्योदय, माध्यान्य, सूर्यास्त हेसुद्धा आदिबंध आहेत. सूर्य-चंद्र हे आदिम आहेत. या मूलाकारांना सृष्टी तत्त्वामध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ऋतुतत्त्व, पंचमहाभूते, ब्रह्मांडाची किमया, मानवी जगण्याशी संबंधित अनेक घटक आदिम आहेत. मानवी जीवनातील आदिमता ही सर्व विश्वव्यापी आहे. मानवाच्या जाणीव आणि नेणिवेचा अपरिहार्य भाग आहे. आई, माता, महामाया, पिता, स्त्री, पुरुष, साप, म्हातारा, वाटाड्या, चंद्रोदय, चंद्रास्त असे अनेक मूलाकार मानवी नेणिवेमध्ये जाऊन बसलेले आहेत. अरण्य हा एक सनातन असा आदिबंध आहे. जो मानवी जगण्याचा सृष्टिचक्राचा अपरिहार्य असा भाग आहे. मानवी जगण्याची गुंतागुंत, व्यामिश्रता, आशा, निराशा, श्रद्धा, अश्रद्धा, संकल्पना, समजुती, रूढी, परंपरा, स्वप्ने, तत्त्वज्ञान, क्रूरता, अंधार, उजेड अशा अनेक परस्पर बाबींना आपल्यामध्ये सामावून आहे. मानवी मेंदू ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यात असणारी आरण्याहत नेणीव टिपणारी कविता दा.गो.काळे यांनी लिहिली आहे. यातील जाणीव ही दुहेरी स्वरूपाची आहे. एक वैयक्तिक निश्चेतनाची म्हणजे सिग्मंड फ्रॉइड म्हणतो तशी ती अबोध मन उकलण्याची प्रक्रिया आहे, आणि दुसरे म्हणजे सामूहिक निश्चेतनाची म्हणजे कार्ल युंग म्हणतो त्याप्रमाणे ही पिढ्यानपिढ्या संक्रमित होत आलेली नेणीव आहे. संस्कृतीचे अनेक घटक त्यात समाविष्ट आहेत. प्रतिमा, प्रतीकांच्या माध्यमातून दा. गो.काळे यांनी हे आदिबंध आपल्या कवितेतून मांडले आहेत. सर जेम्स फ्रेजर यांनी लोकबंधाचे आदिबंध सांगितले आहेत. मानवी वृत्तीप्रवृत्ती, नातेसंबंध, स्वर्ग- नरक, आस्थास्थळे इत्यादी सारे आदिबंधातून व्यक्त होते. मानव आणि प्रकृती यांच्यात सौख्यभाव आणि सहज सहानुभाव असतो तो लेखक मांडत असतो.

दा.गो.काळे ह्यांच्या 'आरण्याहत'मध्ये एक वेगळी आदिम जाणीव मनात तरळून जाते. कवीला आदिम प्रतिमा, प्रतीकांतून प्रेमाचा आणि आपला शोध का घ्यावासा वाटतो? यांचे उत्तर आपली ती आदिम प्रवृत्ती आहे. म्हणजे मला पु.शि. रेगे, पाडगावकर, आदिमायावाले करंदीकर डोळ्यासमोर उभे राहिले. त्यांचा प्रभाव दा.गों.च्या कवितांवर अशा अर्थाने नाही; पण या एका प्रवाहाची प्रवृत्ती आपल्या डोळ्यासमोर येते. या कवितेत चंद्राच्या प्रतिमा पाहिल्यानंतर बा.भ.बोरकरांची सौंदर्यवादी कविता डोळ्यापुढून तरळून गेली. प्रेमाविषयीची ओढ, धूसरता,

तरलता, अनामिकता, विरह त्या अनुषंगाने येणारी संवेदनशीलता ही पोक्त वयात व्यक्त व्हावी या जाणिवेचे मला कौतुक वाटले. सामाजिक प्रखर जाणीव असणारा समीक्षक आणि तरल भावकाव्य, आदिबंधात्मक जाणिवेतून व्यक्त करणारा कवी, ही दोन रूपे जेव्हा एका ठिकाणी पाहतो तेव्हा आपण अचंबित होतो. ही कविता यांनी लिहिलीच नसावी असे वाटते. सामाजिक जाणिवेत असणारा विचारांचा, प्रचाराचा आकृतिबंध बाजूला सारून नव्या, आपल्या नेणिवेतील भावविश्वाला प्रतिमारूप देण्याचे अवघड काम दा.गो.काळे यांच्यातील कवीने करून त्यांच्यातील समीक्षकावर मात केली आहे. मनाचे अरण्य हे घनदाट असते. त्यात असतो काळोख आणि फांद्यांमधून येणारे कवडसे. असा ऊन सावलीचा हा खेळ सतत चालू असतो. तो टिपणं म्हणजे आपल्या मनावर आपला सतत पहारा असावा लागतो. हा पहारा ठेवणे वेदनादायी असते. दा.गो. आपल्या निबिड अरण्यात शिरले आहेत. तिथे जे दिसते आहे ते चातक चोचीने टिपत आहेत. या त्यांच्या भावविश्वात आहे ती विशुद्ध प्रेमाची भावना. प्रेम या भावनेचा होणारा सर्वव्यापी साक्षात्कार.

'तुझ्या अस्तित्वाच्या आसमंती आरशात' ही कविता व्यापक आहे. तिच्या शोधाचा एक प्रवास सतत चालू आहे. ती सापडत नाही ही खंत आहे. त्यामुळे उत्कंठा वाढत वाढत चालली आहे. तीत आणि त्यात अद्वैत आहे. ती रोमारोमात भिनली आहे इतकी ती आदिम आहे. 'आत्मविश्वासाचं अस्तर' ही सुंदर प्रतिमा योजून कवी 'प्रतिबिंबाची सावली' ही आणखी एक नावीन्यपूर्ण प्रतिमा योजतो. ती तो सर्जनात्मक रूपात पाहतो म्हणून तिला 'अस्तित्वाचा आसमंती आरसा' अशा द्विपदात्मक प्रतिमेमध्ये पाहतो. 'स्वप्नातील नवलाईची कोर' या कवितेत हे अद्वैत पुन्हा वेगळ्या पातळीवर व्यक्त होते. त्याच्या इच्छांना तो आदिम 'अभ्राच्छादित पिंजनकापसी इच्छा' म्हणून उजागर करतो. या प्रतिमांतून त्या पातळीपर्यंत ज्या अनुभवाचे सार आहे ते म्हणजे ही कविता आहे.

'तू तर पृथ्वी तत्त्वाचे
चिर निरंतर विधान
तुझ्या पावलांना
ओढ ओढून घेणाऱ्या
या दुभंगणाऱ्या जमिनीची'

तिची शाश्वतता तो व्यक्त करतो आहे. ती म्हणजे एक आदिबंध आहे. त्याच्या नेणिवेत ती आहे ही भावना आदिबंध या कवितेत व्यक्त झाली आहे. 'सावलीचे उबदार वर्तमान', 'भविष्याच्या ओळीवरची अमर्याद ओढ', 'आभाळभर साठवणीतील करुण गोष्ट' अशा प्रतिमांच्या माध्यमातून त्यांचे नाते व्यक्त होते. तो अशी द्विपदात्मक अनुभूती मांडत जातो.

ती आईच्या आदिबंधाच्या रूपाने त्यास दिसते.

'माये तू
उखळातून सुपात पसरलेल्या
घडीव वेदनांचा आदिबंध
आमच्या निर्मितीची खगोल धग'

'प्राक्तनांचे क्षण उत्सवी अंगण' या कवितेत विलोभनीय प्रतिमा येतात. 'गोठत चाललेल्या संधीछेदी', 'मनभोर दिवे' यातून ती प्रकटते. इंद्रियसंवेद्य प्रतिमांतून दिसते. 'किती अव्यक्त जाणिवांचे कोपरे' या कवितेत ही ओढ अधिक प्रखर होते. त्याची मिलनोत्सुकता ही शिगेला पोहचली आहे. जगण्यातील अपरिहार्यता ती आहे.

'हे महामाये
आतातरी येऊ दे
या कंठात रुतलेले विद्रोहाचे
संयत गाणे'

त्याची स्थिती आणि गती तो व्यक्त करतो आहे. तिचे अदृश्यपण हे त्याला छळणारे आहे. मनाची व्याकुळता तो ढवळत राहतो. त्याला तिची सौंदर्यात्म ओढ आहे. या विषयीची 'चंद्रबिंबाची प्रकाश ओढ' ही कविता आहे. तिच्या आगमनाची चाहूल त्याला सतत लागते आहे. ती त्याला व्यापून उरते आहे. तसे ते दोघेही आदिम आहेत ही भावना तो मांडतो.

'तू पृथ्वी भेदणारी अवकाशी
आकाश ओढ
मी उजेडाची गाणी गाणाऱ्या
सूर्यसुताची कारुणिक गाथा'

असे हे परस्पर नाते स्पष्ट होते. तो तिच्याकडे मागणे मागतो आहे. तो तिला माये, आदिमाये अशी संबोधने वापरतो आहे. त्या आदिमातेचे एक रूप 'बाया' या कवितेत दिसते. बाया ह्या तशा गूढ, सोशिक असतात. आयुष्यातील अनेक प्रसंगांना त्या सामूहिकपणे सामोरे जातात. त्यांच्या वेदना ह्या अव्यक्त असतात. त्या अनवट वाटांवरून चालत राहतात. जन्मोजन्मी. त्या बायकांचे मन कवी मांडतो आहे,

'काय बोलत असतील बाया
एव्हढ्या तन्मयतेने
तळ्याच्या काठी

पदराआडुन एकमेकांशी
हे अनंतकाळचे अबोलपण
की अरण्यरुदन'

बायकांचे कारुण्य हे आदिम आहे. त्या अंधार तुडवत राहतात, आणि निघतात जंगलाकडे असे कवी सूचित करीत आहे. कवी स्वत:च्याकडे 'पुरुषी अहंता' या कवितेत पाहतो आहे. ही दुहेरी तपासण्याची प्रक्रिया आहे. यात आत्मपरीक्षण आहे.

'युगानुयुगे तर मी
तसेच पहात आलोय
तुला एका मांडणीच्या
अचल वेगळ्या विटेवर
मग माझ्यात पुरुषी
अहंकारी अनावर तृष्णा
का पेरली जात असेल युगानुयुगे'

हे पुरुषीतत्त्व तिने बहाल केले होते. त्यामुळे तो तिला मुक्त करत आहे. तिच्यातील मातृत्वभाव हा आदिम आहे.

या संग्रहात अनेक आदिम प्रतिमा आलेल्या आहेत. 'औत्सुक्याच्या क्षणातील चंद्रकोर', 'मंदलयीतला घनगर्द अवकाश', 'लवलवते हिरवेपण', 'जलचरांचे नंदनवन', 'खडक बंध', 'भयावह स्थितीच्या सावल्या', 'उजेड', 'काळाकुट्ट डोह', 'शीलाचे सुजनत्व', 'खिडक्यांचे कप्पे', 'जळजळीत शिर', 'मचुळ दुःख', 'धुरांची वलयांकित वर्तुळ', 'मैत्रीचे बिढार', 'आकुंचलेली देह वाट', 'सळसळता पिंपळ', 'दुःखाचा तार स्वर', 'अस्तित्वाचा अबलख वारू', 'देव डांगर वेल', 'मित्र', 'करुणार्द प्रार्थना', 'भूमी', 'खांडव वनातील आग', 'गर्भार विजा', 'अंधाराचा काळा बुरखा', 'जीवन जाणिवांचे पोपटी कोंब', 'काळे तंबूमय कोषागार', 'दगडी अहंकार' यांसारख्या अनेक प्रतिमांमधून होते.

'एका गर्भार कारागृहातून पुढे ढकलताना
या देहाचे सुपीक गोत्र
सांगत सुटतात
काळे गुलाब पुरविणाऱ्या
दगडी अहंकाराचे जीर्ण फर्मान'

या कवितासंग्रहामध्ये जशी प्रेमाची आदिम भावना व्यक्त झाली आहे तसा आत्मशोधसुद्धा व्यक्त झालेला आहे. कवी स्वतःला खोदतो आहे आणि खोदण्याची प्रक्रिया अव्याहतपणे त्याच्या मनाच्या ठिकाणी चालू आहे, त्यामुळे हा त्याचा स्वतःशी चाललेला एक संवाद आहे. तो दीर्घकालीन चाललेला संवाद आहे, आणि एक अस्तित्ववादी जाणिवेची भावना याच्यामधून व्यक्त होते आहे. ही अस्तित्ववादी जाणीव मी आणि ती यांच्या पातळीच्या बाहेर जाऊन मी आणि विश्व यांच्या पातळीवरसुद्धा व्यक्त होते आहे. त्यामुळे तिला एक सार्वकालिक अशा स्वरूपाचे रूप प्राप्त होते आहे. 'म्लान सूर्य' ही वेगळी प्रतिमा ते वापरतात. कवीच्या मनात ती अनंत काळची तृष्णा आहे. 'आणि तृष्णेची ही जीभ' ही कविता असा आदिम भाव व्यक्त करते.

'या ओठांचे दोन बलदंड काठ
मधुन वाहते कृष्णेची
एक किरकोळ रेष
नदीचा वेश धारण केलेली
ही तृष्णेची प्रीत फिरते
अखंड अहोरात्र'

आपले असणे आणि नसणे याचा विचार तो करतो आहे. नदी ही एक आदिम प्रतिमा आहे. आधीपासून असंख्य धबधबे निर्माण झालेली आहेत आणि त्या नदीच्या असंख्य खुणा मानवी जीवनामध्ये पसरलेल्या आहेत. त्या खुणा श्वेतवर्णीय आहेत. त्याची तृष्णा मात्र ह्या सुकलेल्या लाळेसारखी पांढरीशुभ्र शुष्क आहे. त्यामुळे त्याचे असणे आणि नसणे या काठावर आधारित आहे. त्यामुळे आकांक्षांची हिरवळ त्याच्या मनामध्ये आदिम स्वरूपामध्ये उगवते आहे, आणि उन्मत्त वाळूसारखी अलवार होते आहे. त्यामुळे त्याच्या इच्छा आहेत, त्या इच्छांचा वणवा त्याच्या देहभर पसरलेला आहे. ही जाणीव या कवितेतून व्यक्त होते.

'माळलेल्या फुलांचे गर्भ' या कवितेत कवी आपल्या इच्छांबाबत भाष्य करत जातो. त्यातून त्याच्या पलीकडे असलेली जी तृष्णा आहे. त्याला ती कशी आहे? याबाबत तो सांगत राहतो. या संग्रहामध्ये कवितेविषयीच्या कविता आहेत. त्याच्या मते आतून आलेली गोष्ट असते कविता. ती लिहिली जात नाही. याची जाणीव कवीने व्यक्त केलेली आहे. त्यामुळे माणसाच्या जन्मापासून कविता आहे असे त्याचे भाष्य आहे. परखड असे त्याचे मत आहे. 'कविता निवडते आपल्याला' अशी त्यांची भावना आहे.'बीजा जवळ' हीसुद्धा कवितेची मिथक सांगणारी गोष्ट आहे.

आपणच आपणाला बोलावे, तोलावे, मोलावे आणि मनातल्या घालमेलीला शब्दांकित करावे. खरं तर ओढ ही वेदनादायी असते, मग ती प्रेयसीची असेल किंवा आदिमायेची असेल. ही आदिमाया अनेक रूपांनी आपल्या

मनात वसत असते. छळत असते, आणि आपण तिची व्याख्या करण्याचा प्रयत्न करत असतो. तरीही ती अव्याख्येय आहे. मी आणि ती यांच्यात नक्की अनुबंध काय आहे? याचा शोध तर सनातन आहे. दा.गो.ही आपल्यापरीने या शोधाच्या मागे आहेत. हातात मिळते निसटते अशी त्यांची स्थिती आहे. ही आरशातील प्रतिबिंबे न्याहाळत आपल्या मनाला समजावत राहण्याची स्थिती आहे. खरे तर हा तिच्याशी सांधलेला संवाद आहे, कधी तिची काढलेली समजूत, आपल्या मनाचा समंजसपणा आहे. कधी समांतरपणे जाणारे नातेबंध आहेत. कधी विरोधीपणे प्रकट होणारे सूर आहेत. हे असे तसे, तसे असे हे आपल्या मनाचे खेळ आहेत. त्या खेळास कारणीभूत आहेत त्या आपल्या इच्छा. अमर्याद इच्छा आणि प्रेरणा ह्या मनाला ऊर्जा देत असतात. त्यामुळे ह्या मानवी जीवनाला व्यापणाऱ्या प्रभावी घटक म्हणून दा गों ना वाटतात. त्यामुळे या अंगाने दा गों ना जीवनाचे तत्त्वज्ञान वेगळे वाटते आहे. त्यामुळे व्यक्त व्हायला वयाचे बंधन कशाला? मोकळेपणाने त्यांनी आपल्या संवेदनांना वाट करून दिली आहे. हा प्रदेश तसा मनाच्या पातळीवरचा अज्ञात आहे. त्याला प्रतिमारूप त्यांनी दिले आहे. आपली जाणीव काय आहे? आणि नेणीव काय आहे? हे त्यांना ज्ञात आहे. आपल्या मनातलं गूढ शोधून त्यांनी त्यावर भाष्य केले आहे. हा संग्रह म्हणजे कवीच्या मनातील आरण्याची आहट आहे. मनात सतत विचार जंगलासारखे आडवेतिडवे साचून असतात. त्या विचारांचे विरेचन होणे गरजेचे आहे. त्यामुळे कवी स्वत:ला मांडतो आहे. आपल्या मनाचे सांदीकोपरे व्यक्त करतो आहे, ते मुक्तछंदाच्या माध्यमातून. त्याच्या मनात आहे तो शोध, कधी अंधाराचा, तर कधी प्रकाशाचा, कधी द्वैताचा तर, कधी अद्वैताचा, कधी मिलनाचा तर कधी विरहाचा, कधी पूर्णत्वाचा तर कधी अपूर्णत्वाचा, कधी प्रेमाचा तर कधी त्यागाचा, कधी संकुचित आत्मकेंद्रीत्वाचा तर कधी विश्वव्यापकतेचा. हा खरं तर कवी मनाचा चाललेला झगडा आहे, तो आदिम प्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त करतो आहे. आपण काय आहोत? आपली जाणीव कोणत्या दिशेने जाते? आपली नेणीव कोणत्या दिशेने जाते? असे प्रश्न कवीला पडलेले आहेत. त्याला काय हवं आहे? काय खोदतो आहे? काय खोदायला पाहिजे? ही सारी मनाची घालमेल आहे, ती सारी संभ्रमावस्था आहे. त्यातून बाहेर पडू की नाही हे त्याचे त्याला ज्ञात नाही कारण हे अरण्य आहे. त्याचा ठाव आपणाला लागत नसतो. एक एक गुपित आपणासमोर येत असते. आपण हे असे आहे म्हणत असतानाच दुसरे आपल्या समोर येते. या जंजाळातून सुटका नाही कारण हा अंधार दूरदूरवर पसरला आहे. तरीही निराशेचा लवलेश कवीला दिसत नाही. आहे ती सगळी सकारात्मकता. या मनाच्या जंगलात आपणच आपणास खायला उठतो. आपणच आपणाला ओरबाडायला लागतो. रक्तबंबाळ होतो; पण वेदना ही उरबडवी न होता ती संयत होते. तिला स्वत:चा आकार आहे.

या वेदनेला कारुण्याची झालर आहे. ती खोल बुडालेली नाही. त्यामुळे विफलतेच्या प्रतिमा मांडत नाही. ही खिडकी सतत ताजी तवानी, विरहाचे कवडसे व्यक्त करते. तिला ओढ आहे ती शाश्वत प्रीतीची. कवीची अभिव्यक्ती ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याला जे सांगायचे ते तो तात्त्विकपणे सांगतो आहे. त्याबरोबरच तो लौकिकही सांगतो आहे. त्यामुळे दोन प्रकारची काव्यशैली या संग्रहात दिसते. काही भावनांचे तुकडे तुकडे प्रतिमांच्या माध्यमातून दिसून येतात. ते सुटे सुटे तुकडे आहेत. त्यातून एक कोलाज तयार होते. हे त्याच्या जाणिवांचे तुकडे संवेदनशील आहेत. त्यामुळे पारंपरिक प्रारंभ, मध्य, अंत अशी चौकट ही कविता पाळत नाही. ती अधिक मोकळेपणाने व्यक्त होते. तर काही कविता मोजक्या एकसंध अनुभव देणाऱ्या आहेत. त्यातून पूर्णानुभूती येते. एक वेगळेच कोलाज आरण्याहतमध्ये दिसून येते. ही कविता आवाजी नाही. तिला खळखळाट नाही. जमिनीच्या खाली असणारे पाणी जसे बिना आवाज करता वाहत असते तशी ती मृदू, संथ, शांत लयीत व्यक्त होते; पण वाचकाला विचार करायला लावते. थांबायला लावते. वाचकाला बरोबर घेऊन हे गाणे संवादीपणे पुढे पुढे सरकत राहते. त्या गाण्याला स्वत:चे रंग, रूप, गंध, नाद, आवाज आहे. सुट्ट्या कवितांचा प्रभाव होऊन आपल्या लक्षात राहते ते समग्र एक कोलाज. संपूर्ण संग्रह मुक्तछंदात आहे. या कवितेची शैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. ती तिरकस नाही तशी सरळही नाही, ती आहे चिंतनात्मक. मानवी जीवनावर ती सखोल, चिकित्सक, मार्मिक भाष्य करत राहते. चिंतनाची रूपे विधानांतून प्रकट होत नाहीत, तर ती सूचक आदिम प्रतिमांमधून प्रकट होतात. दोन ओळींमधला भावार्थ हा अधिक सूचक होतो आहे. त्यामुळे प्रत्येक वाचक आपल्या सोयीनुसार त्याचा अर्थ लावतो. त्यामुळे अर्थविस्तारास जागा सोडणाऱ्या या कविता आहेत. अनेक अर्थाच्या शक्यता मांडणाऱ्या आदिम प्रतिमा हे या संग्रहाचे वैशिष्ट्य आहे.

**प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे**
चलभाष : ९९२१८४६१९८

◆◆

कोरोना काळातील साहित्यनिर्मिती आणि साहित्य व्यवहाराचा आढावा घेणारा लेख.

# कोरोना आणि साहित्य व्यवहार

प्रा. डॉ. राजाभाऊ भैलुमे

साहित्याचा आणि समाजाचा अन्योन्य असा संबंध पूर्वीपासूनचा आहे. कार्लाईल यासंबंधी म्हणतो की, 'साहित्य म्हणजे समाजाचा आरसा' तर तेन म्हणतो, 'साहित्य हे देश काळ, परिस्थितीने निहित होत असते.' म्हणजेच समकालीन कालखंडातील घडामोडींचा साहित्यावर विविध अंगाने प्रभाव पडत असतो. या घडामोडींमुळे साहित्य निर्माण होते. स्वतःकडे, समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. ती घटना साहित्याला वेगवेगळे विषय, आशय पुरविते. त्याने साहित्याची भाषा बदलते. असे अनेक परिणाम साहित्यावर समकालीन घडामोडींचे होताना आपणास दिसतात. बऱ्याच वेळा ती घटना कशा स्वरूपाची आहे, समाजातील कोणत्या घटकावर व किती प्रभाव करते, यावरसुद्धा साहित्यावरील त्या घटकाचा प्रभाव ठरतो. कोरोना महामारी ही संपूर्ण जगाला व्यापणारी गोष्ट आहे. त्यामुळे भारतातील सर्व स्तरांतील, प्रांतांतील व्यक्तींवर याचा खोलवर परिणाम झालेला आपणास दिसतो कारण हा आता आपल्या जीवन मरणाचा विषय झाला आहे.

कोरोना साहित्याचे स्वरूप पाहत असताना आपल्या असे लक्षात येते, की सोशल मिडियाच्या गरजेमुळे, स्वरूपामुळे हे साहित्य गाणे, कविता, चारोळ्या, माहितीपर लेख, उपाययोजना सांगणारे लेख अशा स्वरूपाचे आहे. कोरोनामुळे आरोग्य, सामाजिक, राजकीय, धार्मिक व कौटुंबिक इत्यादी क्षेत्रे प्रभावित झाल्यामुळे या प्रभावाने प्रतिबिंबित साहित्य, ऑडिओ, व्हिडीओ व लेखाच्या स्वरूपातील हे साहित्य प्रभावी असे आहे. कोरोनाने आविष्काराची सर्व क्षेत्रे व्यापलेली आपणास दिसतात. यासारखा व्यापक प्रभाव तोही कमी वेळेत यापूर्वी कोणत्याच घटकाचा पडलेला नव्हता, हे यातून सिद्ध होते. कोरोनाच्या साहित्यावर पडलेल्या प्रभावाचे स्वरूप पाहता या साहित्याचे वर्गीकरण वेगवेगळ्या अंगाने करता येते.

१. कोरोनापासून कशी स्वतःची व इतरांची सुरक्षा करावी हे सांगणारे साहित्य.

२. कोरोना महामारीविषयी वैद्यकीय माहिती व कोरोनावरील औषधे, संशोधन या संबंधीचे साहित्य.

३. समाजावरील चांगला, वाईट परिणाम नोंदवणारे साहित्य.

४. कोरोनाने प्रभावित इतर घटकांवरील साहित्य (आरोग्य, अर्थशास्त्र, सामाजिक, विषमता, राजकारण)

५. कोरोनानंतरचे जग कसे असेल, हे सांगणारे साहित्य.

साहित्यामध्ये आपल्या भाव-भावनांचा आविष्कार असतो. प्रत्येक व्यक्तीच्या भावना व शब्द सामर्थ्य यातून तो आपल्या आविष्काराला आकार देत असतो. कोरोना

महामारी सर्वत्र पसरू नये म्हणून लॉकडाऊन जाहीर झाले व काही सूचनाही शासनामार्फत जनतेला देण्यात आल्या. याचा परिणाम सुरुवातीच्या कोरोना साहित्यावर पडलेला आपणास दिसतो. या संबंधी कवी व गायक रवि वाघमारे म्हणतात, की

बाहेरुन आला नि धिंगाना केला
असा कसा रोग कोरोना
जास्त गर्दीत जाऊ नका
अन्न बाहेरचे खाऊ नका
हात हातात घेऊ नका
नाहीतर जीवन देईल धोका''

या साहित्यामध्ये मास्क लावणे, गरम पाणी पिणे, सुरक्षित अंतर ठेवणे अशा अनेक सूचनावजा विनंत्या केलेल्या दिसतात. तसेच या रोगाचे परिणाम किती भयानक आहेत, हे सांगत भीतीही दाखवलेली दिसते. अशा प्रकारचे साहित्य हे तुलनेने इतर साहित्यापेक्षा जास्त प्रमाणात आलेले दिसते. या साहित्याचे लेखक, कवी हे बऱ्याच वेळा अज्ञात आहेत.

घरात स्वतःला बंदिस्त करून घेणे म्हणजे या कोरोनाशी लढणे होय. याचा अनेक दृष्टीने परिणाम झालेला दिसतो. विशेषतः एप्रिल, मे महिना म्हणजे सुट्टीचा काळ आहे. त्यामुळे पोटासाठी महानगरात आलेल्या व सुट्टीत गावी जाऊ न शकलेल्या चाकरमान्यांची व्यथाही या साहित्यातून व्यक्त झालेली दिसते. असा आशय असलेल्या असंख्य कविता दिसतात. त्यातील कवी रमेश जाधवांची कविता मोजक्या शब्दांत व्यथा मांडताना दिसते. याला त्यांनी काव्यगीताच्या स्वरूपात सादर केल्यामुळे परिणामकारकता अधिक वाढताना दिसते.

कोकणाचा रानमेवा यावर्षी नाही
जिंकलो लढाई कोरोनाची, तर गावी येईन आई
कोरोनाचे पायी मजला येणे शक्य नाही
जिंकलो लढाई, तर मी गावी येईन आई
आज सांगू शकणार नाही, उद्याचे मी काही
मी सुखरूप आहे इकडे नको ढाळू अश्रू
आई तुझ्या चेहऱ्यावर हवे आहे हसू
वृद्धपणाला आता नको ग तू त्रासू
आधाराची काठी आहे मी दुःख लागे भासू
गायीलेली अंगाई मी विसरलो नाही

पहिल्या लॉकडाऊनमध्ये कोरोनासंबंधी, कोरोनाच्या माहितीसंबंधी, उपाय योजनासंबंधी साहित्य आले. दुसऱ्या लॉकडाऊन व तिसऱ्या लॉकडाऊननंतर मात्र हा आशय थोडासा बदललेला दिसतो. या काळातील साहित्याचा मूलाधार मजुरांच्या पायपिटीकडे, त्यांच्या एकूणच जीवनासंबंधी, हलाखीसंबंधी त्यांच्यासंबंधी उदासीन असणाऱ्या राजसत्तेविषयी साहित्य आले. यात अनामिक कवी अधिक आहेत.

मला लाज वाटली माझ्या गरिबीची
जेव्हा श्रीमंतांनी कोरोना आणला अन्
माझी रोजंदारी बंद झाली
मला लाज वाटली माझ्या गरिबीची
जेव्हा श्रीमंताच्या बापड्यांना एसी गाडी मिळाली अन्
मी व माझ्या लेकाला खांद्यावर घेऊन चालू देत नव्हते
जेव्हा एन. आर. आय. विमानात येथून येत होते.
अन् मी मात्र बायकापोरासकट ट्रेनखाली चिरडत होतो.

लॉकडाऊनमुळे कष्टकरी मजुरांचे जे हाल झाले, त्याचा अधिक प्रभाव या काळातील साहित्यावर झाला कारण कोरोनामुळे करोडो भारतीय गरीब, भिन्न जनजाती लोकांना दुःख भोगावे लागले. याचा विविध अंगाने भारतीय मनावर झालेला परिणाम या कवितांमधून आपणास दिसून येतो. यासंबंधी सुभाष थोरात आपल्या कवितेतून म्हणतात की,

''दुःख यातनाच या प्रदेशातून
मला मिटून घेता येत नाहीत संवेदनांची दारं
की, थोपवता येत नाहीत
हृदय ठोकणाऱ्या असंख्य पाखरांचे जन्म
इथे भुकेवर पसरली जाते महात्म्यांची करुणा
अध्यात्माचं मायाजाल, लोकसंख्या वाढीचे खोटे अर्थशास्त्र
येथे असं शांतीपाठ विद्रोहाचे अखंड आड ठेचणारे

आणि शूचिर्भूत धर्म वचनांच्या शरणागत प्रार्थना
हृदयातील असंतोषाचे वणवे विझवणाऱ्या''

अशा सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक संदर्भ असणाऱ्या असंख्य कविता पुढे आलेल्या दिसतात. अशा चिंतनात्मक, संदर्भाच्या साह्याने केलेल्या विद्रोहाबरोबरच समकालीन वास्तवाची चीडही निषेधाच्या स्वरूपात व्यक्त केलेली दिसते. मारुती कसाब आपल्या कवितेत म्हणतात की,

''किती दिवस रे फोकणीच्यांनो,
किती दिवस चालायचं आम्ही असंच पारशा अंगानं?
तुमच्या मायला धनधांडगंना विमान
आन् आम्हाला चलूही देत न्हाईत
आम्ही बांधलेल्या रस्त्यानं मरायचं तं कुठंबी हाय
पर जाऊद्या की मुलुखात आन् आमच्या माणसात गमानं
सुरक्षित रहा तुमच्या घरात तुम्ही सुखानं
आम्हीच बांधलंय ना, तो आमच्या रक्ताघामानं
वा रे तुमचं राज्य, वा रे तुमचं वागणं
लखलाभ तुम्हालाच शेपूट घालून जगणं
असंच शेपूट घालून वागणं!''

आपल्या घराकडे १२०० ते १५०० किलोमीटर प्रवास करत जाणाऱ्या माणसांचे हाल पाहून अशा असंख्य कवितांचा जन्म झालेला दिसतो. फेसबुक, व्हॉट्सअॅपवर तर चारोळ्या, विनोद यांचा पूरच आला होता. त्यातील काही उदाहरणे पाहू,

''दोन साधू मारले गेले
'धर्मा'ने देश डोक्यावर घेतला
१६ मजूर मारले गेले, पण...
'धर्म' शांतच आहे!
काय माहीत
मजुरांचा 'धर्म' कोणता होता ?''

अशा मार्मिक चारोळ्यांबरोबर राजकीय गोष्टींवर विनोदात्मक भाष्य चारोळ्यांतून केलेले दिसते.

''प्रत्येकाच्या खात्यात
१५ लाख येतील
इथून झालेला प्रवास
शेवटी पंतप्रधान खात्यात
पैसे टाका,
इथपर्यंत जाऊन पोहोचला.''

या काळात निर्माण झालेले साहित्य सर्वच उच्च दर्जाचे होते, असे नाही. काही तर फक्त प्रतिक्रिया देणारे, मनातील भावना, चीड, विद्रोह-व्यक्त करणारे होते. यातील काही बालिश साहित्यावर, तर सोशल मिडियावर खिल्लीही उडवलेली दिसते. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कोरोनाचा प्रभाव व्यक्त करण्यासाठी प्रचलित गाण्यांच्या चालीवर कविता लिहिल्या, गायलेल्या दिसतात. उदा. फुगडी गीत, हिंदी मराठी गाण्यांच्या चालीवर लेखन केलेले दिसते. अंगाई, गझल, अभंग रचनेमध्येसुद्धा लेखन झालेले आहे. कवी विठ्ठल सोडनवर आपल्या 'अभंग कोरोना' मध्ये म्हणतात,

कोरोना विषाणू। संसर्गाचा वाण ।।
ठेवावी रे जाण । आरोग्याची ।।

लॉकडाऊनच्या काळात कोरोना योद्धे म्हणून जे पुढे आले त्या पोलिसांवर, सफाई कर्मचाऱ्यांवर, वैद्यकीय खात्यातील डॉक्टर, नर्स व इतर कर्मचाऱ्यांवरही मोठ्या प्रमाणात साहित्य लिहून त्यांच्याबद्दलची कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यात आली. कवी शंकर बोरसे 'परिचारिका' या कवितेत म्हणतात,

''महामारी भोवताली, हसुनी सामोरी जाते
विसरून घरदार, माता रुग्णांचीच होते.''

या योद्ध्याबरोबर गाव पातळीवर ग्रामसेवकसुद्धा ही कोरोनाची लढाई लढत आहे; परंतु त्याचे नाव घेतले जात नाही. तेव्हा स्वतः ग्रामसेवक असलेल्या कवी सुभाष कर्डक यांनी 'एकटा ग्रामसेवक' या शीर्षकाची कविता लिहून तो कसा गावपातळीवर एकटा काम करतो आहे हे लिहिले.

''कामे गावामधली सतराशेसाठ
करतोय ग्रामसेवक एकटा
कोरोनाचा संपूर्ण नायनाट करतोय
ग्रामसेवक एकटा
प्रत्यक्ष तोच लोकांना
आज देतो सामाजिक

अंतराचे धडे
प्रत्यक्ष तोच जाऊ देत नाही
संचारबंदीच्या नियमांना तडे.''

कामगारांच्या पायपिटीनंतर सर्वांत जास्त साहित्य लॉकडाऊन या विषयाच्या अंगाने लिहिलेले दिसते. काहींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा लॉकडाऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लॉकडाऊन या विषयाच्या अंगाने यांनी केलेला स्वयं क्वारंटाईन यावर भरपूर लिहिले गेले, तर काहींनी जाती, धर्माच्या अंगाने कसे छळले गेले, हा धागा पकडून सोशल डिस्टन्सिंगवर साहित्य लिहिलेले दिसते. याविषयी कवी महेंद्रकुमार मेश्राम म्हणतात की,

मात्र शेकडो पिढ्यांना अस्पृश्य ठरवत
वेशीबाहेरचे कलंकीत जिणे देत
सोशल इकॉनॉमिकल, एज्युकेशनल, पॉलिटिकल
कल्चरल आणि जिऑग्राफिकल डिस्टन्सिंगचा
आम्ही विचार करणार आहोत काय?
वर्क फ्रॉम होममध्ये
कोरोनाच्या निमित्ताने
क्वारंटाईनच्या वृत्ताने
हलकेच श्वास सोडतो आम्ही
मृतांचा आकडा वाढला की,
भयभीत होत सॅनिटाईझरला हात लावतो आम्ही
मग पशुतूल्य वागणूक देत
मानवताच क्वारंटाईन करणाऱ्या व्यवस्थेचा
आम्ही विचार करणार आहोत काय?

असे इथल्या माणसांना त्यांच्या विषमतावादी वागणुकीविषयी प्रश्न विचारणारे साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिले गेले. कोरोनाचा परिणाम विशेष करून वंचित, कष्टकरी, स्त्री वर्गावर अधिक प्रमाणात झालेला आहे व हाच वर्ग इथल्या जात, धर्म व व्यवस्थेचा पूर्वीपासूनचा बळी आहे. त्यामुळे ही साम्यता दर्शवणारे साहित्य अधिक आले. क्वारन्टाईन, सोशल डिस्टन्सिंगचे संदर्भ वेगळ्या पद्धतीने इथे लावलेले दिसतात व आताही समाज व्यवस्थाच बदलली पाहिजे, अशी मागणी हे कवी करतात. लॉकडाऊन काळात मंदिरे, चर्च, मशीद बंद; घरातून बाहेर जाऊन कमवणारी माणसे घरात; सार्वजनिक ठिकाणे बंद या सर्वांचा परिणाम, मानसिक द्वंद्व या साहित्यात मोठ्या प्रमाणात आलेले दिसते. उज्ज्वला नाईक आपल्या दारू पिणाऱ्या पतीसंबंधी मार्मिकपणे लिहिताना म्हणतात की,

''ती खूप खूप आनंदली
जेव्हा लॉकडाऊनमध्ये
दारूची दुकाने बंद झाली
चिडचिडणारा नवरा बघून
मनातल्या मनात खूप हसली
दारात तो उभा होता
डोळ्यात त्याच्या अंगार नव्हता
अचानक कोसळला तिच्या पायांवर
खूप वेळ रडत होता..
दिवसभर माझ्याशीच मी
खूप झगडलो, भांडलो आणि
मी हरलो तू जिंकली
मी दारू सोडली
हळूच त्याच्या कुशीत शांतावली ती''

लॉकडाऊनमुळे अर्थव्यवस्था ढासळली आहे. तेव्हा दारूची दुकाने चालू करा यावर 'दारूडे' हेही कोरोना योद्धे आहेत, अर्थव्यवस्थेचा तेच कणा आहेत, अशा प्रकारे विनोदात्मक पातळीवरचे साहित्यही अधिक प्रमाणात लिहिलेले दिसते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रंगलेल्या राजकारणावरही अधिक प्रमाणात साहित्य लिहिले गेले. कवी ज्ञानेश वाकुडकर म्हणतात की,

''कोरोना म्हणाला देवेंद्र भाऊ
जास्त जोर नको रे लावू
राजभवनावर जाऊ जाऊ
आधीच तुझी उसवली''

लॉकडाऊन काळात सर्व पशू, पक्षी मुक्तपणे विहार करत आहेत. माणूस मात्र घरात लपून बसला. यावरसुद्धा साहित्य भाष्य करते. कवी प्रा. विजय पोहनेरकर आपल्या कवितेत अफलातून कल्पना मांडताना म्हणतात की,

''कॉलनीच्या मोकळ्या जागेत
भरली होती सभा
मी कुणाला दिसत नव्हतो
लांब होतो उभा

डुक्कर, मांजर, कुत्रा, गाढव
बसले होते गोल
बैल म्हणाला गायबाई
काहीतरी बोल
बैलोबा काय बोलू
शब्दच फुटत नाही
दोन महिन्यापासून मला
माणूस भेटत नाही..''

एकाच विषयाच्या अनुषंगाने मनात किती व कसे वेगवेगळे भावतरंग उत्पन्न होतात, हे या कोरोनाच्या साहित्यातून प्रकर्षाने दिसून येते.

कोरोना काळात कोरोनाच्या अनुषंगाने अनेक विषयांवर सोशल मिडियाच्या माध्यमातून अनेक संस्था, मंडळे, महाविद्यालये व विद्यापीठांनी वेबिनार घेतलेले दिसतात. वृत्तपत्र, सोशल मिडियावर या अनुषंगाने अनेक स्फुटलेख लिहिले गेले व आजही लिहिले जात आहेत. याची शीर्षकं पाहिल्यावरसुद्धा कोरोनाच्या अंगाने कशा विविध पद्धतीने विचार चालू आहे, हे समजते.

उदा. १. कोरोनाने गाव दाखवला– बाळासाहेब आल्हाट

२. कोरोनाग्रस्त टाळेबंदीनंतरच्या शिक्षण व्यवस्थेची नवी दिशा– गंगाधर ढवळे

३. कोरोनानंतरचे जग– डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

४. गरिबांच्या जीवनावर उठलेली सत्ता– लोकनाथ काळमेघ

५. समकालीन परिस्थितीवर भाष्य – सचिन गरूड

६. कोरोनाची षड्यंत्रकारी क्रोनोलॉजी– डॉ. नीलम महेंद्र

७. लॉकडाऊन काळातील शिक्षणविषयक धोरणांबाबत विनम्र आवाहन– ॲड. शितल शामराव चव्हाण

८. मी ॲम्बुलन्सवाला आणि आठ तास– दत्ता कोहीनकर

९. कोरोनामुळे ज्योतिषांचा ढोंगीपणा सिद्ध, ज्योतिष्यांचे धंदे बंद करावेत– डॉ. नितीन शिंदे

१०. कोरोना काळ : मराठीचे भविष्य आणि नव्या संधी– डॉ. पृथ्वीराज तौर

११. गडकरींचे नाटक, तळीरामांचे सरकार– ज्ञानेश महाराव

१२. परप्रांती– द्वारकानाथ संझगिरी

१३. तंत्रज्ञान वापरताना मानवी संवेदनाही महत्त्वाची– डॉ. मनोहर जाधव

अशा प्रकारचे असंख्य लेख लिहिले गेले. विशेष म्हणजे या काळात मोठ्या प्रमाणात म्हणींची निर्मिती झालेली दिसते.

१. आपला तो खोकला, दुसऱ्याचा तो कोरोना

२. थांब लक्ष्मी, हातावर सॅनिटायझर देते

३. कोरोनाचं पोर अख्या गावाला घोर

४. गर्वाचे घर लॉकडाऊन

५. माणसाची धाव किराणा दुकानांपर्यंत

६. नवरा वैतागला लॉकडाऊनने, बायको वैतागली स्वयंपाकाने

७. आधी पोटोबा नंतर पण पोटोबा

८. इकडे बायको तिकडे पोलीस

अशा अनेक म्हणी पुढे आल्या. कोरोनामुळे काय शिकलो, या विषयाच्या अनुषंगाने प्रचंड लेखन या काळात लिहिले गेले. या सर्व साहित्यातून आत्मपरीक्षण; भावनिक द्वंद्व; भावनिक गुंतागुंत; ओढ; गळून पडलेले पैसा, धर्म, जात हे अहंभाव; आपण सृष्टीपुढे फारच कनिष्ठ आहोत याची झालेली जाणीव; सरकारच्या मर्यादा; माणसांनी मदतीच्या रूपाने दाखवलेली माणुसकी, या सर्वांचे चित्रण या साहित्यात येते म्हणून काही लेखकांनी कोरोना चांगला आहे, अनेक धडे शिकवून गेला, असाही सूर आपल्या साहित्यातून लावलेला दिसतो. यातून हेच दिसते की, 'कोरोना' हा फक्त विषाणू न राहता सामूहिक शत्रू, एक क्रूर शिक्षक, भ्रम दूर करणारा, डोळ्यांत अंजन घालणारा, जमिनीवर आणणारा मित्र, एक मिथक अशा वेगवेगळ्या रूपांत साहित्यातून वावरताना दिसतो म्हणून कोरोना जेव्हा साहित्यातून येतो तेव्हा एवढा भीतीदायक वाटत नाही, जेवढा तो दैनंदिन जीवनात वावरताना, घरात टीव्ही बघताना वाटतो कारण या कोरोनाने वेगवेगळी रूपे, प्रतीके इथे घेतलेली दिसतात म्हणून कोरोनाचा संस्कार साहित्याच्या माध्यमातून समाजावर झाला, असे आपणास म्हणता येते.

**प्रा. डॉ. राजाभाऊ भैलुमे**
चलभाषः ९८२२२१५३८८ ।
rajbhailume@gmail.com

◆◆

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

ज्येष्ठ लेखिका मा. मंगला गोडबोले यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्रीविषयक– जाणिवांची चिकित्सा करणारा संशोधनलेख.

# मंगला गोडबोले ह्यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्रीविषयक जाणिवांचा अभ्यास

तेजाली गवळी

मंगला गोडबोले या ज्येष्ठ लेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. संवेदनशील लेखिका म्हणून स्त्रीच्या भावजीवनाचा मागोवा घेतात तेव्हा काळानुरूप या बदलत्या जीवनजाणिवा व त्याचे परिणाम आपल्या लेखनामधून शब्दबद्ध करतात. गद्यातील मुक्तछंद म्हणजे ललितगद्य होय. यात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला केंद्रस्थानी ठेवून आत्मनिष्ठ आविष्कार होत असतो. यामुळे, या मुक्त साहित्यप्रकारामध्ये लेखकाच्या विचाराला मुक्तचिंतनाची जोड मिळते. म्हणून, लेखकाचे ललितगद्य लेख हे आत्मानुभूतीचा आनंद मिळवून देतात. मंगला गोडबोले यांनीही स्त्रीविश्वाचा गोतावळा, त्यांची भावनिक जडणघडण, जुन्या नव्या परंपरेतील जाणिवा, स्वतंत्र व स्वच्छंदी असा स्त्रीवाद तर कधी स्वत:ला बंधनात ठेवणारी सोशिक स्त्री या सर्व जीवनजाणिवा जगू पाहणाऱ्या स्त्रीचा आंतर्बाह्य विचार ललित लेखनातून मांडला आहे. आजूबाजूच्या स्त्रीजीवनाविषयीची संवेदनशीलता व त्यामधून प्रकट होणारी त्यांची विचारसरणी ललित लेखांमधून दिसते. त्यांच्या ललित लेखनातून आजच्या सुशिक्षित व शहरी स्त्रीच्या जगण्याचं आकलन प्रकटले आहे.

मुळात बाईचे जगणे कसे आहे हे सांगताना, पटवून देताना लेखिका बाईच्या जगण्याला 'रायवळाची' उपमा देतात. समाजात स्त्रीला असणारे स्थान याविषयी मार्मिक शब्दांत लिहितात, 'रायवळ आंब्याची स्थिती असते. कोणी मुद्दाम रायवळाच्या बागा लावत नाही. वाटसरूने आंबा खाऊन, चोखून टाकलेल्या कोयींमधून नानाप्रकारची गावठी आंब्याची झाडं आपली आपण उगवतात. ऊन, वारा, पाऊस जे काही आपोआप मिळेल ते घेतात. त्यातून काही फळं येतात. त्यातली किती गळतात, पायदळी पडतात, पक्षी, प्राणी कुरतडतात ह्याचा हिशोब नसतो. रायवळ आंबा कोणाच्याही प्रतिष्ठेचा विषय बनू शकत नाही, तरीही तो पिकत असतो...पिकत असतो...'('जरा चुकीचे, जरा बरोबर,' पृ. १११) या समाजामधील पुरुषप्रधान संस्कृतीबद्दल लेखिका नाराजी व्यक्त करतात. या समाज संस्कृतीमुळे स्त्रीवर काही बंधने सातत्याने लादली आहेत. जैविक अवस्थेमुळे या मानसिकतेवर जो परंपरेचा पगडा घालण्याचा प्रयत्न केला आहे यावर लेखिका टीका करतात. समाजाची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी व दृष्टिकोन बदलावा यासाठी स्त्री–पुरुष तुलना, स्त्रीमुक्तीवाद यावर लेखामधून चिंतन प्रकट करतात. मंगला गोडबोले यांना आधुनिक स्त्री विशेषत्वाने आवडते, जी कुंपण ओलांडून आकाशाकडे झेप घेते. अशा स्त्रिया स्वानुभव, आठवणी, प्रासंगिक घटना यांमधून त्यांच्यासमोर उभ्या राहिल्या. त्या स्त्रियांचे

जीवनविषयकनिरीक्षण, मते, आत्मानुभव 'कुंपण आणि आकाश' या लेखसंग्रहामध्ये प्रकट होते. ज्या समाजात स्त्रीवर्ग राहतो त्या समाज मानसिकतेमुळे स्त्री जातीवर आलेली बंधने, नियम, उपेक्षा याबद्दल गोडबोले व्यक्त होतात. शहरी भागात राहणारा स्त्रीवर्ग सुशिक्षित असला तरीही काही प्रश्न आजही तिच्या कक्षा मर्यादित करतात. 'घरकामाचा मोबदला', 'कलावंत गृहिणीची उपेक्षा', 'भावनिकपिळवणूक', 'स्त्रिया आणि व्यसनं', 'स्पर्शाची भाषा', 'तरुण स्त्रीचे मित्र' इत्यादी लेखांमधून या उपेक्षित बाजूचे चित्र समोर आले आहे. त्यांच्या लेखनामध्ये शहरी व मध्यमवर्गीय स्त्रीचे प्रश्न आर्थिक वा कोंडमारीचे नाहीत तर 'बाईच्या जगण्याच्या पद्धतीत 'सन्मान' हा शब्द दुर्लक्षित असल्याचे दिसते. स्त्रीच्या आत्मसन्मानाचा प्रश्न गोडबोलेंच्या लेखामधून सातत्याने डोकावतो. मात्र काही अंशी त्या स्त्रीलाही दोषी ठरवितात कारण, तिच्या प्रगतीमध्ये, आत्मसन्मानाने चालण्याच्या वाटेमध्ये स्त्रीचे मन अडथळा आणत असेल तेथे गोडबोले त्यांच्या चुका, उणिवा वा दोष निदर्शनास आणतात. उदा. 'व्रतवैकल्याचं स्थान', 'सौंदर्य आणि व्यक्तिमत्त्व', 'क्लास संस्कृतीचा उदय', 'गृहिणी आणि चळवळ', 'लग्नासाठी लग्न' अशा अनेक लेखांमधून स्त्रीच्या प्रगतीमध्ये येणारे अडथळे दाखवितात. मंगला गोडबोले यांच्या मते, 'जे आयुष्य माणसाला स्वत: मधल्या शक्ती ओळखू देतं आणि त्या वापरण्याची संधी देतं ते दर्जेदार आयुष्य!' ('कुंपण आणि आकाश', पृ. १५५) हे दर्जेदार आयुष्य स्त्रीला कसे प्राप्त करता येईल यासाठी त्या लेखनाच्या साह्याने आपल्या विचारांना चालना देतात.

'कुटुंब' हा प्रत्येकस्त्रीचा जिव्हाळ्याचा विषय आहे. या कुटुंबातच तिच्या शरीर व मन या दोन्हींची जडणघडण होत असते म्हणून, कुटुंबप्रिय मंगला गोडबोले या 'गृहिणी' असणाऱ्या किंवा गृहकृत्यदक्ष अशा स्त्रीच्या मानसिकतेचा अभ्यास करतात. स्त्रीचे शरीर, यश, घरातील आवराआवर करण्यापासून मनाची आवराआवर असे दुर्लक्षित असलेले विषय केंद्रस्थानी ठेवून, 'बाईपणातील माणूस' शोधण्याचा प्रयत्न लेखनामधून करतात. अशा स्त्रियांना स्वत:साठी वेळ देण्याची गरज कशी आहे हे पटवून देतात उदा. 'देहाची तिजोरी' सारख्या लेखामधून शरीराकडे दुर्लक्ष करणाऱ्या स्त्रीला देहाचे महत्त्व पटवून देतात, तर 'यश' या लेखामध्ये स्वत:चे अनुभव सांगताना यशाबद्दल स्त्रीच्या मानसिकतेचा उलगडा करतात. गृहिणी असताना मिळालेले 'यश', प्रसिद्धी मनमोकळेपणाने स्वीकारत नाही, उलट मिळालेल्या यशाने तिला अवघडलेपण येते. त्याचा स्वीकार करण्यात तिची कुचराई होते. या छोट्या वाटणाऱ्या; पण एखाद्या बाईचा आत्मविश्वास, परिपूर्णतेची गोष्ट असल्याने ती समाजासमोर ठेवणे गोडबोले यांना महत्त्वाचे वाटते. 'सुखी स्त्रीची साडी' या लेखामधून जगण्यातील सुख उपभोगण्याचा सकारात्मक दृष्टिकोन देतात. त्यांच्या मते, 'सुखी माणसाचा सदरा' असतो, तर 'सुखी स्त्रीची साडी' का असू शकत नाही? त्यांच्या कल्पना व विनोदबुद्धीचा प्रत्यय येथे आला आहे, तर काही लेखांमधून साध्या वाटणाऱ्या पण बाईच्या मनाचे गुपित दडल्याचे प्रत्यय आणणाऱ्या गोष्टी अनुभवातून सहजपणे सांगून जातात. उदा. 'पर्स हरवलेली बाई' या लेखामध्ये पर्स हरवल्याचा प्रसंग घडतो; पण, पर्स हरवल्याने नेमकेकाय होऊन जातं हे मार्मिकव प्रतीकात्मक शब्दांत मंगला गोडबोले सांगतात की, 'बाईची पर्स ही अलिबाबाची गुहा असते, कुबेराचा खजिना असतो. अजबखाना असतो, जादुगाराची पोतडी असते. वेड्याचा बाजार असतो; पण ते जे काही असतं तो तिच्या काळजाचा तुकडा असतो.' ('पर्स हरवलेली बाई', पृ. १४)

मंगला गोडबोले यांना काही लेखांमधून स्त्रीजातीला काही सूचित करायचे आहे, सांगायचे आहे. गोडबोले आपले विचार, मत प्रकट करण्यासाठी शब्दांशी खेळताना दिसतात. 'माझा सुपरवुमनायटीस' या शीर्षकरूपी लेखामध्ये पन्नाशीनंतरच्या बायकांना 'सुपरवुमन'आहे असे वाटू लागल्याने 'सुपरवुमनायटीस' हा आजार जडला आहे असे शाब्दिक खेळातून सांगतात. तेव्हा त्यामागचा लक्षणार्थ घेताना स्त्रीच्या मानसशास्त्रीय गुंतागुंतीचा उलगडा करतात. 'आदर्श' स्त्री होण्याच्या निरर्थक प्रयत्नामध्ये स्वत्वाचा विसर पडणाऱ्या स्त्रियांना जागे करू पाहतात, तर 'देशी ॲरनला देशी आईचे पत्र' या पत्ररूपी लेखामध्ये साकारलेली 'आई' ही सध्याच्या तरुण पिढीला वास्तव परिस्थितीची जाणीव करून देते. तेव्हा

अशा आधुनिक स्त्रीचे मंगला गोडबोले कौतुक करतात. याउलट, 'चुलत सासूची सेवा' या लेखामधून चूल, स्वयंपाकघर, किचन इथपर्यंतच्या प्रवासाच्या पारंपरिक-आधुनिक जडणजडणीवर भाष्य करताना, अनुभव सांगताना स्त्रीच्या बदलाचे प्रत्यंतर देतात.

ललितगद्य लेखनामध्ये व्यक्तिचित्रणात्मक लेख हा एक उपप्रकार आहे. यात 'व्यक्तिरेखा' केंद्रस्थानी ठेवून लेखाची मांडणी केली जाते. आनंद यादव म्हणतात की, ''व्यक्तीविषयी 'मी'चे अनुभव व्यक्त करणे हेच व्यक्तिचित्रांचे ध्येय असू शकते.'' म्हणून मंगला गोडबोले या स्त्री व्यक्तिरेखांचे चित्रण करतात तेव्हा त्यांचेही अनुभव, भावविश्व उलगडत जाते. 'मालकी', 'वास्तुदेवता', 'अढळपद', 'निमित्त', 'अटळ', 'हे कुणाचंही घर नाही म्हणून तर', 'अस्तित्व', 'इक आवत...इक जावत...' अशा लेखांमधून विविध जीवनजाणिवा जगणाऱ्या स्त्रियांचे भावविश्व उलगडतात. 'धराधर मॅडम' ही अविवाहित स्त्री स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी स्वतंत्र, एकटी राहण्याचा निर्णय घेते. (मालकी), तर 'शाळीग्राम' ही स्त्री कुटुंबात कुठलेच स्थान मिळत नसल्याने घराबाहेर स्वत:ला व्यक्त ठेवून मानसिक क्षमता दृढ करत असते. (वास्तुदेवता), तर काही स्त्री व्यक्तिरेखांचे चित्रण करताना लेखिकेचा हेतू स्पष्ट होतो. उदा. 'मिसेस सावर्डेकर' ही श्रीमंत बाई स्वत:च्या मालकीच्या दोन खोल्या विकत घेऊन तिच्या अस्तित्वाची, आत्मसन्मानाची सोय करते. (अढळपद) तर आजही काही स्त्रियांना बंधनात राहणे पसंत आहे. उदा. 'पटणी' (निमित्त), 'दोनशे पाच' (अस्तित्व) या स्त्रियांना, आपल्या कोशात, बंधनात राहून अस्तित्वशून्य होऊपाहणाऱ्यांना गोडबोले योग्य तो सल्ला देतात. त्यांच्या ललित लेखनातील लेख हे स्त्रीबद्दल आलेले अनुभव व स्त्रीजीवनाचा घेतलेला आत्मशोध याचा प्रत्यय देतात. तेव्हा हे लेख स्त्री कक्षेपुरते मर्यादित न राहता समाज प्रवृत्तीवर भाष्य करणारेही ठरतात.

आधुनिककाळात स्त्रीच्या कक्षा रुंदावल्यामुळे तिची झेप क्षितिजापलीकडे गेली आहे. या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात सुशिक्षित स्त्री स्वावलंबी होऊन स्वत:चे निर्णय घेताना दिसते; पण तिच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या गोष्टींना तिच्या पूर्णपणे नाकारून देण्यामुळे काही जैविक, नैतिक व सामाजिक हानी होत आहे हे गोडबोले लेखनातून सांगतात. मातृत्व, कुटुंब व लग्नसंस्था, एकल मूल पद्धती याबद्दल त्या आजच्या तरुण स्त्रीवर्गाला समुपदेशन करतात. त्याचे फायदे, तोटे सांगून निर्णयक्षमतेवर पुनर्विचार करण्यास भाग पाडतात. उदा. 'मुले : घरातून पाळणाघरांकडे ' (जरा चुकीचे जरा बरोबर), 'मूल', 'विवाहमुक्ती', 'लग्नाशिवाय ', 'लग्न मोडताना' (गाठ आहे लग्नाची /शी ), 'थांब आजचे माऊली', 'परि जाति न नाशे...' (आई, तुझ्याच ठायी) या लेखांमधून मंगला गोडबोले आजच्या आधुनिक व उच्चशिक्षित स्त्रीवर्गाला योग्य दिशा दाखवितात.

अशा प्रकारे, मंगला गोडबोले ह्यांच्या ललितगद्य लेखनामधून 'स्त्री' या विशिष्ट वर्गाचा सूक्ष्म व चिंतनरूपी अभ्यास केलेला दिसतो. विविध दर्शनी स्त्री स्वभावाचे, वृत्ती, प्रवृत्ती, स्थितीचे चित्रण आले आहे. याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) गोडबोले मंगला, 'जरा चुकीचे, जरा बरोबर', नाविन्य प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१९, पृ. १११

२) गोडबोले मंगला, 'कुंपण आणि आकाश', नाविन्य प्रकाशन, सुधारित आवृत्ती २०१६, पृ. १५५

३) गोडबोले मंगला, ' पर्स हरवलेली बाई ', साकेत प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००५, पृ. १४

४) यादव आनंद, 'मराठी लघुनिबंधाचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, ऑक्टो. १९९५, पृ. ६९



**तेजाली गवळी**

चलभाष : ९५७९८७८३९०



◆◆

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

दीपक बिचे लिखित
संत तुकारामांवरील
'तुका झाला पांडुरंग' या
ग्रंथावरील परीक्षण.

# संत तुकारामाचे उद्बोधक चरित्रः तुका झाला पांडुरंग

प्रा. विजय लोंढे




पुस्तकाचे नाव : **तुका झाला पांडुरंग**
लेखक : **दीपक निलकंठ बिचे**
प्रकाशकः **यशोदीप पब्लिकेशन्स**
प्रथमावृत्ती : **डिसेंबर २०१८**
पृष्ठे :३५२ किंमत : ४००/-

आपली महाराष्ट्र भूमी संत महंतांची भूमी, त्यांच्या कार्याने पावन झालेली भूमी. महाराष्ट्र भूमीचे सारे वैचारिक, सांस्कृतिक, प्रबोधन संचित संतांच्या साहित्यातून, त्यांच्या कार्यामधून समजते. संत नरहरी सोनारांपासून ते संत निळोबारायांपर्यंत हृदयमंदिरात विराजमान झालेले आहेत.

'जगाच्या कल्याणा
संतांच्या विभूती'

या न्यायाने सकल जनांना शहाणे करून सोडण्याचे सामर्थ्य संत विचारांमध्येच आहे. संत नामदेव, सावता महाराज, गोरोबा काका, नरहरी सोनार, चोखामेळा, संत ज्ञानेश्वर, सेना महाराज, संत निर्मळा, सोयरा, मुक्ताबाई, कान्होपात्रा, संत एकनाथ, शेख महंमद, संत तुकाराम या साऱ्या संतांचे अवतार कार्य आपण सर्वांना प्रेरणादायी आहे. वारकरी संप्रदाय गेली अनेक शतके सर्व भोळ्या, भाविक, कष्टकरी जनांसाठी मार्गदर्शक ठरलेला आहे.

या साऱ्या संतांमध्ये वारकरी संप्रदायाच्या देवालयाचा कळस असणारे संत तुकाराम अर्थात

सर्वांचे तुकोबा त्यांच्या गाथेमुळे,त्यांच्या जीवनातील विचार व आचारांमुळे संसार व परमार्थ यांचा अपूर्व संगम. तुकोबांनी आपल्या साध्या, सोप्या, परखड अभंगरूपी विचारांतून सर्वांसमोर मोठा आदर्श निर्माण केला.

तुकोबांचे जीवनकार्य अनेक चरित्रकारांनी रेखाटले आहे. महिपतीबाबा, बहिणाबाई ही यातील महत्त्वाची नावे. आधुनिक काळातही अनेक चरित्रकारांनी तुकारामांचे चरित्र लिहिले आहे. त्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे प्रा. दीपक नीलकंठ बिचे. त्यांच्या पुस्तकाचे शीर्षक आहे, 'तुका झाला पांडुरंग.' एक सर्वांगसुंदर, प्रबोधक, उद्बोधक, प्रासादिक चरित्र म्हणजे हा ग्रंथ. संसारी तुकाराम ते संत तुकाराम आणि संत तुकाराम ते पांडुरंग तुकाराम असा प्रभावी, प्रेरक, देदीप्यमान प्रवास वर्णन करणारा अनमोल ग्रंथ म्हणजे हा ग्रंथ होय. या पुस्तकाला डॉ. श्रीपाल सबनीस सरांनी सविस्तर प्रस्तावना लिहिलेली आहे.

२९ प्रकरणांत तुकोबांच्या संतत्वाचा प्रवास बिचे सरांनी आपल्या सहज सोप्या शैलीमधून प्रमाणसिद्ध केलेला हा अनमोल ग्रंथ. तुकोबांची विविध रूपे त्यांनी आपल्या विचक्षण लेखणीतून रेखाटलेली आहेत. विवेकवादी, समाजसुधारक, तत्त्वचिंतक, धर्मसुधारक, क्रांतिकारक, कृषिनिष्ठ, कृतीप्रवण, विज्ञानवादी अशा एक ना विविध रूपांचा साक्षात्कार वाचकाला करून दिला आहे. तुकोबांचे चरित्र वेगळ्या अंगाने मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बिचे सरांनी केलेले आहे.

ग्रंथातील प्रकरणे, त्यांची नावे वाचल्यानंतर व त्याच्याही पुढे प्रकरणे वाचल्यानंतर संत तुकारामांचे आभाळाएवढे विविध पैलूयुक्त गुण वाचून समस्त वाचक त्यांच्यासमोर लोटांगण घालतो. तुकोबांची गाथा हा पाचवा वेद मानला जातो, तर त्यांचा प्रत्येक अभंग सुभाषित म्हणून विविध म्हणींच्या सर्वसामान्यांच्या रूपात तोंडी सहजपणे येतो.

तुका म्हणे उगी रहावे
जे जे होईल ते ते पहावे
नाही निर्मळ मन ; काय करील साबण
ठेविले अनंत तैसेचि रहावे चित्ती असो द्यावे समाधान
जे का रंजले गांजले

यांसारखे अनेक अभंग आजघडीला सर्वसामान्यांच्या जीवनाचे, जगण्याचे सार झालेले आहेत. ग्रंथांतील प्रकरणे पाहिल्यानंतर, वाचल्यानंतर एक वेगळी अनुभूती मिळते. संतपीठमध्ये संत, त्यांचे कार्य त्याचबरोबर देहू, आळंदी, पंढरपूर या स्थळांचे माहात्म्य वर्णन येते.

तुका म्हणे तोचि संत
सोशी जगाचे आघात
भूतांची दया हे भांडवल संता
आपुली ममता नाही देही ।।

या अभंगातून याची प्रचिती येते.

तुकोबारायांचे जीवनचरित्र, त्यांची गुरुभक्ती प्रेरणादायी. तुकोबा म्हणजे कवी, प्रभावी वक्ते होते. त्याचबरोबर साधनेच्या पायऱ्या सांगितल्यामुळे एक वेगळे महत्त्व गुरुभक्ती या प्रकरणास आहे. बिचे सर येथे एक सुंदर वाक्य लिहून जातात, त्या वाक्यातून तुकोबांचे श्रेष्ठत्व जास्त ठळक होते. ते वाक्य असे 'जगाच्या कल्याणासाठी ज्ञानदेवांनी पसायदान सांगितले, तर तुकोबांनी भक्तीचा प्रसाद सामान्यांत वाटला.'

कीर्तनकार तुकाराम महाराज या लेखात कीर्तन म्हणजे काय? कीर्तनपरंपरा, भजन, त्याची परंपरा बिचे सरांनी सुंदरपणे वर्णिली आहे. 'भजन म्हणजे परमेश्वराच्या दिव्य शक्तीचे गुणगान' अशी अर्थपूर्ण व भावणारी भजनाची व्याख्या आनंददायीच. 'वारकरी सांप्रदायाचे प्रचारक' म्हणजे वारीवरील सर्वांगसुंदर निबंध. वारकरी केवळ वार्षिक किंवा

मासिक उपचार म्हणून वारीला जाणारा नसतो, त्याच्या दैनंदिन आचारविचारांवर, आहार विहारावर त्याच्या वारकरी होण्याचा प्रभाव होतो. 'वारी हा सर्जनाचा उत्सव आहे.' वारकऱ्यांच्या खुणा सांगणाऱ्या दोन गोष्टी म्हणजे माथा व गाथा.

प्रा. दीपक बिचे यांनी एकाहून एक सरस अभंगांचे निरुपण करून तुकोबांच्या अभंगावर एक वेगळा प्रकाश टाकला आहे. 'प्रबोधनकार तुकाराम महाराज' या निबंधात समाजातील भोंदू लोक, त्यांनी निर्मिलेली अंधश्रद्धा यावर केलेले परखड भाष्य वैज्ञानिक संत तुकोबा यांच्या वेगळ्या प्रतिमेची साक्ष आहे.

'तत्त्ववेत्ते तुकाराम' हेही असे प्रबोधनात्मक प्रकरण. त्यांच्या तत्त्वज्ञानाची साक्ष पटल्यामुळेच पाश्चात्त्य पंडितांनी तुकोबांच्या गाथेचा विशेषत्वाने अभ्यास केलेला आहे. त्याचा उल्लेख या पुस्तकात केलेला आहे. या प्रकरणातील काही वाक्यं आजच्या जीवनात मार्गदर्शक ठरणारी आहेत.

दु:खरूपी वादळात शांत रहा.

दु:खाकडे लक्ष देऊ नका.

दु:खाला विलंबाने प्रतिसाद द्या.

ज्यांना धर्म, अर्थ आणि काम यांची एकत्र सांगड घालता येईल त्यांनाच स्वत:चा उद्धार करून घेता येईल. अधर्माने वागू नका. कोणाही जिवाचा न घडो मत्सर, वर्म सर्वेश्वर पूजनाचे. सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणारे हे प्रकरण होय. 'पर्यावरण तज्ज्ञ व विज्ञानवादी तुकाराम महाराज' हे प्रकरण आजच्या काळात आपणा सर्वांना शिरोधार्य. 'हिंदी अभंग रचनाकार तुकाराम महाराज' हे वैशिष्ट्यपूर्ण प्रकरण आहे. यातून तुकोबांचा वेगळा गुण सर्वांना समजतो. यातील श्रीराम व श्रीकृष्ण यांच्यावरील हिंदी अभंग रचना सुंदरच आहे.

एकंदरीतच हा ग्रंथ सर्वसर्व तुकोबांच्या देवत्वाची प्रचिती आणून देणारे. त्यांचे कर्मभोगाचे वैशिष्ट्य, प्रयत्नवादाचा संदेश, विज्ञानवादी दृष्टिकोन, ढोंगी लोकांवरील कोरडे हे सर्व आपणास ललामभूत ठरणारे. तुकाराम म्हणजे आंतरराष्ट्रीय कवी. साकल्याने ह्या महत्त्वपूर्ण ग्रंथांचा विचार करू जाता, प्रा. दीपक बिचे यांनी चिंतन, मनन, वाचन व विशेष परिश्रमांतून साकारलेले अद्वितीय व उद्बोधक तुकाराम चरित्र असाच याचा गौरवाने उल्लेख करता येईल. आपण सर्वांनी एकदा तरी हा तुकोबा चरित्र ग्रंथ वाचावा.

**प्रा. विजय लोढे**
९८६०४९११६९


◆◆



# व्यवस्थेतील व्यत्यास आणि वर्तनातील विसंगतीचे अन्वयार्थः सगळं उलथून टाकलं पाहिजे

**भवताल सुटत जाणारी वेदना अधोरेखित करणाऱ्या देवा झिंजाड यांच्या ‘सगळं उलथून टाकलं पाहिजे’ या काव्यसंग्रहावरील समीक्षालेख.**

**चंद्रकांत चव्हाण**




पुस्तकाचे नावः **सगळं उलथून टाकलं पाहिजे**
लेखिका : **देवा झिंजाड**
प्रकाशक: **हार्मिस प्रकाशन, पुणे.**
मुखपृष्ठः **प्रदीप खेतमर**
प्रथम आवृत्ती: **ऑगस्ट २०२०**
पृष्ठ संख्या: ११६ किंमत: १४० /-

आसपास घडणाऱ्या घटनांचे पडसाद साहित्य निर्मितीचं प्रयोजन असतं. तो प्रवास असतो, व्यवस्थेच्या वर्तुळांत विसावलेलं गोमटेपण अनुभवण्याचा, तसा विचारांत विहार करणाऱ्या वैगुण्यांना शोधण्याचा. त्यात अनेक स्तर सामावलेले असतात. ते सामूहिक असतात तेवढे वैयक्तिकही. कविताही यास अपवाद नसते. ती वैयक्तिक असते, तेवढीच सामूहिक. आसपास वाचण्यासाठी सजग डोळसपण अन् आसमंत वेचण्यासाठी संवेदनशील मनाचं धनी असायला लागतं. कविता समजून घेण्यासाठी ओंजळभर ओलावा अंतरी नांदता असायला लागतो. हा ओलावा धरून वाहता येतं त्याला विस्ताराचे अन्वयार्थ समजावून नाही सांगायला लागतं. माणूसपणाच्या परिभाषा अवगत असल्या की, आसपासच्या आसमंतात असणारा आनंद अनुभवता येतो, तशी नांदणारी वैगुण्येही दिसू लागतात. त्यांचं असणं विचारांच्या वर्तुळाभोवती प्रदक्षिणा करू लागलं की, आपणच आपल्याला नव्याने शोधू लागतो. अस्तित्वाला आव्हान देणाऱ्या प्रश्नांवर म्हणूनच कवीने बोलत राहावं लागतं अन् कवितेने प्रश्नांना मांडत. कवितेने प्रश्न सुटत नसले, तरी त्यांना धार लावता येते. असं कवी म्हणतो, तेव्हा याचं प्रत्यंतर प्रकर्षाने येतं.

कधी नव्हे इतकीसमृद्धी आज माणसांकडे आली;

मात्र मनं दरिद्री झाली आहेत. इमारतींची उंची आम्ही वाढवली; पण माणसं उंची हरवून बसली. अगदी दूरदूर चंद्रावर पोहचली. मंगळावर वसतीची कामना केली जाते आहे. यानं शनिपर्यंत पोहोचल्याच्या वार्ता आपण करतो. पण आपल्या शेजारच्या फ्लॅटमध्ये कोण राहतो, हे तरी कुठे नीटसं माहीत असतं. काळ परिवर्तनीय असतो. त्यासोबत चालताना आपणही बदलून घ्यावं लागतं. पण याचा अर्थ चेहरा विसरून मुखवटा परिधान करायचा असा नाही होत. मुंगीला साखर आणि गायीला भाकर खायला देण्यासाठी धावणारे फाटक्या झोळीत चतकोर तुकडा तेवढ्याच आस्थेने टाकतात का? काळ कधीच काळा गोरा नसतो. त्याला रंग चढवण्याचं काम माणूस करीत असतो. काळाचा हात धरून चालत आलेल्या बदलांनी संवेदनशीलता याशब्दाची व्याख्याच बदलून टाकली आहे. कवी म्हणतो,

घसा कोरडा पडतो
वासुदेवाचा
बोंबलून बोंबलून
पण उतरत नाही कधीच
माणुसकी
दुसऱ्या तिसऱ्या मजल्यावरून खाली
ह्या कॉन्क्रिट हृदयी शहरात

(वासुदेव:पृ.६३)

काळाने कोरलेल्या प्रश्नांची जाणीव साहित्यातून प्रतिबिंबित होत असली, तरी त्याला अर्थाचे अनेक आयाम असतात. ते केवळ वैयक्तिक नसतात. संवेदनांना वेदनांचे अर्थ कळले की, त्यांना वैश्विक परिमाण प्राप्त होत असतं. आयुष्यावर अनेक अंगांनी आघात होत असतात. ओंजळभर अस्तित्वालाच ते आव्हान असतं. ही आव्हाने मनात भावनिक, मानसिक, वैचारिक आंदोलने निर्माण करतात. त्याचे पेच असतात. ते पकडता आले, की स्वप्नांचे प्रदेश अन् वास्तवातल्या जगाची अंतरे आकळत जातात. देवा झिंजाड यांची कविता माणसांभोवती फिरते. त्यांच्या जगण्यावर, वागण्यावर, आचार-विचारांवर बोलते; तशी वैगुण्यांवरही बोट ठेवते. जगण्यातल्या विसंगतीला अधोरेखित करते. संगतीला समजून घेते. जीवनाची रुपे समर्थपणे मांडते. माणसांच्या विसंगत वागण्याचे अन्वयार्थ समजून घेताना कवी लिहितात,

लाळघोटी फ्लेक्सच्या नादात अन्
हुजरेगिरीच्या वणव्यात
नामशेष केले जातायेत
महान नेत्यांचे विचार
उलटे पालटे टांगून त्यांच्या तत्त्वांची
काढली जातेय धिंड
सुविचारांची केली जाते होळी

(डीजे: पृ.३१)

जगण्याचे पोत विटलेले आणि पावलोपावली पेच वाढत चाललेले आहेत. जगण्याची गती वाढली, पण आयुष्याचा गुंता अधिक जटिल होत आहे. विसंगतीच्या वणव्यात आकांक्षा करपत आहेत. आसपासच्या कोलाहलात वेदनांचे आवाज हरवत आहेत. जागतिकीकरणाच्या गोंडस झुली पांघरून दारी चालत आलेले परिवर्तन माणसांना अगतिकी करणाच्या सुळक्यावर उभं करीत आहे. आसपास सुखांची कृत्रिम बेटे तयार होत आहेत. दुभंगत जाणारी मने आणि ध्वस्त होत जाणारी नाती नियतीचा अभिलेख ठरू पाहत आहेत. काळाचे बरे-वाईट ओरखडे संवेदनशील मनावर ओढले जातातचं. परिस्थितीच्या गर्भातून अंकुरणाऱ्या आकांक्षांच्या कोंबांची मनोगते लिहित्या हातांना अवगत असली की, अभिव्यक्तिचे अर्थ शोधायची आवश्यकता नसते हेच खरे. अशा बहुपेडी पेचानां ओंजळीत पकडणारी देवा झिंजाड यांची कविता म्हणूनच परिस्थितीवरील परखड भाष्य आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्त होणार नाही. परिस्थितीने पदरी पेरलेले पेच काही केल्या सैल होत नाही. काहींकडे सगळंच असावं पण काहींकडे काहीच नसावं, हा विपऱ्यास शब्दांकित करताना कवी लिहितो,

तुहा जल्म झाल्ता
तव्हा
चिमनीत घासलेट नव्हतं
दुसऱ्या दिवशीच तुला पाह्यलं...

(घासलेट: पृ.११३)

आपापली कुंपणे सुरक्षित करण्याला आयुष्याचं प्रयोजन मानणारी माणसे आसपास विपुल प्रमाणात नांदती असतात. भेदाच्या भिंती उभ्या करून कार्यभाग

साध्य करण्यात पारंगत असणारेही अनेक असतात. बेगडी अस्मिता मिरवण्यात धन्यता मानणारेही संख्येने कमी नसतात. या सगळ्यांची प्रतीती प्रत्यक्ष यायला हवी असे नाही. पण त्यांच्या प्रवासाच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत कविता चालत असते. याचा अर्थ तिला वैगुण्ये वेचायची असतात असे नाही, तर आसपास वाचायचा असतो. व्यवस्थेत विसावलेला कोरडेपणा आस्थेचा ओलावा हाती लागू नाही देत. ही कविता ओंजळभर ओलाव्याच्या शोधात आहे. शोषितांना वाचा नसते. शोषकांना आवाज आंदण दिलेले असतात. वंचितांच्या आवाजांना मुखरित करणारे शब्द आत्मबोधाच्या प्रतलावरून प्रवास करीत असतात.कवी केवळ मातीच्या वेदनेला शब्दांकित नाही करत तर मरगळलेल्या मनांमध्ये मशाली प्रज्वलित करून परिस्थिती परिवर्तनाचे प्रयोग करू पाहतो. कवी म्हणतो,

मध्यवर्गीयांना वेळ नाही
श्रीमंतांना गरज नाही
गरिबाला भीती वाटते
ज्याच्याकडे आहे सगळं त्याला लाज वाटते
कशी करणार क्रांती?

(सगळं उलथवून टाकलं पाहिजे: पृ.३२)

देवा झिंजाड यांची कविता भवताल वाचते. वेचते. सामान्य वकुब असणाऱ्या माणसांच्या जगण्याचे प्रश्न अन् प्रेरणा या कवितेला शब्द देतात. सगळं उलथवून टाकलं पाहिजे मधील कविता हे सगळे अनुभव तरलतेने टिपते. जगण्यातले वास्तव दिमतीला घेऊन वाहणारी ही कविता काळाच्या अनुबंधांना अधोरेखित करीत राहते. ध्वस्त होत जाणाऱ्या माणसांची, त्यांच्या जगण्यातील गुंत्याची, मुळांपासून सुटत चालल्याची व्यथा व्यक्त करते. बेगडी सुखांच्या सोबत धावताना आलेल्या कोरडेपणाची वेदना घेऊन मूल्यांच्या पडझडीबाबत खंत व्यक्त करीत राहते. कवी म्हणतो,

मेनूकार्डाशिवाय आयुष्यात जे करत नाहीत
कशाचीच पारायणं
तेच घेत असतात गाठेवर मोठमोठाले परिसंवाद
ओसंडून वाहणारी अक्कल ओकणारे घसे
अन् पासबुक अपडेटच्या प्रेमातली माणसं
कधीच वाचत नाहीत तुकाराम आणि आंबेडकर
जयंत्या पुण्यतिथ्या मात्र निष्ठेने करतात साजऱ्या

(मेनूकार्डाशिवाय: पृ.६२)

प्रघातनीतीच्या परिघाभोवती प्रदक्षिणा करताना पडलेला परंपरांचा पायबंद सहजी मिटत नसतो. कदाचित त्यामागे आलेली अगतिकता असेल अथवा प्रवाहाच्या विरोधात निघण्याचा धीर नसेल. कारणे काही असोत. तिच्या बाई असण्याचे अर्थ व्यवस्थाप्रणीत संकेतांनी सीमांकित केलेल्या चौकटीत आणून अधिष्ठित केले आणि सांभाळलेही जातायेत. या सीमांचं उल्लंघन करू पाहणारे असंख्य आवाज आक्रंदनाच्या आवर्तात हरवले आहेत. परंपरेने बंदिस्त केलेलं जगणं जगणारी मानिनी व्यवस्थेच्या वर्तुळात नियतीनिर्मित, परिस्थितीनिर्मित आघात सहन करीत राहते, हे अधोरेखित करताना कवी लिहितात,

ओझ्याखालची चुंभळ
आणि चुंभळीखालची बाई
अवस्था दोघींची सारखीच होई
वापर झाला की दिली जाते
सांदाडीत ठेवून
काढली जाते हवी तेव्हा
वापरली जाते हवी तितक्या वेळा
....
एकदा चपटी झाली की
कायमची अडगळीत फेकून दिली जाते.

(चुंभळ: पृ.२५)

जागतिकीकरणाची वसने परिधान करून आलेल्या झगमगाटाने व्यवस्थेला गती मिळाली, पण प्रगतीचे पट किती विस्तारले? नक्की सांगणं अवघड. काळ काही कुणासाठी थांबत नसतो. आपला आपण शोध घेत तो पुढच्या वळणावर विसावतो. त्याला प्रतिसाद देता नाही आला, तर त्याचे पडसाद परिस्थितीच्या पटलावर पडतात. परिस्थितीपासून पलायन करून माणूस प्रगती नाही करू शकत. प्रगतीच्या परिभाषा सुनिश्चित कराव्या लागतात. संकेतांच्या चौकटी खिळखिळ्या होत आहेत. ध्वस्त होत जाणाऱ्या वर्तुळात विहार करणाऱ्या माणसांच्या जगण्यातील ओलावा आटत चालला आहे. सगळ्याच सीमा आक्रसत आहेत. पडझड प्राक्तन होऊ पाहत आहे. 'स्व' अधिक सुंदर होऊ पाहतोय. त्याग,

समर्पण वगैरे गोष्टी मूल्यांच्या परिभाषेत परिमित झाल्या आहेत. देहाचे सोहळे साजरे करण्याला बरकत असण्याच्या काळात केवळ जिभेची नाही, तर जगण्याचीही चव बदलली आहे. कवी म्हणतो,

ज्वारीची असो वा बाजरीची
भाकरी कधीच नसते बेचव
तर काहींच्या जिभाच
म्याकडोनाल्ड जातीच्या झाल्यात
त्यांना रात्रंदिवस लागतात
पिझ्झाचे डोहाळे

(म्याकडोनाल्ड जातीच्या: पृ.३७)

काळाने कूस बदलली, तसे परिस्थितीचे परीघही फिरले. काल सुसंगत म्हणा किंवा आणखी काही, माणसाच्या जगण्याच्या दिशा बदलल्या. त्यांना सुखाचा परीस शोधण्याची आस लागली. नव्या वाटां-वळणांचे हात धरून चालत आलेली मोहतुंबी सुखे मनाला सुखावत आहेत, तसा मनात अधिवास करून असणारा स्वार्थ अधिक प्रबळ होत आहे. जगण्यातील व्यापकपणाची क्षितिजे आक्रसत आहेत. संकुचित जगण्याला आत्मलब्ध प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. उच्छृंखलपणाचे वारे वाहत आहेत. साऱ्यांना स्वतःभोवती सुखांचा परिमळ सतत दरवळत राहण्याची आस लागली आहे. मी नावाच्या मूठभर परिघाभोवती मन घिरट्या घालू लागलंय. उथळपणाला सभ्यतेची वसने चढवून वास्तव झाकण्याचा प्रयत्न सुरु आहे. हे सांगताना कवीचे शब्द उपरोधाची वसने परिधान करून अवतरतात. ते लिहितात,

तो करतो
ती करते
म्हणून मीही करतो
तो फिरतो
ती फिरते
म्हणून मीही फिरतो
किती मिळतील म्हणून आधीच करतो विचारणा
परवडेल का जायला-यायला घेतो ह्याचा अंदाज
आम्ही विकतो कविता
पाकिटात घालून
टाळ्या आणि हशा घेऊन बोकांडी बसतो हिंडत
तेव्हा चढतो आमच्या जाकीटावर गर्वाचा रंग...

(पाकिटातल्या कविता: पृ.४८)

माणसाचं मन सैरभैर होऊन उधळत आहे. साऱ्यांनी आपापल्या जगण्याची परिभाषा आपणास हव्या असणाऱ्या शब्दांनी लेखांकित करून घेतली आहे. पूर्वी समाज नावाचं स्वखुशीने स्वीकारलेलं बंधन तरी सोबत असायचं. कळत-नकळतही आपणाकडून वाईट कृती घडू नये, सार्वजनिक विचारांत अप्रतिष्ठा होऊ नये, याची काळजी घेतली जायची. गाव काय म्हणेल, याची चिंता वाहत रावही वचकून असायचे. माणसे अन्योन्यभावाने समाजशरण जगणं सहजपणे स्वीकारायचे. याचा अर्थ तेव्हा समाजात सगळं काही सुरळीत सुरु असायचं असाही नाही. पण समाजाने आखून दिलेल्या नीतिसंकेतांचा माणसांच्या जगण्यात एक वाचक असायचा. मग तो वैयक्तिक असो अथवा सार्वजनिक. पण काळाच्या ओघात एक कोडगेपण जगण्यात विसावू पहातंय. हे सांगताना कवी लिहितो,

स्वतः रहातो शहराच्या मिठीत
आई -बाप बिन भाकरीचे मारतो गावाला
बेसुमार टुकार भिकारसुद्धा भाजून घेतात पोळ्या
अश्याच आमच्या सगळीकडे सुटल्यात टोळ्या

(पाकिटातल्या कविता: पृ. ४९)

भवताल सुटत जाण्याची वेदना कवी समर्पक शब्दांनी अधोरेखित करतो. वर्तमानाचे सजग भान त्याच्या स्मरणातून निरोप नाही घेत. सत्य कल्पितापेक्षा प्रखर असते, त्याचा अव्हेर करून नाही चालत याची जाण आणि भानही कवीकडे आहे. व्यवस्थेतील व्यत्यास आणि वर्तनातील विसंगती माणसांना अविचारी बनवत असल्याची खंत प्रत्ययकारी शब्दांतून कवी व्यक्त करतो. जाणिवांचे अनेक पदरी आयाम लाभलेली ही कविता व्यवस्थेत विसावलेलं दुभंगलेपण कोणताही सांधा जुळू देत नसल्याचं सूचना करते. असं म्हणणं अतिशयोक्त नाही होणार, नाही का? सगळं उलथवून टाकलं पाहिजे.


**चंद्रकांत चव्हाण**
चलभाष : ९४२०७८९४५५

◆◆

कवयित्री प्रतिभा जगदाळे यांच्या ‘भावतरंग’ या काव्यसंग्रहाचे डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केलेले परीक्षण.

# अव्यक्त स्त्रीच्या उद्गारांच्या कविता !

**प्रा. डॉ. सुनीलकुमार लवटे**




पुस्तकाचे नाव : **भावतरंग**
लेखक : **सौ. प्रतिभा जगदाळे**
प्रकाशकः **इसाप प्रकाशन (नांदेड)**
पृष्ठेः ९६ किंमत : १२५/-

प्रतिभाताई जगदाळे यांनी यापूर्वी लिहिलेली ‘भावनांच्या हिंदोळ्यावर’, ‘अनुबंध’, ‘मिश्किली’ आणि ‘चंदनवृक्ष’ ही पुस्तके वाचकांच्या पसंतीस उतरली आहेत. या गद्य लेखनानंतर त्यांनी ‘भावतरंग’ हा काव्यसंग्रह साकारला. मी या संग्रहातील सगळ्या कविता मनापासून वाचल्या आहेत. कविता दोन प्रकारे वाचायची असते. एक लिहिलेली कविता आणि दुसरी न लिहिलेली, न सांगितलेली कविता. अव्यक्तपणे सांगितलेली कविता! स्त्री जेव्हा एखादी गोष्ट बोलते, त्यातून न सांगितलेलं ती जे बोलत असते, ते फार मार्मिक असतं. प्रतिभाताईंच्या कविता वाचत असताना हे ठळकपणे जाणवतं.

एक गोष्ट खरी, आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत नवरे अहंकारी असतात. आयुष्यभर ते अहंकारातच असतात; पण एक वेळ येते तेव्हा त्यांना आपली चूक कळते. म्हणजे त्यांचं गर्वहरणच होतं. माझ्यासह सर्व पुरुष वर्गाचा हाच अनुभव आहे. याची देही याची जन्मी इतके दिवस त्याला वाटत असतं, की मी संसार करतो; पण नंतर लक्षात येतं, की तू हमाल होतास गड्या! संसार तर त्या माऊलीनंच केला.
हे असं जे शहाणपण स्त्रीमध्ये असतं ते त्याच्या उशिरा लक्षात येतं. प्रतिभाताईंच्या कविता वाचत असताना मला जो साक्षात्कार झाला तो म्हणजे भारतातील तमाम स्त्रियांनी भारतातल्या तमाम पुरुषांना संबोधून केलेल्या या कविता आहेत. त्याचा हा वस्तुपाठच आहे, म्हणजे ब्ल्यू प्रिंटच आहे. यात कसलीही अतिशयोक्ती नाही.

यातील ‘डोळे’ कविता घ्या किंवा यात ‘स्त्रीलिंगी

पुल्लिंगी' नावाची कविता आहे. मी पहिल्यांदा ही कविता वाचल्यानंतर माझ्या लक्षात आले, की खरेच पुरुष किती क्रूरपणे वागतात. स्त्री किती विनम्र असते. नैतिक असते. या संग्रहातील कविता वाचत असताना आपल्या लक्षात येते, की यातील कवितांना अनेक छटा आहेत, आणि ही नुसती लावणी लिहिणारी कवयित्री नाही तर वीरकाव्य लिहिणारी वीरश्रीपण आहे.

अशा अनेकपरी या कवयित्रीच्या 'भावतरंग' या काव्यसंग्रहात आपल्याला दिसून येतात. लोकसाहित्याच्या अभ्यासक, ज्येष्ठ लेखिका डॉ. तारा भवाळकर यांनी पहिल्यांदाच कवितांचं अभिवाचन केलं, आणि ते या भावतरंगमधील कवितांचं अभिवाचन केलेलं आहे. अभिवाचनात केवढी ताकद असते हे आपण जाणतोच.

भावतरंग या कवितासंग्रहाध्ये गझल आहे, अभंग आहे, भावगीत आहे, आणि एक अव्यक्त स्त्रीची सल पण यामध्ये भरलेली आहे.

यातील कविता वाचत असताना मला एक गोष्ट आठवली, की केव्हातरी भारतातली स्त्री लिहिती झाली. ती कशी, याचा धांडोळा घेताना मला बंगालमधल्या पहिल्या लिहिणाऱ्या स्त्रीची कथा आठवली.

बंगालमध्ये लिहिणारी जी पहिली स्त्री होती तिचं आत्मकथन तिच्या मृत्यूनंतर प्रकाशित झालं. त्या आत्मकथनाचं वैशिष्ट्य असं होतं, की ती स्त्री अशिक्षित होती. तिला आपण अशिक्षित असल्याचे शल्य होते. त्या काळात बंगालमध्ये स्त्री उंबऱ्याच्या बाहेर पडायची नाही. हे आपल्याला रवींद्रनाथांच्या आणि शरच्चंद्र चटर्जी यांच्या लिखाणातून समजतं; पण तिने ठरवलं, की आपल्या मुलीच्या आयुष्याचे सार्थक व्हावे म्हणून तिने आपल्या घरी गुरुजींना बोलावून, तिला शिक्षण देण्याचे ठरवले. गुरुजी जेव्हा तिला शिकवत तेव्हा ही बाई स्वयंपाकघरामध्ये दाराच्या आत बसून शिकत राहिली आणि तिने दिसेल त्या कागदावर काही लिहून ठेवलं आणि नंतर ते तिच्या मुलीने प्रकाशित केलं.

प्रतिभा जगदाळे यांच्या सगळ्या कविता मला एकच महत्त्वाची गोष्ट सांगतात, ती म्हणजे स्त्रीला व्यक्त होण्याचा अवकाश मिळाला, तर ती स्त्री अनेक अव्यक्त गोष्टी सांगून जाते. अशाच अनेक अव्यक्त गोष्टी या एकेक कवितांमध्ये आपल्याला वाचायला मिळतात. ज्यांना शहाणपण आहे त्यांनी ही कविता शहाणपणाने वाचावी. डॉ. पी. जी पाटील मला नेहमी सांगायचे, की जो शहाणा, सुजाण शिक्षक असतो, तो रीड बिटवीन द लाइन नावाची जी गोष्ट असते ती शिकवत असतो. शहाणी कवयित्री शब्दांत जे सांगते त्याच्या पलीकडे जो आशय असतो तो तिला खरा सांगायचा असतो.

या कविता म्हणजे नुसत्या कविता नाहीत, तर भारतातील स्त्रियांनी केलेली पुरुषाची समीक्षा आहे.

पूर्वीच्या काळात भारतात जी संस्थाने होती त्या संस्थानांमध्ये तीन संस्थाने प्रागतिक मानली जातात. एक बडोद्याचे सयाजीरावांचे संस्थान, दुसरे कोल्हापूरच्या शाहू महाराजांचे संस्थान; पण त्याआधी भारतातले एक प्रागतिक संस्थान होते, ते म्हणजे त्रावणकोरचे संस्थान. भावतरंग वाचत असताना त्रावणकोरमधील स्त्रीमुक्तीच्या लढ्याची आठवण येते. तेथील स्त्रीमुक्ती कशी झाली याच्या मार्मिक अशा कथा आहेत. त्यातीलच एक कथा निर्मलाची!

त्रावणकोर संस्थानात गरत्या स्त्रियांनाच म्हणजे सवर्णांच्या स्त्रियांनाच छातीवर वस्त्र लावण्याचा अधिकार होता. तेथील दलित स्त्रियांना छातीवर वस्त्र लावण्याचा अधिकार नव्हता. लावलेच तर तिला कर भरावा लागे आणि ती कर भरण्याची प्रक्रिया फार गलिच्छ होती. तेथील निर्मला नावाची दलित स्त्री या विरोधात बंड करते आणि त्यात तिला बलिदान द्यावे लागले. तिच्या विरहाने तिचा नवराही आत्महत्या करतो. त्यानंतर तेथील सर्व स्त्रिया म्हणजे सवर्णांच्या स्त्रिया आणि दलित स्त्रिया एकत्र येऊन ठरवतात, की आजपासून गावातील एकही स्त्री छाती उघडी ठेवणार नाही, आणि करही भरणार नाही. अशा प्रकारे तेथे क्रांती होते. करझोल बंद होतो.

मी हे का लिहीत आहे असे जर तुम्हाला वाटत असेल तर, यातल्या एकेक कवितांमध्ये भारतीय स्त्रियांचा करझोल, एकेक स्त्रियांचा जोहार तुम्हाला भरलेला दिसेल. प्रतिभा जगदाळे यांच्या कविता वाचून विसरण्याच्या कविता नाहीत, शिळोप्याच्या वेळेत वाचण्याच्या कविता नाहीत, त्या सर्व स्त्रियांच्या अशा उद्गारांच्या कविता आहेत, की त्या वाचून भारतीय पुरुषांनी नतमस्तक व्हावं, आत्मकेंद्रित व्हावं, अंतर्मुख व्हावं आणि आपला पुरुषीपणा एकविसाव्या शतकात गाडून टाकावा.

डॉ. प्रतिमा इंगोले यांनी या संग्रहाला साजेशी प्रस्तावना लिहिली आहे.

अशा या कविता सर्वांनी वाचाव्यात असे मी आवाहन करतो, आणि या कविता आपणाला आवडतील अशी अपेक्षा करतो.

**प्रा.डॉ. सुनीलकुमार लवटे**
चलभाष : ९८८१२५००९३

◆◆

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
# इतर शाखा कार्यवृत्त नोंद

### दामाजीनगर

१) १६ मार्च – डॉ. राजेश्वरी कोरे यांच्या 'कुळव' या कवितासंग्रहाचे प्रकाशन प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांचे हस्ते करण्यात आले. या कवितेविषयी कवयित्री सौ. वंदना कुलकर्णी व सौ. सुषमा सुतार यांनी रसग्रहणात्मक विचार मांडले, व्यासपीठावर डॉ. अश्विनी शहा, नगराध्यक्षा सौ. अरुणा माळी, जि. प. सदस्या मंजुळा कोळेकर, अर्चना सलगर उपस्थित होत्या. प्रास्ताविक सौ. रेखा जडे यांनी केले तर सौ. दया वाकडे यांनी आभार मानले.

२) लॉकडाऊनच्या काळात मंगळवेढ्यात बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिस कर्मचारी होमगार्ड, कमांडो यांना तीन जून ते वीस जून या कालावधीत रोज सकाळी अल्पोपहार देण्यात आला.

३)११ जून– म.सा.प. दामाजीनगर शाखेने लॉकडाऊन काळात राबवलेल्या विविध उपक्रमांची दखल घेऊन नागणे सोशल सव्हिसेस या संस्थेच्या वतीने नगरसेविका सौ. अनिता नागणे यांचे हस्ते 'कोविड योद्धा, पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

४)१५ व १६ ऑगस्ट– राज्यस्तरीय ऑनलाईन साहित्य संमेलनः प्रसिद्ध कवयित्री डॉ. स्वाती शिंदे होत्या. स्वागताध्यक्ष माजी सभापती ॲड. नंदकुमार पवार होते. संमेलनाचे उद्घाटन माजी पालकमंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांचे हस्ते ग्रंथपालखी पूजनाने झाले. संमेलन स्थळाचे साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे नगरी असे नामकरण करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात कथाकथनाने झाली. त्यात नयन राजमाने (लातूर) अर्चना लाड (पलुस) प्रभाकर जमखंडीकर (सोलापूर) आशा पाटील (पंढरपूर) अशोक उन्हाळे, रेश्मा गुंगे (मंगळवेढा) यांनी सहभाग घेतला. वासुदेव जोशी यांनी सूत्रसंचालन केले. नवोन्मेष या सत्रात सांगलीचे कवी गौतम कांबळे यांचे अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले, त्यात प्रा. मेघा पंडित (लातूर) जयश्री देशकुलकर्णी, ऋतुजा भांबरे, जगदीश वेदपाठक, पांडुरंग तांबे, सचिन बेंडभरे, डॉ.वैष्णवी जोशी (पुणे), कमल नलवडे (उस्मानाबाद) सागर डवरी (मुंबई), मनिषा पाटील (सांगली) देवदत्त चौधरी (नाशिक) गोरक्ष जाधव आदी सत्तावीस कवी सहभागी झाले. सूत्रसंचालन प्रा. दत्ता सरगर यांनी केले.

५) वात्सल्यसूक्त या शीर्षकाखाली प्रकाश जडे लिखित वात्सल्य भावनेने ओतप्रोत कविताचे सादरीकरण सौ. स्मिता जडे यांनी केले. सूत्रसंचालन सौ. अवंती पटवर्धन यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अश्विनी शहा होत्या. शेवटच्या सत्रात 'काव्यरंग' हा कार्यक्रम लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांचे अध्यक्षतेखाली झाला. त्यात डॉ. स्वाती शिंदे(विटा) कलिका बापट, विजय वडवेराव, सुनीता लवटे, दिनेश भोसले(पुणे) बाळकृष्ण शिंदे(कल्याण) प्रा. प्रिया धारुरकर(औरंगाबाद), अरुणा दिवेगावकर, मंदाकिनी कुलकर्णी (लातूर), डॉ. विद्यासागर पाटंगणकर(बीड), अनिता यलमटे (उदगीर) प्रकाश व चित्रा क्षीरसागर(मडगाव), डॉ. सुनंदा शेळके (जयसिंगपूर), वासंती मेरु (सांगली), आबा पाटील (मगसुळी), रमजान मुल्ला (नागठाणे), दयासागर बन्ने (देशिंग), संदिप नाझरे (अमनापूर), सुधीर इनामदार (आटपाडी), डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, निर्मला मठपती, वंदना कुलकर्णी, रेणुका बुधाराम, स्मिता मुराळी (सोलापूर) रविराज सोनार, संगीता मासाळ, सूर्याजी भोसले, सचिन कुलकर्णी (पंढरपूर), डॉ. स्मिता पाटील, विमल माळी (मोहोळ), प्रा.दत्ता सरगर (मंगळवेढा) हे सहभागी झाले. सूत्रसंचालन सौ. दया वाकडे यांनी केले. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी शाखा अध्यक्ष प्रकाश जडे, डॉ सुभाष कदम, दिगबर भगरे, संभाजी सलगर, लहु ढगे यांनी विशेष प्रयत्न केले.

६) २ जुलै – म.सा.प शाखेच्या सामाजिक कामाची दखल घेऊन राजे प्रतिष्ठानतर्फे शाखेस 'कोविड लढवय्या' पुरस्कार देण्यात आला.

७) ५जुलै – नवनियुक्त शिक्षणाधिकारी मंदोदरी वाकडे यांचा सत्कार शाखेच्या वतीने कवयित्री सुषमा सुतार यांचे हस्ते करण्यात आला.कोरोनाच्या महामारीत घरी सुरक्षित राहून दि.२१ जुलै ते २८ जुलै २०२० दररोज फक्त ४० मिनिटे महाराष्ट्र साहित्य परिषद, नंदुरबार शाखेतर्फे ऑनलाईन झूम ॲपवर राज्यस्तरीय व्याख्यानपुष्प आठ दिवस संपन्न झाले. महाराष्ट्र साहित्य परिषद आजीवन सदस्य व साहित्यप्रेमींनी व्याख्यानाचा लाभ घेतला. डॉ. उमेश शिंदे यांनी नियोजन केले व यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

८)२१जून– कालिदासाची रचना अवीट गोडीची!असे मत कालिदास दिनी बोलताना सौ. अवंती पटवर्धन यांनी व्यक्त केले.

९) शाखेचे सदस्य दत्तात्रय वाघ यांचे सौजन्याने कोविड सेंटरला सॅनिटायझेशन मशिन भेट दिले.

१०)२२ ऑगस्ट – प्रतीवर्षाप्रमाणे आरोग्याची काळजी घेणारे सर्व नियम पाळून सौ.दया वाकडे यांचे अध्यक्षतेखाली सामाजिक उपक्रम राबवत गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

११) ५ सप्टें. – शाखेने प्रेरणा प्रतिष्ठानचे सहकार्याने कृतिशील शिक्षक पुरस्कार डॉ. वंदना जाधव (उस्मानाबाद)राजेश पवार (मंगळवेढा) शावरू जडगे (सोलापूर) यांना प्रदान केले.

१२) १५ ऑक्टोबर– वाचक प्रेरणा दिनानिमित्त प्रभाकर जमखंडीकर यांना कै. ज्ञानेश्वर जडे स्मृती बहुश्रुत वाचक पुरस्कार, स्व. संजय

सविता स्मृती वाचनालयाला- वाचन समृद्धी पुरस्कार, तर सौ.दया वाकडे, रोहिदास भोरकडे, प्रा.पठाण शिवशरण यांना वाचनप्रेमी पुरस्कार, ज्येष्ठ रंगकर्मी डॉ.मीरा शेंडगे यांचे हस्ते देण्यात आले.

१३)२२ ऑक्टो- आनंदी गुरुकुल ॲकॅडमी (अकोला) यांनी आयोजित केलेल्या ऑनलाईन राज्यस्तरीय काव्यवाचन/लेखनस्पर्धेत शाखेने भरघोस यश मिळवले. काव्यवाचन खुला गट प्रथम-स्मिता जडे, काव्यलेखन द्वितीय -दया वाकडे, स्वरचित लोकप्रिय कवितागट प्रथम- संगीता मासाळ, द्वितीय-भारती धनवे, तृतीय-रेश्मा गुंगे. किशोर गट, काव्यवाचन प्रथम-श्रुती जाधव, काव्यलेखन प्रथम-प्रांजली तोडकरी, प्रोत्साहनपर-गोरक्ष जाधव. सर्व विजेत्यांचा शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

१४)३० ऑक्टो.- लॉकडाऊन काळात शाखेच्या वतीने शाखेच्या सभासदांसाठी ऑनलाईन काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत खुला गट स्वरचित कविता, प्रथम-संगीता मासाळ द्वितीय-रेश्मा गुंगे, डॉ.शबनम सय्यद, तृतीय-डॉ. राजेश्वरी कोरे, गोरक्ष जाधव. उत्तेजनार्थ-शुभदा जोशी, सुधा मांडवे. अन्य कवींच्या कवितेचे सादरीकरण गट. प्रथम-अवंती पटवर्धन, द्वितीय-भारती धनवे, प्रफुल्लता स्वामी, तृतीय-
प्रा. राजेश भोजने. उत्तेजनार्थ-प्रा.पठाण शिवशरण

## जुळे सोलापूर

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूर आणि श्री. संतोषी महिला मंडळ, जुळे सोलापूर, संयुक्त विद्यमाने, जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविणे, अशी स्पर्धा महिलांसाठी आयोजित केली होती. या स्पर्धेत राजश्री म्हमाणे, संध्या साळुंके, अनिता संगशेट्टी यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे, तर सुनीता पाटील, अनिता पाटील यांना उत्तेजनार्थ परितोषके दिली गेली. या स्पर्धेत एकूण १४ महिला सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. दीपाली जोशी आणि सौ. स्वानंदी देशपांडे यांनी काम पाहिले, तर मसाप जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी दीप प्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन केले. प्रास्ताविक उषा देशपांडे, तर सूत्रसंचालन आणि आभार रोहिणी कुलकर्णी यांनी मानले. यावेळी म. सा. प. जुळे सोलापूरचे प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, सदस्य श्रीकांत कुलकर्णी, शांताबाई क्षीरसागर यांचेसह कार्यकारिणी सदस्य, तसेच संतोषी महिला मंडळाच्या सदस्या हजर होत्या.

**२) १८ मार्च २०२०**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूर आयोजित स्व. श्रीनिवास विष्णू रायते गुरुजी बालसाहित्यिक पुरस्कार डॉ.उर्मिला चाकूरकर यांना, तर स्व.श्रीनिवास जोशी गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, श्री. अण्णपा भिमशा कुंभार गुरुजींना, तसेच राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा २०१९ मधील दिवाळी अंक १) वारस, २) समाज प्रतिबिंब, २) तेजोमय, ३) अधोरेखित, यांना तर हास्य रंग, पूर्व पुण्य आणि चटक मटक या अंकांना विशेष पुरस्काराने २२ मार्च २०२० रोजी सन्मानित करण्याचे ठरले होते; पण कोविड-१९ चे साथी मुळे १९ मार्च २०२० पासून संपूर्ण लॉकडाऊन घोषित झाल्याने सदर कार्यक्रम सध्या स्थगित ठेवून पुढे करण्याचे म.सा.प., शाखा जुळे सोलापूर, कार्यकारिणीने ठरवले.

**३) १२ ऑक्टोबर २०२०:**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूर आणि हिराचंद नेमचंद वाचनालय, संयुक्त विद्यमाने, ज्येष्ठ साहित्यिक, अरण्य ऋषी, आणि २००६ साली सोलापूर येथे झालेल्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असलेले मा. श्री. मारुती चितमपल्ली हे वयाच्या ९० व्या वर्षी, आपल्या स्वग्रामी सोलापूर येथे कायमचे स्थायिक होण्यासाठी आले तेव्हा सोलापूरच्या साहित्य क्षेत्रातून प्रथम, त्यांचे शाल, बुके देऊन, म.सा.प. जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी आणि हि.ने.वाचनालय प्रमुख कार्यवाह डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी कोरोनाचे नियम पाळून प्रातिनिधिक स्वागत केले.

**४) ३०ऑक्टोबर २०२०:**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूर आणि रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर, संयुक्त विद्यमाने, कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्त, ज्येष्ठ विडंबन कवी, मा श्री. बंडा जोशी, पुणे यांची, हास्य मैफल कोरोनाचे सर्व नियम पाळून फेसबुक लाईव्ह आयोजित केली होती. प्रास्ताविक पद्माकर कुलकर्णी अध्यक्ष म.सा.प. जुळे सोलापूर यांनी, तर आभार रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर अध्यक्ष सचिन चौधरी यांनी मानले. यावेळी म.सा.प जुळे सोलापूर प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, कार्यकरिणी सदस्य अमित कामतकर आणि रोटरी क्लबचे काही सदस्य हजर होते

**५) ५ नोव्हेंबर २०२० :**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूर कार्यकारिणीत ठराव करून, विजापूर रस्त्यावर असलेल्या 'स्मृतीवन' याला, वनाचे प्रणेते आणि म.सा.प जुळे सोलापूरचे माजी अध्यक्ष स्व. डॉ. वासुदेव रायते स्मृती वन हे नाव देणे आणि अरण्यऋषी श्री. मारुती चितमपल्ली यांचा सोलापूर महानगरपालिका यांनी नागरी सत्कार करून त्यांना 'मानपत्र' द्यावे, असे निवेदन सोलापूर महानगरपालिका महापौर सौ.श्री.कांचन यन्नम यांना देण्यात आले. यावेळी कोरोनाचे सर्व नियम पाळून, म.सा.प जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, उपाध्यक्ष प्रशांत जोशी, प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे हजर होते.

**६) ९ नोव्हेंबर २०२० :**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूर यांची लॉकडाऊन नंतर अनलॉक झाल्यावर कोरोनाचे सर्व नियम पाळून कार्यकारिणीची सभा इंडियन मॉडेल स्कूल येथे घेण्यात आली.या

सभेत मागील इतिवृत्त आणि मार्च २०२० अखेर ताळेबंद पत्रक/उत्पन्न खर्च पत्रक, प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी वाचून दाखवले, ते कायम करण्यात आले. तसेच २२ मार्च २०२० रोजी होणारे आणि लॉकडाऊनमुळे पुढे ढकलले गेलेले, स्व.श्रीनिवास विष्णू रायते गुरुजी बालसाहित्यिक पुरस्कार, स्व.श्रीनिवास जोशी गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार आणि राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा २०१९ चे पुरस्कार एका छोट्या समारंभात कोरोना नियम पाळून करायचे ठरले. यंदाचा स्व.दत्ता हलसगीकर पुरस्कार स्थगित करायचे ठरले, याच सभेत दिवंगत साहित्यिक रत्नाकर मतकरी, भास्करराव आव्हाड, मधुकर जोशी, आशालता वाबगावकर, नीला सत्यनारायण, डॉ.लीलाताई पाटील, पुष्पा भावे, वामनराव तेलंग, उत्तम बंडू तुपे, सुधाकर पंत परिचारक, संत साहित्याचे गाढे अभ्यासक ह.भ.प. वा. ना. उत्पात, ज्येष्ठ बालसाहित्यिक विजया जहागीरदार, म.सा.प. जुळे सोलापूर माजी अध्यक्ष डॉ.वासुदेव रायते, साहित्यिका निर्मला मठपती, विजय कुलकर्णी, दैनिक संचारचे प्रशांत गांधी, भैया शिरसिकर, पू.रा.खांबेटे सर, लेखक आनंद देशमुख, क्रीडा तज्ज्ञ जे टी.कुलकर्णी यांचेसह ज्ञात, अज्ञात मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

**७) ९ नोव्हेंबर २०२० :**

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा जुळे सोलापूरतर्फे, देशात आणि परदेशात एकाच वेळी शंभर ठिकाणी प्रकाशित केल्या जाणाऱ्या, साहित्य चपराक पुणे, दिवाळी अंक २०२० चे प्रकाशन सोलापुरात इंडियन मॉडेल स्कूल, जुळे सोलापूरच्या प्रा. ए. डी. जोशी सभागृहात सकाळी ११ वाजता म.सा.प. जुळे सोलापूरच्या पद्माकर कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली, सोलापूर आकाशवाणी केंद्राचे साहाय्यक संचालक श्री.सुनील शिनखेडे यांचे शुभ हस्ते आणि इंडियन मॉडेल स्कूलचे संचालक श्री.अमोल जोशी यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. प्रास्ताविक सागर सुरवसे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी केले. यावेळी कोरोनाचे सर्व नियम पाळून कार्याध्यक्षा सौ.सायली जोशी, उपाध्यक्ष प्रशांत जोशी, कार्यवाह संदीप कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य श्रीकांत कुलकर्णी, रामचंद्र धर्मसाले, सौ.अचला राचर्ला तसेच कवी मारुती कटकधोंड, कवी गोविंद काळे उपस्थित होते.

## पिंपरी चिंचवड

**एप्रिल ते ऑक्टोबर २०२०**

**१) दिनांक ९ ऑगस्ट २०२० : 'सरीवर सरी'**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आयोजित 'सरीवर सरी' कार्यक्रमाचे आयोजन युट्युबवर मंगळवार शनिवार ९ ऑगस्ट २०२० रोजी ४ वाजता करण्यात आले. श्रावणात बरसणाऱ्या रिझमिझ धारांमध्ये आपल्या शब्दांची मुक्त उधळण करत श्रवण करणाऱ्या रसिकांना काव्यधारांनी चिंब चिंब करत अनेक कवी व कवयित्रींनी आपल्या पावसात चिंब झालेल्या कविता ऑनलाईन सादर केल्या. कार्यक्रमाचे उदघाटक मा. प्रवीण तुपे अतिरिक्त आयुक्त पिंपरी चिंचवड हे होते. तर प्रमुख अतिथी मा. रवींद्र बेडकिहाळ म.सा.प. सातारा जिल्हा प्रतिनिधी आणि मा. प्रमोद आडकर कार्यवाह म.सा.प. पुणे हे होते.

कार्यक्रमात राज्यभरातून आलेल्या ३५ कवींनी आपल्या पावसावरील चिंब भिजलेल्या कविता व गाणी सादर करून रसिकांची मने जिंकली. महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड कार्यवाह संजय जगताप यांनी शाखेच्या कार्यक्रमांचा आढावा सादर करून शाखेची ओळख करून दिली तर शाखेचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. सीमा गांधी काव्य विभाग प्रतिनिधी यांनी उत्तम सूत्रसंचालन करून कार्यक्रमात रंगत आणली.

सरीवर सरी कार्यक्रमात सुरेखा कटारिया, मीना शिंदे, संपत गर्जे, प्रतिभा कुलकर्णी, संगीता चव्हाण, जयश्री श्रीखंडे, सुभाष आहेर, सतीश शहा, डॉ. प्रभाकर शेळके, सुनीता परदेशी, प्रमोद येवलेकर, पल्लवी फडणीस, किसान आटोळे, संगीत व्होरा, नेहा चौधरी, इंदिराबाई गणगे, डॉ. राणी खेडीकर, सुधाकर जावळे, स्मिता जोशी, कमल सोनजे, सुप्रिया लाड, अरविंद कुलकर्णी, प्रसाद कालेकर, अपर्णा मोहिले, योगेश्वरी देसाई, मानसी चिटणीस, डॉ. श्वेता मोरे, शालन कळमकर, जनार्दन धुमाळ, मधुश्री ओव्हाळ, अश्विनी कुलकर्णी, संतोष लाटकर, लीलाधर महाजन, डॉ. मीनल लाड, कांचन नेवे, शर्मिला गुडेकर, शुभांगी कामत, मंगला पाटसकर, धीरज जानराव, अभिजीत कोळपे, प्रकाश निर्मल यांनी आपल्या रचना सादर केल्या व कार्यक्रमात रंगत आणली.

सहभागी सर्व कवी, कवयित्रींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**२) दि. १५ सप्टेंबर २०२० : गझल-ए-मैफिल**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आयोजित - गझल-ए- मैफिल कार्यक्रमाचे आयोजन युट्युबवर मंगळवार दि. १५ सप्टेंबर २०२० सायंकाळी ५ वाजता करण्यात आले. विविध अंगाच्या, विविध ढंगाच्या, विविध रंगाच्या गझलांचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. ए. के. शेख ज्येष्ठ गझलकार आणि उद्घाटक मा. तानसेन जगताप अध्यक्ष : म.सा.प. चाळीसगाव म.सा.प शाखा, प्रमुख पाहुणे मा. जयंत येलुरकरः अध्यक्ष रसिक ग्रुप अहमदनगर, प्रमुख कार्यवाह म.सा.प. नगर शाखा, प्रमुख पाहुणे मा. पद्माकर कुलकर्णी; अध्यक्ष जुळे सोलापूर शाखा हे होते.

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड कार्यवाह संजय जगताप यांनी शाखेच्या कार्यक्रमांचा आढावा सादर करून शाखेची ओळख करून दिली, तर शाखेचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. सीमा गांधी काव्य विभाग प्रतिनिधी यांनी संहिता व तांत्रिक बाजू सांभाळली, उत्तम सूत्रसंचालन करून कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमात अनेक

गझलकारांनी आपल्या गझल सादर केल्या.

कार्यक्रमात साबीर सोलापुरी, रघुनाथ पाटील, दीपक करंदीकर, मीना शिंदे, अशोक कोठारी, सीताराम नरके, जयसिंग गाडेकर, माधुरी गयावळ, निलेश शेम्बेकर, डॉ. विजयकुमार माने, मोहन टिपणीस, सूर्यकांत भोसले, रश्मी थोरात, शेखर जोशी, गौरी शिरसाठ, आय के. शेख, सुनेत्रा जोशी, सागर पाटील यांनी आपल्या बहारदार गझल सादर केल्या व रसिकांची मने जिंकली.

**३) दि. २० सप्टेंबर २०२०: राष्ट्रीय कार्य सन्मान**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवडतर्फे राष्ट्रीय कार्याबद्दल प्रकाश निर्मळ व संजय जगताप यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन दि. २० सप्टेंबर २०२० सायंकाळी ५ वाजता करण्यात आले. यावेळी म.सा.प. कार्यालयात सुरक्षित अंतर पाळून झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य मकरंद बापट होते. तसेच म.सा.प. पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष राजन लाखे हे उपस्थित होते. प्रकाश निर्मल हे महाराष्ट्र साहित्य पिंपरी-चिंचवडचे आजीव सभासद असून त्यांनी हिंदी भाषेत 'ल' ऐवजी 'ळ' चा वापर करण्यात यावा यासाठी गेली अनेक महिने शासनाशी पत्रव्यवहार व संपर्क केला व तसे पुरावे सादर केले. अनेक महत्त्वाच्या लोकांशी संपर्क साधून आपली भूमिका पटवून दिली.

भारत देशातील अनेक राज्यांमध्ये हिंदी भाषेत 'ळ' ह्या अक्षराचा वापर केला जातो तरीही प्रशासकीय भाषेत या अक्षराचा स्वीकार केला गेलेला नाही. अखेर अनेक वेळा पाठपुरावा करून त्यांच्या लढ्याला यश आले आणि शासनाने त्यांची ही विनंती मान्य केली व तसे अधिकृत पत्रही दिले आहे. वर्तमानपत्र व दूरदर्शनने ही बातमी प्रकाशित करून त्यांच्या या कामगिरीचे कौतुक केले आहे. त्यांच्या या राष्ट्रीय कार्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

तसेच म.सा.प. पिं. चिं.चे आजीव सभासद असलेले शिक्षक कवी संजय जगताप यांना 'नॅशनल टिचर इनोव्हेशन अॅवॉर्ड' प्राप्त झाल्याने सन्मानित करण्यात आले. अक्षरफुलं हा 'विद्यार्थी काव्यसंग्रह निर्मिती व प्रकाशन' हा नवोपक्रम शाळा तालुका, जिल्हा, राज्य पातळीवर सादर केला. स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च तज्ज्ञांच्या कमिटीने राष्ट्रीय स्तरावर निवडला असून त्यांना 'राष्ट्रीय नवोपक्रम शिक्षक पुरस्कार' प्राप्त झाला आहे. त्यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील कामगिरीबद्दल म.सा.प. शाखेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

म.सा.प. पिं. चिं. कार्यकारिणी सदस्यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमास संस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. मोहन गायकवाड, डॉ. श्रीकृष्ण जोशी, डॉ. मीनल लाड व कवी दत्तू ठोकळे हे उपस्थित होते.

**४) दि. १ ऑक्टोबर २०२० : ज्योतीने तेजाची आरती**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आयोजित महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांचा जन्मदिवस १ ऑक्टोबर रोजी 'गदिमांना मानवंदना' - 'ज्योतीने तेजाची आरती' हा गुरुवार दि. १ ऑक्टोबर ४.३० वाजता घेण्यात आला. यानिमित्त सुप्रसिद्ध कवींची ऑनलाइन यूट्यूब मैफिल घेण्यात आली. महाराष्ट्रातील प्रतिभावंत कवींच्या आवाजात गीतयात्री गदिमांच्या कविता सादर करण्यात आल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील (अध्यक्ष अ. भा. मराठी साहित्य महामंडळ)प्रमुख पाहुणे मा. प्रवीण दवणे (ज्येष्ठ कवी, गीतकार) प्रमुख उपस्थिती मा. प्रा. मिलिंद जोशी (कार्याध्यक्ष म.सा.प. पुणे) हे मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात नामवंत कवी मा. संदीप खरे, मा. अशोक नायगावकर, मा. अशोक बागवे, मा. प्रदीप निफाडकर, मा. अरुण म्हात्रे, मा. इंद्रजित भालेराव, मा. अश्विनी धोंगडे, मा. दासू वैद्य, मा. डॉ. संगीता बर्वे, मा. श्रीधर नांदेडकर, मा. लीनता माडगूळकर यांनी सहभाग घेतला व ग.दि. माडगूळकर यांच्या प्रसिद्ध कविता सादर केल्या. म.सा.प. पिंपरी-चिंचवडचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक त्यांनी स्वतः केले. म.सा.प. शाखा कार्यक्रमांचा आढावा कार्यवाह संजय जगताप यांनी सादर केला. सीमा गांधी यांनी तांत्रिक बाजू सांभाळत उत्कृष्ट सूत्रसंचालन केले, तर कार्याध्यक्षा विनिता ऐनापुरे यांनी सर्वांचे आभार मानले.

**५) दि.१५ ऑक्टोबर २०२०: वाचन प्रेरणा दिन**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवडतर्फे 'वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन' भारताचे मा. राष्ट्रपती व वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त शाखा कार्यालयात दिनांक १५ ऑक्टोबर २०२० रोजी दुपारी ठीक ४ वाजता आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म.सा.प. शाखेचे ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य मकरंद बापट होते. तसेच शाखेचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी प्रास्ताविक केले व आजच्या युगात वाचनाची आवश्यकता सांगितली. यावेळी प्रसिद्ध लेखकांच्या निवडक लेखांचे प्रातिनिधिक वाचन घेण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन तसेच सरस्वती व ग्रंथपूजन करून करण्यात आली. यावेळी मा.डॉ. श्रीकृष्ण जोशी हे लोकमान्य ग्रुप ऑफ हॉस्पिटलचे असोसिएट व्ही.पी. तसेच संस्कार प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य (पिंपरी चिंचवड) आयएसओ मान्यता प्राप्त संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. मोहन गायकवाड व आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र निगडी येथे प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. मीनल लाड, म.सा.प. पिंपरी चिंचवडचे कार्यवाह संजय जगताप, कथालेखक प्रकाश निर्मल व कार्यकारिणी सदस्य मा. दत्तू ठोकळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मकरंद बापट यांनी आपल्या मनोगतातून साहित्य परिषद घेत असलेले विविध कार्यक्रम वाचनास पूरक असून मराठी साहित्यास निश्चित दिशा देणारे व मराठी रसिकांना योग्य मार्ग दाखविणारे असल्याचे सांगितले. वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे कार्य व विचार नेहमीच समाजाला प्रेरणा देत राहतील असे त्यांनी सांगितले.

डॉ. श्रीकृष्ण जोशी, डॉ. मोहन गायकवाड, प्रकाश निर्मल,

डॉ. मीनल लाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह संजय जगताप यांनी केले तर कार्यकारिणी सदस्य दत्तू ठोकळे यांनी आभार मानले.

**६) दि.१८ ऑक्टोबर २०२०: कोरोना योद्ध्यांचा सन्मान**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवडतर्फे समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कोरोना योद्ध्यांचा सन्मान दि. १८ ऑक्टोबर २०२० रविवार रोजी सायंकाळी साडेचार वाजता करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म.सा.प. शाखेचे ज्येष्ठ सदस्य मकरंद बापट होते. तसेच शाखेचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी प्रास्ताविक केले. यातील सन्मानार्थी डॉक्टर सौ. मीनल दीपक लाड गेली तीस वर्षे आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र निगडी येथे प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून काम करत आहेत. आयुर्वेदिक औषधशास्त्र या विषयांमध्ये एमडी आणि पीएचडी आहेत. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संशोधन परिसंवादांमध्ये त्यांनी शोध निबंधांचे वाचन केले आहे. तसेच अनेक रिसर्च जर्नल्समध्ये त्यांचे संशोधनपर लेख प्रसिद्ध झालेले आहेत. वर्षातून दोन वेळा अमेरिका या राष्ट्रामध्ये दहा राज्यांना रुग्ण तपासणीसाठी भेट देतात तसेच तेथे शुद्ध आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार करतात. त्यांच्या महाविद्यालयाचे आयुर्वेद रुग्णालय व स्टर्लिंग मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल निगडी येथे कन्सल्टंट फिजिशियन म्हणून २८ वर्षे रुग्ण तपासणी करत आहेत. रुग्ण तपासणीमध्ये खंड पडलेला नाही. पुण्यातील व पुण्याबाहेरील अनेक कोरोनाग्रस्त रुग्णांना आयुर्वेदाची ट्रीटमेंट देऊन पूर्णतः बरे केलेले आहे. 'कोरोना योद्ध्या' म्हणून त्यांचा सन्मान करण्यात आला.

संस्कार प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य (पिंपरी चिंचवड) आयएसओ मान्यता प्राप्त संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. मोहन गायकवाड यांनी कोव्हिड १९ संकटकालीन समाजसेवा केलेली आहे. यामध्ये १९ मार्च ते २ जुलै कालावधीत सेवेचे १०० दिवस व कोरोना योद्धा प्रशिक्षित कार्यकर्ते १०५, सहभागी कार्यकर्ते ४७, प्रत्यक्ष फिल्ड वर्कमध्ये सहभागी कार्यकर्ते ३८ ( १२ स्त्रिया व २६ पुरुष ) यांना घेऊन आर्थिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उलाढाल अंदाजे ७,८०,००० रुपयांची मदत कोरोना काळात गरजूंना केलेली आहे. यासाठी आर्थिक स्त्रोत कार्यर्त्यांचे वैयक्तिक योगदान तसेच सहृदयी वैयक्तिक देणगीदार-फेसबुक आणि वॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद यामधून उपलब्ध केलेला आहे. वस्तुरूपी साहाय्य तांदूळ, डाळ, कांदे, बटाटे, आटा, गहू, कार्यकर्त्यांसाठी फेसशिल्ड, सॅनिटरी पॅड्स, कापडी मास्क प्राप्त केलेले आहे. प्रथम १९ मार्च २०२० ते ३० एप्रिल २०२० पर्यंत कोरोनाबाबत घ्यावयाची दक्षता अभियान राबविले.

कोरोना जगजागृती अभियान राबवले, तसेच विविध सेवा; अन्न वाटप, शिधावाटप, मास्क वाटप, सॅनिटरी पॅड्स वाटप, होमिओपॅथी अर्सेनिक अल्बम ३० व आयुर्वेदिक आयुष क्वाथं गोळ्या वाटप, रक्तदान-१२ पिशव्या, तातडीची रुग्णसेवा २, गोसेवा-१२ गायीसाठी कडबा कुट्टी दान, नागरीवस्ती सर्प भयमुक्ती -५५ ठिकाणी सर्प पकडून सर्पांना जीवनदान, आपत्कालीन वाहन दुरुस्ती, वाहतुकीसाठी मदत, विलगीकरणाची सोय, थर्मल स्कॅनिंग शिबिर व घरोघरी या माध्यमातून केलेल्या कोविड काळातील सेवेबद्दल त्यांना गौरविण्यात आले.

डॉ. श्रीकृष्ण जोशी हे लोकमान्य ग्रुप ऑफ हॉस्पिटलचे असोसिएट व्ही पी असून गेरियाट्रिक वेलनेस फाऊंडेशनचे फाऊंडर मॅनेजिंग डायरेक्टर आहेत मधुसंचयचे ट्रस्टी आहेत तसेच इंटरनॅशनल योग ट्रेनर आहेत. त्यांचा 'रानफुलं' हा काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. कोविड रुग्णांची सेवा करत स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी अनेकांना जीवनदान दिले आहे. त्यांच्या या कार्याबद्दल म.सा.प. पिंपरी चिंचवडतर्फे कोरोना योद्धा म्हणून गौरविण्यात आले. संजय जगताप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सर्व कोरोना योद्ध्यांनी आपले मनोगत व्यक्त करून समाजासाठी शेवटच्या क्षणापर्यंत लढण्याचे मनोदय असल्याचे सांगितले. कार्यकारिणी सदस्य दत्तू ठोकळे यांनी आभार मानले.

**७) दि.२७ ऑक्टोबर २०२०: संवाद-परिसंवाद**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आयोजित संवाद-परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार दि. २७ ऑक्टोबर २०२० रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता करण्यात आले.

गूगल मीटच्या माध्यमातून हा ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचा विषय होता, 'कोरोना आणि जगण्याचे विश्व- आज आणि उद्याचे' सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. विनोद कुलकर्णी (वृत संपादक पुण्यनगरी) होते, तर प्रमुख पाहुणे प्रा. क्षितिज पाटुकले (ज्येष्ठ साहित्यिक विश्व मराठी संस्थेचे अध्यक्ष) हे होते. कार्यक्रमाचे निवेदन महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी केले. कोरोनामुळे जग हवालदिल झाले आहे. साहित्य, संगीत, शैक्षणिक, न्याय विधी, चित्रपट, उद्योग, सर्व क्षेत्रांवर 'न भूतो न भविष्यति' असा भयंकर परिणाम झालेला आहे. जग आर्थिक दृष्टीने कितीतरी वर्षे मागे गेले आहे. अजूनही संकट संपले नाही आणि यातून मार्ग काढणेही आवश्यक आहे, तर आज काय आणि उद्या काय? हे परिसंवादाच्या माध्यमातून जाणून घेण्यासाठी त्या त्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले होते यामध्ये १. सेन्सॉर बोर्डाच्या मा. अध्यक्षा मा. अपर्णा मोहिले यांनी (कोरोना आणि चित्रपट विश्व) २. ज्येष्ठ संगीतकार मा. नाना दामले यांनी (कोरोना आणि संगीत विश्व) ३. मा. अ‍ॅडव्होकेट. मनाली गाडगीळ यांनी (कोरोना आणि न्यायालयीन विश्व) ४. राष्ट्रीय पुरस्कार विजेते शिक्षक संजय जगताप यांनी (कोरोना आणि शैक्षणिक विश्व) ५. साहित्य परिषद कार्यकारिणी सदस्या मा. माधुरी मंगरुळकर यांनी (कोरोना आणि साहित्य विश्व) या विषयांवर आपले बहुमोल विचार मांडून मार्गदर्शन केले. श्रीमती. विनिता ऐनापुरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व दीपक अमोलिक यांनी आभार मानले. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील रसिकांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड समस्त कार्यकारी मंडळाने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

## भोर

**१. रविवार दि. २९/११/२०२० :** रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा भोर, फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसारक मंडळ भोर, अनंतराव थोपटे महाविद्यालय भोर, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती भोर आणि समविचारी संस्था/संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसार साहित्य संमेलन (ऑनलाईन) २०२० आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष पद्मश्री डॉ. सुखदेव थोरात, उद्घाटक डॉ. धनंजय केसकर, प्रमुख पाहुणे डॉ. रावसाहेब कसबे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष मा. संग्रामदादा थोपटे होते.

या संमेलनात कार्याध्यक्ष डॉ. रोहिदास जाधव, अध्यक्ष मा. विजया पाटील, उपाध्यक्ष हसीना शेख, सुजाता भालेराव, सचिव आनंदा जाधव, खजिनदार कॉं. ज्ञानोबा घोणे, धनंजय कोठावळे, सुजीत चव्हाण, सुनंदा गायकवाड, भालचंद्र सोरटे उपस्थित होते.

संमेलनात डॉ. प्रसन्नकुमार देशमुख आणि डॉ. रोहिदास जाधव संपा. 'मूकनायकचा आवाज' या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. मनोहर जाधव यांच्या हस्ते झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कार्यगौरव पुरस्कार प्राचार्य डॉ. प्रसन्नकुमार देशमुख (राज्यस्तरीय) आणि मा. यशवंत (अप्पा, खुंटे (तालुकास्तरीय) यांना डॉ. मनोहर जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रमुख पाहुणे मा. शाम तागडे होते.

जागतिक पातळीवरील सामाजिक न्यायाचे स्वरूप या परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत बोरकर (युके) आणि डॉ. श्रीमंत कोकाटे (भारत) यांचा सहभाग होता. या संमेलनाचा समारोप ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत उत्तम कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

संमेलनाचे सल्लागार म्हणून डॉ. प्रसन्नकुमार देशमुख, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. सुरेश गोरेगावकर आणि डॉ. अरुण बुरांडे उपस्थित होते. तसेच या संमेलनात प्रा. रविंद्र भालेराव, प्रा. प्रविण कांबळे, आनंदा गायकवाड, अशोक शिंदे, संजय गायकवाड, प्रा. प्रज्वल गायकवाड, निलेश घोडेस्वार, विशाल सावंत, मनिष यादव, योगेश कांबळे, अनुप शिंदे, अमोल भालेराव, राहुल सपकाळ, राहुल गायकवाड, जगदीश गायकवाड, प्रफुल्ल बनसोडे, विनोद हिवराळे, प्रमोद कांबळे, खंडू गायकवाड, शांताराम जगताप, पोपट चव्हाण, मुकींदा तगारे, नितीन मोहिते आणि मुरलीधर कांबळे उपस्थित होते.

◆◆



**मसापचे माजी अध्यक्ष आणि प्रसिद्ध व्यवस्थापनशास्त्र तज्ज्ञ, लेखक व विचारवंत डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली**



# मसापमध्ये मोरेश्वर नांदुरकर स्मृती पुरस्काराचे वितरण





### साहित्य क्षेत्राने काळानुसार बदलायला हवे : श्रीरंग गोडबोले


''एकेकाळी दिवाणखान्यात पुस्तकांनी भरलेले कपाट असणे हे समाजात प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात होते. आता दिवाणखान्यात स्मार्ट टीव्ही असणे हे प्रतिष्ठेचे मानले जात आहे. समाजाची बदलत चाललेली मानसिकता चिंताजनक आहे. अशा काळात वाचन संस्कृती टिकविण्यासाठी साहित्यक्षेत्राने काळानुसार बदलायला हवे,'' असे मत प्रसिद्ध गीतकार आणि निर्माते श्रीरंग गोडबोले यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे आणि नांदुरकर कुटुंबीय यांच्या वतीने संपादन क्षेत्रातील उत्तम कामगिरीसाठीचा यावर्षीचा 'मोरेश्वर नांदुरकर संपादक उत्तेजन पुरस्कार' नीता कुलकर्णी (पुणे) यांना आणि पुस्तकविक्रीच्या उत्तम कामगिरीसाठीचा 'मोरेश्वर नांदुरकर पुस्तक विक्रेता उत्तेजन पुरस्कार' नाशिकच्या पुस्तक पेठेचे निखिल दाते यांना गोडबोले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनीताराजे पवार, कार्यवाह बंडा जोशी, मोरेश्वर नांदुरकर यांच्या पत्नी सुनीता नांदुरकर, मुलगी धनश्री कुलकर्णी, रसिक साहित्यचे शैलेश नांदुरकर आणि सहयोगीचे योगेश नांदुरकर यावेळी उपस्थित होते.


गोडबोले म्हणाले, ''नवे पुस्तक हातात घेऊन वाचणे हा वेगळाच अनुभव असतो. आजच्या वाचकांना ऑडिओ बुकच्या माध्यमातून वाचनाचा आनंद मिळवावा वाटतो. उद्या एखादे नवीन माध्यम आल्यास तेही स्वीकारण्यासाठी साहित्य क्षेत्राने अद्ययावत असायला हवे.''

प्रा. जोशी म्हणाले, ''साहित्याची वृद्धी आणि समृद्धी जसजशी वाढत जाते त्याचा संकलित परिणाम म्हणून निर्मिती आणि वाचन अशा दुहेरी सृजनशील प्रक्रियेत संपादनकार्याची गरज निर्माण होते. संपादित वाङ्मय हे समाजाच्या वाङ्मयीन अभिरुचीची विविधता दाखवते. संपादकांकडे वैचारिक शिस्त, व्यासंग, परखडपणा आणि लेखकाशी सुसंवाद साधण्याचे कौशल्य असायला हवे. गेल्या काही दिवसांपासून गावोगावी होणारी पुस्तक प्रदर्शने बंद पडली आहेत. ती सुरू होण्यासाठी लेखक, प्रकाशक, विक्रेते आणि साहित्य संस्थांनी एकत्र यायला हवे, महाराष्ट्र साहित्य परिषद त्यासाठी पुढाकार घेईल.'' कार्यक्रमाच्या उत्तरार्धात मिलिंद कुलकर्णी यांनी नीता कुलकर्णी आणि निखिल दाते यांच्याशी संवाद साधला. उमेदीच्या काळात मिळालेल्या या पुरस्कारामुळे कामाचा हुरूप वाढेल अशी भावना त्यांनी व्यक्त केली. प्रकाश पायगुडे यांनी प्रास्ताविक केले. शैलेश नांदुरकर यांनी पुरस्कारामागची भूमिका सांगितली. सुनीताराजे पवार यांनी आभार मानले.

Maharashtra Sahitya Patrika Quarterly : December 2020
Registered with the Register of Newspaper for India under No 6398/57
Book Pkt. Periodical category. Publishing Date : 31 December 2020


# पुस्तक सूची

| | |
|---|---|
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : | रु. ५००/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) : | रु. ७००/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) : | रु. ७००/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : | रु. ३५०/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : | रु. ४००/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : | रु. ३५०/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : | रु. ३५०/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : | रु. ३५०/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : | रु. ३००/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : | रु. ७००/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : | रु. ८००/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : | रु. ७००/- |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : | रु. ७००/- |
| भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : | रु. ८००/- |
| भाषा व साहित्य संशोधन खंड १ : | रु. ५००/- |
| भाषा व साहित्य संशोधन खंड २ : | रु. ३००/- |
| भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : | रु. २००/- |
| म. सा. पत्रिका लेख - सूची : | रु. ४००/- |

## सर्व खंड २५ टक्के सवलतीत !

## महाराष्ट्र साहित्य परिषद

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष : ०२०- २४४७ ५९ ६३


प्रेषक ।
**प्रमुख कार्यवाह,**
**महाराष्ट्र साहित्य परिषद,**
टिळक रस्ता, पुणे ४११०३०,
दूरभाष : ०२०-२४४७ ५९ ६३